# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

(सत्र ३ : पेपर ४)

# भारतीय राजकीय विचार

**(Indian Political Thought)**

(सत्र ४ : पेपर ६)

# भारतीय राजकीय विचार

**(Indian Political Thought)**

(शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून)

**बी. ए. भाग-२ राज्यशास्त्र**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०२१

बी. ए. (राज्यशास्त्र) भाग-२ पेपर ४ व ६ करिता

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ८००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-02-4

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एम. सरवदे** (सदस्य सचिव)
प्र-संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र ■**

अध्यक्ष – **प्रा. डॉ. श्रीमती भारती तुकाराम पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. डॉ. प्रकाश पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर**
  के.आर.पी. कन्या महाविद्यालय, उरुण–इस्लामपूर,
  जि. सांगली
- **डॉ. एस. जी. कुंभार**
  राजा श्रीपतराव भगवंतराव कॉलेज, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. आर. आर. कांबळे**
  कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स अॅण्ड
  एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, जि. कोल्हापूर
- **डॉ. अनिता संजिव कणेगांवकर**
  डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, महालक्ष्मी मंदीर जवळ,
  कोल्हापूर
- **डॉ. शिवाजी सुबराव पाटील**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्राचार्य डॉ. शिरिषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा
- **प्रा. डॉ. श्रीमती उत्तरा सहस्त्रबुद्धे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **डॉ. मृदुल निळे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. ए. एस. चौसाळकर**
  आर. के. नगर हौसिंग सोसायटी,
  एमएसईबी ऑफीस समोर, कोल्हापूर
- **श्री. वैभव नायकवडी**
  हुतात्मा किसन अहिर शुगर मिल, वाळवा,
  जि. सांगली
- **श्री. दशरथ विठोबा पारेकर**
  फ्लॅट नं. ५०८, एव्हरग्रीन होम्स, फेज–४,
  टॉवर डी, प्रभू हॉस्पिटल रोड, नागाळा पार्क, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात आणण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

बी. ए. भाग २ च्या राज्यशास्त्र विषयाच्या ऐच्छिक पेपर क्रमांक ४ सत्र-३ व पेपर क्रमांक ६ सत्र ४ भारतीय राजकीय विचार हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. रविंद्र भणगे, राज्यशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे आम्ही आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण केंद्राचे प्र-संचालक प्रा. डॉ. ए. एम. सरवदे दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**प्रा. डॉ. भारती पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. शार्दूल माणिकराव सेलूकर**
विठ्ठलराव पाटील आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स
कॉलेज, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सत्र–३ : पेपर–४ : भारतीय राजकीय विचार**
**सत्र–४ : पेपर–६ : भारतीय राजकीय विचार**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–३ : पेपर–४ : भारतीय राजकीय विचार** | |
| **प्रा. आंगद नरसगौंडा पाटील**<br>कर्मवीर भाऊराव पाटील आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, कळे<br>ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | १ |
| **प्रा. डॉ. भारती पाटील**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |
| **डॉ. विजय एस. पानस्कर**<br>बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. पाटण, जि. सातारा | २ |
| **प्रा. अनिल मोहिते**<br>एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर | ४ |
| **सत्र–४ : पेपर–६ : भारतीय राजकीय विचार** | |
| **डॉ. निळकंठ लोखंडे**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, जि. सातारा | १ |
| **डॉ. पांडूरंग विष्णू पाटील**<br>प्रा. संभाजीराव कॉलेज, देऊर, ता. कोरेगाव, जि. सातारा | २ |
| **डॉ. सूर्यकांत लकाप्पा गायकवाड**<br>'कर्मवीर छाया' बॅरिस्टर पी. जी. पाटील बंगल, ५२९ अ पारसनीस कॉलनी,<br>पवई नाका, सातारा, जि. सातारा | ३ |
| **डॉ. शार्दूल माणिकराव सेलूकर**<br>विठ्ठलराव पाटील आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, कळे,<br>ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. भारती पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. शार्दूल माणिकराव सेलूकर**
विठ्ठलराव पाटील आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स
कॉलेज, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **पेपर–४ : सेमिस्टर–३** | |
| | **भारतीय राजकीय विचार** | |
| १. | कौटिल्य | १ |
| २. | महात्मा जोतिराव फुले | ३३ |
| ३. | न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे | ४७ |
| ४. | लोकमान्य टिळक | ६५ |
| | **पेपर–६ : सेमिस्टर–४** | |
| | **भारतीय राजकीय विचार** | |
| १. | महात्मा गांधी | ९१ |
| २. | जवाहरलाल नेहरू | ११६ |
| ३. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | १३१ |
| ४. | मानवेंद्रनाथ रॉय | १५० |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१९-२० पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# कौटिल्य


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ राज्यविषयक विचार

राज्याचा उदय

सप्तांग सिद्धांत

१.२.२ राजा व राजाचे प्रशासन

राजाचे गुण, दिनचर्या व कर्तव्ये

राजाचे प्रशासन

मंत्रीपरिषद

१.२.३ मंडल सिद्धांत व षाडगुण सिद्धांत

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्न

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्टे

प्रस्थापित पाश्चिमात्य राजकीय विचारांचा अपवाद वगळता प्राचीन भारतीय राजकीय विचार हा विश्वातील एक महत्त्वाचा राजकीय विचार आहे. हजारो वर्षे भारतीय राजकीय विचारांची ही परंपरा अव्याहतपणे सुरू होती. राज्यसंस्था, शासनसंस्था, व्यक्ती, आंतरराज्य संबंध व अन्य राजकीय प्रश्नांच्या संबंधीही भारतीय राजकीय विचारकांनी स्वतंत्रपणे विचारांची मांडणी केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत भारतीय विचारवंतानी स्वतःची अशी व्यवस्था अस्तित्वात आणली. प्रशासकीय व्यवस्था व आंतरराष्ट्रीय राजकारण यासंबंधीही भारतीय राजकीय विचार परंपरेने समाजास एक नवे वळण दिले. त्यामुळे या विचारपरंपरेत कौटिल्य व त्याने मांडलेल्या राजकीय विचारांना राज्यसंस्थेचे संघटन कसे करावे, प्रशासन व्यवस्था कशा प्रकारे काटेकोरपणे विवेचन केलेले आहे. कौटिल्याने आपल्या न्यायव्यवस्थेत न्यायाबरोबरच गुन्ह्याच्या शोधातही न्यायाधीशाने लक्ष घालावे असे सुचविले आहे. आंतरराज्यसंबंधााबत विवेचन करताना कौटिल्यने विजिगीषू राजाला मंडलाचा स्वामी होण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. राज्यातील प्रशासनव्यवस्था, मंत्रिपरिषद, सप्तांग यांचेही त्याने विस्तारपूर्वक विवेचन केलेले आहे. कौटल्याने आपली मते मांडत असताना आपल्या पूर्वसूरींच्या मतांचा आधार घेतल्यामुळे कौटिल्यपूर्व राजकीय विचारांचा अभ्यासही आपणाला करता येतो. प्रस्तुत प्रकरणात कौटिल्याच्या राजकीय विचारांचा विस्तृतपणे आढावा घेऊन त्याच्या विचारांची समकालीनता व मूल्यमापन केले जाणार आहे.

## १.१ प्रास्ताविक

प्राचीन भारतीय राजकीय विचारांना एक प्रदीर्घ अशी परंपरा लाभलेली आहे. या विचारांची सुरुवात वैदिक वाङ्मयातील अर्थवेदाच्या 'राजकर्मणि' विभागातून होते. ब्राह्मणग्रंथांमध्येही राजसूय यज्ञ व सौत्रामणी यज्ञ यांच्या संदर्भात राजकीय विचारांची मांडणी करण्यात आलेली आहे. प्राचीन भारतीय राजकीय विचारांची सुरुवात इ.स.पू. सहाव्या शतकात झाल्याचे अनेक अभ्यासकांचे म्हणणे आहे. त्यापूर्वीही राजकीय विचार मांडले जात असणार आहेत. मात्र त्या विचारांनी धर्म व नीतीपासून स्वतंत्र अस्तित्व धारण केलेले नव्हते. इ.स.पू. सहाव्या शतकात भारतात जी एक प्रचंड सामाजिक क्रांती झाली. त्यातून नव्या विचारांची निर्मिती होण्यास सुरुवात झाली. प्राचीन भारतात राज्यशास्त्रात 'अर्थशास्त्र' म्हणून संबोधले जात होते. दंडनीती, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र ही प्राचीन भारतातील राज्यशास्त्राची विविध नावे आहेत. प्राचीन भारतात राज्यशास्त्राच्या तीन परंपरा अस्तित्वात होत्या. त्या म्हणजे (१) अर्थशास्त्र, (२) धर्मशास्त्र, (३) बौद्ध या तीन परंपरा स्वतंत्रपणे कार्यरत होत्या. अर्थशास्त्र परंपरा विशिष्ट अशा अर्थशास्त्र अभ्यासकांनी विकसित केली होती. कौटिल्यही अर्थशास्त्र परंपरेचाच पाईक होता. ही विचारपरंपरा संपूर्णतः ऐहिक व भौतिकवादी होती. तिचा उदय लोकायतांच्या जडवादी तत्त्वज्ञानापासून झाला होता.

भारतीय समाजाला राजकीय विचारांची एक गौरवशाली परंपरा लाभलेली आहे. अगदी वैदिक कालखंडापासून राजकीय विचारांची मांडणी केली जात असल्याचे दिसून येते. प्राचीन पाश्चात्त्य राजकीय

विचारांची सुरुवात ग्रीक संस्कृतीच्या काळात झाल्याचे दिसून येते. मात्र भारतीय परंपरा ही त्याहूनही अधिक प्राचीन आहे. वैदिक वाङ्मयातील अनेक ब्राह्मण ग्रंथात राजकीय विचार दिसून येतात. महाभारतातील 'शांतीपर्व' हा भाग पूर्णतः राजकीय विचारांसाठीच वाहिलेला आहे. याशिवाय मनू, याज्ञवल्क्य, नारद या स्मृतीमधून आणि गौतम, बोंधायन आणि नारद इत्यादी धर्मसूत्रातून राजकीय विचारांची मांडणी केल्याचे दिसून येते. तरीही अगदी आधुनिक काळातील पाश्चात्त्य व भारतीय राजकीय अभ्यासकही असे म्हणत होते की भारतात राजकीय विचारांचा पद्धतशीर व स्वतंत्रपणे अभ्यास झाला नव्हता. हा समज होण्याचे मुख्य कारण म्हणजे वेद, महाभारत, श्रुती, धर्मसूत्रे यांमधील राजकीय विचार हे धर्मग्रंथाचा किंवा तत्त्वज्ञानाचा एक भाग म्हणून मांडले गेले होते. यातील राजकीय विचार हे एकत्रित नसून विखुरलेले होते व त्यात सुसंगतीचा अभाव होता. त्यातून एका नवा राजकीय सिद्धांत निर्माण होऊ शकत नव्हता. एकाच परंपरेतील विचारांमध्ये एकवाक्यतेचा अभाव होता. त्याबरोबरच या विचारांमध्ये धर्म व राजकारण यांची सांगड घातली गेली होती. राज्य व शासन यांचा विचार धार्मिक दृष्टीकोणातून केला जात होता. मॅक्समुल्लरसारख्या पाश्चात्त्य विद्वानांनी भारतीय संस्कृतमधील तत्त्वज्ञान, अध्यात्म, धर्म, वाङ्मय यावर लक्ष केंद्रीत केल्यामुळे राज्यशास्त्रासारख्या सामाजिक शास्त्रात भारतीयांनी फारसे योगदान दिले नाही असे म्हटले.

१९०५ साली म्हैसूरच्या पौर्वात्य ग्रंथालयाचे अधिकारी श्री. शामशास्त्री यांना कौटिल्य लिखित 'अर्थशास्त्र' ग्रंथाची एक प्रत मिळाली व ती त्यांनी प्रसिद्ध केली. ही प्रत प्रसिद्ध होईपर्यंत कौटिल्याच्या अर्थशास्त्राची प्रत्यक्ष माहिती आधुनिक राजकीय अभ्यासकांना नव्हती. या ग्रंथाच्या उपलब्धतेमुळे प्राचीन भारतात राज्यशास्त्राचा स्वतंत्रपणे विचार केला गेला नव्हता. हा समाज खोटा ठरला. कारण कौटिल्याचा हा ग्रंथ पूर्णतः राजनितीला वाहिलेला आहे. यानंतर इतर अनेक विद्वानांनी यासंबंधी अधिक माहिती मिळविण्यासाठी संशोधन सुरू केले व त्यामुळे अर्थशास्त्रावर अनेक टिकात्मक व संपादित ग्रंथ प्रकाशित झाले. त्रिवेंद्रम येथील महामहोपाध्याय गणपतीशास्त्र यांनी अर्थशास्त्राच्या आणखी काही प्रती मिळविल्या. तसेच अर्थशास्त्रावरील प्राचीन टिकांचा शोध केला. डॉ. जॉली यांनीही अर्थशास्त्राची आणखी एक प्रत प्रसिद्ध केली. या संशोधनामुळे प्राचीन काळी राज्यशास्त्रावर स्वतंत्रपणे व पद्धतशीरपणे अभ्यास केला गेला होता. ही गोष्ट तर स्पट झालीच, शिवाय आणखीही अनेक दृष्टींनी हा ग्रंथ महत्त्वाचा ठरला. अर्थशास्त्रामध्ये राजनीति आणि धर्म यांची एकमेकांपासून फारकत करून राजाला प्रस्थापित केलेले आहे. एकप्रकारे धर्माच्या जोखडातून राजनीतिला स्वतंत्र करण्याचे कार्य या ग्रंथाने केले. त्यामुळे प्राचीन काळातील इतर ग्रंथामधील राजकीय विचारांहून कौटिल्याचे विचार वेगळे ठरतात. कौटिल्यानंतर पुढे १०००/२००० वर्षे राजनीतिशास्त्रावर जे अनेक ग्रंथ भारतात लिहिले गेले. त्यावर कौटिल्याच्या अर्थशास्त्राचा सर्वाधिक प्रभाव दिसून येतो. कारण कौटिल्याने राज्याच्या सर्व अंगाचा व घटकांचा समग्रपणे आढावा घेतलेला होता.

*** कौटिल्याचा कालखंड**

अर्थशास्त्राचा कर्ता कौटिल्य हा आर्य चाणक्य हे त्याचे मूळ नाव असावे. चाणक्य हे नाव त्याला त्याच्या घराण्यावरून पडलेले असावे किंवा चणक नावाच्या गावावरून पडलेले असावे. कुटील नीतिचा वापर करणारा

तो 'कौटिल्य' अशा अर्थाने विशाखादत्ताने आपल्या 'मुद्राराक्षस' या नाटकात हे नाव वापरले व ते पुढे दृढ झाले. हे नाव 'कौटिल्य' असे नसून 'कौटिल्य' असावे असे अनेक विद्वानांचे मत आहे. श्री. गणपती शास्त्री यांच्या मते 'कुटल' या गोत्रावरून 'कौटल्य' हे नाव पडलेले असावे. मद्रास येथे सापडलेल्या हस्तलिखितात 'कौटल्य' असाच उल्लेख आहे. परंतु श्री. शामशास्त्री यांनी संपादित केलेल्या प्रतीत 'कौटिल्य' हे नाव वापरलेले आहे आणि तोच परिपात आजमितीपर्यंत सुरू आहे.

कौटिल्याचा कालखंड निश्चितपणे कोणता याबाबत विद्वानांत एकवाक्यता नाही. मात्र परंपरेने सुप्रसिद्ध मौर्य सम्राट चंद्रगुप्त याचा मुख्य प्रधान व मार्गदर्शक कौटिल्याच्याच मदतीने आणि सल्ल्याने नंद घराण्याची राजवट उलथवून टाकून त्याच्या जागी मौर्य घराण्याची राजवट प्रस्थापित केला असे समजले जाते. यावरून इ.स.पू. ४ थे शतक हाच कौटिल्याचा कालखंड होय हे स्पष्ट होते कारण चंद्रगुप्त इ.स.पू. ४ थ्या शतकातच होऊन गेला. याबाबत अभ्यासकांत एकमत आहे.

*** कौटिल्याचे अर्थशास्त्र**

अर्थशास्त्र हा ग्रंथ चंद्रगुप्त मौर्याचा प्रधान कौटिल्य यानेच लिहिलेला आहे याबाबत बहुतेक विद्वानांमध्ये एकमत आहे. कौटिल्यप्रणीत अर्थशास्त्र हा ग्रंथ मध्यंतरीच्या काळात तो पूर्णपणे विस्मरणात गेला होता. १९०५ साली डॉ. शामशास्त्री यांना तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयात तो उपलब्ध झाला. १९०९ साली ग्रंथनिश्चिती व काळनिश्चिती हे सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर तो १९१० साली प्रकाशित करण्यात आला. १९१४ साली त्याचे इंग्रजी भाषांतर प्रकाशित करण्यात आले. तेव्हापासून प्राचीन भारतीय राजकीय विचारांबद्दल विद्वानांच्या मनात निर्माण झालेले कुतूहल आजपर्यंत टिकून आहे. या ग्रंथावरील झालेल्या चर्चेत जी मतमतांतरे व्यक्त झाली, त्यामुळे भारतीय राजकीय जीवनाविषयी अनेक गैरसमज दूर होण्यास मदत झाली. अर्थशास्त्रात राजकारणाशी संबंधित असलेल्या अनेक महत्त्वाच्या प्रश्नांचा ऊहापोह करण्यात आला असून त्यांची तपशीलवार चर्चा करण्यात आलेली आहे.

कौटिल्याच्या अर्थशास्त्राचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, त्या ग्रंथात कौटिल्याने राजकीय तत्त्वज्ञानाची विस्तारपूर्वक चर्चा केलेली नसून दैनंदिन राज्यकारभारतात राजापुढे निर्माण होणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक त्याने कशा प्रकारे करावी याविषयी मार्गदर्शनपर सल्ला दिलेला आहे. कौटिल्य हा मनोराज्यमयी, स्वप्नाळू तत्त्वज्ञ नव्हता तर तो एक वास्तववादी व व्यवहारवादी राजकीय विचारक होता. त्यामुळे त्याने राजकारणातील सर्व समकालीन समस्यांचा विचार वास्तववादी दृष्टिकोनातून केला आहे. राजाने राज्याचा सर्व कारभार कशा प्रकारे चालवावा, राजाचे आपल्या मंत्र्यांशी, प्रजेशी, सैन्याशी कशा प्रकारचे संबंध असावेत, राजाने राज्य चालविताना स्वतःच्या नजरेसमोर कोणती उद्दिष्टे ठेवावीत, राज्याची प्रशासनव्यवस्था, न्यायव्यवस्था, गुप्तहेर व्यवस्था यांची व्यवस्था कशी ठेवावी, तसेच त्याने आपले परराष्ट्र धोरण कोणत्या प्रकारे व कोणत्या घटकांच्या आधारे निर्धारित करावे इत्यादी प्रश्नांचे विवेचन कौटिल्याने अतिशय विस्तृतपणे व समग्रपणे केलेले आहे. या सर्व गोष्टींमधून कौटिल्याने व्यावहारिक राजकारणाचे किती बारकाईने अध्ययन केले होते याचे आकलन करता येते.

कौटिल्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याने राजकारणाला नैतिकता व धर्म यांपासून स्वतंत्र केले होते. कौटिल्य राजकीय विचारांची नैतिक व धार्मिक विचारांशी गफलत होऊ देत नाही. राजकीय प्रश्नांची सोडवणूक व्यवहारवादाच्या कसोटीवरच केली गेली पाहिजे असा त्याचा आगह आहे. त्यामुळे राजाने राज्यहितासाठी केलेली कोणतीही कृती नैतिक-अनैतिक आहे की नाही याचा तो फारचा विचार करत नाही. राजाने केलेल्या प्रत्येक कृतीचा एकमेव निकष तो राज्यहितच असले पाहिजे असे सुचवितो. म्हणजेच त्याने नैतिक-अनैतिक, न्याय-अन्याय, सत्य-असत्य याऐवजी राज्यहितालाच सर्वोच्च प्राधान्य दिले होते.

कौटिल्याने अर्थशास्त्रात राज्यासंबंधीच्या अनेक घटकांचा सूक्ष्मपणे विचार केलेला आहे. अर्थशास्त्रात एकूण ६००० श्लोक असून त्यात १५ अधिकरणे किंवा विषयविभाग, १५० प्रकरणे आणि १८० विभाग आहेत. या ग्रंथामधील १५ अधिकरणांमध्ये १५ वेगवेगळ्या उदा. शिक्षण कायदा, न्याय व्यवस्था, गुन्हेगारांवरील उपाययोजना, मंत्रीमंडळाची कार्य, युद्ध, आपत्ती निवारण इत्यादी विषयांची विस्तारपूर्वक चर्चा कौटिल्याने केलेली आहे.

वरील सर्व विषयांवर केवळ दृष्टीक्षेप टाकल्यास कौटिल्याने राजनीतिशास्त्राची किती सखोलपणे मीमांसा केलेली आहे हे लक्षात येते. कौटिल्याच्या अर्थशास्त्राविषयी र. पं. कंगले असे म्हणतात की, ‘‘ग्रंथातील विवेचनाचे स्थूलमानाने दोन भाग पडतात. एक अंतर्गत राज्यव्यवस्था व दुसरा परराष्ट्र संबंधाविषयीचा. या दोन्ही भागातील विवेचन इतके परिपूर्ण आहे की, विषयाची कोणतीही अशी बाजू नाही की, जिची सविस्तर चर्चा केली गेलेली नाही. राजनीती-शास्त्रावरील सर्वात प्राचीन ग्रंथ इतकेच याचे महत्त्व नसून सर्वांग परिपूर्ण आणि मौलिक स्वरूपाचा म्हणूनही हा ग्रंथ महत्त्वाचा ठरतो.

कौटिल्याने अर्थशास्त्रात एकूण चार प्रकारच्या विद्या गृहीत धरलेल्या आहेत. त्याच्या मते, राजाने या चारही विद्यांचे सूक्ष्मपणे अध्ययन करावे.

१. **आन्वीक्षकी** : सांख्य, योग व लोकायत यांचे तत्त्वज्ञान

२. **त्रयी** : तीन वेद, सहा वेदांगे व इतिहास

३. **वार्ता** : कृषी, गोरक्ष व वाणिज्य

४. **दंडनिती** : राजनीतीशास्त्र, कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी निर्माण झालेले शास्त्र (चतुरंग सैन्य)

पहिल्या तिन्ही शास्त्रांची अंमलबजावणी व प्रगती दंडनीतीवर अवलंबून आहे. काहीही प्राप्त करण्यासाठी, मिळालेल्या किंवा मिळविलेल्या गोष्टींचा उपभोग घेण्यासाठी, त्यात वाढ करण्यासाठी, झालेल्या लाभाचे सुव्यवस्थितपणे वितरण करण्यासाठी दंडाची आवश्यकता असते. दंडनीतीवरच विश्वातील प्रगतीचा मार्ग सुकर होतो. मात्र दंडाचा वापर अधिक काळजीपूर्वक केला पाहिजे. कारण जो राजा कठोरपणे शासन करतो,

त्या राजाबद्दल लोकांमध्ये द्वेषभावना निर्माण होते. जो राजा अगदी सौम्यशासन करतो तो अवहेलनेस पात्र होतो. कारण प्रजा त्याला कमकुवत, दुर्बल समजते. पण जो राजा यथायोग्य शासन करतो तो प्रजेच्या कौतुकास पात्र होतो. म्हणून राजाने अकारण व गरजेपेक्षा अधिक शासन करू नये. तसेच अन्यायी व्यक्तीला शिक्षेअभावी सोडूही नये. दंडाअभावी समाजात मात्स्यन्याय निर्माण होतो. दंडाच्या योग्य वापरामुळे लोक चातुर्वर्ण्य व्यवस्थेनुसार व्यवहार करतील व आपापली कार्ये कर्तव्यनिष्ठेने पार पाडतील. राजाने या सर्व शास्त्रांचे अध्ययन तज्ज्ञ गुरूंच्या मार्गदर्शनाखालीच केले पाहिजे आणि त्यानुसार आचरण केले पाहिजे. १६ व्या वर्षापर्यंत राजपुत्राने ब्रह्मचर्याचे पालन करावे. त्याने नेहमी वृद्ध तज्ज्ञ गुरूंच्या सानिध्यात राहून ज्ञानप्राप्ती केली पाहिजे. दुपारच्या वेळी त्याने युद्धशास्त्राचे अध्ययन करावे. हत्ती, घोडे, रथ, शस्त्रास्त्रे यांची माहिती घ्यावी. सायंकाळी पुराणे, इतिहास, आख्यायिका ऐकाव्यात. जो राजा अशाप्रकारे ज्ञान प्राप्त केलेला असेल, तो प्रजेला उत्तम शासन देईल आणि सर्वांना सुखी ठेवू केल. राजाने क्रोध, मोह, लोभ, मान, मद व हर्ष या षड्रिपूंवर विजय मिळविलेला असावा. कौटिल्याने अनेक राजांची उदाहरणे देऊन इंद्रियनिग्रहाऐवजी त्यांचा कशा प्रकारे विना झाला याचे वर्णन केले आहे.

### १.२.१ राज्यविषयक विचार

#### * राज्याचा उदय

कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात राज्यशास्त्रातील अनेक मूलभूत समस्यांची विस्ताराने व सूक्ष्मपणे चर्चा केलेली आहे. स्वाभाविकपणे राज्यनिर्मितीसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा होणे अतिशय अगत्याचे होते. मात्र कौटिल्याने राज्याच्या उदयासंबंधी कोणत्याही नव्या सिद्धांताचे प्रतिपादन न करता आपल्या पूर्वसुरींच्या ग्रंथातील विचारांच्या आधारेच आपली मते मांडलेली आहेत. कारण कौटिल्यपूर्व काळातील वैदिक वाङ्मय, महाभारत यामध्येही राज्याच्या उदयासंबंधी चर्चा करण्यात आली होती. कौटिल्याचे विचार हे प्रामुख्याने 'राजा व त्याचे प्रशासन' यांच्याशी संबंधित आहेत. त्यामुळे राज्याचा उदय व स्वरूपासंबंधीचे सिद्धांत याविषयी विस्तृत विवेचन अर्थशास्त्रात आढळत नाही.

प्राचीन भारतीय राजकीय विचारांचा मागोवा घेतला तर असे लक्षात येते की, राज्याच्या उदयासंबंधीचे सिद्धांत हे वास्तवतः राजाच्या किवा राजपदाच्या उदयासंबंधीचे सिद्धांत आहेत. वैदिक काळातील ब्राह्मणग्रंथात राज्याच्या उदयासंबंधीच्या अनेक कल्पना स्वीकारण्यात आल्या होत्या. तसेच महाभारताच्या शांतीपर्वातील राजधर्म पर्वात राज्याच्या उदयासंबंधीचे दोन वेगवेगळे सिद्धांत मांडण्यात आले होते. आपल्या पूर्वीच्या अनेक ग्रंथात मांडलेल्या विचारांचा आधार घेऊनच कौटिल्याने आपला राज्याच्या उदयासंबंधीचा सिद्धांत मांडलेला आहे. कौटिल्याचा हा सिद्धांतही राज्याच्या उदयाच्या अन्य सिद्धांताप्रमाणे काल्पनिक किंवा गृहीतकावर आधारलेला आहे.

कौटिल्याच्या मते, पृथ्वीवर सर्वत्र अराजकता, मात्स्यन्याय, बळी तो कान पिळी हा न्याय निर्माण झाला होता. म्हणजेच समाजात कोणत्याही प्रकारची कायद्याची व्यवस्था नव्हती. या अव्यवस्थेला कंटाळून लोकांनी मनूची राजा म्हणून नेमणूक केली. यावेळी मनू व लोक यांच्यात झालेल्या करारात काही अटी एकमेकांनी निर्धारित केल्या. राजाने लोकांच्या जीवित व वित्ताचे रक्षण करावयाचे व त्या मोबदल्यात लोकांनी त्याला धान्याचा १/६ हिस्सा, व्यापारातील व सोने यांच्या उत्पन्नाचा १/१० हिस्सा देण्याचे मान्य केले. या उभयपक्षी करारातून राज्याची निर्मिती झाली असे कौटिल्य म्हणतो. राजा व लोक या दोघांनी एकमेकांवर घातलेल्या अटींचे पालन करण्याची जबाबदारी दोन्ही पक्षांची आहे. कौटिल्याने राजेशाही शासनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. परंतु गणराज्य पद्धतीलाही त्याने नकार दिलेला नाही. गणराज्ये ही सुद्धा सामर्थ्यवान असतात यावर त्याचा विश्वास होता. परंतु त्या काळी गणराज्यांची संख्या अगदी नगण्य होती. राजेशाही शासनपद्धती सर्वमान्य व रूढ झाली होती आणि कौटिल्यानेही त्याचाच पुरस्कार केला होता.

प्राचीन भारतातील अन्य ग्रंथातील राज्याच्या उदयाच्या सिद्धांताप्रमाणेच कौटिल्यानेही राज्याच्या उदयाचा सिद्धांत मांडलेला आहे. युरोपमधील हॉब्ज, लॉक व रुसो या सामाजिक करारवादी विचारवंतांच्या सिद्धांतात व कौटिल्याच्या सिद्धांतात बरेच साम्य दिसून येते. कौटिल्याने अत्यंत प्रबळ व एकात्म अशा राजेशाहीचा पुरस्कार केलेला होता. राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे हे राजाचे प्रधान कर्तव्य आहे असे कौटिल्य म्हणतो. समाजामध्ये अव्यवस्था निर्माण करणाऱ्या समाजकंटकांचा बंदोबस्त राजाने केला पाहिजे. राजा आपला अधिकार गाजवितो तो दंडाच्या आधारावर. ज्याच्या योगाने राज्य सुव्यवस्थित चालते ते साधन म्हणजे दंड होय. अर्थात राजाने दंडाचा वापर करताना तारतम्य बाळगावे. दंडाचा वापर अगदी सौम्यपणे किंवा अगदी कठोरपणे करू नये. दंडाचा अतिरेकी वापर झाला तर राजाबद्दल लोकांमध्ये असंतोष उत्पन्न होतो व कार्यनाश होतो. याऊलट दंडाचा वापर अतिसौम्य झाला तर लोक राजाला दुर्बल किंवा कमजोर समजतात आणि राजरोसपणे राजाज्ञांचे उल्लंघन करू लागतात. म्हणून राजाने दंडाचा वापर विचारपूर्वक करावा. राज्यात केवळ शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे इतकेच राजाचे कर्तव्य आहे असे मानले नाही तर प्रजेचा योगक्षेम चालविण्यास त्याने अग्रक्रम दिले आहे. नैसर्गिक आपत्तींपासून राज्याचे संरक्षण, दुष्काळ, विषारी जीवाणू आणि रोगराईपासून रक्षण, भाववाढ नियंत्रण, शेतीविकास अशी कामे करणे ही राजाची कर्तव्ये आहेत व त्यांची पूर्ती राजाने करावी अशी अपेक्षा कौटिल्य करतो.

### * सप्तांग सिद्धांत

उत्तर वैदिक काळातील वाङ्मय आणि ब्राह्मणग्रंथ यामध्ये कर्मकांडाचे सैद्धांतिकरण झाले असले तरी 'राज्य' या संकल्पनेची निश्चित व्याख्या वेदिकोत्तर वाङ्मयात व पूर्वकालीन धर्मसूत्रातून मिळत नाही. कारण त्या काळापर्यंत राज्यसंस्था भक्कम व मजबूत पायावर उभी राहिलेली नव्हती. बौद्ध काळात कोसल व मगध या सुसंघटित राज्यांचा उदय झाल्यानंतर राज्यात सप्त प्रकृती असतात अशी त्याच्या कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात प्रथमच केली व पुढील काळातील राजकीय विचार व साधनांमध्ये ती प्रस्थापित तत्त्व

म्हणून मानली गेली. कौटिल्याने स्वामी, अमात्य, जनपद, दुर्ग, कोश. दंड आणि मित्र अशा सात प्रकृती सांगितलेल्या आहेत. प्राचीन भारतातील राजनीतीवरील बहुतेक सर्व ग्रंथांमध्ये या सात अंगाविषयी निर्देश केलेला आहे. परंतु काही ठिकाणी काही अंगांचे प्रतिशब्द भिन्न-भिन्न आहेत. कौटिल्याने मांडलेला राज्याचा सप्तांग सिद्धांत खालीलप्रमाणे :

**१. स्वामी** : 'राजा' या संकल्पनेऐवजी कौटिल्याने उपयोजिलेली 'स्वामी' ही संकल्पना अधिक समर्पक वाटते. स्वामी म्हणजे शासनातील किंवा राज्यातील प्रमुख व्यक्ती होय. ती उच्चकुळात जन्मलेली, उत्तम चारित्र्याची, योग्यरित्या शिक्षण घेतलेली, सत्यवचन, शिस्तप्रिय, शूर, साहसी, संयम, कर्तव्यपरायण, शेजारील राजांना आपल्या नियंत्रणात ठेवणारी असली पाहिजे. त्याचे विचार, कर्तुत्व आणि बुद्धी ही लोकहितासाठीच अर्पण केलेली असली पाहिजे. कर्तव्यापासून दूर जाणारे, हुकूमशाही व स्वार्थी प्रवृत्तीच्या राजांचा लवकरच नाश होतो म्हणून राजा हा सर्वसमावेशक वृत्तीचा, इतरांच्या मतांचा आदर करणारा असावा. कौटिल्याच्या मते, आदर्श राजाची प्रथा चालविण्यासाठी सामान्यपणे राजाचा ज्येष्ठ मुलगा राजपदावर यावा, परंतु तो अपात्र असल्यास हा नियम बदलण्यास कौटिल्य परवानगी देतो. बालपणापासून राजपुत्राचे संगोपन व शिक्षण काळजीपूर्वक व विशिष्ट ध्येय नजरेसमोर ठेवून करावे. पण जर तो दुर्वर्तनी, व्यसनी निघाल्यास त्याची गय करू नये. राजाने समाजव्यवस्था सुरळीतपणे चालवावी यासाठी शासनाचे योग्य संचालन करावे.

कौटिल्याच्या मते, राजा हे सप्तांगातील सर्वात महत्त्वाचे अंग आहे. राजा प्रज्ञावंत, उत्साही आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा असावा असे सांगताना कौटिल्याने प्रज्ञा, उत्साह आणि व्यक्तिमत्व यांचे गुणधर्मही स्पष्ट केलेले आहेत. हे सर्व गणधर्म अंगी जोपासणाऱ्या राजाच्या राज्याची उत्तरोत्तर भरभराट होत असे कौटिल्य म्हणतो. तसेच राजा हा राज्याचा प्रमुख असल्यामुळे त्याने आपल्या सुरक्षिततेची काळजी कशी घ्यावी, त्याची दिनचर्या कशी असावी, राज्याच्या कामासाठी वेळ देत असताना स्वतःकडे कसे लक्ष द्यावे. शासनातील कोणत्या घटकांशी कोणत्या वेळी मसलत करावी याविषयी कौटिल्याने राजाला मार्गदर्शन केले आहे. कौटिल्याच्या मते राजाने सतत कर्तव्यतत्पर असले पाहिजे. राजा हा उत्साहशक्तीने युक्त असावा. कारण राजाच जर कर्तव्यनिष्ठ व उत्साही नसेल तर नोकरवर्ग व राज्यातील लोकही तसेच व्यवहार करू लागतात. कारण तेथे 'यथा राजा तथा प्रजा' हा नियम लागू होतो. थोडक्यात राजा हा आपल्या राज्याच्या, प्रजेच्या हिताची सदैव काळजी करणारा, त्यासाठी सातत्याने तत्पर असावा. केवळ गुणसंपन्न राजाच आपली कर्तव्ये समर्थपणे पार पाडू शकतो असे कौटिल्य म्हणतो.

**२. अमात्य** : अमात्य हा राजाचा दुसरा महत्त्वाचा घटक होय. कौटिल्याने अमात्य ही संकल्पना अधिक व्यापक अर्थाने वापरली आहे. अमात्य ही एक सेवाश्रेणी होती व अमात्यांमधूनच मुख्य पुरोहित, मंत्री, करवसुलीचे अधिकारी, कोषाधिकारी, मुलकी व फौजदारी शासनातील अधिकारी, नाटकशाळांचे अधिकार, कोषाधिकारी, मुलकी व फौजदारी शासनातील अधिकारी, नाटकशाळांचे अधिकारी, परराष्ट्रीय वकील व अनेक खात्यांचे अधीक्षक यांची नेमणूक केली जात असे. कौटिल्य जेव्हा अमात्य मंडळाचा विचार करतो. तेव्हा तो मंत्रिन् व अमात्य यांच्यातील फरक नजरेसमोर ठेवतो. मंत्र्यांवर तो तीन ते चार या संख्येची मर्यादा

घालतो तर अमात्यांची संख्या त्याने आवश्यकता व त्यासाठी लागणारे आर्थिक सामर्थ्य यावर अवलंबून ठेवलेले आहे. अमात्यपदाला आवश्यक असणारी गुणवत्ता विशद करताना कौटिल्य म्हणतो की, आवश्यक त्या वेळी व स्थळी आणि कामाच्या गरजेनुसार अमात्य नेमावे. कौटिल्याच्या मते राजा कितीही कर्तृत्ववान असला तरी तो सर्व राज्यकारभार एकट्याच्या सामर्थ्यावर, कौशल्यावर करू शकत नाही. राजा केवळ आपल्या सहाय्यकांच्या सहकार्यावरच यशस्वी होऊ शकतो. राज्यरूपी रथाचे एक चाक राजा असेल तर दुसरे चाक अमात्य असते. या दोन्ही चाकांशिवाय रथ पुढे जाऊ शकत नही. म्हणून राजाने योग्य व्यक्तीची मंत्री म्हणून नेमणूक करावी आणि त्यांची मते विचारात घेऊन राज्यकारभार चालवावा.

कौटिल्याच्या मते, अमात्यांकडेही काही गुणवैशिष्ट्ये असावीत. अमात्य हा आपल्याच राज्यातील रहिवासी, उच्चकुलीन, प्रभावशाली, विविध कलांचे ज्ञान असलेला, दूरदृष्टी असणारा शूर, बुद्धीमान, चारित्र्यवान, राजनिष्ठ, उत्साही आपल्या वर्तणुकीने सर्वांवर छाप पाडणारा असा असला पाहिजे. राज्यात अमात्यांचा दर्जा अतिशय महत्त्वपूर्ण असल्यामुळे राजाने त्यांची अनेक कसोट्यांच्या आधारे परीक्षा घेऊन त्यात उत्तीर्ण झाल्यानंतरच अमात्यपदी नेमणूक करावी. राजाने आपली कार्ये अमात्यांच्या साहाय्याने पार पाडावीत. म्हणजेच राज्याच्या प्रशासनाचे काम कौटिल्याने अमात्यांवर सोपविलेले आहे. मंत्रीपरिषदेत मंत्र्यांखेरीज इतर तज्ज्ञ लोकांना परिस्थितीनुरूप आमंत्रित करून त्यांचा सल्ला घ्यावा. मंत्र्यांच्या संख्येबाबत कौटिल्याने आपल्या पूर्वसुरींच्या मते उदधृत करून अखेरीस आपले मत नोंदविले आहे. मनुने १२, बृहस्पतीने १६, उशनसाने १२ मंत्री असावेत असे म्हटले आहे. मात्र कौटिल्याने निश्चित संख्या न सांगता राज्याच्या गरजेनुसार मंत्र्यांची संख्या असणे हितावह आहे, असे म्हटले आहे. मंत्रीपरिषदेचे कार्य सल्लागार स्वरूपाचे आहे. अमात्यांची नेमणूक राजाने करावयाची आहे. मंत्रीपरिषदेची बैठक राजाच्या अध्यक्षतेखाली होऊन त्यामध्ये युद्ध व शांतता, संरक्षण, आंतरराज्य संबंध, आर्थिक समस्या व इतर महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा होत असे. मंत्रीपरिषदेचे सदस्य बैठकीत एकामागून एक अशा प्रकारे आपली मते स्पष्टपणे मांडत व त्यावर मुक्तपणे चर्चा होत असे. ही सर्व चर्चा अत्यंत  गुप्त राखली जात होती.

**३. जनपद** : स्वामी व अमात्यानंतर 'जनपद' हे राज्याचे तिसरे महत्त्वाचे अंग होय. जनपद याचा अर्थ लोकवस्ती असलेला भूप्रदेश असा होतो. म्हणजेच कौटिल्याने जनपदात भूमी व लोकसंख्या या दोहोंचाही समावेश होतो. कौटिल्याच्या मते, राज्याचा भूप्रदेश सुपीक, शत्रूला जिंकता येऊ नये असा सुरक्षित, नैसर्गिक साधनसंपत्तीने युक्त, पाण्यासाठी पावसावर अवलंबून नसलेला, मोठ्या सैन्याचा भार सहन करू शकणारा असावा. राज्यातील लोकसंख्येत उद्योग-व्यवसाय करणारे शेतकरी, मध्यमवर्गीय, कारागीर व राज्याच्या कराचे ओझे सहन करणारे लोक असावेत. चक्रवर्ती राजाच्या भूप्रदेशात हिमालयापासून समुद्र किनाऱ्यापर्यंत भूभाग असावा; असे कौटिल्याचे मत होते. साधारणपणे एका गावात १०० ते ५०० कुटुंबे असावीत व स्थानीय जनपदाचा मोठ्यांत मोठा असणारा गट आठशे ग्रामांचा/गावांचा असावा. पज्ञा राजाशी एकनिष्ठ व सद्वर्तनी असावी.

**४. दुर्ग** : कौटिल्याने सांगितलेले हे राज्याचे चौथे महत्त्वाचे अंग होय. दुर्ग ही संज्ञा 'किल्ला' या अर्थाने वापरलेली आहे. परकीय आक्रमणापासून राज्याच्या संरक्षणक्षमतेच्या दृष्टीकोणातून दुर्गाचे महत्त्व अनन्यसाधारण असते. प्रवेशास कठीण असाही दुर्गाचा अर्थ होतो. राज्याची राजधानी या अर्थानेही दुर्ग हा शब्द वापरण्यात आला आहे. कारण राजा व राज्याचे इतर महत्त्वाचे विभाग दुर्गातच असतात. राजधानीत निरनिराळ्या वर्णाच्या व्यवसायाच्या लोकांनी राहावे अशी राजाने व्यवस्था करावी. बांबू, लोकर, शस्त्रे, धातूची कामे, रत्नजडीत दागिने इ. व्यवसाय राजधानीत असावेत असे कौटिल्य म्हणतो. त्या-त्या प्रदेशातील विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन राजाने पुढील चार प्रकारचे दुर्ग बांधावेत असे कौटिल्य म्हणतो. (अ) औदक दुर्ग - पाण्यातील, (ब) पर्वत दुर्ग - डोंगरावरील, (क) धान्वत दुर्ग - वाळवंटातील, (ड) वनदुर्ग - जंगलातील यापैकी औदक दुर्ग व पर्वत दुर्ग हे दाट लोकवस्तीच्या संरक्षणासाठी तर धान्वत दुर्ग व वनदुर्ग हे विरळ लोकवस्तीच्या संरक्षणासाठी उपयोगी पडतात. तसेच राजाने आपल्या राजधानीभोवती तटबंदी बांधून घ्यावी असे कौटिल्य म्हणतो. कारण राजधानीतूनच सर्व राज्याचा राज्यकारभार चालत असतो. म्हणून राजाने राजधानीच्या सुरक्षिततेची योग्य दक्षता घ्यावी.

**५. कोश** : दुर्गानंतर कोश किंवा खजिना हे महत्त्वाचे राज्यांग होय. कारण कोश हे राज्याचे जीवन रक्त असते. राज्याच्या दृष्टीने कोशाचे महत्त्व हे वादातीत असते. समृद्ध कोश हेच राज्याचे सर्वात मोठे सामर्थ्य असते. कारण कोशाच्या बळावरच चतुरंग सैन्याची उभारणी करता येते आणि समाजीवन सुरळीत चालविता येते. राज्यातील अनेक प्रश्न समृद्ध कोशामुळे सहजगत्या सोडविता येतात. म्हणूनच कौटिल्याने कोशाला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. कौटिल्याच्या मते, राजाजवळ न्याय्य मार्गाने मिळविलेला कोश असावा. हा कोश त्याच्याकडे वंशपरंपरेने चालत आलेला किंवा तो राजाने स्वतः प्राप्त केलला असावा. राजाचा कोश हा हिरे, माणिक, मोती, सोने, चांदी, मौल्यवान रत्ने यांनी युक्त असावा. कारण असा कोशच राजा व राज्याचे अनेक मोठ्या आपत्तींपासून संरक्षण करतो. राजाने कोशासाठी राज्यातील जनतेवर माफक कर लादावा. राजाने जनतेवर अन्याय्य कर लादल्यास राजाबद्दल जनतेच्या मनात असंतोषाची भावना निर्माण होते. राजाने प्रजेकडून जमिनीच्या किंवा शेतीच्या उत्पन्नापैकी १/६ हिस्सा घ्यावा. पाणीपुरवठा करण्यासाठी वेगळा कर घ्यावा. उत्पादन, वितरण, विक्री इत्यादींवर राजाने कर आकारावा. महाद्यूत, वेश्याव्यवसाय यावरही कर आकारावा. न्यायदानातून केलेल्या दंडाची रक्कमही कोशातच जमा करावी. राज्याने जहाजे, खाणी, मीठावरील एकाधिकार, जंगले इ. पासून मिळणारे उत्पन्न गोळा करावे. कोशाला राजाने अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. कारण कोशाविना सैन्याची उभारणी करता येत नाही. सैन्याला वेळेवर वेतन दिले नाही तर सैन्यात असंतोष उत्पन्न होऊन राजनिष्ठेस बाधा येऊ शकते. त्याचा फायदा शत्रूराज्य घेऊ शकते.

**६. दंड** : कौटिल्याच्या मते दंड किंवा सैन्य हा राज्याचा आणखी एक अत्यावश्यक घटक आहे. दंडशक्ती म्हणजे शिक्षा करण्याची शक्ती होय. सैन्य हे राजाच्या दंडशक्तीचे व्यक्तरूप असते. राज्याच्या अंतर्गत व बाह्य संरक्षणाचे दायित्व सैन्यावर असते. सैन्यात किती विभाग असावेत, त्यांची संघटना कशी करावी, राज्याच्या विविध भागातील लोकांची सैन्यात भरती कशी करावी, पायदळ, घोडदळ, रथदळ व

हत्तीदळ या चतुरांग सैन्याची उभारणी कशी करावी याची चर्चा कौटिल्याने विस्ताराने केलेली आहे. कौटिल्याच्या मते, सैन्यामध्ये वंशपरंपरेने सैनिकी व्यवसाय करणाऱ्या लोकांची भरती करावी. राज्याचे सैन्य राजनिष्ठ, आज्ञाधारक, शूर, अजिंक्य, सहनशील, शस्त्रविहीत व युद्धकौशल्यात प्रवीण असावे. सैन्याने नेहमी राज्यहिताला प्राधान्य द्यावे. तसेच राजानेही सैन्याला नेहमी संतुष्ट ठेवावे. कारण सैन्य असंतुष्ट असेल तर राजा फार काळ राज्य करू शकत नाही. नागरिकांना राज्यातील सैन्याचे भय वाटू नये मात्र आदर वाटला पाहिजे. पण राजाने सैन्यशक्तीचा प्रभावीपणे वापर करून घ्यावा. राज्यातील सैन्याच्या जोडीला पगारी भरती केलेले सैन्य असावे. शत्रूच्या राज्यातून असंतुष्ट होऊन आपल्याकडे आलेल्या लोकांची व सैनिकांचीही भरती आपल्या सैन्यात करावी. तसेच मित्र राज्यातून आलेल्या लोकांनाही सैन्यात भरती करून घ्यावे. सैन्यातील विविध भागांच्या व उपविभागांच्या तुकड्या विविध निशाणे, रणभेरी, दुदुंभी व शंख यांच्या वैशिष्ट्यासह असाव्यात. सामान्यतः क्षत्रिय जरी उत्तम लढवय्ये असले तरी संकटकाळी वैश्य, शूद्र यांचाही सैन्यात समावेश करावा.

७. **मित्र** : मित्र हे कौटिल्याने सांगितलेले शेवटचे अंग आहे. राज्याची संप्रभूता विविधांगी असते. राजाचे अंतर्गत अंग दुर्ग, दंड, कोश यामुळे संपन्न होत असले तरी बाह्य अंग परराज्यातून मान्यता मिळाल्यामुळे संपन्न होत असते. मित्रराज्ये वंशपरंपरागत, स्नेहसंबंध ठेवणारी, युद्धकाळात मुबलक मदत करणारी असावीत. संकटकाळात, युद्धकाळात व अन्य प्रसंगीही मदतीसाठी मित्रराज्याची आवश्यकता असते. राजाचा शेजारील राष्ट्रांशी अनेक कारणांमुळे संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे अशा संघर्षाच्या वेळी राजा व राज्याच्या संरक्षणासाठी मित्रराज्यांचा उपयोग होतो. कौटिल्याच्या मते, मित्र हा वंशपरंपरेने चालत आलेला, दीर्घकालीन संबंध असलेला, विश्वासू आणि मोठ्या प्राणावरील युद्धाची ताबडतोब तयारी करण्याची ज्याच्याकडे कुवत आहे असा असावा.

काही अभ्यासकांच्या मते, राज्याच्या सातही अंगांची वरील यादी पाहता तो क्रम त्यांच्या महत्त्वानुसार निर्धारित केलेला आहे. कौटिल्याने याबाबतीत आपल्या पूर्वसुरींची मते उद्धृत करून शेवटी आपले मत दिले आहे. भारद्वाजाच्या मतानुसार मंत्र्यांचे दोष राजाच्या दोषापेक्षा अधिक हानीकारक असतात. करवसुली, स्वराज्यरक्षण इ. कामे योग्य रितीने न झाल्यास राज्यात अव्यवस्था निर्माण होते. कोश रिकामा होतो. राजनिष्ठा दुर्बल होते. संरक्षणक्षमता कमी होते. विशालाक्षाच्या मते, प्रजेचे दोष अमात्याच्या दोषापेक्षा अधिक हानीकारक असतात. कारण अखेर कोशभरणात सैन्यभरती व अशा प्रकारची इतर कामे प्रजेवरच अवलंबून असतात. पिशूनच्या मते, दुर्गाची उभारणी व दुरूस्ती कोशावर अवलंबून असते, म्हणूनच कोशातील दोषांमुळे दुर्गाची हानी होते. कौणपदन्त याच्या मते, कोशाची सुरक्षितता व शत्रूवर विजय मिळविणे सैन्यावर अवलंबून असल्यामुळे कोशाहून सैन्य अधिक महत्त्वाचे आहे व सैन्यातील दोषामुळे कोशावर परिणाम होतो. पराशराच्या मते, प्रजेचे संरक्षण दुर्गामुळ होते. म्हणून प्रजेवरील संकटापेक्षा दुर्गावरील संकट अधिक काळजी करण्यासारखे असते. या सर्व मतांचा विचार करून कौटिल्याने असा निष्कर्ष काढला आहे की, वरीलर सातही अंगांचे महत्त्व त्यांच्या अनुक्रमाप्रमाणे आहे. स्वामींचे महत्त्व अमात्यापेक्षा अधिक आहे. कारण स्वामीच अमात्यांची नेमणूक करतो. राजा योग्य असेल तरच प्रजा सुखी व समृद्ध होते. अमात्यांचे महत्त्व प्रजेपेक्षा अधिक

असते. प्रजेचे महत्त्व दुर्गापेक्षा अधिक, दुर्गाचे कोशापेक्षा अधिक व कोशाचे सैन्यापेक्षा अधिक असते. प्रजेची सर्व महत्त्वाची कार्ये मंत्र्यांकडून होतात. दुर्ग व कोश यांचा सैन्यास आार असतो. मात्र सैन्य व कोश यांचे परस्परसापेक्ष महत्त्व कालप्रसंगानुसार ठरते. म्हणजे काही प्रसंगी कोशात तूट आल्यास सैन्यात असंतोष निर्माण होतो. तर काही वेळा सैन्याच्या पराक्रमामु कोशात भर पडते. राजा हा राज्याचा आत्माच असतो. म्हणून कौटिल्याने राज्याच्या सातही अंगांचा संक्षेपाने निर्देश करावयाचा झाल्यास 'राजा व राज्य' असा करता येईल असे म्हटले आहे.

### १.२.२ राजा व राजाचे प्रशासन

*** राजाचे गुण**

प्राचीन भारतीय राजकीय विचारांचा प्रमुख विषय 'राजा व त्याचे प्रशासन' हा होता. कौटिल्यही त्याला अपवाद नव्हता. प्राचीन काळ हा राजेशाहीचा होता आणि राज्याचे भवितव्य राजाच्या कर्तृत्वावर अवलंबिलेले होते. राजा कर्तृत्ववान असला, गुणवान असला तर राज्याची भरभराट होत असे. राजा दुर्गुणी, व्यसनी असेल तर राज्याचीही अवनती होत असे. म्हणून राजाला एकंदर राजकीय विचारांमध्ये मध्यवर्ती स्थान होते. कौटिल्याचे अर्थशास्त्र म्हणजे राज्याचा राज्यकारभार कार्यक्षमतेने, कुशलतेने आणि लोक-कल्याणाच्या दृष्टीने कसावा करावा हे सांगणारा ग्रंथ आहे. अर्थात त्यातील फार मोठ भाग राजा कसा असावा, कस असू नये, त्याने काय करावे किंवा करू नये, त्याची दिनचर्या, त्याचे अधिकार, कर्तव्ये यासाठी खर्च केलेला आहे. राजा हा राज्याच्या सर्व प्रशासनाचा मध्यबिंदू होता. न्यायदानाचा तसेच सर्व सैन्यदलाचाही तो प्रमुख होता. राजा हा धर्म-प्रवर्तक असल्याचे समजले जात होते. राज्याचे वैभव व समृद्धी ही राजावर अवलंबून असायची. रजा हा प्रजेकरिताच असतो. प्रजेचे सुख हेच राजाचे सुख मानले जात होते. प्रजेच्या हितातच राजाचे हीत समाविष्ट असते असे गृहीत धरण्यात आले होते.

कौटिल्याने राज्याची जी सात अंगे सांगितलेली आहेत त्यात राजा हे सर्वात महत्त्वाचे अंग असल्याचे दिसून येते. कारण अर्थशास्त्रातील प्रत्येक अधिकरणात राजाचा समावेश केलेला असून राज्याची सर्व जबाबदारी त्याच्यावर टाकण्यात आली आहे. आळतेकरांच्या मते, 'कौटिल्यपूर्व काळात राजा ही मानवी संस्था मानली जात असे.' काही अभ्यासकांच्या मते राजा हा दैवी शक्तीचा अंश म्हणून प्राचीन भारतात ओळखला जात होता. परंतु जनतेची राजावर श्रद्धा बसावी म्हणून ही कल्पना केलेली असावी. कारण वैदिक काळातही राज्याभिषेकाच्या वेळी 'राजास प्रजेच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर राहील' अशी प्रतिज्ञा करावी लागत असे.

कौटिल्याने अर्थशास्त्रामध्ये राजाचे असाधारण महत्त्व वर्णन केले आहे. राजा हा त्या भूप्रदेशामध्ये वास्तव्य करणारा असावा. त्याला धर्मशास्त्राचे ज्ञान असावे. त्याचप्रमाणे तो विद्वान असावा व इतरांना विश्वासात घेऊन आपली मते त्यांना पटवून देण्याचे कौशल्य त्याच्याकडे असावे. तो शूर, प्रसंगानुसार योग्य निर्णय घेणारा, प्रबळ इच्छाशक्ती असणारा, दृढ निश्चयी असावा. जन्मतःच या सर्व गुणांनी युक्त असलेला

एकही व्यक्ती या भूतलावर सापडणार नाही म्हणून त्यास योग्य प्रशिक्षण देणे अपरिहार्य ठरते. सर्वात महत्त्वाचे प्रशिक्षण म्हणजे त्याला सर्व धर्मशास्त्रात पारंगत करणे हे होय. कारण राज्याचा कारभार न्यायावर आधारित चालविण्यासाठी धर्मशास्त्राचा आधार अनिवार्य ठरतो. तसेच त्याने तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र व राजीनीती यांचा सर्वांग परिपूर्ण अभ्यास केलेला असावा. केवळ पुस्तकी ज्ञानाने राजा योग्य पद्धतीने राज्यकारभार करू शकेल असे कौटिल्यास वाटत नाही. म्हणून तो म्हणतो, राजाने राग, लोभ, मद, मत्सर, दंभ,हर्ष इत्यादी षड्रिपूंवर विजय मिळविला पाहिजे. तसेच राजा हा उद्योगी असला पाहिजे. राजा उद्योगी असेल तरच प्रजाही उद्योगी बनते. म्हणूनच कौटिल्य म्हणतो की, कर्तव्यतत्पर असणे हेच राजाचे व्रत, समदृष्टी ठेवणे हे दानासमान, तर कर्तव्यास न चुकणे हे यज्ञकार्यासमान आहे’ म्हणून राजाने नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की, प्रजेच्या हितातच राजाचे खरे हित आहे. प्रजेच्या सुखातच राजाचे सुख आहे. आपण सुखी तर प्रजा सुखी अशी कल्पना राजाने करू नये.

*** राजाची दिनचर्या**

कौटिल्याने राजपदाचे महत्त्व जाणून राजाच्या वेळेला फार महत्त्व दिलेले आहे. त्याच्या मते, राजा उद्योगी असावा. राजाने आपल्या सर्व वेळेचा उपयोग राज्याच्या हितासाठी केला पाहिजे. सतत उद्योग हे द्रव्यप्राप्तीचे मुख्य कारण आहे आणि आळस म्हणजे अनर्थाचे बीज होय. म्हणूनच राजाची दिनचर्या कशी असावी याचा विचार अर्थशास्त्रात केलेला आहे. दिवसाचे आठ व रात्रीचे आठ भाग किंवा प्रहर मानलेले आहेत आणि यापैकी प्रत्येक प्रहरी राजाने कोणते कार्य करावे हे कौटिल्याने सांगितलेले आहे. दिवसाच्या कामाच्या प्रारंभी राज्याची एकंदर परिस्थिती व जमाखर्च पाहणे; दुसऱ्या प्रहरी पौरजनांच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकणे, तिसऱ्या प्रहरी स्नान-भोजन, अभ्यास यासाठी; चौथ्या प्रहरी वसुलीचा स्वीकार व वेगवेगळ्या खातेप्रमुखांच्या भेटी, पाचव्या प्रहरामध्ये मंत्रिपरिषदेशी सल्लामसलत व गुप्तहेरांनी आणलेल्या बातम्या ऐकणे, सहाव्या प्रहरी स्वच्छंद विहार करावी किंवा मसलत करावी. सातव्या प्रहरी हत्ती, घोडे, रथ, योद्धे यांची पाहणी करावी. आठव्या प्रहरी सेनापतीबरोबर युद्ध चर्चा करावी.

राजाने दिवसभराचे सर्व काम संपवून सायंकाळच्या वेळी संध्या करावी. पुन्हा रात्रीच्या वेळेची कामे कौटिल्याने निश्चित केलेली आहेत. राजाने रात्रीच्या पहिल्या प्रहरी गुप्तहेरांची भेट घ्यावी, दुसऱ्या प्रहरी ज्ञान, भोजन, अभ्यास, तिसऱ्या प्रहरी अंतःपुरात गतिवाद्य श्रवणात आपला वेळ घालवावा. चौथ्या व पाचव्या प्रहरामध्ये शयन करावे. सहाव्या प्रहरी जागे होऊन शास्त्र व कर्तव्ये याबद्दल चिंतन करावे. सातव्या प्रहरी मसलती कराव्यात व गुप्तहेरांना कामे सांगून त्यांची रवानगी करावी. आठव्या प्रहरामध्ये आचार्य व पुरोहित यांच्याकडून स्वस्तिवाचन करून घ्यावे. राजवैद्य व ज्योतिषी यांची भेट घ्यावी व नंतर दरबारात जावे.

*** राजाची कर्तव्ये**

कौटिल्याने राजाला सप्तांगातील सर्वांत महत्त्वाचा घटक मानले आहे. राजा हा राज्याचा प्रमुख असल्यामुळे राज्यकारभाराची सर्व सूत्रे त्याच्याच हाती असतात. म्हणूनच राज्याचे सर्व हितसंबंध हे राजाशी निगडीत

असतात. कौटिल्याच्या मते, चांगला राजा राज्याच्या इतर सर्व घटकांतील उणिवाही स्वतःच्या बुद्धीने, कौशल्याने दूर करतो. म्हणूनच राजाच्या गुणसंपन्नतेवर कौटिल्याने भर दिलेला आहे. पर्यायाने राजाच्या कर्तव्यावरही जोर दिलेला आहे. कौटिल्याच्या मते, राजा जर स्वतः उत्साही असेल तर प्रजाही उत्साही बनते. राजा जर अनुत्साही असेल तर प्रजाही तसाच व्यवहार करते. त्यामुळे राजाने सतत स्वतःला आपल्या कर्तव्यकर्मात गुंतवून घेतले पाहिजे. त्यासाठी कौटिल्याने राजाचा संपूर्ण दिनक्रम आखून दिला आहे. तसेच राजपुत्राच्या शिक्षणाची तजवीजही त्याने करून ठेवली आहे. राजाने षड्रिपूंवर विजय मिळविला पाहिजे असे कौटिल्य म्हणतो. कार्यतत्पर राजास आपले इप्सित तर साध्य होतेच शिवाय ऐश्वर्यही प्राप्त होते.

कौटिल्याने सर्वोत्तम शासनप्रकार म्हणून राजेशाही व्यवस्थेला मान्यता दिली होती. कौटिल्याने राजा व राज्य यांच्या कार्यात फारसा फरक केलेला नाही. राज्याची कार्ये हीच राजाची कर्तव्ये होत असे कौटिल्य समजतो. कौटिल्याने अर्थशास्त्रात राजाची प्रमुख कर्तव्ये पुढीलप्रमाणे सांगितलेली आहेत.

**१. परचक्रापासून संरक्षण** : परचक्रापासून तसेच अंतर्गत धोक्यापासून राज्याचे संरक्षण करणे हे कौटिल्य राजाचे प्रधान कर्तव्य समजतो. परचक्रापासून राज्याचे संरक्षण करण्यासाठी राजाने कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत यासंबंधी त्याने राजाला मार्गदर्शन केले आहे. राज्याच्या संरक्षणासाठी राजाने आपली सेना सतत सुसज्ज ठेवली पाहिजे. संरक्षणाच्या सोयीसाठी राज्याच्या सर्व प्रदेशात किल्ले बांधले पाहिजेत, तसेच गुप्तहेरांच्या साहाय्याने शत्रूच्या हालचालीची सर्व माहिती मिळविली पाहिजे असे तो सांगतो. तसेच राज्याच्या दृष्टीने अंतर्गत धोका सर्वात गंभीर असतो म्हणून राजाने आपल्या राज्यातील शत्रूच्या हस्तकांना शोधून काढून त्यांना कठोर शासन केले पाहिजे असेही तो सांगतो.

**२. अंतर्गत शांतता** : राज्यात शांतता आणि सुव्यवस्था निर्माण करणे हे देखील राज्याचे प्रमुख कर्तव्य ठरते. समाजकंटकांच्या हालचालीमुळे समाजाचे स्वास्थ्य बिघडते. म्हणून राजाने अशा समाजकंटकांना शोधून काढून त्यांचा योग्य तो बंदोबस्त केला पाहिजे असे कौटिल्याचे मत आहे. यासाठी रजाने दंडाचा म्हणजे त्याच्या हाती असलेल्या सत्तेचा वापर केला पाहिजे असे तो म्हणतो. मात्र राजाने दंडाचा वापर कठोरपणे केला तर लोक भितीग्रस्त होतात व अशा राजाविषयी लोकांमध्ये तिरस्कार निर्माण होतो. याउलट दंडाचा वापर फारच सौम्यपणे केला तर लोकांना राजाचे भय वाटेनासे होते व असा राजा प्रभावशून्य बनतो. जर दंडाचा वापर मुळीच केला नाही तर समाजात 'मात्स्यन्याय' निर्माण होऊन अराजक माजते. म्हणून राजाने दंडाचा वापर योग्य रीतीने व न्यायबुद्धीने केला पाहिजे.

**३. प्रजेचे पालन करणे** : कौटिल्याच्या मते, प्रजेचे पालन करणे हे राजाच्या प्रमुख कर्तव्यांपैकी एक आहे. राजाने लोकांच्या जिवीत व वित्ताचे रक्षण केल्यामुळेच त्याचे प्रजापालनाचे कर्तव्य संपत नाही तर याचबरोबर राजाने प्रजेच्या योगक्षेमाची काळजी वाहणेही आवश्यक असते. कौटिल्याच्या मते, राजाला प्रजेकडून कर मिळाला की त्याच्यावर प्रजेचा योगक्षेम चालविण्याची जबाबदारीही येते. जर राजाने ही जबाबदारी पार पाडली नाही तर लोकांनी केलेले पाप राजाला लागते. तेव्हा राजाने प्रजेला हितकर अशा गोष्टी

करण्यात व प्रजेला जे हितावह असेल त्यातच आपले हित मानावे. प्रजेच्या सुखातच राजाचे सुख असे म्हणून प्रजेला ज्यात समाधान वाटते तेच राजाने श्रेष्ठ समजावे. त्याने प्रजेला उपजिविकेची साधने उपलब्ध करून द्यावीत व त्यासाठी राज्यात आठ प्रकारची कामे सुरू करावीत.

१. नवीन प्रदेश लागवडीखाली आणून तेथे नव्या वसाहती निर्माण करणे.

२. शेतीला व पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था करण्यासाठी बंधारे व तलाव बांधणे.

३. गुरांना चरण्यासाठी नवीन कुरणांची व्यवस्था करणे.

४. नवीन रस्ते बांधून व्यापाराची सोय करणे.

५. नवीन खाणी सुरू करून कारखाने बांधणे.

६. राखीव वनांत हत्तींची जोपासना करणे.

७. काही जंगले राखीव ठेवणे.

८. नवीन किल्ले बांधून त्यांची सातत्याने डागडुजी करणे.

**४. दैवी आपत्तींपासून संरक्षण** : कौटिल्याने राजाच्या कर्तव्यांमध्ये दैवी आपत्तींपासून लोकांचे संरक्षण करण्याच्या कर्तव्याचाही समावेश केला आहे. अशा प्रकारच्या आपत्तींपासून लोकांचे रक्षण करण्यासाठी राजाने कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे यासंबंधीचे मार्गदर्शन केले आहे. कौटिल्याने अग्नी, पूर, दुष्काळ, रोगांच्या साथी, हिंस्र प्राणी, उंदीर, साप, राक्षस इत्यादी उपद्रवांचा समावेश दैवी आपत्तींमध्ये केला आहे. या सर्वांपासून प्रजेचे रक्षण करण्याची सर्व जबाबदारी त्याने राजावर सोपविली आहे. राजाने उपद्रवपीडित लोकांना पुत्रवत मदत केली पाहिजे. इतकेच नव्हे तर राजाने अनाथ बालके, वृद्ध, व्याधिग्रस्त, संकटात सापडलेले व अनाथ स्त्रिया यांचे भरणपोषण करावे असेही त्याने सांगितलेले आहे.

**५. धर्मरक्षण** : प्राचीन भारतातील अन्य राजकीय विचारवंतांप्रमाणेच कौटिल्य धर्मरक्षण करणे हे राजाचे एक प्रमुख कर्तव्य समजतो. राजाने वर्णाश्रमधर्माचे रक्षण करण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. समाजाचा सर्व व्यवहार धर्मतत्त्वानुसार चालावा आणि त्याविरुद्ध कोणीही आचरण करू नये हे पाहण्याची जबाबदारी कौटिल्याने राजावर सोपविली आहे. राजाच्या या कर्तव्यातच न्यायदानाचे कर्तव्यही अभिप्रेत आहे. वर्णाश्रम व्यवस्थेप्रमाणे प्रत्येक वर्णातील लोकांनी आपली आपल्या वर्णांची विहीत कामे करणे यालाच धर्म मानले जात होते. त्यानुसार राजाने प्रत्येक वर्णातील लोकांना त्यांचा परंपरागत व्यवसाय करण्यास बाध्य करणे हे राजाचे कर्तव्य ठरते. तशी व्यवस्था राजाने करावी. कोणत्याही वर्णातील लोकांनी इतर वर्णातील लोकांच्या कार्यात हस्तक्षेप करू नये. यासंबंधात राजाचे सर्वात महत्त्वाचे कर्तव्य म्हणजे राजाने कोणत्याही प्रकारचा वर्णसंकर होऊ न देणे हे होय.

**६. शेती** : कौटिल्याने अर्थशास्त्रात शेतीसंबंधी अतिशय विस्तारपूर्वक विवेचन केलेले आहे. शेतीच्या विकासासाठी राजाने कशा प्रकारे प्रयत्न करावेत यासंबंधीची माहिती त्याने सांगितली आहे. त्याच्या मते, राजाने नवीन गावे वसवावित, नवीन जमीन लागवडीखाली आणावी. शेतीला लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी बंधारे, तलाव बांधावे. राज्यातील अधिक लोकसंख्येच्या केंद्रातील लोकांना नवीन ठिकाणी जाण्यास प्रोत्साहन द्यावे. जे जमीनमालक आपली शेती कसत नसतील त्यांची शेती काढून घेऊन ती कसणाऱ्यांना द्यावी. राजाने शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार आवश्यक ती मदत करावी असे कौटिल्याने सांगितले आहे.

**७. राज्यविस्तार** : राजाने आपल्या राज्याच्या विस्ताराकडे लक्ष दिले पाहिजे. कौटिल्याच्या मते, राजाने आपल्या राज्याचा विस्तार करण्यासाठी आपल्या मंत्री, अमात्यांसोबत विचारपूर्वक एक योजना तयार करावी. त्यानंतर परिस्थितीचा अंदाज घेऊन ही योजना अंमलात आणावी. राजाने आपल्यापेक्षा कमी सामर्थ्यशाली राज्यावर सरळ आक्रमण करावे आणि तो भूप्रदेश आपल्या राज्याला जोडावा. शेजारील राज्यावर आक्रमण करताना कौटिल्य नैतिकता आणि धर्मिकता यांना फारसे महत्त्व देत नाही. आपल्यापेक्षा बलाढ्य राज्याशी त्याने तह करावा. कारण त्याच्याशी युद्ध केल्यामुळे लाभापेक्षा हानी होण्याची शक्यता जास्त असते. म्हणून राजाने आंतरराज्य संबंध निर्धारित करताना काळजी घ्यावी. आपले राज्यहीत नजरेसमोर ठेवूनच आंतरराज्य संबंध निश्चित करावेत.

याखेरीज कौटिल्याने राजाच्या इतरही अनेक कर्तव्यांचा उल्लेख केला आहे. राजाने आपल्या राज्याच्या आर्थिक भरभराटीकडे लक्ष द्यावे. त्यासाठी त्याने व्यापार व अन्य व्यवसाय यांना उत्तेजन द्यावे. राजाने मंत्री, अमात्य तसेच राज्याचे इतर अधिकारी यांची काळजीपूर्वक नेमणूक करावी आणि त्यांच्यामार्फत राज्यकारभार सुरळीतपणे चालवावा. राजाने प्रशासनातील भ्रष्टाचार निपटून काढण्याचा प्रयत्न करावा.

*** राजाचे प्रशासन**

राजाने दैनंदिन जीवनामध्ये राज्यकारभार कसा सुरळीतपणे चालवावा याचे मार्गदर्शन कौटिल्याने अर्थशास्त्रातकेले आहे. कौटिल्याचा काळ हा राजेशाहीचा होता. तेव्हा राजा हाच सर्व प्रशासनाचा प्रमुख होता. राज्याची सर्वोच्च व अंतिम सत्ता राजाच्याच हाती असते. पण एखाद्या मोठ्या राज्याचा किंवा साम्राज्याचा राज्यकारभार कार्यक्षमतेने चालवावयाचा असेल तर ते काम एकटा राजा करू शकत नाही. त्यासाठी राजाला राज्यकारभारात सल्ला देण्यासाठी आणि मदत करण्यासाठी सल्लागार मंडळ किंवा मंत्रिमंडळ असे. अशा मंडळाचा उल्लेख अनेक ग्रंथांमध्ये आलेला आहे. कौटिल्याने या प्रकारच्या सल्लागार मंडळाचे महत्त्व सांगितले आहे. कौटिल्याच्या मते, ज्याप्रमाणे रथाचे एकच चाक रथ पुढे नेऊ शकत नाही त्याप्रमाणे राजकार्यही एकट्या राजाच्या हातून चालविणे शक्य होत नाही. म्हणूनच राजाने मंत्र्यांची नेमणूक करावी व त्यांचे मत ऐकून घेऊन राज्यकारभार करावा. राजाला एकाच वेळी अनेक प्रकारची कामे करावी लागत असल्यामुळे एकटा राजा ही सर्व जबाबदारी पूर्ण करू शकत नाही. त्यामुळेच त्याला मंत्र्यांच्या सहकार्याची गरज असते असे कौटिल्याचे मत आहे.

कौटिल्याच्या मते, राजा हा देखणा, उच्च कुलोत्पन्न, राजकारण धुरंधर, शास्त्रपारंगत, रोगमुक्त, धर्माचा आदर करणारा असावा. साधारणपणे राजानंतर गादीवर राजाचा वारस म्हणजे युवराज यावा ही अपेक्षा कौटिल्याची आहे. म्हणून त्यास लहानपणीच राजकारणास आवश्यक अशा सर्व अंगांचा अभ्यास करवून घ्यावा. परंतु कौटिल्य त्याच वेळी दुसरा सल्ला असा देतो की, ''दुष्ट राजकुमार हा एकुलता एक पूत्र असेल, तर त्यास आपला वारस बनवू नये. अशा परिस्थितीत आपल्या मुलींच्या मुलास किंवा नियोग पद्धतीने पुत्रप्राप्ती करून घेऊन वारस बनवावे.''

कौटिल्याने मंत्री आणि अमात्य यात फरक केलेला आहे. अमात्य हे मंत्र्यापेक्षा कनिष्ठ दर्जाचे अधिकारी होत. अमात्यांची महत्त्वाच्या पदांवर नेमणूक करण्यापूर्वी ते राजनिष्ठ आहेत की नाहीत हे निरनिराळ्या कसोट्यांच्या आधारे परीक्षा घेऊन ठरविले पाहिजे. त्यासाठी वेगवेगळ्या कसोट्या व गुप्तहेरांकरवी माहिती गोळा करावी. ही परीक्षा घेत असताना अमात्यपदी नेमणूक करावयाच्या व्यक्तीला धर्मोपधा, अर्थोपधा, कामोपधा, भयोपधा ही सर्व प्रलोभने दाखवावी. या चारही कसोट्यांना जे उतरतील त्यांनाच मंत्रीपदावर नियुक्त करावे आणि जे यापैकी एक किंवा दोन कसोट्यांना उतरतील त्यांना कमी महत्त्वाच्याप दांवर अमात्य म्हणून नियुक्त करावे. यावरून मंत्र्यांचे स्थान व दर्जा अमात्यापेक्षा श्रेष्ठ होता हे लक्षात येते.

कौटिल्याने अमात्यांची निवड करण्याच्या वेगवेगळ्या पद्धतींचे विवेचन केलेले आहे. प्रथम तो यासंबंधीची आपल्या पूर्वाचार्यांची मते उद्‌धृत करतो. त्यानंतर तो म्हणतो, अमात्य हा उच्चकुलीन, विद्वान, शूर व राजनिष्ठ असला पाहिजे. अशा व्यक्तीस स्थल, काल व कार्याची निकड पाहून अमात्य नेमावे. कुशल व योग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी मंत्र्यांच्या आणि पुरोहितांच्या साहाय्याने प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे परीक्षा घेऊन त्यांची निवड करावी. अमात्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत जे सर्वच कसोट्यांना उतरतील त्यांना मंत्रिपदावर नियुक्त करावे. मंत्र्यांना अमात्यांशिवाय राज्याचा रहिवाशी, कला-शास्त्रनिपुण, वाक्‌चतुर, उत्साही, उल्हासी, शुद्ध आचरणाचा ही गुणवैशिष्ट्ये असावीत असे म्हणतो.

कौटिल्याने मंत्री आणि मंत्रिपरिषद यामध्येही फरक केला आहे. मंत्री हे राजाला महत्त्वाच्या प्रश्नांवर नेहमीच सल्ला देणारे निकटवर्ती, तर मंत्रिपरिषद हे राजाने घेतलेल्या निर्णयांची कार्यवाही करणारे मंडळ होय. यावरून मंत्रिपरिषद ही मुख्यतः खातेप्रमुखांची मिळून बनलेली असावी असे समजले जाते. मंत्र्यांच्या संबंधात कौटिल्याने असे म्हटले आहे की, मंत्री तीन किंवा चार इतकेच असावेत. मंत्र्यांची संख्या त्यापेक्षा कमीही असू नये किंवा अधिकही असू नये. याचे कारण असे की, मंत्री एकच असेल तर तो वरचढ होऊन राजावर वर्चस्व गाजविण्याचा संभव असतो. तसेच एकाच मंत्र्याशी विचारविनिमय करण्याचा कटाक्ष पाळला तर संकटाच्या किंवा गुंतागुंतीच्या वेळी त्या मंत्र्याला कोणताही निर्णय घेता येणार नाही. दोन मंत्री असल्यास ते दोघे आपसात संगनमन करून राजाला आपल्या दडपणाखाली ठेवण्याचा प्रयत्न करतात किंवा ते एकमेकांच्या विरुद्ध कारवाया करून राजाला संकटात आणू शकतात. मंत्र्यांची संख्या तीन किंवा चारहून जास्त असल्यास विचारविनिमयाच्या वेळी त्यांच्यात एकमत होऊन निर्णय घेणे दुरापास्त होते. तसेच सल्लामसलतीची गुप्तता नाहीशी होण्याचाही संभव असतो. यासाठी राजाने तीन किंवा चार मंत्र्यांशीच सल्लामसलत करावी. तसेच

आवश्यकतेनुसार त्यातील एक किंवा दोन मंत्र्यांबरोबरही त्याने सल्लामसलत करावी किंवा काही वेळा राजाने स्वतःच विचार करून निर्णय घ्यावा असे कौटिल्य म्हणतो. मंत्रिपरिषदेतील मंत्र्यांची संख्या निश्चित न सांगता ती गरजेनुसार, आवश्यकतेनुसार व क्षमतेनुसार असावी असे कौटिल्य सुचवितो.

मंत्र्यांचे कार्य राजाला महत्त्वाच्या प्रश्नाबाबत सल्ला देणे हे आहे. मंत्र्यांशी सल्लामसलत केल्याशिवाय राजाने कोणत्याही कामाला सुरुवात करू नये असे कौटिल्य म्हणतो. मंत्रिपरिषदेचे कार्य राजाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे हे असते. याखेरीज नवीन कार्याचा प्रारंभ करणे, आधी सुरू केलेली कार्ये चालू ठेवणे, हाती घेतलेल्या कार्यात सुधारणा घडवून आणणे इ. कार्यांचा उल्लेखही अर्थशास्त्रात आला आहे. मात्र विशेष महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले तर राजाने मंत्री व मंत्रिपरिषदेची संयुक्त बैठक बोलवावी आणि त्यांच्याशी सल्लामसलत करावी, असे कौटिल्याचे मत आहे. राजाने मंत्र्यांशी सल्लामसलत करावी याचा अर्थ मंत्र्यांचा सल्ला राजावर बंधनकारक होता असे नव्हे. कौटिल्याने राजाच्या सत्तेवर कोणतेही बाह्य नियंत्रण लादलेले नाही. तेव्हा मंत्र्यांचा सल्ला स्वीकारावयाचा की नाही, हे सर्वस्वी राजाच्या इच्छेवर अवलंबून होते. मंत्री हे कोणत्याही बाबतीत राजाला वरचढ नव्हते. कौटिल्याने राज्यामध्ये राजालाच सर्वोच्च स्थान दिले आहे. मंत्र्यांची नियुक्ती करणे किंवा त्यांना अधिकारपदावरून दूर करणे हा सर्वस्वी राजाचाच अधिकार होता. तेव्हा मंत्र्यांच्या किंवा मंत्रिपरिषदेच्या अस्तित्वामुळे राजाचे अधिकार मर्यादित झालेले आहेत असे म्हणता येणार नाही.

अर्थशास्त्रात प्रशासकीय किंवा कार्यकारी स्वरूपाची कामे करणाऱ्या अधिकाऱ्यांचा उल्लेख आला आहे. या अधिकाऱ्यांना 'तीर्थ' असे संबोधले जात होते. तीर्थाची व्याख्या करताना कौटिल्य म्हणतो, ''धर्मानुशासनाची व कार्यकारी मंडळाची कामे करणारे पुरुष म्हणजे तीर्थ होय.'' कौटिल्याने आपल्या प्रशासकीय मंडळात पुढील अठरा अधिकाऱ्यांचा समावेश केलेला आहे.

१. **मंत्री** : सर्वोच्च प्रशासकीय अधिकारी

२. **पुरोहित** : राजाचा गुरू. अध्यात्मिक व इतर क्षेत्रात राजाला सल्ला व मार्गदर्शन करणारी व्यक्ती म्हणजे पुरोहित होय. याला वेदशास्त्राचे ज्ञान असणे आवश्यक होते.

३. **सेनापती** : चतुरंग सैन्यदलाचा प्रमुख

४. **युवराज** : राजपुत्रांमधून निवडलेला आणि युवराजपद दिलेला राजाचा भावी वारसदार.

५. **द्वौवारिक** : राजधानी व राजवाड्याच्या संरक्षणाची जबाबदारी असणारा अधिकारी.

६. **अन्तर्वशिक** : राजाच्या जनानखान्याचा प्रमुख

७. **प्रशास्ता** : फौजदारी अधिकारी

८. **समाहर्ता** : महसूल जमा करणारा तसेच पोलीस दल, नागरी प्रशासन व गुप्तहेर खात्याचा प्रमुख.

९. **सन्निधाता** : कोशाचा प्रमुख

१०. **प्रदेष्टा** : राज्याचा जमाखर्च तपासणारा व गुन्हेगारांना दिलेल्या शिक्षेची अंमलबजावणी करणारा अधिकारी.

११. **नायक** : सैन्याचा अधिकारी

१२. **पौर** : राजधानीचा प्रमुख

१३. **व्यावहारिक** : शहराचा न्यायाधीश

१४. **कार्मांतिक** : खाणी व उद्योग यावरील अधिकारी

१५. **मंत्रिपरिषद अध्यक्ष** : मंत्रिपरिषदेचा प्रमुख

१६. **दंडपाल** : पुरवठा व वाहतूक खात्यावरील अधिकारी

१७. **दुर्गपाल** : किल्ल्यांवरील बंदोबस्त पाहणारा अधिकारी

१८. **अंतपाल** : राज्याच्या सीमाप्रदेशाचा अधिकारी

वरील सर्व मंत्र्यांशी राजा प्रत्येक बाबतीत सल्लामसलत करीत होता असे नव्हे. यापैकी काही महत्त्वाचे मंत्री व युवराज हेच त्याचे निकटचे सल्लागार असायचे. मंत्रीमंडळाचा सल्ला राजावर बंधनकारक नव्हता. कारण राज्याची सर्व सत्ता राजाच्या हाती केंद्रीत झालेली होती आणि मंत्रिमंडळाची भूमिका ही राजाला सल्ला देणाऱ्या सल्लागार मंडळाची होती. कौटिल्याच्या मते, 'मंत्रिमंडळाशी राजाची चर्चा अत्यंत गुप्तपणे व्हावी' मसलत एकांतात करावी. वार्ता बाहेर पडणार नाही याची काळजी घ्यावी. पक्षांनाही ज्या ठिकाणी जाता येणार नाही अशा ठिकाणी मसलत करावी.

### * मंत्रीपरिषद

राज्याचा कारभार सुव्यवस्थित व कार्यक्षमतेने चालविण्यासाठी कार्यक्षम प्रशासक पाहिजे. कौटिल्याने प्रशासकीय खाती व त्यांचे प्रमुख याबाबत विस्ताराने माहिती सांगितली आहे. खात्यावरील वरिष्ठ अधिकारी या अर्थाने त्याने 'अमात्य' ही संज्ञा वापरली आहे. अमात्य कोणास नेमावे व त्यांची परीक्षा कशी घ्यावी याचीही माहिती त्याने दिली आहे. कौटिल्याच्या मते ''कार्यक्षमता पाहून व विशेषतः बुद्धिसामर्थ्य पाहून अमात्यांची नेमणूक करावी.''

कौटिल्याने प्रशासनाच्या सोयीसाठी अनेक खाती सांगितली आहेत. (१) करवसुली, (२) कर जमा करणारे खाते (कोश) (३) जमाखर्च व लेखा (४) कोशाध्यक्ष (५) खाणी (६) राजाज्ञापत्र (७) सुवर्णाध्यक्ष (८) नाणी (९) कच्चा माल व पावत्या (१०) शस्त्रागार (११) वजने-मापे, पौनवाध्यक्ष (१२) वेळनियंत्रक-मानाध्यक्ष (१३) जकात खाते-शुल्काध्यक्ष, (१४) दोरा व कापड-सूत्राध्यक्ष (१५) राजाच्या जमिनीची देखभाल-सीताध्यक्ष (१६) दारूखाने-सुराध्यक्ष (१७) मांस-सूनाध्यक्ष (१८) जलमार्ग (१९) गजदल

(२०) अश्वदल (२१) गाई (२२) दुकाने व दर नियंत्रण (२३) बंदरावरील नियंत्रण (२४) जंगल व इतर कच्चा माल (२५) धान्य, कोठारावर देखभाल (२६) निरुपयोगी जमीन, (२७) सर्वसामान्य सेना खाते (२८) रथदल.

कौटिल्याने २८ खात्यांच्या कामाचा तपशील अर्थशास्त्रात दिलेला आहे. यावरून राज्याची शासन-यंत्रणा कार्यक्षम होण्यासाठी कौटिल्याने किती सूक्ष्म गोष्टींची कल्पना राजास दिली आहे हे स्पष्ट होते. यावरून कौटिल्याचे दूरदृष्टीपण व शासनातील नैपुण्य दिसून येते. या सर्व खातेप्रमुखांना 'पण' या नाण्यांत पगार देण्यात येत असे.

*** मंडल सिद्धांत**

प्राचीन भारतीय राजनीतीमधील मंडल सिद्धांत हा अतिशय महत्त्वाचा आहे. शिशुनाग व नंदकालीन राजांच्या व्यवहारांचा अभ्यास करून हा सिद्धांत मांडण्यात आला आहे. कौटिल्यापूर्वी महाभारतातही आंतरराज्य संबंधाची मांडणी करण्यात आली होती. मात्र कौटिल्याने अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने आंतरराज्य संबंधाचे विवेचन अर्थशास्त्रात केलेले आहे. राजाला आपल्या शेजारील राज्यांच्या संदर्भात आपली धोरणे निर्धारित करावी लागतात. आपल्या व मित्र राज्यांच्या आघाड्या बांधाव्या लागतात. म्हणून त्याने आपल्या शेजारच्या राज्यांशी कशा प्रकारचे संबंध स्थापन करता येणे शक्य आहे, त्याचा विचार करून या सिद्धांताची मांडणी केली आहे. कौटिल्याच्या मते, मंडल हे बारा राज्यांचे वर्तुळ असून त्यातील विजिगीषु बनू इच्छिणाऱ्या राजास या सर्व मंडळातून आपले वर्चस्व स्थापन करावयाचे आहे. म्हणजेच कौटिल्याने राजापुढे साम्राज्यविस्ताराचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. विजिगीषु राजाच्या दृष्टिकोणातून कौटिल्याने परराष्ट्रीय धोरणाचा ऊहापोह केला आहे. विजय मिळवू इच्छिणाऱ्या राजाने इतर राज्यांशी स्नेहाचे किंवा शत्रूत्वाचे संबंध कोणत्या परिस्थितीत ठेवावेत याची चर्चा केली आहे. विजिगीषु राजाभोवती तीन प्रकारच्या राज्यांचे वर्तुळ आहे. त्यातील पहिल्या वर्गात समोरच्या पाच राजांचा समावेश होतो. त्यात काही राजे मित्र आहेत, काही शत्रू आहेत. पण विजिगीषु पासून भौगोलिक अंतर जास्त असेल तर मित्रत्वाची व शत्रूत्वाची भावना कमी होते. दुसऱ्या वर्गात पाठीमागील चार राजांचा समावेश होतो. त्यात दोन मित्र व दोन शत्रू असतात. ते पाठीमागून येऊन विजिगीषुवर आक्रमण करू शकतात किंवा पाय______शकतात. म्हणून त्यांना पार्ष्णीग्राह म्हणतात. तिसऱ्या वर्गात उदासीन व मध्यम या दोन राजांचा समावेश होतो. यांचा भूप्रदेश विजिगीषुच्या व त्याच्या समोरच्या शत्रूच्या राज्याच्या सीमेला लागून असतो. उदासीन राजा शक्तिशाली असतो व तो विजिगीषुच्या दोन्ही शत्रू राज्यांना मारू शकतो. तो विजिगीषू व त्यांच्या शत्रूंशी एकाच वेळी लढू शकतो. एकूण मंडलात चाललेल्या हालचालींबाबत उदासीन राजा उदासीनता दाखवितो. पण त्यांचे लक्ष मंडलावर असते. परिस्थितीचा विचार करून तो विजिगीषु राजास, मध्यम राजास व शत्रूसही मदत करू शकतो. आपला उत्साह, प्रभू व मंत्र या तिन्ही शक्तींचा वापर करून विजिगीषुने मंडळावर वर्चस्व निर्माण करावे असे, कौटिल्याचे मत आहे. त्यासाठी त्याला अकरा राज्यांवर आपले वर्चस्व स्थापन करावयाचे असते. कौटिल्याचे मंडल खालील तीन तत्त्वांवर आधारलेले आहे.

१. आपले शेजारचे राष्ट्र आपले शत्रू असते व शत्रूच्या शेजारचे राष्ट्र त्याचा शत्रू असल्यामुळे आपला मित्र असते. म्हणून प्रत्येक शेजारील हे आपले शत्रू असतो आणि शत्रूच्या शत्रू हा आपला मित्र असतो.

२. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय हीत महत्त्वाचे असते. या स्वहिताच्या आधारावर राष्ट्रांचे सर्व व्यवहार चालतात.

३. विजिगीषु राजास त्याच्या राजमंडलात सतेचा समतोल सातत्याने साधावा लागतो. जुना समतोल मोडून नवा व आपणास फायद्याचा असणारा समतोल स्थापन करीत मंडलावर नियंत्रण प्रस्थापित करावयाचे असते.

कौटिल्याने या मंडलात एकूण १२ राज्यांची कल्पना केलेली आहे. ही संख्या कमी-अधिकही असू शकते. कौटिल्याने या १२ राज्यांची स्वभाववैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितली आहेत.

**१. विजिगीषु** : हे मंडलाच्या केंद्रस्थानी असलेले आणि मंडलातील इतर राज्यांवर आपले प्रभुत्व प्रस्थापित करू पाहणारे राज्य होय. या राज्यालाच केंद्रस्थानी ठेवून कौटिल्याने मंडल सिद्धांताची मांडणी केलेली आहे. विजिगीषु म्हणजे विजयाची आकांक्षा ठेवणारी व्यक्ती होय. विजिगीषु राजाने या मंडलाचा स्वामी व्हावा यासाठी कौटिल्याने त्याला सल्ला दिला आहे.

**२. अरि** : हे विजिगीषुच्या शेजारचे राज्य होय. स्वाभाविकपणे दोन्ही राज्यांच्या सीमा एकमेकांना लागून असल्यामुळे त्यांच्यात शत्रूत्व येते. अरि म्हणजे शत्रू.

**३. मित्र** : हे अरिराज्याच्या पलीकडील राज्य होय. या राज्याची सीमा अरिराज्याला लागून असल्यामुळे ते अरिचे शत्रू राज्य ठरते. कौटिल्याच्या सिद्धांतानुसार शत्रूचा शत्रू हा मित्र असतो. त्यामुळे हे राज्य विजिगीषुचे मित्र असते.

**४. अरिमित्र** : विजिगीषुच्या मित्राच्या सीमेला सीमा लागून असणारे हे राज्य आहे. हे राज्य अरिच्या शत्रूचे शत्रू असल्यामुळे पर्यायाने ते अरिराज्याचे मित्र बनते.

**५. मित्रमित्र** : अरिमित्राच्या सीमेला लागून सीमा असलेला राजा हा मित्रमित्र होय. हे राज्य विजिगीषुच्या मित्रराज्याचे मित्र असल्यामुळे ते विजिगीषुचेही मित्र ठरते. कारण मित्राचा मित्र हा मित्र असावा असे कौटिल्याचे मत आहे.

**६. अरिमित्रमित्र** : मित्रमित्र राज्याच्या पलीकडे असलेले हे राज्य होय. हे राज्य विजिगीषुच्या शत्रूराज्याचे मित्रमित्र राज्य असते.

विजिगीषू राज्याला ज्या दिशेने राज्यविस्तार करावयाचा आहे त्या दिशेची राज्ये वरीलप्रमाणे असतात. पण त्याच्या विरुद्ध दिशेला किंवा मागील बाजूसही काही राज्ये असतात. ती खालीलप्रमाणे :

**७. पार्ष्णिग्राह** : विजिगीषु राज्याच्या पाठीमागील बाजूस व सीमेलगत असलेले हे शत्रूराज्य होय. पार्ष्णिग्राह म्हणजे मागून येऊन पाय धरणारा.

**८. आक्रंद** : आक्रंद म्हणजे ओरडणे. ओरडून विजिगीषु राजाला पार्ष्णिग्राह राजाच्या धोक्यापासून सावध करणारे मित्रराज्य म्हणजे आक्रंद. पार्ष्णिग्राह राज्याच्या पिछाडीला असलेले विजिगीषुचे हे मित्रराज्य.


**९. ग्राहसार** : हे राज्य आक्रंदच्या पाठीमागे असते. ते आक्रंदचे शत्रूराज्य असल्यामुळे विजिगीषुचेही शत्रूराज्य ठरते.

**१०. आक्रंदसार** : पार्ष्णिग्राहसार राज्याच्या पाठीमागे असलेले राज्य आक्रंदसार होय. हे राज्य आक्रंद राज्याचे मित्र असल्यामुळे आक्रंदसारही मित्रराज्य असते.

**११. मध्यम** : विजिगीषु आणि अरि या दोन्ही राज्यांना लागून असणाऱ्या विजिगीषु व अरि या दोन्ही राज्यांना मदत किंवा नुकसान पोहोचविणारे बलवान राज्य म्हणजे मध्यम होय.

**१२. उदासीन** : या मंडलातील हे सर्वात शक्तिशाली राज्य होय. विजिगीषु, अरि, मध्यम या सर्वांपासून हे राज्य दूर असते पण या तीनही राज्यांना प्रभावित करण्याची क्षमता या राज्यात असते. पण आंतरराज्य संबंधाच्या बाबतीत हे उदासीन असते.

**आकृतीबंध**



कौटिल्याने या विजिगीषुला त्या राजमंडलात मध्यवर्ती स्थान दिलेले आहे व त्याला या मंडळाचा स्वामी होण्यासाठी त्याने मार्गदर्शन केले आहे. विजिगीषुला या मंडलातील इतर सर्व राज्यांवर प्रभुत्व मिळवायचे आहे. त्याने कोणत्या राज्याला मित्र समजावे व कोणत्या राज्याला शत्रू समजावे हे त्या राज्यांच्या भौगोलिक स्थानावर अवलंबून असते. म्हणजे राजकारणात कोणीच कोणाचा कायमस्वरूपी मित्र किंवा कायमस्वरूपी शत्रू नसतो असे कौटिल्याने सुचविलेले आहे. विजिगीषूला आपल्या राज्याचा विस्तार शेजारच्या राज्याचा प्रदेश जिंकूनच करावयाचा असल्याने राज्याच्या सीमा सातत्याने बदलत जाणार व त्याच्या शेजारचे राज्य हे शत्रू बनणार. त्यामुळे त्यांच्यात संबंध सातत्याने बदलत राहणार.

विजिगीषु, त्याचा मित्र व त्याच्या मित्राचा मित्र यांचे एक राज्यमंडल बनते. या तीन राजांपैकी प्रत्येकाला अमात्य, जनपत्र, दुर्ग, कोश व दंड ही संप्रभुतेची पाचही अंगे असतात. त्यामुळे राजमंडलात एकूण तीन राज्ये व त्यांची प्रत्येकी पाच अंगे असू एकूण अठरा घटक होतात. राजमंडळातील विजिगीषुचा शत्रू, मध्यम राजा व उदासीन हे विजिगीषुहून वेगळे असतात. त्यामुळे या तिघांपैकी प्रत्येकाचे एक राजमंडळ असते. म्हणजेच एकूण चार राजमंडळे; १२ राजे, संप्रभुतेचे ६० घटक असे एकूण ७२ घटक किंवा प्रकृती होतात.

**१. पहिले मंडळ** : यात विजिगीषु; त्याचा मित्र व त्या मित्राचा मित्र असे तीन राजे येतात.

**२. दुसरे मंडळ** : यात शत्रू, त्याचा मित्र व त्याच्या मित्राचा मित्र असे तीन राजे येतात.

**३. तिसरे मंडळ** : यात मध्यम, त्याचा मित्र त्याच्या मित्राचा मित्र असे तीन राजे येतात.

**४. चौथे मंडळ** : यात उदासीन, त्याचा मित्र व त्याच्या मित्राचा मित्र असे तीन राजे येतात.

यापैकी प्रत्येक राजाच्या संप्रभुतेचे ५ घटक (अमात्य, जनपद, दुर्ग, कोश व दंड) गृहीत धरल्यास प्रत्येक मंडळात ३ राजे व त्यांचे एकूण १५ घटक असे एकूण १८ घटक येतात. चार मंडलात प्रत्येकी १८ घटक मिळून ७२ घटक होतात. म्हणजेच ४ प्राथमिक राज्यमंडळे, १२ राजे, ६० संप्रभूततेचे घटक असे एकूण ७२ राज्य घटक होतात. कौटिल्याने आपल्या परराष्ट्र धोरणाचे रहस्य 'शक्ती हेच बळ' यामध्ये ग्रथित केले आहे.

कौटिल्याने शक्तीचे तीन प्रकार पाडलेले आहेत.

**१. मंत्रशक्ती** : मंत्री, अमात्य यांच्याशी सल्लामसलत करून राजा जे धोरण निर्धारित करतो व त्यातून जी शक्ती निर्माण होते ती मंत्रशक्ती होय.

**२. प्रभुशक्ती** : समृद्धा अशा कोशातून व प्रबळ अशा चतुरंग सैन्यातून निर्माण होणारी शक्ती म्हणजे प्रभुशक्ती.

**३. उत्साहशक्ती** : राजाच्या स्वतःच्या बुद्धीमत्तेतून, कौशल्यातून, ऊर्जेतून, साहसातून निर्माण होणारी शक्ती म्हणजे उत्साहशक्ती होय.

कौटिल्याच्या मते, या तीनही शक्ती ज्या राजाकडे असतात तोच राजा मंडलाचा स्वामी बनू शकतो. म्हणून विजिगीषू राजाने या तिन्ही शक्तींमध्ये सातत्याने वाढ करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शक्ती व सुख यांतील परस्परसंबंध स्पष्ट करताना कौटिल्य म्हणतो की, शक्ती व सुख अधिक प्रमाणात उपलब्ध झालेला राजा इतर राजांहून श्रेष्ठ ठरतो. या दोन्ही गोष्टी ज्या राजाकडे कमी असतील तो कनिष्ठ ठरतो. हे दोन्ही ज्याच्याकडे समप्रमाणात असतील ते दोघे समान ठरतात. म्हणून कौटिल्य म्हणतो, राजाने आपल्या शक्ती व सामर्थ्यात सदैव भर टाकत असावे.

कौटिल्याच्या मते, राज्याराज्यातील संबंध ज्यामुळे प्रभावित होतात व एक राज्य दुसऱ्या राज्यावर आपले प्रभुत्व संपादन करण्याचा प्रयत्न करते. त्याला उपाय म्हणतात. ते चार प्रकारचे असतात.

१. **साम** : मैत्री अथवा सामोपचार

२. **दाम** : सवलती देऊन, द्रव्याचा वापर करून संबंध राखणे

३. **दंड** : युद्ध करणे किंवा शिक्षा करणे

४. **भेद** : शत्रू राज्यात फूट पाडणे.

कौटिल्याच्या मते, या उपायांचा वापर राजाने वरीलप्रमाणे क्रमानेच करावा. अर्थात भाग पडल्याशिवाय युद्धाचा उपाय अनुसरू नये.

*** षाडगुण्य सिद्धांत**

विजिगीषु राजाने स्थल, काल व परिस्थितीचा विचार करून राज्यविस्ताराचा प्रयत्न केला पाहिजे. तेव्हा परराष्ट्र धोरणाचा विचार करताना विजिगीषु राजाने सहा प्रकारच्या धोरणांचा अवलंब करावा असे कौटिल्य सांगतो. या सहा प्रकारच्या धोरणालाच **'षाडगुण्य'** अशी संज्ञा वापरली जाते. अर्थात ही धोरणे विजिगीषु राज्याप्रमाणेच कमकुवत किंवा दुर्बल राज्यांनाही मार्गदर्शन ठरणारी आहेत. ती पुढीलप्रमाणे :

१. **संधी** : तह, करार करून शांततेचे व मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे.

२. **विग्रह** : शत्रूत्व प्रकट करणे

३. **आसन** : काहीही न करता तटस्थ राहणे

४. **यान** : प्रत्यक्ष आक्रमण करणे

५. **संश्रय** : दुर्बल असताना दुसऱ्या बलवान राजाचा किंवा दुर्गाचा आश्रय.

६. **द्वैधीभाव** : एकाच वेळी एका राजाशी युद्ध चालू ठेवणे, तर दुसऱ्या राजाशी तहाच्या वाटाघाटी करणे.

या सहा धोरणांचा अवलंबन राजाने कशा प्रकारे करावा याविषयीही कौटिल्याने विजिगीषु राजाला मार्गदर्शन केले आहे. विजिगीषु राजाने स्थल, काल व परिस्थिती विचारात घेऊन षाड्गुण्यांपैकी नेमका

कोणत्या धोरणाचा अवलंब करावयाचा याचा निर्णय घ्यावा. जेव्हा शत्रू आपल्यापेक्षा सामर्थ्यवान असेल, तेव्हा शत्रूशी तह करावा. अशा प्रकारे तहाच्या अटी आपल्यावर लादल्या गेलेल्या असल्यामुळे त्या पाळण्याच्या बाबतीत चुकारपणा करण्यास किंवा फसवणूक करण्यासही हरकत नाही, जेव्हा शत्रू आपल्यापेक्षा दुर्बल असेल, शत्रूचा हल्ला परतवून लावणे, त्यास उपद्रव देणे शक्य असेल किंवा शत्रू अन्यत्र युद्धात गुंतलेला असेल तर अशा प्रसंगी विग्रहाचे धोरण फायदेशीर ठरते. जेव्हा शत्रू समबल असेल तेव्हा तटस्थतेचा धोरणाचा अवलंब करावा. कारण ज्याप्रमाणे कच्च्या मातीच्या दोन मडक्यांची एकमेकांशी टक्कर झाली तर दोन्हीही मडकी फुटतात. त्याप्रमाणे दोन तुल्यबळ राजांमधील युद्ध दोघांचाही विनाश घडवून आणू शकते. तेव्हा अशा परिस्थितीत राजाने शत्रू दुर्बल होण्याची किंवा आपण सामर्थ्यवान होण्याची वाट पाहत थांबावे व तटस्थतेच्या धोरणाचा अवलंब करावा. जेव्हा आपण शत्रूपेक्षा सामर्थ्यवान असू तेव्हा शत्रूवर सरळ आक्रमण करावे. अशा वेळी ज्याप्रमाणे दगडाने मातीच्या मडक्यावर घाव घातल्यावर त्या मडक्याचा चक्काचूर होतो, त्याचप्रमाणे प्रबळ राजा दुर्बळ राजावर निर्णायक विजय मिळवू शकतो. जेव्हा प्रबळ शत्रूकडून हल्ला होतो आणि शत्रूच्या आक्रमण थोपवून धरण्याची शक्ती आपल्यात नसते तेव्हा एखाद्या बलवान राजाच्या आश्रयाला जावे किंवा किल्ल्यात आश्रय घ्यावा. ज्यावेळी दुसऱ्या एखाद्या राजाच्या मदतीशिवाय शत्रूशी मुकाबला करणे किंवा त्याच्यावर चालून जाणे शक्य नसते त्यावेळी द्वैधीभावाचा अवलंब करावा. राजाने परिस्थितीनुसार आपल्या धोरणात बदल करावा आणि त्यायोगे आपले सामर्थ्य जास्तीत-जास्त वाढविण्याचा प्रयत्न करावा.

विजिगीषु राजाने युद्ध मोहिमेवर निघण्यापूर्वी कोणती काळजी घेतली पाहिजे याचीही माहिती कौटिल्याने दिली आहे. ज्या शत्रूशी युद्ध करायचे, त्याच्यापेक्षा आपण सामर्थ्यवान आहोत याची खात्री करून घ्यावी. आपल्या राज्याची व्यवस्था सुरळीतपणे लावून द्यावी. राज्याच्या संरक्षणाची तयार करून ठेवावी व पिछाडीवरून हल्ला होणार नाही याची दक्षता घ्यावी. युद्धासाठी देश व काळ अनुकूल आहेत की नाहीत याची खात्री करावी. परराज्याशी व्यवहार करताना साम, दाम, दंड व भेद या चारही उपायांचा अवलंब करावा. ज्यावेळी युद्धापासून काही लाभ होण्याची शक्यता असेल त्यावेळीच युद्धाचा मार्ग अनुसरावा.

राजाने प्रत्यक्ष युद्धाच्या वेळी कोणकोणत्या डावपेचांचा उपयोग करावा याविषयीही कौटिल्याने राजाला मार्गदर्शन केले आहे. कौटिल्याने युद्धाचे तीन प्रकार सांगितलेले आहेत.

**१. प्रकाशयुद्ध** : उभय पक्षांनी निश्चित केलेल्या स्थळी व वेळी तसेच फक्त दिवसा जे युद्ध चालते ते प्रकाशयुद्ध. उभय पक्षांनी युद्धाचे नियम आधी ठरविलेले असतात. त्यानुसार युद्ध केले जावे.

**२. कपटयुद्ध** : शत्रूपक्षाला कोणतीही कल्पना न देता किंवा आक्रमणाची चाहूल लागू न देता, शत्रू बेसावध असताना किंवा अडचणीत असताना त्याचा लाभ घेऊन जे युद्ध केले जाते ते कपटयुद्ध होय.

**३. गुप्तयुद्** : शत्रूच्या सैन्यात आपले सैन्य घुसवून त्याचा घातपात करणे याला गुप्तयुद्ध म्हटले जात होते.

राजाने परिस्थितीनुसार युद्धाच्या या तीनही प्रकारांचा उपयोग करावा असे कौटिल्य म्हणतो. विजिगीषू राजाने दुर्बल राजावर आक्रमण करताना तो प्रथम अन्यायी आहे का ते पहावे. कौटिल्याच्या मते, प्रजेच्या मनात आपल्याविषयी द्वेष निर्माण होणार नाही याची काळजी राजाने घ्यावी. आर्थिक विषमता अधिक असेल तर दारिद्र्याने पिडीत लोक शत्रूपक्षाला मिळण्याचीच शक्यता अधिक असते. राजाने शत्रूच्या मर्मस्थळावर नेहमी हल्ला करावा. शत्रूला गाफील ठेवून आणि त्याचा बुद्धीभेद करून विजय मिळवावा. शत्रूच्या शेजारील राज्यांना त्याच्याविरुद्ध चिथावणी द्यावी. शत्रूराज्यातील अधिकाऱ्यांना निरनिराळी प्रलोभने दाखवून त्यांना आपल्या बाजूने वळवून घ्यावे. त्याचबरोबर शत्रूराज्याच्या आपल्या हेरांमार्फत खून करविणे, शत्रू राज्याच्या अंतःपुरातील दासींना वश करून त्यांच्यामार्फत राजा व राज्याच्या महत्त्वाच्या मंत्र्यांवर विषप्रयोग करणे. शत्रूचे सेनापती व इतर अधिकाऱ्यांचे आपल्या हस्तकांमार्फत खून करविणे या गोष्टीही कौटिल्याने योग्य ठरविल्या आहेत. यावरून युद्धामध्ये ज्या डावपेचांचा किंवा उपायांचा अवलंब करायचा. त्याबाबत कौटिल्य कोणतेही विधीनिषेध बाळगत नाही. मात्र युद्धात विजय मिळविल्यावर विजयी राजाने नव्याने जिंकलेल्या प्रदेशातील लोकांची मने आपल्याकडे वळवून घेण्याचा प्रयत्न करावा. युद्धाच्या साधनांत कौटिल्याने सैन्यशक्तीपेक्षा बुद्धीसामर्थ्याला श्रेष्ठ मानले आहे.

कौटिल्याच्या आंतरराज्य संबंधांचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, त्याने आक्रमक धोरणाचा पुरस्कार केलेला आहे. विजिगीषुने आपला प्रभाव वाढविण्याचा व साम्राज्यविस्ताराचा सातत्याने प्रयत्न करावा. तो प्रयत्न करताना धर्म, नीतिमत्ता, सत्य, हिंसा यांचा तो फारसा विचार करत नाही. परराष्ट्र धोरणाचा विचार करताना तो वास्तववादी दृष्टीकोन बाळगतो व राज्याला सामर्थ्यशाली बनविणे हेच एकमेव ध्येय राजापुढे ठेवतो.

### १.३ सारांश

प्राचीन भारतीय राजकीय विचारांमध्ये कौटिल्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कौटिल्य हा अर्थशास्त्र परंपरेचा पाईक होता. त्यामुळे आपल्या पूर्वसुरींच्या विचारांच्या आधारेच त्याने अर्थशास्त्र हा सिद्ध केला. तरीही कौटिल्याचे महत्त्व त्याने कमी होत नाही. कारण अर्थशास्त्रावरील इतरांचे ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळे कौटिल्याच्या अर्थशास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कौटिल्याने अर्थशास्त्रात राजनीतीचा स्वतंत्रपणे विचार केला आणि नीती व धर्म यांपासून राज्य वेगळे केले. कौटिल्याने एका कल्याणकारी राज्याची कल्पना मांडली आहे. कौटिल्याने प्रबळ अशा राजेशाही शासनपद्धतीचा पुरस्कार केला होता. प्रजेचा पालनकर्ता ही राजाची भूमिका असल्यामुळे राजाने प्रजेच्या हितासाठीचा राज्यकारभार करावा असे तो म्हणतो. कौटिल्याने राज्यहितासाठी राजाने कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत, कोणत्या करू नयेत याचे विवेचन अर्थशास्त्रात केलेले आहे.

कौटिल्याने परराष्ट्र संबंधाविषयी मौलिक असे विवेचन केलेले आहे. यात त्याने सांगितलेली तत्त्वे आजही उपयुक्त ठरतात. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे मुलभूत तत्त्व कौटिल्याने आपल्या मंडल सिद्धांतात मांडलेले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणातील भू परिस्थितीसापेक्ष कशा असतात याची मांडणी त्याने केली आहे.

आपल्या राज्याचा विस्तार करण्यासाठी कोणकोणत्या धोरणांचा, उपायांचा राजाने अवलंब करावा याचे मूलगामी मार्गदर्शन त्याविषयी राजाला केलेले आहे. कौटिल्याने अत्यंत वास्तववादी भूमिका स्वीकारली. आंतरराष्ट्रीय राजकारण हे हितसंबंधावर आधारलेले असते हे त्याने सांगितले आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रावर अनेक अभ्यासकारांनी कठोर टीकाही केलेली आहे. तरीही त्याचे महत्त्व कमी होत नाही. कारण अर्थशास्त्र हा ग्रंथ प्राचीन भारतीय राजनीतीचे वास्तविक दर्शन घडवून आणतो.

### १.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **जनपद** : भूमी व लोकसंख्येचा प्रदेश

२. **विजिगीषु** : विजयाची आकांक्षा बाळगणारा

३. **अरि** : शत्रू

४. **संधी** : करार, तह

५. **योगक्षेम** : उपजिविका

६. **मध्यम** : मध्यस्थ

७. **उदासीन** : तटस्थ, अलिप्त

८. **पार्ष्णिग्राह** : पाय धरणारा

९. **आक्रंद** : ओरडणारा

१०. **कंटक** : समाजाचा शत्रू

**११. वैदिक वाङ्मय** : हे भारतातील प्राचीन साहित्य समजले जाते. या साहित्याचे संहिता, ब्राह्मणे व आरण्यके आणि उपनिषदे हे तीन भाग समजले जातात.

**१२. वैदिक कालखंड** : इ.स.पू. १२०० ते १००० हा कालखंड वैदिक कालखंड मानला जातो. हा संहिता, ब्राह्मणे व आरण्यके व वेद आणि उपनिषदे यांच्या निर्मितीचा कालखंड समजला जातो.

**(टीप** : या संपूर्ण घटकात प्राचीन भारतातील व संस्कृत भाषेतील अनेक संकल्पना आलेल्या आहेत. त्या शब्दांचे अर्थ व उपयोजन त्या-त्या ठिकाणी स्पष्ट करण्यात आलेले आहे.)

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्न

### स्वयं अध्ययन प्रश्न १

१. कौटिल्याने ........... हा ग्रंथ लिहिला.

(अ) राज्यशास्त्र (ब) अर्थशास्त्र (क) नीतिशास्त्र (ड) वरील सर्व.

२. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात ........... अधिकरत्ने आहेत.

(अ) १५ (ब) १६ (क) १७ (ड) १८

३. कौटिल्याच्या मते, राजाने ........... शाखांचे सूक्ष्मपणे अध्ययन करावे.

(अ) एक (ब) दोन (क) तीन (ड) चार

४. कौटिल्याने अर्थशास्त्रात ........... तत्त्वज्ञानाची विस्तारपूर्वक चर्चा केलेली आहे.

(अ) सामाजिक (ब) आर्थिक (क) राजकीय (ड) सांस्कृतिक

५. ........... साली डॉ. शामशास्त्री यांना कौटिल्याचे अर्थशास्त्राची प्रत मिळाली.

(अ) १९०४ (ब) १९०५ (क) १९०६ (ड) १९०७

### स्वयं अध्ययन प्रश्न २

१. कौटिल्याचे राजकीय विचार हे प्रामुख्याने ........... यांच्याशी संबंधित आहेत.

(अ) राजा व प्रजा (ब) राजा व राज्य

(क) राजा व त्याचे प्रशासन (ड) राजा व परराष्ट्र धोरण

२. प्राचीन भारतीय राजकीय विचारवंत राज्याच्या उदयासंबंधीचे सिद्धांत हे ........... च्या उदयासंबंधीचे सिद्धांत आहेत.

(अ) राजा (ब) प्रजा (क) मंत्रीमंडळ (ड) मंत्रीपरिषद

३. कौटिल्याने ........... शासनपद्धतीचा पुरस्कार केलेला आहे.

(अ) महाजनशाही (ब) राजेशाही (क) लष्करशाही (ड) हुकूमशाही

४. कौटिल्याने ........... शासनपद्धतीचा पुरस्कार केलेला आहे

(अ) एकात्म (ब) अनेकात्म (क) संघात्म (ड) कोणतेही नाही

५. कौटिल्याच्या मते, राजा आपला अधिकार ........... च्या साहाय्याने गाजवितो.

(अ) मंत्रीमंडळ (ब) अमात्य (क) मित्र (ड) दंड

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

१. कौटिल्याने राजाची ........... अंगे सांगितलेली आहेत.

(अ) पाच (ब) सहा (क) सात (ड) आठ

२. कौटिल्याच्या मते ........... हे सप्तांगातील सर्वात महत्त्वाचे अंग आहे.

(अ) राजा (ब) अमात्य (क) जनपद (ड) दंड

३. अमात्यांची नेमणूक करण्याचा अधिकार ........... कडे असतो.

(अ) स्वामी (ब) पुरोहित (क) मित्र (ड) दंडपाल

४. कौटिल्याच्या मते, राजाने ........... प्रकारचे दुर्ग बांधावेत.

(अ) तीन (ब) दोन (क) चार (ड) सहा

५. कौटिल्याच्या मते, राजाने ........... सैन्याची उभारणी करावी.

(अ) एकरंग (ब) द्विरंग (क) त्रिरंग (ड) चतुरंग

**स्वयं अध्ययन प्रश्न ४**

१. कौटिल्याच्या मते ........... हा राज्याच्या सर्व प्रशासनाचा केंद्रबिंदू आहे.

(अ) अमात्य (ब) राजा (क) युवराज (ड) सैन्य

२. कौटिल्याने दिवसाचे व रात्रीचे ........... प्रहर पाडून राजाची दिनचर्या स्पष्ट केलेली आहे.

(अ) पाच (ब) सहा (क) सात (ड) आठ

३. राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी राजाने ........... चा वापर करावा.

(अ) मित्र (ब) दंड (क) अमात्य (ड) न्याय

४. कौटिल्याच्या मते, ........... चे पालन करणे हे राजाचे प्रमुख कर्तव्य आहे.

(अ) प्रजेचे (ब) सैन्याचे (क) मंत्र्यांचे (ड) मित्राचे

५. कौटिल्याच्या मते, राजाने ........... व्यवस्थेचे रक्षण केले पाहिजे.

(अ) जातिव्यवस्था (ब) आश्रमव्यवस्था

(क) न्यायव्यवस्था (ड) वर्णाश्रमव्यवस्था.

**स्वयं अध्ययन प्रश्न ५**

१. कौटिल्याच्या काळात राज्याची सर्वोच्च व अंतिम सत्ता ........... च्या हाती होती.

(अ) प्रजा (ब) राजा (क) युवराज (ड) अमात्य

२. कौटिल्याच्या मते ........... चे कार्य राजाला महत्त्वाच्या प्रश्नाबाबत सल्ला देण्याचे आहे.

(अ) युवराज (ब) मंत्री (क) मित्र (ड) अरि

३. कौटिल्याने आपल्या प्रशासकीय मंडळात ........... अधिकाऱ्यांचा समावेश केलेला आहे.

(अ) पंधरा (ब) सोळा (क) सतरा (ड) अठरा

४. राजधानी व राजवाड्याच्या संरक्षणाची जबाबदारी ........... अधिकाऱ्यावर होती.

(अ) द्वौवारिक (ब) प्रशास्ता (क) सेनापती (ड) दंडपाल

५. प्रशासकीय व कार्यकारी स्वरूपाची कामे करणाऱ्या अधिकाऱ्यांना ........... असे संबोधले जात होते.

(अ) सेनापती (ब) अमात्य (क) मंत्री (ड) तीर्थ

**स्वयं अध्ययन प्रश्न ६**

१. कौटिल्याचा मंडल सिद्धांत ........... तत्त्वांवर आधारलेला आहे.

(अ) एक (ब) दोन (क) तीन (ड) चार

२. कौटिल्याने आपल्या मंडलात एकूण ........... राज्यांची कल्पना केलेली आहे.

(अ) दहा (ब) अकरा (क) बारा (ड) तेरा

३. कौटिल्याच्या मंडलात एकूण ........... प्रकृती आहेत.

(अ) ६० (ब) ६५ (क) ७० (ड) ७५

४. कौटिल्याने शक्तीचे ........... प्रकार सांगितलेले आहेत.

(अ) दोन (ब) तीन (क) चार (ड) पाच

५. परराष्ट्र धोरणाचा विचार करताना विजिगीषु राजाने ........... धोरणाचा वापर करावा, असे कौटिल्याने म्हटले आहे.

(अ) सहा (ब) आठ (क) चार (ड) सात

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कौटिल्याने लिहिलेल्या ग्रंथाचे नाव कोणते ?

२. कौटिल्याने कोणत्या प्रकारची न्यायालये सांगितली आहेत.

२. राजाच्या सप्तांगातील घटक कोणते ?

४. कौटिल्याने हेरांचे किती प्रकार सांगितलेले आहेत.

५. कौटिल्याने मंत्र्यांची संख्या किती सांगितलेली आहे ?

६. कौटिल्याने कोणत्या शासनपद्धतीचा पुरस्कार केलेला आहे ?

७. कौटिल्याने कोणते उपाय सांगितलेले आहेत ?

८. कौटिल्याने शक्तीचे कोणते प्रकार सांगितले आहेत ?

९. कौटिल्याच्या मंडल सिद्धांतात एकूण किती राज्ये आहेत.

१०. कौटिल्याच्या मंडलात किती घटकांचा समावेश होतो.

**२. टीपा लिहा.**

१. राजाची कर्तव्ये

२. राजाची दिनचर्या

३. षाड्गुण्य

४. हेरांची कार्ये

५. मंत्र्यांचे प्रकार

६. राजाची उत्पत्ती

**प्रश्न २ : दीर्घोत्तरी प्रश्न**

१. मंडल सिद्धांत स्पष्ट करा.

२. कौटिल्याच्या न्यायविषयक विचारांची मीमांसा करा.

३. कौटिल्याचा सप्तांग सिद्धांत स्पष्ट करा.

४. कौटिल्याचे प्रशासनव्यवस्थे विषयीचे स्पष्ट करा.

५. कौटिल्याच्या राज्याचे स्वरूप व कार्ये यासंबंधी चर्चा करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


१. प्राचीन भारतीय राजनीती, कंगले र. प.

२. प्राचीन भारतीय राजनीती, मोरखंडीकर रा. शा.

३. प्राचीन भारतीय राज्यविचार, गर्दे दि. का.

४. भारतीय राजकीय विचार, वराडकर र. घ.

५. प्राचीन भारतीय राजकीय विचार, शर्मा रामशरण

६. प्राचीन भारतीय राजकीय विचार, डॉ. चौसाळकर अशोक

७. काही प्रमुख राजकीय विचारवंत, प्रा. महाजन, प्रा. पाटील, प्रा. कुलकर्णी

८. भारतीय राजकीय विचारवंत, डॉ. कावळेकर, प्रा. विभूते

९. भारतीय तथा पाश्चिमात्य राजकीय विचार, शृंगारपूरे अरविंद

१०. राजकीय विचारांचा इतिहास, डोळे ना. य.

# घटक – २

# महात्मा जोतिराव फुले

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ महात्मा फुले : अल्प परिचय

२.२.२ महात्मा फुलेंचा राज्यविषयक सिद्धांत

२.२.३ महात्मा फुलेंची बळी राज्याची संकल्पना

२.२.४ महात्मा फुलेंची धर्म संकल्पना : ब्राह्मण्यावरील टीका

२.२.५ सत्यशोधक समाज : त्याचे क्रांतिकारी विचार

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वाध्यायासाठी प्रश्न

२.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टे

(अ) सदर पाठाद्वारे विद्यार्थ्यांना महात्मा फुलेंच्या जीवन व कार्याचा परिचय होईल.

(ब) महात्मा फुलेंनी मांडलेला राज्यविषयक सिद्धांत या बाबतचे आकलन विद्यार्थ्यांना होईल

(क) महात्मा फुलेंची लोकसत्ताक बळी राज्याची संकल्पना या पाठाद्वारे विशद होईल.

(ड) महात्मा फुलेंनी ब्राह्मण्यावर कशी टीका केली आणि त्यांचे धर्मविषयक चिंतन काय होते याचे आकलन होईल.

(इ) सत्यशोधक समाजाचे महत्त्व, त्याचे कार्य याबाबतची यथायोग्य माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल.

## २.१ प्रास्ताविक

भारतीय राजकीय विचारांचा विचार करताना कौटिल्याच्या विचारांचा आपण सर्वप्रथम ऊहापोह केला. कौटिल्याचा कालखंड इ.स. पूर्व तिसऱ्या शतकातील होता. कौटिल्यानंतर जवळपास २१ शतकानंतरच्या महात्मा फुलेंच्या विचारांकडे आपण वळणार आहोत. म्हणजेच भारतात प्राचीन राजकीय विचार समृद्ध होते. त्यानंतर प्रगल्भ असे आधुनिक राजकीय विचार/विचारवंत उदयास आले. म्हणजेच मध्ययुगीन कालखंडात समृद्ध असे भारतीय विचार उदयाला आले नाहीत. अर्थात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात रामचंद्रपंत अमात्यानी लिहिलेली 'आज्ञापत्रे' या बाबत अपवाद म्हणाली लागतील. कोणताही राजकीय विचार उदयाला येण्यासाठी विकसित राज्यव्यवस्था असावी लागते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात ती तशी होती म्हणून आज्ञापत्रे तयार झाली. परंतु मध्ययुगीन कालखंडात तसे झाले नाही. भारतातील ब्रिटिशांच्या आगमनाने मात्र एक नव्या प्रकारची आधुनिक राज्यव्यवस्था भारतात सुस्थापित झाली. ब्रिटिश सत्तेचा उद्देश्यच भारताची येथील शेतकऱ्यांची/जनतेची पिळवणूक करणे असा असला तरी त्यांनी ज्या आधुनिक राज्यसंस्थेची भारतात उभारणी केली, ती महत्त्वपूर्ण होती. येथील प्रथा-परंपरा, धर्म यावर ब्रिटिशांनी ओरखडे उठवायला सुरुवात केली. त्यातून समाज सुधारकांचा उदय झाला. या समाज सुधारकांनी / राजकीय विचारवंतानी आधुनिक राज्यव्यवस्थेसंबंधी चिंतन करायला सुरुवात केली. यातूनच भारतात आधुनिक राजकीय विचारवंताचा / विचारांचा उदय झाला.

## २.२ विषय विवेचन

मराठ्यांच्या अस्तानंतर म्हणजेच १८१८ नंतर भारतात ब्रिटिश सत्ता अधिक स्थिरावली आणि एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. पाश्चात्त्य शिक्षणाने प्रभावित झालेले काही तरुण या ब्रिटिश राजसत्तेकडे एक उदार राज्यसंस्था म्हणून पाहू लागले आणि आपल्या भारतीय समाजातील दोषांवर बोट ठेवू लागले. यातूनच भारतात समाजसुधारणेची चळवळ सुरू झाली. ब्रिटन ज्या प्रमाणे आपल्या नागरीकांना स्वातंत्र्य बहाल करते, प्रातिनिधीक लोकशाही तेथे राबवली जाते, तशीच आपल्याकडेही राबवली गेली पाहिजे अशी हळूहळू मागणी होऊ लागली आणि यातूनच भारतीय राजकीय विचारांचा जन्म झाला. राजाराम मोहन रॉय, जोतिबा फुले, महादेव गोविंद रानडे, लोकमान्य टिळक इत्यादींनी राज्यसंस्था, राज्याची कर्तव्ये, नागरीक, त्याचे हक्क व अधिकार, राजकीय प्रतिकार इत्यादी विषयी विस्तृत मांडणी केली. या पैकी महात्मा फुल्यांच्या विचारांचा आपण परिचय करून घेणार आहोत. परंतु ते समजून घेण्यासाठी फुलेंचा जीवन परिचय समजून घेतला पाहिजे.

### २.२.१ महात्मा फुले : अल्प परिचय

महात्मा जोतिराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी एका मध्यमवर्गीय माळी कुटुंबात झाला. सातारा जिल्ह्यातील कटगुन हे त्यांचे मूळगाव, पण त्यांचे आजोबा पुण्यात स्थायिक झाले. ते पेशव्यांना फुले पुरवण्याचा व्यवसाय करीत. त्याचा मोबदला म्हणून पेशव्यांकडून ३५ एकर जमीन त्यांना इनाम म्हणून

मिळाली. त्यामुळे यांचे मूळ नाव गोऱ्हे असले तरी ते फुले नावानेच ओळखले जाऊ लागले. वडील गोविंदराव आणि चिमणाबाई यांना दोन मुले झाली. त्यापैकी जोतिराव हा लहान. पण तो वर्षाचा असतानाच आई वारली आणि त्याचा सांभाळ सगुणा क्षिरसागर या विधवेने ममतेने केला. प्राथमिक शिक्षण पूर्ण होताच जोतिरावांची शाळा बंद झाली आणि ते वडिलांना शेतीत, दुकानात मदत करू लागले. परंतु जोतिरावांची शिक्षणाची आवड मात्र कायम राहिली. जोतिरावांच्या बुद्धिची चमक पाहून ख्रिस्ती धर्मोपदेशक लिजिट यांनी गोविंदरावांना आपल्या मुलाला परत शाळेत घालण्याची गळ घातली आणि जोतिरावांचे शिक्षण पुन्हा एकदा स्कॉटिश मिशनच्या हायस्कूलमध्ये सुरू झाले. तात्कालीन प्रथेप्रमाणे वयाच्या १३ व्या वर्षीच जोतिरावांचा सावित्रीबाईंशी विवाह झाला. मिशनरी शाळेत ज्योतिरावांचा उदार विचारांशी परिचय झाला. सर्व जातिधर्मातील मित्रमंडळींबरोबर त्यांचा स्नेह जडला. हिंदू धर्मातील भेदभाव, उच्च-नीचता यावर इतर धर्मियांकडून होणाऱ्या टीकेमुळे ते अंतर्मुख होऊ लागले. त्याचवेळी कोळी-रामोशी समाजाने केलेली ब्रिटीश सत्तेविरुद्धची बंडे ते जवळून पाहत होते. लहूजी मांगाच्या आखाड्यात जाऊन शक्तीसाधनाही ते करू लागले. ब्रिटीश सत्तेबाबत चीड त्यांच्या मनात निर्माण होत होती.

याच सुमाराला त्यांच्या आयुष्याला कालाटणी देणारा एक प्रसंग घडला. एका ब्राह्मण मित्राच्या वरातीत काही सनातनी ब्राह्मणांनी 'तुम्ही खालच्या जातीचे आहात. तुम्हाला ब्राह्मणांच्या वरातीत सामील होता येणार नाही' असे म्हणून अपमान केला. या प्रसंगाने फुले, जातीव्यवस्था करत असलेल्या अन्यायाबाबत अंतर्मुख झाले. केवळ ब्रिटिश गुलामगिरीची जाणीव असलेल्या फुल्यांना भारतात उच्च जातींनी, शूद्रानिशूद्रांना कसे गुलामगिरीत ठेवले आहे आणि ती राजकीय गुलामगिरीपेक्षाही अधिक भीषण आहे याची जाणीव झाली. या प्रसंगानंतर फुल्यांनी या शूद्रानिशूद्रांच्या सामाजिक गुलामगिरीच्या विरोधात संघर्ष करण्याचे निश्चित केले. थॉमस पेनच्या 'राईटस् ऑफ मॅन' या पुस्तकाने प्रभावित झालेल्या फुलेंना, अविद्या हे या शूद्रानिशूद्रांच्या गुलामगिरीचे महत्त्वाचे कारण आहे, याची जाणीव झाली व त्यातूनच त्यांनी १८४८ साली पहिली मुलींची शाळा सुरू केले. पत्नी सावित्रीबाईंना शिकवायला लिहायला, वाचायला, शिकवून या शाळेत शिकवण्याची जबाबदारी दिली. या काळात फुले दांपत्याचा अनन्वित छळ झाला पण ते डगमगले नाहीत. त्यांनी आणखीन दोन शाळा सुरू केल्या. त्यात त्यांनी महार-मांगासाठी सुरू केलेल्या शाळेंचाही समावेश होतो. १८५३ सालच्या अहवालानुसार त्यावर्षी फुलेंच्या शाळेत १८२ मुलींनी प्रवेश घेतला होता.

स्त्रियांच्या शिक्षणाबरोबरच महात्मा फुलेंनी विधवांचे केशवपन थांबवून त्यांची विटंबना होऊ नये यासाठी आटोकाट प्रयत्न केले. न्हाव्यांचा संप घडवून आणला. विधवांचा पुनर्विवाह व्हावा यासाठी प्रयत्न करून १८६३ साली बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून पुरुष वासनेला बळी पडलेल्या गर्भवती विधवांना आसरा दिला, त्यांची बाळंतपण केली. अनाथ बालकांचे पालकत्व स्वीकारले, एवढेच नव्हे तर अशाच एका काशीबाई नामक विधवेच्या मुलाला दत्तकही घेतले.

शूद्रनिशूद्रांच्या गुलामगिरीला जबाबदार असणाऱ्या ब्राह्मण वर्चस्वासंबंधी फुलेंनी १८६९ मध्ये 'ब्राह्मणांचे कसब' हे पुस्तक लिहिले. तर १८७३ साली 'गुलामगिरी' हे पुस्तक प्रकाशित केले. त्याच वर्षी २४ डिसेंबर रोजी त्यांनी 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली आणि त्याद्वारे ब्राह्मणी शोषणापासून शूद्रातिशूद्रांना मुक्त करण्याचा संकल्प केला. 'सार्वजनिक सत्यधर्म' हे पुस्तक लिहून एक नवीन समाज व धर्म व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला, ज्यात सर्व मानव प्राण्यांना समानतेचा हक्क बहाल केला गेला.

१८७६ साली जोतिराव फुले पुणे नगरपालिकेचे सदस्य म्हणून निवडून आले. त्या जोडीला त्यांचा बांधकाम व्यवसाय सुरूच होता. पण १८७७ साली हंटर आयोगापुढे जोतिरावांनी साक्ष देऊन प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे असा आग्रह धरला. १८८३ साली जोतिबा फुलेंनी 'शेतकऱ्याचे आसूड' हे पुस्तक लिहून शेतकऱ्याच्या अवनत स्थितीचे विदारक चित्र रेखाटून, ती सुधारण्यासाठी सर्वांगीण उपाययोजनाही सुचविल्या. १८८८ साली शूद्रातिशूद्र, गरीब कष्टकरी जनतेने त्यांना 'महात्मा' म्हणून गौरविले. २८ नोव्हेंबर, १८९० साली या महात्म्याची अखेर झाली.

**१.२.२. महात्मा फुलेंचा राज्य विषयक सिद्धांत**

महात्मा फुलेंचा आपल्याला प्रामुख्याने परिचय आहे तो एक समाजसुधारक म्हणून. परंतु फुलेंनी अतिशय सुसंबद्धपणे आपले राजकीय विचार मांडले आहेत. राज्यसंस्था, राज्याची कर्तव्ये, मानवी हक्क, नागरिकांचे स्वातंत्र्य व हक्क, नागरी समाज, वृत्तपत्रीय स्वातंत्र्य, लोकशाही इत्यादीचा त्यात समावेश होतो. परंतु फुल्यांच्या राजकीय विचारांची फारशी चर्चा केली जात नाही.

ब्रिटिशांच्या माध्यमातून भारतात आधुनिक राज्यसंस्था प्रस्थापित झाली. ही राज्यसंस्था भारतातील देशी (indegeneus) राज्यसंस्थेपेक्षा वेगळी होती. फुलेंच्याच शब्दात सांगायचे झाले तर ब्रिटीशपूर्व कालखंडातील आपले राजे ब्रिटिशांइतके बुद्धिमान नसतील, पण ते लोककल्याणासाठी व लोकांच्या सुरक्षिततेसाठी झटत होते. राज्याच्या तिजोरीतून त्यांनी धरणे बांधली, कालवे, विहिरी काढल्या, देवळे, मशिदी बांधल्या. परंतु पेशवाईच्या काळात मात्र ही परंपरा खंडीत झाली. या काळात प्रजेवर कराचे ओझे लादले गेले आणि त्याचा विनियोग ब्राह्मणांसाठी भोजने, दक्षिणा, बक्षिसे, वतने देऊन प्रजेच्या पैशाची नासाडी होऊ लागली. लोकांच्या कल्याणाचा विचार मागे पडला. या उलट ब्रिटिश सत्ता भारतात आल्यापासून लोक कल्याणाचा विचार करू लागली. रस्ते, पूल, धर्मशाळा, पाण्याचे तलाव, कॅनल अशी लोककल्याणकारी कामे करून त्यांनी सुधारणा केल्या. एवढेच नव्हे तर शाळा, महाविद्यालयांच्या माध्यमातून ब्रिटिश सरकार शिक्षणाचाही प्रसार करत आहे अशी भूमिका महात्मा फुले यांनी १८८५ साली प्रसिद्ध केलेल्या 'इशारा' या आपल्या पुस्तिकेत मांडली आहे.

ब्रिटिशांच्या उदार विचारांमुळे, त्यांच्या विज्ञानाकांक्षेमुळे त्यांच्या शिक्षण प्रसारामुळे, त्यांच्या कल्याणकारी राज्यामुळे जोतिराव फुले सुरुवातीच्या काळात ब्रिटिश सत्तेचे प्रशंसक राहिले असले तरी कालांतराने त्यांचा ब्रिटिश सत्तेबाबत भ्रमनिरास झाल्याचे दिसते. नोकरशाही हा या ब्रिटिश राज्यसंस्थेचा

कणा होता. त्यात हळूहळू मूठभर शिकलेल्या ब्राह्मणांचा भरणा झाला. या ब्राह्मणांना हाताशी धरून ब्रिटिश सत्ता सर्वसामान्यांची पिळवणूक करत असल्याचा आरोप फुले करतात.

ब्रिटीश सत्तेवर महात्मा फुले टीका करू लागले असले तरी भारतात प्रस्थापित झालेल्या आधुनिक राज्यसंस्थेचे महात्मा फुले समर्थकच होते, असे म्हणावे लागेल. आधुनिक राज्यसंस्था, राज्याच्या उत्पत्ती, राजकीय आबंधन, राजकीय सत्ता, नागरिकांचे हक्क, प्रगल्भ नागरी समाज आणि राज्यसंस्था, राज्यसंस्थेतील नोकरशाही, न्यायमंडळ यांची भूमिका याबाबतची मांडणी फुले करताना दिसतात.

राज्यविषयक सिद्धांतन करणे हा महात्मा फुलेंचा उद्देश्य नसला तरी 'शेतकऱ्यांचे आसूड' या पुस्तकाच्या माध्यमातून ते राज्याच्या उत्पत्तीचा सिद्धांत मांडतात. ब्राह्मणाच्या शरीराच्या चार भागापासून चार जाती निर्माण झाल्या या मनुसंहितेतील प्रतिपादनाला आव्हान देत फुले डार्विनचा मानवी उत्क्रांतीचा सिद्धांत मांडतात. फुले म्हणतात की, माणूस जेव्हा निसर्गात वावरत होता, जगत होता त्यावेळी कोणताही धार्मिक ग्रंथ नव्हता, तेव्हा कोणताही धर्माधारित भेदभाव नव्हता. भटकंती करणारा माणूस हळूहळू गावे वसवू लागला. गावच्या वेशी तयार झाल्या आणि लोकांच्या सुरक्षिततेसाठी वेसकऱ्यांच्या नेमणुका होऊ लागल्या. संपूर्ण गावाकडून, त्यांच्या सुरक्षेचा मोबदला वेसकऱ्यांना दिला जाऊ लागला. लोकसंख्या जसजशी वाढत गेली तसे लोकांच्यामध्ये तंटे बखेडे होऊ लागले. त्याची सोडवणूक गावातील शहाणे, माहीतगार निवडून त्यांच्या माध्यमातून न्याय निवाडे होऊ लागले. अशा रीतीने राज्यसंस्था निर्माण झाल्याचे फुले विशद करतात.

थॉमस पेनच्या विचारांनी प्रभावित झालेल्या जोतिराव फुल्यांनी मानवी हक्क व नैसर्गिक हक्क याविषयी मांडणी केली. निसर्गतः सर्व स्त्री-पुरुष सारखेच असून त्यांना माणूस म्हणून सारखेच अधिकार आहे असे फुले म्हणतात. सर्वांच्या समान अधिकारांचे संरक्षण करणे हे राज्यसंस्थेचे प्रथम कर्तव्य आहे, असे सांगतानाच ब्रिटीश राजसत्तेने शूद्रातिशूद्रांबाबत होणारे भेदभाव संपुष्टात आणून त्यांच्या मानवी हक्कांचे संरक्षण केले पाहिजे, अशी भूमिका ते घेतात. एवढेच नव्हे तर समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी जात, धर्म, लिंग या आधारावरील भेदभाव संपुष्टात आणणे हेही राज्याचे कर्तव्य असल्याचे फुले सांगतात.

'कल्याणकारी राज्य' हा जोतिबा फुलेंच्या राज्यविषयक विचारांचा गाभा आहे. आधुनिक, शास्त्रीय शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शाळा-महाविद्यालये स्थापन करणे, उद्योगधंद्यांना चालना देणे ही राज्याची कर्तव्ये असल्याचे फुले नमूद करतात. राज्याने रस्ते, पूल, कालवे, धरणे यांचा विस्तार करावा. ज्यायोगे दळणवळण व शेतीला चालना मिळेल. धंदा, रोजगाराची सोयही राज्याने करावी असे फुले म्हणतात. इथे हे नमूद केले पाहिजे की जोतिबा फुले स्वतः बांधकाम व्यावसायिक होते.

राज्यसंस्था न्यायी असावी, तिने सामाजिक न्याय प्रस्थापित करावा, म्हणजेच दीन-दलित अस्पृश्यांना शिक्षण द्यावे. त्यांना नोकरी, रोजगार द्यावा. राज्यसंस्थेला नैतिक अधिष्ठान असावे, म्हणजेच कोणतेही अनैतिक काम राज्याकडून केले जाऊ नये. उदा. दारूचे गुत्ते चालविणे हे अनैतिक काम आहे, ते राज्याने करू नये असे फुले म्हणतात.

राज्यातील नागरी समाज कसा असावा याबाबतही फुले मांडणी करतात ते म्हणतात जो समाज सामाजिक व राजकीय दृष्ट्या प्रगल्भ आहे, त्याच समाजात राज्यसंस्था सुव्यवस्थितरित्या कार्यरत राहते. समाजाची प्रगल्भता वाढावी म्हणूनच फुले सत्यशोधक समाजाची स्थापना करतात व जत्रा, मेळे व इतर मौखिक परंपरेच्या माध्यमातून लोकांना सुजाण करण्याचा प्रयत्न करतात. वृत्तपत्रांचे महत्त्व फुलेंना पटलेले असले तरी ज्या दीन-दुबळ्या अस्पृश्य समाजाला जागृत करायचे आहे, त्यांच्यासाठी वृत्तपत्र हे माध्यम कुचकामी आहे कारण या समाजात शिक्षणाचा प्रसार झालेला नाही.

अशा रितीने जे राज्य न्यायी, नैतिक आहे, जे लोककल्याणाचा विचार करते त्या राज्याला तेथील नागरीक पाठिंबा देतात. छत्रपती शिवाजी महाराज यांचे राज्य हे एक आदर्श राज्य असल्याचे फुले म्हणतात. छत्रपतींवर रचलेल्या पोवाड्यात ते शिवाजी महाराजांचे वर्णन पुढीलप्रमाणे करतात :

बाळगी जरी संपत्तीला । तरी बेताने खर्च केला
वाटणी देई शिपायाला । लोभ द्रव्याचा नाही केला ।

.............

युद्धी नाही विसरला । लावी जीव रयतेला
टळेना रयत सुखाला । बनवी नव्या कायद्याला

.............

दाद घेई लहानसानाची । हयगय नव्हती कोणाची

परंतु राज्यसंस्था जुलमी झाली तर मात्र 'इडापीडा टळो, बळीचे राज्य येवो' अशी प्रार्थना लोक करतात.

### १.२.३ जोतिबा फुलेंची बळी राज्याची संकल्पना

थॉमस पेन यांच्या 'राईटस् ऑफ मॅन' या पुस्तकात प्रतिनिधीक लोकशाहीचा पुरस्कार केलेला आहे. ब्रिटनमध्ये ही प्रतिनिधीक लोकशाही अस्तित्वातही आली होती. अमेरिकेतही जॉर्ज वॉशिंग्टन, बेंजामिन फ्रॅकलिन यांच्या प्रयत्नातून तेथे लोकसत्ताक व्यवस्थेची प्रस्थापना झालेली होती. या पार्श्वभूमीवर भारतात 'बळीराज्य' या लोकसत्ताक व्यवस्थेची पुर्नस्थापना व्हावी अशी भूमिका फुले मांडतात

आपल्या देशात आर्य येण्यापूर्वी जे बळीचे राज्य होते. ते लोकशाही राज्य होते. परंतु ते लयाला गेले आणि त्याबरोबरच भारतातील लोकशाही परंपराही लयाला गेली, असा इतिहास फुले मांडतात. हा इतिहास कदाचित वास्तवाला धरून नसेलही परंतु या निमित्ताने फुले 'बळीराज्य' ही संकल्पना मांडून त्याद्वारे ब्राह्मण (आर्य) व शूद्र (अनार्य) यांच्यातील वेगवेगळ्या सांस्कृतिक परंपरा स्पष्ट करतात.

वैदिक व ब्राह्मणी परंपरेमध्ये बळीची जी कथा आहे, ती पुढीलप्रमाणे : विरोचनाचा पुत्र बळी हा आसुरांचा राजा होता. तो प्रल्हादाचा नातू होतो. काही दिवसात तो खूप शक्तिशाली झाला आणि त्याने

देवांचा पराभव केला. या बळीचा पराभव करण्यासाठी विष्णूने बुटक्या वामनाचे रूप धारण केले व बळी करत असलेल्या विश्वजीत यज्ञाच्या ठिकाणी तो आला. दक्षिणा म्हणून त्याने बळीकडे तीन पावले जमीन दान मागितली. बळी दानास तयार झाला. वामनाने पहिल्या दोन पावलात पृथ्वी व आकाश व्यापून टाकले आणि तिसरे पाऊल त्याने बळीच्या डोक्यावर ठेवले आणि त्याची रवानगी पाताळात केली. संपूर्ण वैदिक व ब्राह्मणी परंपरेमध्ये विष्णूने दगाबाजी करून बळीचे जे दमन केले त्याचे समर्थन केल्याचे दिसते.

परंतु जोतिबा फुले बळीची अनार्य परंपरा सांगून आजही ठिकठिकाणी बळीची जी पूजा क्षत्रिय स्त्रियांकडून केली जाते त्याचा दाखला देतात. आपल्या 'गुलामगिरी' या पुस्तकात फुले बळीची गोष्ट पुढीलप्रमाणे सांगतात : हिरण्यकश्यपू हा असुरांचा राजा. त्याचा नातू आणि प्रल्हादाचा मुलगा म्हणजेच विरोचन. या विरोचनाचा मुलगा बळी. त्याचे फार मोठे राज्य होते. जोतिबा, खंडोबा, मल्हारी, म्हसोबा, मार्तंड, भैरोबा इत्यादी क्षेत्रपती त्याचे वेगवेगळे मंत्री आणि अधिकारी होते. बळीच्या प्रत्येक प्रांताचा प्रमुख खंडोबा होता. मार्तंड त्याच्या सैन्याचा प्रमुख होता, तर म्हसोबा हा त्याचा न्यायाधिकारी होता. महात्मा फुल्यांच्या मते बळी व त्याचे अधिकारी अतिशय न्यायी व कर्तव्यदक्ष होते. बळीचे वाढते सामर्थ्य आर्यांना सहन झाले नाही, म्हणून त्यांनी वामन नावाच्या सेनापतीच्या नेतृत्वाखाली बळीच्या राज्यावर हल्ला केला. बळीने निकराने झुंज दिली पण त्याचा पराभव झाला. लढाईत बळी मृत्यूमुखी पडला. वामनाने आपल्या सैन्याला घेऊन अश्विन शुद्ध दशमीस म्हणजे दसऱ्या दिवशी बळीच्या राजधानीत प्रवेश केला आणि तेथील सर्व अंगणांचे (घरांचे) सोने लुटले. (त्याचा अपभ्रंश 'शिलंगणाचे सोने लुटले' हा होय) आणि आपल्या घरी ताबडतोब निघून गेला.

महात्मा फुले वामनास ब्राह्मणांचा प्रतिनिधी मानतात आणि ब्राह्मणात सध्या प्रचलित असणाऱ्या रूढीचा ते आपला मुद्दा सिद्ध करण्यासाठी वापर करतात. त्यांच्या मते दसऱ्याच्या दिवशी ज्यावेळी ब्राह्मण संध्याकाळी शिलंगण करून घरी येतो, त्यावेळी त्याची बायको कणकेच्या पिठाची बळीची मूर्ती तयार करते आणि ती दाराच्या उंबऱ्यावर ठेवली जाते. ब्राह्मण घरी आल्यावर आपट्याच्या काडीने त्याचे पोट फोडतो आणि त्यास उल्लंघून घरात प्रवेश करतो.

परंतु ब्राह्मणेतर, क्षत्रिय वंशातील स्त्रिया दरवर्षी अश्विन शुद्ध दशमीस संध्याकाळी आपला पती/मुलगा शिलंगणावरून आल्यानंतर त्यांना ओवाळतात. त्यावेळी त्या म्हणतात 'इडा पीडा जावो, बळीचे राज्य येवो'. बळी या शक्तिशाली, न्यायी व कर्तव्यदक्ष राजाचे राज्य पुन्हा येवो ही मनोकामनाच जणू स्त्रिया करतात. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, केरळ या राज्यात ही परंपरा आजही सुरू असल्याचे आपल्याला दिसते.

महात्मा फुल्यांच्या मते प्राचीन काळात भारतात बळीस्थानात एकूण ५६ गणराज्ये होती. ही गणराज्ये लोकसत्ताक होती. परंतु हळूहळू त्यांनी लोकसत्ताक राज्याची कास सोडली. त्यामुळे आर्यांकडून लढाईत पराभूत होण्याची यथायोग्य शिक्षा त्यांना मिळाली. इराणी आर्य ब्राह्मणांनी सर्व क्षेत्रपतींना-क्षत्रियांना पराभूत केले आणि त्यांना गुलाम करून शूद्र म्हणून संबोधावयास सुरुवात केली. ज्या योद्ध्यांनी जास्त हिरीरीने

आर्यांशी लढाई केली, त्यांना महा-अरि-महार संबोधण्यात आले आणि त्यांची गणना अस्पृश्य अतिशूद्रात करण्यात आली. धनलोभाने ब्राह्मणांनी क्षत्रियांचा पाडाव केला. बळीचे राज्य ताब्यात घेण्यासाठीच वामनाने त्यांच्यावर स्वारी केली होती म्हणून जोतिराव सर्व शूद्रातिशूद्रांना बळीची आठवण मनात ठेवण्याचे आव्हान करतात, ते लिहितात :

''इडा पिडा मर्दून । सेवा बळीराजाला

स्वतः श्रम करून । जो पोसे स्वकुटुंबाला

महात्मा फुले यांच्या मते बळीचे राज्य हे लोकसत्ताक राज्य होते, आणि त्याच्या लयाबरोबरच भारतातील लोकशाही परंपरा लयास गेली.

परंतु धर्म, न्याय, निती, सत्य, बंधुता या गुणांचा समुच्चय असलेले 'देवाचे राज्य' किंवा बळीचे राज्य स्थापण्याचा जगात काही ठिकाणी प्रयत्न झाला. यापैकी येशू ख्रिस्त हा असाच बळी राजा होता. येशू ख्रिस्त दीनांचा कैवारी, सत्यमय ज्ञानाचा पुरस्कर्ता होता. अमेरिकेतील जॉर्ज वॉशिंग्टन आणि फ्रेंच विचारवंत, लाफेयत हेही याच परंपरेतील असल्याचे फुले सांगतात. त्यांच्या मते बळी हा शेतकऱ्यांचा, दीन-दुबळ्यांचा राजा होता. त्यामुळेच बळीचे राज्य म्हणजे शेतकऱ्यांचे, दीन-दुबळ्यांचे राज्य पुन्हा स्थापन व्हावे असे फुलेंना वाटत होते.

**१.२.४ महात्मा फुलेंची धर्म संकल्पना : ब्राह्मण्यावरील टीका**

मिशनरी शाळेत शिकत असलेल्या दिवसापासूनच महात्मा फुलेंच्या धर्म चिंतनाला सुरुवात झाली होती. ख्रिस्ती धर्मातील मानवतावादाने ते प्रभावित झाले होते. ब्राह्मण मित्राच्या वरातीतून हाकलून लावल्यानंतर हिंदू धर्मातील विषमता त्यांच्या लक्षात येऊ लागली आणि हळूहळू ते हिंदू धर्मचिकित्सेकडे वळू लागले. हिंदू धर्मातील सनातनी ब्राह्मण कशा रितीने बहुजनांना लुबाडत आहेत, याचे विश्लेषण फुले १८६९ साली 'ब्राह्मणाचे कसब' या शीर्षकाखाली करतात आणि हिंदू धर्मातील ब्राह्मण वर्चस्वाची अधिक चिकित्सा करून 'गुलामगिरी' नामक पुस्तक प्रकाशित करतात. बळी राज्याची संकल्पना मांडताना आर्य परंपरा नाकारून ज्याप्रमाणे फुले अनार्य सांस्कृतिक परंपरा मांडतात, त्याचप्रमाणे हिंदू धर्मातील ब्राह्मण वर्चस्व आणि विषमता नाकारून समता आणि मानवता या मूल्यांवर आधारित पर्यायी सार्वजनिक सत्य धर्माची मांडणी करतात.

शूद्रातिशूद्रांच्या गुलामगिरीचे मुख्य कारण हे येथील ब्राह्मणांनी जाणीवपूर्वक केलेले कारस्थान आहे हे विशद करताना फुले म्हणतात, 'या देशात भट लोकांचे (आर्य) राज्य होऊन सुमारे तीन हजार वर्षांपासून अधिक काळ लोटला गेला असावा, असे अनुमान होते. ते लोक परकीय देशातून (इराण) येऊन या देशातील मूळचे राहणारे लोकास जिंकून त्या सर्वांस त्यांनी आपले दास केले. काही काळाने आर्य लोकांचा ब्रह्मा या नावाचा मुख्य अधिकारी झाला. त्याने आपल्यात व दास केलेल्या लोकांत भेद राहावा यासाठी

काही नियम केले. ब्रह्मा मेल्यानंतर आर्य लोकांच्या मूळच्या नावाचा आपोआप लोप होऊन त्यांचे नाव ब्राह्मण पडले. या ब्राह्मणांनी अनेक कल्पित गोष्टी रचल्या व त्या ईश्वराच्या इच्छेनुसार झाल्या आहेत, हे दासांच्या मनावर बिंबवण्यात ते यशस्वी झाले. ब्राह्मण श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी जातींची उतरंड तयार केली गेली. त्याच्या समर्थनार्थ गोष्टी रचल्या गेल्या. उदाहरणार्थ ब्रह्माच्या मुखातून ब्राह्मणाचा, बाहूतून क्षत्रियाचा, जांघेतून वैश्याचा आणि पायातून शूद्राचा जन्म झाला अशी कपोलकल्पित गोष्ट रचली गेली. मनूसारख्या ब्राह्मणांच्या अधिकाऱ्यांनी, शूद्रांची गुलामगिरी दैवी इच्छेतून निर्माण झाली असल्याने, स्पृश्य-अस्पृश्यतेचे कडक पालन केले पाहिजे असे नियम केले. शूद्रातिशूद्रांचा शिक्षणाचा हक्क नाकारला. मनूने निर्माण केलेले सर्व नियम हे ब्राह्मणांचे वर्चस्व व शूद्रातिशूद्रांची गुलामगिरी कायम रहावी यासाठीच केले गेले. वेद, पुराणे, मनुस्मृती या ग्रंथांना दैवी अधिष्ठान देण्यात आले आणि त्याद्वारे निरक्षर, गरीब, शूद्रातिशूद्रांची पिळवणूक करण्यात आली. ब्राह्मणांनी हिंदू धर्माला व त्यातील जाती चौकटीला सर्वोच्च स्थान दिले. हिंदू धर्म श्रेष्ठ असला पाहिजे व सर्व समाजव्यवहार, धर्म व धर्मगंथांच्या (वेद, पुराणे, मनुस्मृती) चौकटीत झाले पाहिजेत असा दंडक या ब्राह्मणांनी निर्माण करून आपले वर्चस्व कायम ठेवले.

महात्मा फुले म्हणतात ब्राह्मणांची संख्या कमी होती व शूद्रातिशूद्रांची संख्या जास्त होती आणि ती अधिकाधिक वाढत होती, म्हणून ब्राह्मणांना भिती वाटू लागली. आपल्याला ऐष आरामात श्रम न करता सदा सर्वदा जगता यावे, इतरांनी घामाने/श्रमाने निर्माण केलेल्या उत्पन्नावर निर्धास्त जगता यावे, यासाठी ब्राह्मणांनी जातिभेदाचे थोतांड निर्माण केले, स्वहितसाधक ग्रंथ तयार केले व अज्ञानी लोकांच्या मनात भरविले. त्यांच्यापैकी ज्यांनी ब्राह्मणाचा विरोध केला, त्याचा सूड उगविण्यासाठी त्यांना अस्पृश्य केले; हे लोक जेव्हा अन्नास मोताद झाले, तेव्हा मेलेल्या गुराचे मांस खाण्याची वेळ त्यांच्यावर आली. इतरांना या अस्पृश्यांचा द्वेष करण्यास शिकविले. जातीत भेद निर्माण करून स्वहित जपले. ब्राह्मणांव्यतिरिक्त इतर सर्व जातींना ज्ञानार्जन करण्यास बंदी घातली आणि त्यांचे दास्यत्व टिकवले.

अशा या विषमतामूलक दास्यत्व निर्माण करणाऱ्या हिंदू धर्मातील ब्राह्मण वर्चस्वाचे पितळ उघडे पाडल्यानंतर महात्मा फुले परमेश्वराची संकल्पना मांडतात. थॉमस पेन यांच्या विचारांनी प्रभावित झालेले फुले, परमेश्वराचे एकत्व आणि मानवमात्रांची समता या तत्त्वांचा स्वीकार करतात. फुले धर्मभावना व परमेश्वराची संकल्पना नाकारत नाहीत, तर या चराचर सृष्टीचा, प्राणिमात्रांचा कोणी तरी एक 'निर्मिक' असला पाहिजे, तो सृष्टीचा पालनकर्ता, दयावान, न्यायी, समदृष्टीचा असला पाहिजे असे फुले म्हणतात. या परमेश्वराशी संवाद करण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची आवश्यकता नाही. पूजा, कर्मकांडे, नैवेद्य, यज्ञ, अनुष्ठान या सर्वांचा निषेध करत, फुले परमेश्वराचे निर्गुण निराकार रूप मान्य करतात. त्यांची अशी धारणा होती की संपूर्ण सृष्टीचा एक निर्माता असला पाहिजे. या निर्मात्यास फुले 'निर्मिक' म्हणून संबोधतात. या निर्मिकाने सृष्टी, त्यातील प्राणीमात्र निर्माण केले आणि या सृष्टीच्या संवर्धनाची, संरक्षणाची जबाबदारी त्याने मानवावर सोपविली, त्यासाठी मानवाला बुद्धी प्रदान केली. परंतु माणसाने या बुद्धिचा फारसा वापर केला नाही. त्यामुळे तो मानसिक गुलामगिरीत गेली. वास्तविक मानसिक दास्यातून मानवाची मुक्ती

करण्याचे अगाध सामर्थ्य बुद्धीच्या ठायी असते, पण कोणतीही गोष्टी बुद्धीच्या निकषावर माणसाने तपासून पाहिली नाही. माणसाचा बुद्धी प्रामाण्यवाद त्यामुळे पोकळ झाला. भारतात या बुद्धीप्रामाण्यवादाच्या अभावी ब्राह्मणांनी तयार केलेले धर्मग्रंथ, त्यांनी निर्माण केलेली जातीव्यवस्था, सर्वसामान्य बहुजनांनी, शूद्रातिशूद्रांनी तपासून पाहिली नाही आणि त्यांची मानसिक गुलामगिरी अधिक मजबूत झाली. या गुलामगिरीतून शूद्रातिशूद्रांची सुटका करायची असेल तर त्यांना शिक्षित केले पाहिजे. ज्यामुळे त्यांच्या बुद्धी प्रामाण्यवादाला चालना मिळू शकेल अशी भूमिका फुले घेतात आणि त्यासाठी बहुजनांच्या, शूद्रातिशुद्रांच्या शिक्षणाचा आग्रह धरतात, त्यांच्यासाठी शाळा सुरू करतात.

हिंदू धर्मातील ब्राह्मण वर्चस्व आणि ब्राह्मणांनी तयार केलेला विषमता मूलक हिंदू धर्म यावर केवळ टीका करून फुले थांबत नाहीत तर गुलामगिरीत असणाऱ्या समाजाला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी एका पर्यायी धर्माची मांडणी करतात. हा धर्म फुल्यांनी प्रमाण मानलेल्या दोन तत्त्वांवर अधिष्ठीत असलेला दिसतो. ती दोन तत्त्वे म्हणजे; परमेश्वराचे एकत्व आणि प्राणिमात्रांची समता या दोन तत्त्वांवर आधारित सार्वजनिक सत्य धर्माची फुले मांडणी करतात.

### १.२.५ सत्यशोधक समाज : त्यांचे क्रांतिकारी विचार

२४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुल्यांनी आपल्या काही समविचारी मंडळींच्या सहकार्याने पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्य वर्तन केल्याशिवाय मानव जगात सुखी होणार नाही. कारण सत्य हेच धर्माचे माहेर आहे. सत्याशिवाय जगात अंधःकार आहे असे म्हणत जोतिराव फुल्यांनी सत्यशोधक समाजाचा पाया रचला त्यांच्या मते स्वातंत्र्य, समता व बंधुता या पायावर संपूर्ण मानव जातीचे एक कुटुंब निर्माण करणे हेच मनुष्याचे सर्वोच्च ध्येय आहे. निर्मिकाने प्रत्येक स्त्री-पुरुषास समान मानवी अधिकार दिले आहेत. कोणत्याही मानवास स्वामित्व गाजविण्याचा, धर्माच्या नावाखाली त्यांना गुलाम करण्याचा किंवा छळ करण्याचा अधिकार नाही. अशा प्रकारचा भेदाभेद करणे म्हणजे सत्याचा द्रोह करणे होय. निर्मिकाने ही सृष्टी निर्माण करताना पशूपक्षी आणि मानव यांच्यात एक महत्त्वाचा भेद निर्माण केला. मानवास सारासार विचार करण्याची बुद्धी प्रदान केली. या बुद्धीचा वापर करून माणसाने सर्व मानवमात्रांच्या गरजा पूर्ण केल्या पाहिजेत. जगण्याकरिता आणि उपभोगाकरिता वस्तू उत्पन्न करणे, त्यासाठी उद्योगशील राहणे हे माणसाचे प्रथम कर्तव्य आहे व त्यासाठी परस्परांचा सन्मान करून, परस्पर सहकार्य करणे हा माणसाचा सर्वश्रेष्ठ धर्म आहे, अशी मांडणी फुले करतात.

भजन, नामस्मरण, जपजाप, प्रार्थना या गोष्टींची ईश्वराला गरज नाही, कारण तो सर्व विश्वाचा स्वामी आहे. त्याला माणसाच्या स्तुतीची, भक्तीची मुळीच गरज नाही. सत्य हे धर्मग्रंथात किंवा ऋषी, गुरू, अवतार यांच्यामध्ये नाही, ते मनुष्याच्या सद्‌विवेक बुद्धीत आहे. सत्य आणि नैतिकता प्राप्त करणे हे मानवाला या बुद्धीद्वारेच शक्य होते. निर्मिकाने मनुष्य जातीला दिलेली ती नैसर्गिक देणगी आहे, तो एक ठेवा आहे. त्यामुळेच महात्मा फुले बुद्धी व बुद्धीवादाला, सद्‌विवेक बुद्धीला प्रमाण मानतात. ही बुद्धी देणाऱ्या निर्मिकाचे अस्तित्व फुले मान्य करतात. पण मानवी जीवनाची सूत्रे मात्र माणसाच्या बुद्धीकडेच

असल्याचे नमूद करतात. ही बुद्धीच माणसाला सत्यशोधनात मदत करते. त्यामुळेच महात्मा फुलेंनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज बुद्धी प्रामाण्यावर अधिष्ठित आहे. सत्यशोधक समाज हा एक निर्मिक, एक धर्म, एक मनुष्य जात मानणारा धर्म म्हणून स्थापन झाला. सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी महात्मा फुलेंनी एक घटना बनविली, नियमावली तयार केली. पुढे १८९१ साली फुल्यांच्या मृत्यूनंतर, 'सार्वजनिक सत्यधर्म' या नावाने ही घटना-नियमावली प्रसिद्ध झाली. त्यात सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांची, आचार-विचारांची विस्तृत मांडणी संवाद रूपात करण्यात आली. प्रस्थापित धर्म, परंपरा, विधि, संस्कार इत्यादींचे बुद्धीप्रामाण्यवादाच्या निकषावर परिशीलन करून फुल्यांनी सत्यधर्माचा मार्ग दाखविला. सर्व स्त्री पुरुषास प्रार्थना केली. त्यातील एक अखंड पुढीलप्रमाणे -

सर्वांचा निर्मिक आहे एक धनी
त्याचे भय मनी । धरा सर्व
न्यायाने वस्तूचा उपभोग घ्यावा
आनंद करावा ।। भांडू नये ।।२।।
धर्म राज्य भेद मानवा नसावे ।
सत्याचे वर्तावे । ईशासाठी ।।३।।
सर्व सुखी व्हावे, भिक्षा मी मागतो ।।
मनुजा सांगतो । ज्योती म्हणो ।।४।।

महात्मा फुल्यांनी सार्वजनिक सत्य धर्मपुस्तकात पुढील तत्त्वे सांगितली आहेत.

१. सत्य वर्तन केल्याशिवाय मानव प्राणी जगात सुखी होणार नाही.

२. सर्व मानवांचा निर्मिक एक असून तो निर्गुण निराकार आहे आणि त्यामुळे सर्व मानवांना समान मानवी अधिकार आहेत.

३. निर्मिकांची भक्ती करण्याचा पूर्ण अधिकार प्रत्येकाला आहे त्यासाठी पुरोहित किंवा मध्यस्थांची आवश्यकता नाही.

४. पूजा, नामस्मरण, नैवेद्य, अन्नदान, अनुष्ठान या गोष्टी अज्ञानमूलक आहेत आणि या पासून परमेश्वराला (निर्मिकाला) संतोष होणार नाही, तर सत्य वर्तन करून होईल.

५. स्वर्ग असल्याचे धर्मग्रंथात लिहिलेले आहे पण ती एक कल्पीत गोष्ट आहे. त्यास कोणताही आधार नाही.

६. स्त्री-पुरुषांमध्ये, स्त्री अबला असल्याचे म्हटले जाते पण स्त्रीच श्रेष्ठ आहे. परंतु तिच्या बाबत पक्षपात केला जातो, तिला दुय्यम लेखले जाते. त्यामुळे स्त्री-पुरुष समतेचे पालन करावे.

७. पाप-पुण्याच्या, दैवाच्या गोष्टी कपोलकल्पीत आहेत, त्याचा प्रत्येकजण सोयीने अर्थ घेत असतो.

८. मानवामध्ये जातीभेदास थारा नाही. मानव जातीने नव्हे तर गुणांनी श्रेष्ठ असतो.

९. निर्मिकाने मानव आणि पशुपक्षी यांच्यात एक प्रमुख भेद केला आहे, तो म्हणजे त्याने मानवाला सारासार विचार करण्याची बुद्धी दिली.

१०. सर्व स्त्री-पुरुषांनी सत्यास स्मरून एकमेकांशी निर्मळ व पवित्र अंतःकरणाने वागावे हाच खरा धर्म : जसे माणसांनी तुम्हाशी वर्तावे म्हणून तुमची इच्छा आहे तसेच तुम्हीही त्यांच्याशी वर्तावे.

११. निर्मिकास आनंद देण्यासाठी सार्वजनिक सत्याचे भय मनी धरून इतर मानवाशी बांधवांप्रमाणे आचरण करणे म्हणजे नितीने वागणे होय.

समताप्रधान व सत्यनिष्ठ समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने जोतिबा फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजाची स्थापना झाली तेव्हा जोतिराव फुले हे चिटणीस आणि डॉ. विश्राम रामजी घोले हे अध्यक्ष होते. वर्षातून कार्यकारिणीच्या किमान चार बैठका व्हाव्यात, कार्यारिणीची निवड लोकशाही पद्धतीने व्हावी, सर्व निर्णय बहुमताने घेतले जावेत असा समाजाचा कटाक्ष होता. सुरुवातीच्या काळात डॉ. गावडे यांच्याकडे अनौपचारिक बैठका होत, त्यामध्ये विविध प्रश्नांवर सांगोपांग चर्चा होत असे. समाजातर्फे व्याख्यान आयोजित केले जात असे.

सत्यशोधक समाजाने, शिक्षण प्रसार व प्रबोधन यावर भर दिला. दिनबंधू वृत्तपत्राद्वारे लोकप्रबोधन सुरू केले गेले. पण अशिक्षित बहुजनांपर्यंत जर पोहोचायचे असेल तर व्याख्याने वृत्तपत्रांपेक्षा लोकनाट्यचा आधार घ्यावा लागेल हे लक्षात आल्यामुळे सत्यशोधक समाजाने 'जलसा', मेळे ही माध्यम निवडली आणि त्याद्वारे समाज प्रबोधन सुरू केले.

सत्यशोधक समाजाने लोकशिक्षणाबरोबरच जमीनदार व सावकार (शेटजी-भटजी) यांच्याकडून होणाऱ्या पिळवणुकीतून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी अथक प्रयत्न केले. १८८० साली बारामती तालुक्यातील चिंचोली या गावात शेतकऱ्यांची सभा भरवून शेतसारा, शेती कर्ज, सक्तीचे शिक्षण यासंबंधी ठराव केले. शूद्रातिशूद्रांना ब्राह्मणांकडून कसे नाडले जाते, त्यांच्या अज्ञानाचा कसा गैरफायदा घेतला जातो याबाबतचे विवेचन समाजाच्या कार्यकर्त्यांकडून केले जाऊ लागले.

सत्यशोधक समाजाला हळूहळू पाठिंबा वाढत गेला. महाराष्ट्रात ठिकठिकाणी समाजाच्या शाखा निघू लागल्या. कृष्णराव भालेकर, स्वामी व्यंकय्या, रामय्या अय्यावरु, डॉ. विश्राम घाले, डॉ. संतुजी रामजी लाड असे अनेक कार्यकर्ते सत्यशोधक समाजासाठी परिश्रम घेऊ लागले. १८९० साली जेव्हा जोतिबा फुलेंचे निधन झाले तेव्हा सत्यशोधक समाज महाराष्ट्रात ठिकठिकाणी रुजला होता.

**१.३ सारांश**

महात्मा जोतिराव फुले हे अत्यंत क्रांतिकारी समाजसुधारक होते. भारतीय समाजातील जातिव्यवस्थेला आव्हान देऊन एक समतामुलक समाज निर्माण करण्यासाठी ते अहोरात्र झटले. बुद्धीप्रामाण्यवाद, समता,

स्वातंत्र्य यासारखी मूल्ये समाजात रुजवून अज्ञान, अंधश्रद्धा यांना त्यांनी तिलांजली दिली. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून लोकप्रबोधन केले. शेतकऱ्यांच्या, शूद्रातिशूद्रांच्या, स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली आणि त्यांच्या मानवी हक्कांसाठी संघर्ष केला.

केवळ समाजसुधारणा घडवून आणणे पुरेसे नाही तर एक आदर्श राज्यही निर्माण करणे गरजेचे आहे हे ओळखूनच महात्मा फुलेनी आदर्श राज्याची संकल्पना मांडली. त्यांना अभिप्रेत असलेले आदर्श राज्य कल्याणकारी आणि लोकशाही प्रधान होते. शिवाय हे बहुजनांच्या, अनार्यांच्या परंपरेला प्रमाण मानणारे होते. त्यासाठी महात्मा फुलेंनी बळीराज्याची संकल्पना मांडली. हिंदू धर्म हा जातिभेदावर, उच्च-नीचतेवर आधारलेला आहे. तो धर्मग्रंथ व भ्रामक कल्पना, प्रथा परंपरांना अतिरेकी महत्त्व आहे. विशेषतः हा धर्म समता व बुद्धीप्रामाण्यता नाकारतो, म्हणूनच महात्मा फुले 'सार्वजनिक सत्यधर्म' या पर्यायी धर्माची मांडणी करतात.

महात्मा फुलेंच्या विचारांचे परिशीलन सर्वांसाठीच महत्त्वाचे आहे.

### १.४ पारिभाषिक शब्द

**१. कल्याणकारी राज्य** : लोक कल्याणाची कार्य हाती घेणारे, आपल्या नागरिकांच्या आर्थिक सामाजिक उन्नतीसाठी कार्य करणारे राज्य.

**२. बळी राज्य** : भारतात आर्यांच्या आगमनापूर्वी बळीचे राज्य होते. ते लोकशाही राज्य होते.

**३. आर्य व अनार्य परंपरा** : आर्यांचे भारतात आगमन झाल्यानंतर त्यांनी जी परंपरा निर्माण केली ती आर्य परंपरा, तर आर्य येण्यापूर्वी इथे जी परंपरा होती ती अनार्य परंपरा.

**४. शूद्रातिशूद्र** : भारतातील जातीय उतरंडीतील सर्वांत तळातील जात समूह.

**५. बुद्धी प्रामाण्यवाद** : प्रत्येक गोष्टीचा स्वीकार करताना प्रथा, परंपरा, धर्म या आधारावर नव्हे तर बुद्धीच्या/सद्विवेकाच्या आधारावर करणे.

### १.५ स्वाध्यायासाठी प्रश्न

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) १८७३ साली जोतिराव फुलेंनी कोणते पुस्तक लिहिले.

(ब) महात्मा फुल्यांच्या मानवी हक्कांसंबंधी विचारांवर कोणाचा प्रभाव पडला होता ?

(क) महात्मा फुलेंना अभिप्रेत असणारी बळी राज्याची संकल्पना कोणत्या परंपरेत आजही टिकून आहे.

(ड) फुलेंच्या मते आतापर्यंत भारतात आदर्श राज्य कोणाचे झाले ?

(इ) जोतिबा फुले परमेश्वरास काय म्हणून संबोधतात.

(ई) जोतिबा फुलेंनी १८७३ साली कशाची स्थापना केली.

**२. टीपा लिहा.**

(अ) महात्मा फुले : समाज सुधारक

(ब) महात्मा फुलेंचा राज्याच्या उत्पत्तीचा सिद्धांत

(क) जोतिबा फुलेंची ब्राह्मण्यावरील टीका

(ड) सार्वजनिक सत्यधर्म

(इ) जोतिबा फुलेंची ब्रिटिश सत्तेवरील टीका

(ई) जोतिबा फुलेंची धर्म संकल्पना.

**३. दीर्घोत्तरी प्रश्न**

(अ) महात्मा फुलेंची बळीराज्याची संकल्पना विशद करा.

(ब) महात्मा फुल्यांनी 'ब्राह्मणाचे कसब' कसे स्पष्ट केले आहे ?

(क) महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाविषयी निबंध लिहा.

## १.६ संदर्भ


१. फडके य. दि. (संपादक) महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १९९)

२. ऑम्वेट गेल, कल्चरल रिवोल्ट इन अ कोलोनियल सोसायटी : नॉन ब्राह्मिन् मूव्हमेंट इन वेस्टर्न इंडिया : १८७३-१९३०, सायंटिफीक सोशॅलिस्ट एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई १९७६.

३. ओहॅनलन रोझालिन्ड, कास्ट, कॉनफ्लिक्ट अॅन्ड आयडियॉलॉजी, केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, १९८५.

४. चौसाळकर अशोक, महात्मा फुले यांचे लोकशाही विषयक विचार, नवभारत, सप्टेंबर १९८२, साऊथ एशियन स्टडीज.

५. चौसाळकर अशोक, महात्मा फुले यांचा बळीराजा, समाज प्रबोधन पत्रिका, जुलै-सप्टेंबर १९९१.

# घटक – ३

# न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ न्या. रानडे यांचे राजकीय उदारमतवादी विचार

 ३.२.२ न्या. रानडे यांचे सामाजिक सुधारणेसंबंधी विचार

 ३.२.३ न्या. रानडे यांचे आर्थिक विचार

३.३ सारांश / मूल्यमापन

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्न

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस पुढील गोष्टी समजून येतील.

* न्या. रानडे यांचे राजकीय उदारमतवादाविषयी विचार काय आहेत.
* न्या रानडे यांचे सामाजिक सुधारणेविषयी विचार काय आहेत. त्यांना सामाजिक सुधारणेची निकड का वाटत होती.
* न्या. रानडे यांचे आर्थिक विचार काय आहेत.
* भारतातील लोकांचे दारिद्र्य दूर होण्यासाठी कोणत्या गोष्टींची गरज आहे.

## ३.१ प्रास्ताविक

न्या. महादेव गोविंद रानडे हे एक थोर कायदेतज्ञ, इतिहासकार, नेमस्त उदामतवादी विचारांचे, समाजसुधारक, अर्थतज्ञ, धार्मिक आदर्शवाद आणि तात्त्विक उदारमतवाद यांचे थोर प्रवर्तक, मातृभूमीबद्दल प्रेम असणारे महान नेते होते. त्यांच्या महान कार्याने आणि व्यापक विचारांनी फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतभर लौकीक होता. त्यांनी भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक परिस्थितीचा सर्व बाजूंनी जवळून अभ्यास केला होता. राजा राममोहन रॉय यांचे अपूर्ण कार्य पुढे चालविण्याचे श्रेय न्या. रानडे यांना जाते. ते वृत्तीने धार्मिक होते. प्राचीन धर्मग्रंथातील तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर प्रभाव होता. भारतातील समाजजीवन, जुन्या रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरिती यांनी ते ग्रस्त होते. समाजातील अनिष्ठ रूढी परंपरा, अंधश्रद्धा संपुष्टात आणण्यासाठी न्या. रानडे यांनी अनमोल असा विचार सांगितला आहे, तो म्हणजे अनिष्ट प्रवृत्ती दूर करून, शुद्ध धार्मिक तत्त्वांचे आचरण व आधुनिक विचारांचा स्वीकार करणे होय. हिंदू समाजातील दोष काढून त्यांची नैतिक पातळी वाढविण्याचे उदात्त ध्येय उराशी बाळगून मोठ्या धैर्याने त्यांनी समाज सुधारकाची भूमिका पार पाडली. समाज सुधारणा करणे हे न्या. रानडे यांनी जीवनाचे एक मूलभूत अंग बनविले होते. सामाजिक सुधारणेबरोबरच राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे कार्य अनमोल असे आहे.

## ३.२ विषय विवेचन

वर उल्लेख केल्याप्रमाणे न्यायमूर्ती रानडे यांनी समाजजीवनाच्या विविध अंगावर आपला ठसा उमटवला होता. रानडे यांचा जन्म १८ जानेवारी, १८४२ रोजी नाशिक येथे झाला आणि १६ जानेवारी १९०१ रोजी मुंबई येथे त्यांचा मृत्यू झाला.

१८६२ मध्ये 'इंदूप्रकाश' या साप्ताहिकाचे ते संपादक झाले. १८८४ मध्ये एलफिन्स्टन कॉलेजमध्ये ते इंग्रजी आणि इतिहासाचे प्राध्यापक म्हणून नियुक्त झाले. १८७१ मध्ये मुंबई सरकारने त्यांची न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली. १८८४ मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन झाली. तिचे ते प्रेरणास्थान होते. सरकारी सेवा करत असतानाच रानडे सामाजिक कार्यही करीत होते. त्यांनी भारतीय सामाजिक मंडळाची स्थापना केली. सार्वजनिक सभेच्या कार्यातही ते रूची घेत असत. सन १८८५ मध्ये त्यांची मुंबईच्या उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. रानडे हे प्रथम पासूनच काँग्रेसचे सदस्य होते. सन १८८० ते १८९५ हा काळ विचारमंथनाचा होता. याच विचार मंथनाच्या काळात महाराष्ट्रात रानडे व टिळक यांच्यात दरी निर्माण झाल्याचे दिसते.

सरकारी नोकरीत राहून समाजसुधारक या नात्याने त्यांनी भारतीय जनतेच्या जीवनात मूलगामी सुधारणा करण्याचे प्रयत्न केले. त्यांनी हिंदुस्थानातील प्रागतिक राजकारणाचा पाया घातला. त्यांनी हिंदी अर्थशास्त्राचा पाया घातला. त्यांना 'आधुनिक भारताचे जनक' असे संबोधण्यात येते. रानडे यांचे वाचन आणि लेखन दोन्ही प्रचंड होते. भारतीय धर्मग्रंथ, धार्मिक परंपरा आणि तत्त्वज्ञान हे त्यांना चांगले अवगत

होते. आधुनिक पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि विचारपंथाचाही त्यांनी भरपूर अभ्यास केला होता. हेन्री मेन, चिल, ॲडम स्मिथ, फ्रेडरिक लिस्टर, कोल्बर्ट, क्रॉमवेल यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता. वर उल्लेख केल्याप्रमाणे न्या. रानडे यांनी सरकारी नोकरीत असतानाच सामाजिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रात भाग घेतला होता.

**३.२.१ न्या. रानडे यांचे राजकीय उदारमतवादी विचार** (Political Liberalism)

प्रत्येक राजकारणी मनुष्य आपले कार्यक्रम एका विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या चौकटीत निश्चित करीत असतो. रानड्यांनीही आपले राजकारण एका विशिष्ट तत्त्वज्ञानानुसार निश्चित केले होते. न्या. रानडे यांचा उल्लेख राजकीय विचारवंत यापेक्षा सामाजिक व आर्थिक विचारवंत म्हणूनच जास्त केला जात असला तरी त्यांचे राजकीय उदारमतवादी विचार सुद्धा जाणून घेणे महत्त्वाचे आहे. रानडे हे मुळात उदारमतवादी विचारवंत आहेत. स्वातंत्र्यप्रेमी आहेत, व्यक्तीचे उपासक आहेत. त्यामुळे त्यांच्या तत्त्वज्ञानात व्यक्तीला दुय्यम स्थान नाही. जुन्या कालबाह्य रूढीतून, बंधनातून व्यक्तीची मुक्तता करणे, त्यांनी महत्त्वाचे मानले. रानडे यांच्या विचारात व्यक्ती स्वातंत्र्यवाद आणि आदर्शवाद यांचे समतोल मिश्रण झालेले दिसते. समाज आणि राज्य यांचे अस्तित्व व्यक्तीच्या सुखासाठी आणि कल्याणासाठी असते. हे रानडे यांनी मान्य केले.

न्या. रानडे यांनी हिंदुस्थानच्या प्रागतिक सनदशीर राजकारणाचा पाया घातला. न्या. रानडे हे धार्मिक वृत्तीचे असल्याने ऐतिहासिक व राजकीय घडामोडींकडे परमेश्वरी हेतूच्या दृष्टीकोणातून पाहत असत. हिंदुस्थानात कायद्याचे राज्य स्थापन करून शांतता प्रस्थापित करण्यासाठी परमेश्वराने ब्रिटिशांना आपल्या देशात पाठविले आहे अशी त्यांची श्रद्धा होती. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हिंदी जनतेला समानतेची वागणूक द्यावी. प्रजेला राज्यकर्त्यांच्या बरोबरीने दर्जा द्यावा आणि हिंदी लोकांनी ब्रिटिश साम्राज्याशी एकनिष्ठ राहून निमूटपणे ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या कायद्यांचे पालन करावे असे त्यांचे राजकीय तत्त्वज्ञान होते.

महाराष्ट्रात जे सुधारणेचे वारे वाहू लागले होते, त्याला तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा प्रयत्न न्या. रानडे यांनी केला. त्यालाच राजकीय उदारमतवाद असे म्हणतात. रानड्यांचा पंथ यामुळेच उदारमतवादी पंथ मानला जावू लागला. रानडे यांच्यावरती जसे प्राचीन हिंदुस्थानातील धर्मांचे गहरे संस्कार झाले होते, त्याचप्रमाणे पाश्चात्त्य विचारवंत आणि साहित्य यांचाही खोलवर ठसा त्यांच्यावर उमटला होता. त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा उगम पाश्चात्त्य उदारमतवादी विचारसरणीमध्ये सापडतो. उदारमतवाद हे त्यांच्या राजकीय व सामाजिक जीवनाचे सार होते. भारतीय विचारांतून त्यांनी जे घ्यायचे ते घेतले, तसेच पाश्चिमात्य विचारांतूनही जे घ्यायचे तेच त्यांनी घेतले. रानडे यांनी भारतात उदारमतवादी परंपरा सुरू केली. याच काळात इंग्लंडमध्ये ॲडम स्मिथ, मिल, बेन्थॅम इत्यादी विचारवंतानी उदारमतवादी विचारप्रणालीस लोकप्रियता मिळवून दिली होती. साहजिकच त्यांचा फार मोठा प्रभाव न्या. रानडे यांच्या विचारसरणीवर पडलेला दिसून येतो. पाश्चात्त्य उदारमतवादाचे तत्त्वज्ञान स्वीकारल्याशिवाय हिंदुस्थानची प्रगती होणार नाही

असे त्यांना वाटत होते. व्यक्तिस्वातंत्र्य, सद्सद्विवेक बुद्धीनुसार कार्य, सनदशीर राजकारण, राजकीय सहभाग अशा स्वरूपाची उदारमतवादी विचारसरणी स्वीकारून न्या. रानडे यांनी आपले राजकीय तत्त्वज्ञान हिंदी समाजापुढे ठेवले. उदारमतवाद हे प्रगत राजकीय संस्कृतीचे प्रतीक आहे. व्यक्तिस्वातंत्र्य व सनदशीर राज्यपद्धती आणि राजकारणात लोकांचा सहभाग ही उदारमतवादी विचारसरणीची काही वैशिष्ट्ये असून त्यांचा न्या. रानडे यांच्यावर फार मोठा परिणाम घडून आला होता. रानडे यांच्या राजकीय उदारमतवादाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगता येईल.

* **सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला** : न्या. रानडे सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला होता. माणसामाणसांमधील विषमतेच्या व भेदाच्या ज्या तटबंदी उभारण्यात आल्या आहेत, त्यांना त्यांचा सक्त विरोध होता. जातीव्यवस्था हा भारतीय समाजव्यवस्थेला लागलेला कलंक आहे, अडसर आहे. मुख्य म्हणजे स्त्री–पुरुष विषमता ही फारच पराकोटीला पोहोचली होती. स्त्रियांना भारतीय कुटुंबात गुलामासारखी वागणूक मिळत होती. त्यांच्या मते सर्वच स्त्री–पुरुष व सर्वच जातीतील माणसे ही ईश्वराची अपत्ये असल्याने त्यांच्यात भेदाभेद करणे व उच्चनीच ठरविणे हे अतिशय कृत्रीम व अनैतिक स्वरूपाचे आहे.

* **राजकीय जीवनात व्यक्तीस्वातंत्र्याचाचा पुरस्कार केला** : रानडे हे सुरुवातीपासूनच उदारमतवादाचे पुरस्कर्ते होते. त्यासाठी त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. भारतामधील प्रत्येक व्यक्तीला भाषण, लिखाण, मुद्रणस्वातंत्र्य असावे असे ते सुरुवातीपासून अट्टाहासाने सांगत. ब्रिटिश अशा प्रकारचे स्वातंत्र्य जनतेस देतील याची त्यांना खात्री होती.

* **व्यक्तीचा सर्वांगीण विकास हे राज्याचे ध्येय असले पाहिजे** : न्या. रानडे यांनी फक्त व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार केला असे नाही तर व्यक्तीला आपल्या तत्त्वज्ञानात मध्यबिंदू मानले. व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणे हे राज्याचे ध्येय असले पाहिजे. व्यक्तीविकास साधायचा असेल तर त्यासाठी व्यक्तीला राज्याने अनुकूल परिस्थिती उपलब्ध करून दिली पाहिजे. ते राज्याचे कर्तव्यच ठरते.

* **राजकीय उदारमतवादासाठी भारतात प्रातिनिधीक शासनाची निकड** : भारतामध्ये राजकीय उदारमतवाद प्रस्थापित करण्यासाठी भारतात जबाबदार प्रातिनिधीक शासन संस्था निर्माण झाल्या पाहिजेत व त्यांचा वेगात विकास झाला पाहिजे. अशा संस्थांमधून भारतीयांनी उत्साहाने भाग घेतला पाहिजे, तसेच जबाबदारी पेलण्याची शक्ती वाढली पाहिजे. सर्वच प्रातिनिधीक संस्थांचा विकास झाला पाहिजे असे रानडे यांना वाटत होते. अर्थात हे सांगत असताना भारताला झटपट स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असे त्यांना कधी वाटले नाही. ब्रिटिशांच्या उपयुक्ततेवर त्यांची ठाम श्रद्धा होती. फक्त त्यांनी राज्यकारभार करताना हुकूमशाही कारभार करू नये असे त्यांना वाटे. ब्रिटिशांच्या चांगुलपणावर त्यांचा गाढ विश्वास होता. पाशवी बळाच्या जोरावर पंचवीस कोटी लोकांवर फार काळ राज्य करता येणार नाही. भारतीय लोकांनी शासनाचे धडे घेतले पाहिजेत मात्र हे करत असताना ते ब्रिटिश राजवटीची गरज स्पष्ट करतात.

*** कायद्याच्या राज्याची आवश्यकता** : रानडे यांचा उदारमतवाद स्पष्ट करताना त्यांनी पुरस्कारलेले कायद्याच्या राज्याची आवश्यकता ध्यानात घेणे गरजेचे ठरते. त्यांच्या मते कायद्याचे राज्य हे खऱ्या अर्थाने उदारमतवादी राज्य निर्माण करते. कायद्याच्या राज्यात सर्वांकरिता समान कायदा असतो. त्यामध्ये कुठलाही भेदाभेद केला जात नाही; याउलट ज्या ठिकाणी कायद्याचे राज्य नसते तेथे सत्ता एका व्यक्तीच्या किंवा समूहाच्या ठिकाणी असते. अशा ठिकाणी कारभार हा लहरीपणाने चालतो. सर्वांना समान वागणूक मिळत नाही.

भारतात ब्रिटिश अधिकारी जुलूम-जबरदस्ती व छळ करतात. कारण त्यांना कायद्याचे अधिराज्य ही कल्पना मान्य नाही. जर हे ब्रिटिश पार्लमेंटला समजले तर अशा अधिकाऱ्याविरुद्ध कडक कारवाई करण्यास ते मागेपुढे पाहणार नाहीत. ज्याप्रमाणे इंग्लंडमध्ये कायद्याचे अधिराज्य आहे तसेच ते भारतातही अस्तित्वात आले पाहिजे. रानड्यांचा हा राजकीय उदारमतवाद आहे असे म्हणता येईल. न्या. रानडे यांचा उदारमतवाद न. र. फाटकांच्या शब्दात थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल. ''जातीपातीच्या व वंशाच्या दुराभिमानातून मुक्त होऊन माणसा-माणसांत न्याय प्रस्थापित करण्याच्या सर्व मार्गांना पाठिंबा देणे, राज्यकर्त्यांशी व त्यांना राबवाव्या लागणाऱ्या कायद्यांशी एकनिष्ठ राहणे. पण त्याचप्रमाणे शासितांसाठी कोणत्याही कायद्याखाली त्यांचा अधिकारच असलेली समता मिळवून देण्यासाठी खटपट करणे म्हणजे उदारमतवाद होय.''

*** न्या. रानडे यांचा राजकीय उदारमतवाद हा पाश्चात्त्य राजकीय उदारमतवाद पेक्षा वेगळा** : न्या. रानडे यांच्या उदारमतवादी विचारावर धार्मिक कल्पना, सामाजिक चालीरिती व परंपरा यांचा प्रभाव पडला होता. ते हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यातील संबंधास दैवी संबंध मानत होते. ती दैवी इच्छेचा परिणाम आहे असे वाटत होते. जगातील सर्व घटना या दैवी इच्छेनुसार निसर्गाच्या नियमानुसार होत असतात. म्हणूनच हिंदुस्थानच्या इतिहासातील घटना त्याला अपवाद असू शकत नाही असे ते म्हणत. तत्कालीन समाजातील धर्मकल्पना आणि चालीरीती याविरुद्ध टीका करणे रानडे यांना पसंत नव्हते असे म्हणावे लागेल. हिंदुस्थानातील ब्रिटिश लोकांची सत्ता हा दैवी इच्छेचा भाग आहे, असे रानडे यांनी जे मत मांडले आहे ते त्यांचे व्यक्तिगत मत मांडले आहे. रूढीप्रिय व परंपरावादी समाजाला पाश्चात्त्य उदारमतवाद एकदम मानवणार नाही, हे त्यांनी ओळखले होते. लोकांच्या धर्मकल्पना आणि परंपरा यांना दुखावणारा उदारमतवाद स्वीकारला तर त्याला जनतेकडून प्रखर विरोध होईल, तेव्हा लोकांच्या धर्मकल्पना व परंपरांना न धक्का पोहोचवता हळूवारपणे राजकीय व सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे उदारमतवादी धोरण न्या. रानडे यांनी स्वीकारले होते.

**न्या. रानडे यांच्या उदारमतवादाच्या मर्यादा**

न्या. रानडे यांचा उदारमतवाद हे त्यांच्या राजकीय व सामाजिक जीवनातील अत्यंत ठळक असे वैशिष्ट्य आहे. परंतु त्यांच्या उदारमतवादामध्ये पुढील दोष दिसून येतात.

*** न्या. रानडे यांच्यावर रूढी व परंपरांचा प्रभाव होता** : न्या. रानडे स्वतः उदारमतवादी असले तरी ते स्वतः रूढीपरंपरा यांच्या कात्रीतून कधीही सुटू शकले नाहीत. ते जरी बुद्धिमान असले तरी त्यांच्यावर रूढी-परंपरा यांचा विलक्षण दबाव होता. त्यांनी जुन्याचालीरिती व मूल्ये यांच्यावर कठोर प्रहार केव्हाही केले नाहीत. विधवा विवाहास प्रोत्साहन देणारे रानडे स्वतःवर वेळ आल्यानंतर विधवा विवाहापासून दूर राहिल्याचे दिसते.

*** राज्याच्या हस्तक्षेपास मान्यता** : न्या. रानडे हे पूर्णपणे व्यक्तिस्वातंत्र्यवादी नव्हेत तर व्यक्ति-विकासाचा विचार करणारे विचारवंत होते. त्यामुळे त्यांनी समाजजीवनात राज्याचा हस्तक्षेप मान्य केला आहे. राज्याचा हस्तक्षेप ज्या ठिकाणी होतो त्या समाजात व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोचही होतो असे दाखले इतिहासात अनेक ठिकाणी सापडतात. आर्थिक क्षेत्रातील स्वातंत्र्याला तर त्यांनी पूर्ण विरोध केला होता. ते म्हणतात की सरकारनेच वस्तूचे उत्पादन व वितरण केले पाहिजे. वास्तविक या बाबतीत ज्यावेळेस सरकार दखल घेते तेव्हा व्यक्तिस्वातंत्र्याचा खऱ्या अर्थाने संकोच होतो. राजकीय उदारमतवादावर त्यामुळे फार मोठे बंधन येते.

*** न्या. रानडे यांच्या विचारात विरोधाभास** : न्या. रानडे यांच्या विचारात विरोधाभास असून एका गोष्टीमुळे झाला आहे तो म्हणजे रानड्यांनी ब्रिटिश राजसत्तेचे अस्तित्व मान्य केले होते. एवढेच नव्हे तर ते टिकून राहण्यास संमती दिली होती. म्हणजेच एका बाजूला व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करायचा आणि दुसरीकडे ब्रिटिशांची हुकूमशाही सत्ता या देशावर चालू देण्यास संमती द्यायची. अशा गोष्टींमुळे उदारमतवाद संपुष्टात येतो, असेच म्हणावे लागेल.

*** भारतातील सनातन धर्मावर अतूट श्रद्धा** : पाश्चात्त्य विचार, साहित्य आणि शिक्षण हे उदारमतवादीसाठी प्रसिद्ध होते. त्याचा फार मोठा प्रभाव न्या. रानडे यांच्यावर होता, असे असताना सुद्धा भारतामधील सनातनी धर्मावरील त्यांची श्रद्धा कमी झाली नव्हती. वास्तविक भारतामधील सनातन धर्म हा उदारमतवादास पोषक नव्हता. उलट धर्माला महत्त्व दिल्याने व व्यक्तीपेक्षा धर्म मोठा मानल्याने व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा आल्या हे नाकारता येत नाही.

वरीलप्रमाणे न्या. रानडे यांच्या राजकीय उदारमतवादावर टिका होत असली तरी त्यांचे उदारमतवादी विचार दखल घेण्यासारखे नाहीत असे म्हणता येणार नाही. कारण, व्यक्तीची प्रेरणा जशी उदार असते तशीच ती स्वार्थीपण असते, असे त्यांना वाटत असावे. म्हणूनच त्यांनी अमर्याद व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केला नसावा. व्यक्तीला समाजात कार्यक्षम घटक कसे बनवता येईल याचा विचार त्यांनी केला असावा. म्हणूनच व्यक्तीच्या हक्काचे विनाकारण अवडंबर न माजवता उलट समाजाच्या कर्तव्यबुद्धीला व सद्भावनेला त्यांनी आवाहन केले. शेकडो वर्षे रूढींनी जखडलेल्या भारतीय समाजाला पाश्चात्त्य उदारमतवाद पचणार नाही याची त्यांना कल्पना असावी. रानड्यांनी लोकसंग्रहासाठी आपल्या उदारमतवादी तत्त्वज्ञानास मुरड घातली आणि उदारमतवादाची परंपरावादाशी सांगड घातली असे म्हणता येईल.

### ३.२.२ न्या. रानडे यांचे सामाजिक सुधारणेसंबंधीचे विचार
(Justice Rande's Thoughts on Social Reforms)

न्या. रानडे यांच्या काळात असा विचार रुजत चालला होता की भारताच्या अवनत स्थितीला राजकीय पारतंत्र्य, ब्रिटिश राजवट कारणीभूत आहे आणि म्हणून आपण राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होत नाही तोपर्यंत दुसरे काहीही करणे गैर आहे, परंतु अशी विचारसरणी न्या. रानडे यांना मान्य होणे शक्यच नव्हते. त्यांच्या मते, राजकीय व सामाजिक बाबींची फारकत कधीही करता येत नाही. समाजाच्या अंगाच्या त्या दोन बाबी आहेत. एक अंग दुसऱ्यापासून बाजूस काढता येत नाही. त्याप्रमाणेच राजकीय व सामाजिक या दोन्ही बाजूंचा विचार एकत्रच करावा लागेल असे त्यांचे मत होते. एखाद्या समाजाच्या कल्पनाच अप्रगत आणि मागास असतील तर राजकीय विकास, सुधारणा या पूर्णपणे निराधार ठरतील. समाज व्यवस्थेमध्येच काही उणिवा असतील तर कोणतीच व्यवस्था यशस्वी होणे शक्य नाही, म्हणून रानडे हे राजकीय सुधारणां बरोबरच सामाजिक सुधारणासुद्धा तितक्याच महत्त्वाच्या आहेत या मताचे होते. इतकेच नव्हे तर त्यांनी सामाजिक सुधारणांना अग्रक्रम दिला होता.

न्या. रानडे यांनी तत्कालीन परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण व अवलोकन केले होते. समाजातील जाती व्यवस्था फारच दृढ झाली होती. जाती व्यवस्थेने बरेच उग्र रूप धारण केले होते. या जाती-जमातीच्या उतरंडीने उच्च-नीचता समाजात घट्ट होऊ लागली होती. त्यामुळे समाज जीवन विस्कळीत झाले होते. या व्यवस्थेमुळे सामाजिक ऐक्य नष्ट झाले होते.

विषम सामाजिक रचनेने आर्थिक विषमताही तितक्याच मोठ्या प्रमाणात निर्माण झाली होती. कारण जातीनिहाय कामे वाट्याला आल्याने प्रत्येक सांपत्तिक स्थिती ही त्यानुसारच ठरत होती. समाजातील शिक्षण सुद्धा विशिष्ट वर्गापुरतेच मर्यादित झाल्याने शिक्षणाचे दरवाजे इतरांना बंद होऊन त्यांचा विकास खुंटला होता.

त्यावेळचा समाज वाईट चालीरितीमध्ये अडकला होता. एकाच वेळी बालविवाह व वृद्ध विवाह या टोकाच्या वाईट प्रथा अस्तित्वात होत्या. स्त्रियांच्या हालाखीस पारावर उरला नव्हता. बालविधवांचे प्रमाण वाढत चालले होते. आर्थिकदृष्ट्या स्त्रिया पुरुषांवर अवलंबून होत्या. त्यामुळे त्यांच्या दास्यत्वात भरच पडली होती. स्त्रियांना पतीच्या निवडीत वाव नव्हता. त्यांना वृद्ध म्हाताऱ्या माणसाशी विवाह करावा लागत असल्याने वैधव्यानंतर फार एकटेपणात, हालाखीत दिवस काढावे लागत. पुरुषांना मात्र हव्या तेवढ्या स्त्रियांशी लग्ने करता येत असत. एकंदरीत स्त्रीचा अत्यंत कनिष्ठ दर्जा समाजात अस्तित्वात होता.

निष्कारण कर्मकांड, जाचक धार्मिक चालीरिती आणि वाईट जुनाट प्रथा यामध्ये समाज अडकलेला होता. धर्माचा फायदा समाजातील मूठभर वरिष्ठांना मिळत होता, असंख्य कनिष्ठ मात्र यामध्ये भरडले जात होते. ठेविले अनंते तैसेची रहावे अशा प्रकारची निष्क्रिय वृत्ती बोकाळली होती. समाजाचे चित्र अत्यंत उदास, निराशाजनक असे होते.

राजकीय स्वातंत्र्याचा विचार केला तरी जोपर्यंत विवेकावरती आधारलेले समाजजीवन अस्तित्वात येत नाही, तोपर्यंत राज्यपद्धती सुरळीतपणे चालूच शकणार नाही. जोपर्यंत समाजव्यवस्थेत काहीतरी उणीव असते, तोपर्यंत अर्थव्यवस्था सफल होणे कधीच शक्य नाही. समाजाच्या कल्पनाच जर अत्यंत अप्रगत असतील तर आर्थिक, राजकीय व्यवस्था पूर्णपणे निराधार ठरतील म्हणून राजकीय सुधारणेबरोबरच सामाजिक सुधारणेस देखील तेवढेच महत्त्व देतात.

**१. सामाजिक सुधारणा महत्त्वाच्या असण्याची कारणे**

**(अ) सामाजिक स्वातंत्र्याची निर्मिती** : न्या. रानडे हे अशा मताचे होते की, सामाजिक स्वातंत्र्य हा राजकीय स्वातंत्र्याचा पाया आहे. सामाजिक स्वातंत्र्य निर्माण झाले नाही तर राजकीय स्वातंत्र्यही निर्माण होणार नाही. म्हणून सामाजिक स्वातंत्र्याची निर्मिती केली पाहिजे. ते म्हणतात की ब्रिटिशांनी जर आपल्याला स्वातंत्र्य देऊन टाकले अणि आपण लोकशाहीची निर्मिती केली तर लोकशाही टिकविण्यासाठी जी आवश्यक परिस्थिती असते ती आपणाकडे आहे काय?

**(ब) सामाजिक परिवर्तन** : न्या. रानडे म्हणतात की महाराष्ट्राचा इतिहास असे दर्शवितो की अगोदर सामाजिक परिवर्तन व्हावे लागते. महाराष्ट्रात मराठ्यांचा विकास होण्यापूर्वी संत तुकाराम, संत रामदास यांनी समाजातील सुधारणांचा विचार समाजाच्या सर्व पातळ्यांपर्यंत नेऊन पोहोचविला व सुधारण्यासाठी समाजाची मानसिक तयार केली.

**(क) रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांचा समाजावर अनिष्ठ परिणाम** : भारताच्या समाजरचनेचा विचार केला तर असे लक्षात येते की, समाजरचनेवर रूढी, संकेत, चालीरिती, प्रथा, परंपरा यांचा फार मोठा अनिष्ट प्रभाव आहे. त्याचा परिणाम असा झाला की, संपूर्ण समाजच विवेकशक्ती हरवून बसला आहे. तो रूढी, परंपरा यांचा गुलाम झाला आहे. म्हणून प्रथम आपली अंतर्गत सुधारणा करायला हवी.

**२. राजकीय व सामाजिक प्रश्न एकाच नाण्याच्या दोन बाजू** : न्या. रानडे यांच्या मते राजकीय व सामाजिक प्रश्न हे वेगवेगळे असूच शकत नाहीत. राजकीय व सामाजिक या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यांना परस्परांपासून विभक्त करता येत नाही. त्यांना एकमेकांपासून विभक्त करणे म्हणजे त्या प्रश्नाचे घोंगडे भिजत ठेवण्याचा प्रकार आहे.

**३. भारतीय समाजव्यवस्थेतील दोष** : न्या. रानडे यांच्या काळातील समाज हा अनेक दृष्टीनी वैशिष्ट्यपूर्ण असा होता. त्यांच्या मते या समाजव्यवस्थेत पुढील दोष होते.

**(अ) जातीव्यवस्था** : जातीव्यवस्था हा भारतीय समाजव्यवस्थेला मिळालेला शाप आहे. वास्तविक पाहता अशा जातीव्यवस्थेबद्दल भारतीयांच्या मनात घृणा व तिरस्कार निर्माण व्हायला हवा होता. परंतु तसे न होता उलट जातीव्यवस्था एक अत्यावश्यक व मौलिक ठेवा आहे असे त्यांना वाटे. जातीव्यवस्था हा आपणास लागलेला कलंक आहे असे भारतीय समाजाला कधीच वाटत नव्हते. उलट ते आपल्या समाजव्यवस्थेचे भूषण आहे असे वाटत असे.

**(ब) धर्माज्ञा ही देवाज्ञाच** : भारतीय समाजावर धर्माचे जबरदस्त प्राबल्य आहे. परंतु धर्माचे कोणतेही तत्त्व बुद्धिप्रामाण्यांच्या कसोटीवर तपासून पाहण्याचा प्रयत्न येथे कोणीच केला नाही. त्याचा वाईट परिणाम काय होतो ते तपासण्याचा प्रयत्न कधीच झाला नव्हता. त्याचा वाईट परिणाम असा झाला की एखादी रूढी किंवा परंपरा कितीही हानिकारक असली, तरी तिला धर्माचा आधार मिळाल्याने तिला समाजमान्यता मिळाली.

**(क) मागासलेला समाज** : त्यावेळचा भारतीय समाज मागासलेला होता. तो आपल्याच धर्मातील कालबाह्य ठरलेल्या तत्त्वज्ञानाभोवती फिरत राहिला होता. प्रगत, सुसंकृत पाश्चात्त्य संस्कृतीकडे त्याने पाहिले नाही, त्याचबरोबर नवीन वैज्ञानिक दृष्टीकोण स्वीकारून प्रगत युगाकडे झेप घेण्याचा प्रयत्न तत्कालीन भारतीय समाजाने केला नाही. त्याची परिणीती म्हणून भारतीय समाज मागासलेला राहीला.

**(ड) चौकस बुद्धीचा अभाव** : न्या. रानडे यांच्या मते, तत्कालीन समाजामध्ये स्वतंत्र बुद्धीने, चौकस बुद्धीने एखाद्या प्रश्नावर विचार करण्याची क्षमता भारतीय समाजात नाही. न्या. रानडे यांचे मते भारतीय समाजावर धर्माचा रूढी परंपरांचा फार मोठा प्रभाव राहीला आहे. त्यामुळेच तो स्वतंत्र विचार करू शकत नव्हता. त्याचबरोबर भारतीय समाज प्रगत इंग्रजी शिक्षणापासून दूर राहिला आहे. त्यामुळे कोणत्याही प्रश्नांचा वैज्ञानिक दृष्टीकोणातून विचार करण्याऐवजी धार्मिक नेत्यांच्या आज्ञापालनातच जन्म गेला. त्यामुळेच समाजाची प्रगती खुंटली व विकास थांबला.

**समाजात बदल घडविण्यासाठी काय करावे लागेल ?**

भारतीय समाजाची सर्वांगीण प्रगती करायची असेल तर भारताच्या स्थितीप्रिय समाजाचे स्वरूप बदलले पाहिजे असे न्या. रानडे यांना वाटत होते. अशा प्रकारचा समाज हा भारताच्या प्रगतीमधील अडथळा आहे, भारतीय समाजात कशा प्रकारे बदल घडून येऊ शकतो, याबद्दल न्या. रानडे यांनी सखोल चिंतन केले होते. समाजसुधारणा घडविण्यासाठी समाजातील सर्व घटकांना बरोबर घेतले पाहिजे. समाजातील सर्वांत खालच्या वर्गापासून वरपर्यंत सुधारणा घडवून आणल्या तरच खऱ्या अर्थाने सामाजिक बदल होईल असे रानडे यांना वाटत होते. धर्मावर एकदम हल्ला न चढविता धर्माचीच कास धरत हळूहळू त्यात बदल करावा लागेल. नवा विचार अवश्य स्वीकारा पण त्यासाठी जुन्याचा एकदम त्याग करू नये, टोकाच्या क्रांतीकारक सुधारणा मान्य करण्यास कोणताही समाज एकदम कधीच तयार होत नसतो. त्यासाठी त्यांची मनोवृत्ती तयार करावी लागेल. भारतीय लोकांवर धर्माचा प्रभाव जबरदस्त आहे त्यामुळे धर्माला सोडून बदल करणे अशक्य आहे असे न्या. रानडे यांना वाटते. त्यासाठी रानडे हे प्रगतीवाद व चालत आलेला धर्म यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या मते सामाजिक दृष्टीने विचार केला तर जुना काळ चांगला होता, वैदिक काळात उच्च प्रतीची सामाजिक व्यवस्था अस्तित्वात होती. ती पुढे मध्ययुगात नाहीशी झाली व त्याच्या जागी अनावश्यक असे कर्मकांड सुरू झाले. आपल्या समाजावर रूढी आणि परंपरा यांचा पगडा आहे. त्यामध्ये बदल करायचा असेल तर नवा दृष्टीकोण स्वीकारला पाहिजे. त्यासाठी

(१) पहिला मार्ग असा की, माणसातील चांगल्या प्रवृत्तींना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांची चांगली वर्तणूक सतत जागी ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मनुष्य समाजात वावरत असताना तो सतत कोणत्या ना कोणत्या दबावाखाली वावरत असतो. स्वतःच्या बुद्धीचा वापर करून हा दबाव झुगारून देण्याची कुवत त्याच्यात नसते; रानडे म्हणतात की ज्या सामाजिक सुधारणा करणे आवश्यक आहेत त्या जरूरी आहेत. ते माणसाला पटले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक घटना बुद्धिप्रामाण्याच्या कसोटीवर घासून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. (२) दुसरा नैतिक मार्ग म्हणजे ज्या रूढी आणि परंपरा दुष्ट व हानिकारक आहेत त्यांचा त्वरीत त्याग केला पाहिजे, अशा रूढी परंपरा जोपासणे अयोग्य आहे. चांगल्या रूढी जरूर जोपासल्या पाहिजेत परंतु वाईट रूढी नष्टच केल्या पाहिजेत.

**क्रांतिकारक सुधारणांना विरोध**

न्या. रानडे हे मुळातच नेमस्त, सनदशीर, शांत वृत्तीचे होते. समाजामध्ये क्रांती उलथापालथ होऊन सुधारणा घडाव्यात हे त्यांना मान्य नव्हते. क्रांतीच्या मार्गानी होणारे बदल हे अचानक होतात पण ते योग्य नाही, कारण सामाजिक परिवर्तन नेहमीच मंद व संथ गतीने व्हावे लागते, तरच ते टिकाऊ स्वरूपाचे असते. ज्यावेळेस सुधारणा या सहज आणि शांततेच्या मार्गाने होत नाहीत, त्यावेळी समाजाची सुधारणा घडविण्याचा हा रामबाण मार्ग असला तरी अशा क्रांतीच्या मार्गाने समाज परिवर्तन होऊ नये असे रानडे यांना वाटते.

**सामाजिक सुधारणांना गती देण्यासाठी न्या. रानडे यांनी स्वीकारलेले मार्ग**

**१. स्त्री शिक्षण** : स्त्री सुधारणा व स्त्री शिक्षण हा रानडे यांचा अतिशय कळकळीचा, तळमळीचा आणि व्यथेचा विषय होता. त्या काळात भरपूर शिक्षण देणाऱ्या संस्था उघडल्या होत्या पण मुलींना मात्र शिक्षणापासून दूर ठेवले जात होते. त्यांनी अनेकांचे साहाय्य घेऊन पुण्यात मुलींसाठी शाळा सुरू केली. रानडे यांनी विधवा विवाहासाठी सुद्धा भरपूर प्रयत्न केले. त्यांनी पुण्यात विधवा विवाहांना उत्तेजन देणारी संस्था स्थापन केली होती. त्यांनी समाजसुधारणेच्या क्षेत्रात फार मोठे पाऊल टाकले होते.

**२. वृत्तपत्राचे माध्यम** : न्या. रानडे यांनी सामाजिक सुधारणेस पोषक असे लिखाण केले. वृत्तपत्र हे समाजसुधारणेचे हत्यार होते. त्यांनी वृत्तपत्रातून सातत्याने स्त्रियांची परिस्थिती, अशिक्षितपणा यावर प्रहार केले, बालविवाह पद्धतीवर टीका करून विधवा विवाहास उत्तेजन देण्यासाठी सातत्याने लिखाण केले.

**३. प्रार्थना समाजाची स्थापना** : सामाजिक सुधारणांना बळ मिळावे म्हणून प्रार्थना समाजाची स्थापना केली. प्रार्थना समाजाची स्थापना करण्यामागे त्यांचा हेतू धार्मिक सुधारणा करणे हा होता एक परमेश्वर अवतारवादास विरोध या कल्पना त्यांनी समाजापुढे मांडल्या. याच माध्यमातून धर्मातील थोतांडांना विरोध केला. समाजातील जातीभेदाचा त्यांना तिटकारा होता. या जातीभेदाला विरोध करण्याचे साधन म्हणून त्यांनी प्रार्थना समाजाचा वापर केला.

**४. सामाजिक परिषदेची स्थापना** : सामाजिक सुधारणांना व्यापक व्यासपीठ मिळावे म्हणून सामाजिक परिषदेची स्थापना केली. या परिषदेचा आधार घेऊन निरनिराळ्या सामाजिक समस्येवर तीव्रपणे विचार करण्यास सुरुवात झाली. याच सुमारास भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली होती व लोकांचे लक्ष सामाजिक प्रश्नावरून राजकीय प्रश्नांकडे वळण्याचा फार मोठा धोका निर्माण झालेला होता म्हणून सामाजिक प्रश्नांचा योग्य अभ्यास होण्यासाठी हे होणे गरजेचे होते.

**सामाजिक सुधारणेच्या पद्धती**

**१. पारंपारिक पद्धती** : जुन्या चालीरिती, परंपरा, प्रथा यांचा अर्थ बदलत्या परिस्थितीनुसार बदलून त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे, न्या. रानडे यांच्या मते, समाज सुधारकांनी भूतकाळातील प्रथा, परंपरांचे नाते न तोडता त्यामध्ये नवीन भर घालून सुधारणा घडवून आणाव्यात, परंतु बालहत्या, सतीची चाल, केशवपन, बालविवाह, यज्ञामध्ये प्राण्यांचा बळी, बहुपत्नीत्व या पद्धतीचे व पुनर्जीवन करण्यास न्या. रानडे विरोध केला.

**२. विवेक पद्धती** : या पद्धतीमधील एक मोठा दोष म्हणजे धार्मिक नियमांचे अर्थाबाबतीत नेहमीच मतभेद निर्माण होतात, आणि तो न मिटणार वाद असतो. त्यामुळे समाजसुधारणेच्या उद्दिष्टांमध्ये अडसर निर्माण होतो म्हणून अनेक सुधारक, लोकांच्या सद्सद्विवेक बुद्धीला आवाहन करण्याचा मार्ग स्वीकारतात. समाजात ज्या अनिष्ट प्रथा, परंपरा आहेत त्यांचे दुष्परिणाम लोकांना पटवून देवून त्याऐवजी सद्विवेक म्हणजे ईश्वराचा आवाज मानवी मनाला म्हणजे मानवी विवेकाला ज्या सुधारणा पटतील, भिडतील त्यांचाच स्वीकार करणे. स्त्री-पुरुष समानता, स्त्री शिक्षण, रोटी-बेटी व्यवहार, विधवांचे पुनर्विवाह इत्यादी परंपरांचे, प्रथांचे महत्त्व लोकांना पटवून देणे आवश्यक आहे, असे रानडे यांना वाटत होते.

सामाजिक परिषदेच्या कलकत्ता येथे भरलेल्या अधिवेशनात ते म्हणाले होते की, ''माणसांमधील सद्सद्विवेक बुद्धी जागृत केल्याशिवाय केवळ बाह्यात्कारी साधनांचा वापराने महत्त्वाचे असे काही मिळणार नाही, पण मृत सांगाड्यात सजीवतेची धुगधुगी दिसावी, गारठलेल्या हातापायात ऊबदारपणा यावा, तशी या निद्रिस्त समाजात जागृतीची चिन्हे आता दिसू लागली आहेत.

**३. कायद्या पद्धती** : न्या. रानडे यांच्या मते, जर परंपरावादी किंवा विवेक पद्धतीच्या माध्यमातून सुधारणा घडवून आणणे शक्य झाले नाही तर कायद्याच्या आधारे सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. विवाहाची वयोमर्यादा वाढविणे, संमती वयाचा कायदा करणे, अशा सुधारणा राज्याच्या कायद्याद्वारे कराव्यात असे त्यांचे मत होते. हिंदू समाजातील लोकांनी ज्या सुधारणा आवश्यक वाटतात त्यासंबंधी त्यांनी सरकारकडे मागणी करावी, म्हणजे संस्कार यासंबंधीचे कायदे करून सामाजिक परिवर्तन घडवून आणू शकते. ज्या रूढी, परंपरा, प्रथा समाजविघातक आहेत, त्यांच्या पालन करण्यावर कायद्याने बंदी घालावी, असे न्या. रानडे यांचे मत होते. कायद्याच्या निर्मितीमुळे नवीन बंधने निर्माण होतील, परंतु ही नवी बंधने, जुनी बंधने दूर करण्यासाठी उपयोगी पडणार आहेत.

वरीलप्रमाणे सामाजिक सुधारणेच्या पद्धती सांगून न्या. रानडे यांनी त्यादृष्टीने विधायक स्वरूपाचे कार्य केले. हिंदू समाजातील दोष दूर करून त्याची नैतिक उंची वाढविण्याचे ध्येय त्यांनी स्वीकारले होते. हिंदू धर्माच्या जुनाट वृक्षावर जी बांडगुळे वाढली होती, ती कापून काढण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने केला. समाजसुधारणेचे कार्य करताना त्यांनी राजकीय सुधारणेकडे दुर्लक्ष केले नव्हते. सामाजिक सुधारणा व राजकारण यांची ताटातूट करता येत नाही.''

### ३.२.३ न्या. रानडे यांचे आर्थिक विचार (Economic Ideas of Justice Ranade)

न्या. रानडे हे एक निष्णात अर्थशास्त्रज्ञ होते. तत्कालीन भारताच्या गंभीर आर्थिक स्थितीचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता न्या. रानडे यांच्या मताप्रमाणे कोणताही प्रश्न केवळ राजकीय नसतो व सामाजिकही नसतो त्यास आर्थिक बाजूही असते.

**न्या. रानडे यांच्या मते भारताची विपन्नावस्था का झाली** : ब्रिटिश राजवटीमुळेच देशाला दारिद्र्य आले आहे हे दादाभाईंचे मत न्या. रानडे यांना मान्य नव्हते. त्यांच्या मते फार प्राचीन काळापासून या देशात दारिद्र्य चालत आले आहे. तो शतकानुशतकांचा वारसा आहे. दादाभाई नौरोजी म्हणत की, भारताच्या दारिद्र्याला ब्रिटिश राज्यकर्ते व त्यांनी चालविलेली लूट आहे. सनदी नोकरांचे पगार आणि इतर मार्गांनी बराच पैसा परदेशात जातो. त्यामुळे देशाची अवस्था फारच वाईट झाली होती. न्या. रानडे यांना दादाभाई नौरोजी यांचा हा विचार मान्य नव्हता. ते म्हणत ब्रिटिश, सैनिक, पोलीस यावरती होणारा खर्च ही काही भारताची लूट नाही. कारण त्या पैशाच्या मोबदलत्यात ते भारतात शांतता व सुव्यवस्था निर्माण करतात. जुन्या राज्यकर्त्यांनी तर लोकांचे संरक्षण केले नाही. परंतु लोकांची प्रचंड लूट मात्र केली. भारतातून ब्रिटिशांनी पैसा नेला हे जरी खरे असले तरी जुन्या काळातील सावकारांनी केलेल्या लुटीपेक्षा ही लूट फारच कमी होती.

### हिंदुस्थान दरिद्री का आहे ?

**१. भारतीय लोकांजवळ उद्योगासाठी लागणारे धाडस नाही** : दादाभाई नौरोजींनी ज्याप्रमाणे भारतीय लोकांच्या दारिद्र्याचा सखोल अभ्यास केला होता. त्याचप्रमाणे न्या. रानडे यांनी सुद्धा भारतातील दारिद्र्याची सखोल अशी मीमांसा केली आहे. भारतीय समाजाचे संपूर्ण अवलोकन करून ते असे म्हणतात ''भारतीय समाजातील लोकांजवळ उद्योग-धंद्यासाठी व्यवसायासाठी लागणारी हिंमत नाही, दमदारपणा नाही. धाडस किंवा धडाडी दाखविल्याशिवाय संपत्तीची वाढ कधीही होत नाही.

**२. भारतीय लोकसंख्येचा प्रश्न** : न्या. रानडे यांनी लोकसंख्येचा प्रश्न सुद्धा हाताळला आहे ते म्हणतात की सतत वाढत जाणारी लोकसंख्या हे सुद्धा भारतातील दारिद्र्याचे एक प्रमुख कारण आहे. वाढत्या लोकसंख्येला पोसण्यासाठी उद्योगधंद्याची पुरेशी वाढ भारतात झाली नाही, या वाढत्या लोकसंख्येचा भार एकट्या शेतीलाच सोसावा लागतो. शेती निकृष्ट प्रतीची असल्याने दारिद्र्यात आणखी भरच पडली.

**३. खेड्यांची मोठ्या प्रमाणात वाढ** : न्या. रानडे यांनी भारतातील दारिद्र्याची मीमांसा करताना, हे स्पष्ट केले की येथे खेडी खूपच प्रमाणात वाढत आहेत. त्यामुळे देशाचा विकास ज्या प्रमाणात व्हायला पाहिजेत त्या प्रमाणात झाला नाही. खेड्यांचा भाग हा जुन्या विचारांना चिकटून राहिला. हे भारतातील दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे.

**४. अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून** : भारतातील अर्थव्यवस्था केवळ शेती व्यवसायावर अवलंबून आहे. शेती हे अर्थोत्पादनाचे व उपजिवीकेचे एकमेव साधन आहे. येथील शेती अत्यंत मागासलेल्या अवस्थेत आहे. त्यामुळे भारताच्या दारिद्र्यात वाढ झाली आहे.

**५. आर्थिक विकासासाठी औद्योगिकरणाची गरज** : आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरण अत्यंत आवश्यक आहे. असे औद्योगिकरण करण्यासाठी फार मोठे भांडवल आवश्यक असते. तशा प्रकारचे भांडवल भारताजवळ नाही त्यामुळे मागासलेपणात अधिकच भर पडली आहे.

**६. कर्जात बुडालेला शेतकरी** : भारतीय शेतकरी हा कर्जात जन्मतो, कर्जात वाढतो व कर्जातच मरतो. कर्ज हे सावकाराकडून घेतल्याने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती कधीही सुधारू शकली नाही.

**७. रूढी परंपरात अडकलेला भारतीय समाज** : भारतीय समाज हा चालीरिती, रूढी, परंपरा यात अडकून पडलेला आहे. भारतीय समाजाला या लोकांपेक्षा परलोकावर जास्त रस आहे. त्यामुळे जनतेच्या प्रगतीला जी गती येणे आवश्यक आहे, ती येऊ शकली नाही.

**८. सरकारी धोरणाची अनास्था** : सरकारचे धोरण हे शेती व्यवसायाला पोषक नव्हते. त्यामुळे भारतीय दारिद्र्यात अधिकच भर पडते. देशी उद्योगांना प्रोत्साहन देण्याऐवजी सरकार विविध वस्तूंच्या आयातीवर विसंबून होते. भारतातील उद्योगधंद्याच्या त्यामुळे ऱ्हास झाला. पर्यायाने देशाची अर्थव्यवस्था ढासळली व दारिद्र्य वाढले.

**भारतातील दारिद्र्य दूर करण्याचे उपाय**

न्या. रानडे हे जसे समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ होते, त्याचप्रमाणे ते उत्तम अर्थशास्त्रज्ञही होते. त्यांनी भारताच्या दारिद्र्याची सूक्ष्म मीमांसा केली होती. भारताचे दारिद्र्य दूर कसे करता येईल याचाही त्यांनी विचार केला होता. त्यांनी हिंदुस्थानच्या आर्थिक प्रगतीसाठी विधायक स्वरूपाचे कार्य केले आहे. १८८५ साली तत्कालीन सरकारने जी आर्थिक समिती नेमली होती. तिचे सदस्य म्हणून रानड्यांची नियुक्ती करण्यात आली होती. औद्योगिक विकासासाठी हिंदुस्थानातील जनतेत उत्साह व धाडस निर्माण व्हावे यासाठी रानड्यांनी १८९० साली 'पश्चिम हिंदुस्थान औद्योगिक परिषद' भरविली होती. त्यामुळे आर्थिक व औद्योगिक प्रगतीच्या प्रश्नांना चालना मिळाली. १८९२ साली न्या. रानडे यांनी हिंदी अर्थशास्त्रावर लेख लिहून ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानच्या आर्थिक प्रश्नाकडे कोणत्या दृष्टिकोणातून पहावे याविषयी सूचना केल्या होत्या.

न्या. रानडे यांनी फ्रेडरिक लिस्ट, कॅरे अशा अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांचा आधार घेऊन हिंदी अर्थशास्त्राचा पाया घातला. व्यक्तिगत स्पर्धा, व्यक्तिगत स्वार्थ आणि आंतरराष्ट्रीय खुला व्यापार यातून व्यक्तीचा आर्थिक विकास साधला जाईल आणि व्यक्तीच्या विकासातून राष्ट्राचा विकास होईल अशी जी विचारसरणी पाश्चिमात्य देशात रूढ होती. ती न्या. रानडे यांना मान्य नव्हती. त्यांना आर्थिक क्षेत्रातील व्यक्तिस्वातंत्र्यवाद आणि वैयक्तिक क्षेत्रातील मुक्त स्पर्धा मान्य नव्हती.

भारताच्या आर्थिक विकासाकडे सामाजिक व वास्तववादी दृष्टीकोणातून पाहिले पाहिजे असे त्यांचे मत न्या. रानडे यांनी भारतातील दारिद्र्य कसे दूर करता येईल यासंबंधी उपाय सुचविले आहेत.

**१. शेतीचे आधुनिकीकरण व्हावे** : भारताचा मुख्य व्यवसाय शेती आहे. ते म्हणतात की, दारिद्र्य दूर व्हावयाचे असेल तर शेतीची सर्वांगीण उन्नती केली पाहिजे व तिचे पूर्ण आधुनिकीकरण केले पाहिजे. हा देश शेतीप्रधान असल्याने याचे मुख्य उद्योगाकडे दुर्लक्ष झाले तर दारिद्र्यास निमंत्रण देण्यासारखे आहे. शेती कसण्याचे जुने तंत्र आता टाकून दिले पाहिजे. आणि आधुनिक पद्धतीची यांत्रिकी शेती सुरू केली पाहिजे. सहकारी शेतीचा अवलंब केला पाहिजे. भारतामधील शेतकऱ्याला शेतीसाठी लागणारा पैसा उपलब्ध करून देण्यासाठी खास बँका स्थापन व्हायला हव्यात.

**२. नागरीकरण जलद झाले पाहिजे** : न्या. रानडे यांच्या मते भारताचे शहरीकरण विस्तृतपणे जलद गतीने झाले पाहिजे. त्यांच्या मते खेडी म्हणजे अज्ञान, मागासलेपणा, जुनाट अंधश्रद्धा व निष्क्रियता यांचे आगर आहे. शहरीकरण होऊ लागले की आधुनिकता मोठ्या प्रमाणावर वाढू लागेल. तसे झाले तर लोक प्रगत होतील, शहरांची प्रगती नेहमी जलदगतीने होते.

**३. सरकारने आर्थिक नियोजन करावे** : न्या. रानडे हे आर्थिक क्षेत्रात सरकारी हस्तक्षेपाचे पुरस्कर्ते होते. आर्थिक प्रगतीसाठी सरकारने आर्थिक नियोजन करावे. सरकारने लोकांच्या आर्थिक जीवनात हस्तक्षेप करू नये असे त्यांना वाटे. भारतातील दारिद्र्य इतके भयानक होते की, स्वतःचा स्वतःच्या पायावर करून घेणे त्याना अशक्य होते. म्हणून शेतीविकास उद्योगधंदे या बाबतीत सरकारने आर्थिक नियोजन केले तर भारताचे दारिद्र दूर होईल असे त्यांना वाटत होते.

**४. पाश्चिमात्य भांडवलाचे स्वागत** : भांडवलाची कमतरता असलेल्या देशात पाश्चिमात्य भांडवल आणून औद्योगिक विकास घडवून आणण्यास न्या. रानडे यांची हरकत नव्हती. उद्योजकांना भांडवल उपलब्ध व्हावे, म्हणून देशांतर्गत सहकारी पेढ्या/सोसायट्या निर्माण कराव्यात अशी त्यांची सूचना होती. आर्थिक विकासासाठी दळणवळणाची प्रगत साधने उपलब्ध करून दिली पाहिजेत. शहरांचा योग्य विकास व बिगर शेतमालाचा उठाव होण्यासाठी बाजारपेठा उपलब्ध झाल्या पाहिजेत.

**५. मोठे उद्योगधंदे निर्माण करावेत** : भारतामधील दारिद्र्य संपवायचे असेल तर देशाचे झपाट्याने औद्योगिकरण झाले पाहिजे. परकीय शासनाने देखील भारतीयांना देशी उद्योगधंदे, व्यवसाय चालविण्यास

उत्तेजन दिले पाहिजे. शेती हाच केवळ विकासाचा मार्ग नाही, तो अपुरा आहेत. भारतातील दारिद्र्य हटवायचे असेल, तर येथील अवजड व मोठ्या उद्योगधंद्याचा पाया घातला गेला पाहिजे.

**६. राज्याची कारखानदारी** : भारतातील खेड्यांचे दारिद्र्य लक्षात घेता. राज्याच्या मालकीची देखील शेती असावी व त्यावरती शेतमजुरांना काम मिळावे या कल्पनेचा त्यांनी पुरस्कार केला होता. ज्या ज्या वस्तूंचे ग्राहक स्वतः सरकार आहे. त्या-त्या वस्तूंचे उत्पादनासाठी राज्यामार्फत कारखाने चालविले जावेत असे रानडे यांना वाटत होते.

**७. भांडवल निर्मिती** : न्या. रानडे यांच्या मते भारतात उद्योगधंद्याची वाढ झाल्याने दारिद्र्य दूर होईल. पण उद्योगधंद्यासाठी लागणारे भांडवल याच देशात निर्माण झाले पाहिजेत. या संपूर्ण प्रक्रीयेतून उद्योगधंद्याचा विकास होईल व दारिद्र्य निवारण्यास सुरुवात होईल.

**८. बँकांना प्रोत्साहन** : शेतकऱ्यांची सावकारी पाशातून सुटका करण्यासाठी शेतीला पतपुरवठा करणाऱ्या बँका निर्माण झाल्या पाहिजेत. या संदर्भात ते असे म्हणाले होते ''राज्याने केवळ निधी नियमांद्वारे प्रशासकीय सुधारणांचे लहान-लहान तुकडे न देता व्यापक पातळीवर मदत केली पाहिजे. शेतकऱ्यांना द्यायच्या कर्जासाठी सरकार जर बँकांना जामीन राहिले तर शेतकऱ्यांना त्यांच्या डोक्यावरील कर्ज फेकून देता येईल. त्याचप्रमाणे जमीन महसुलाचे प्रमाण कमी केले, ते कायमचे एखाद्या निश्चित आकड्यावर नेऊन ठेवले तर शेती विकासासाठी कर न बसविता मुबलक उपलब्ध होईल.

**९. व्यापारात वाढ झाली पाहिजे** : न्या. रानडे म्हणतात की, दारिद्र्य दूर करण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे भारतातील व्यापार उदिम वाढला पाहिजे. भारताची आर्थिक संपन्नता येथील व्यापाराची भरभराट होण्यावरच अवलंबून राहणार आहे, त्यासाठी व्यापार वाढला पाहिजे. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढला पाहिजे.

अशा प्रकारे न्या. रानडे यांनी विविध उपाय सूचवून भारताच्या आर्थिक प्रगतीला चालना दिली, त्यांनी देशाच्या आर्थिक पुनर्घटनेच्या दृष्टीकोणातून जे विचार मांडले ते तत्कालीन भारतीय समाजाला पूरक व पोषक असेच होते महत्त्वाचे म्हणजे न्या. रानडे यांनी हिंदुस्थानच्या अर्थशास्त्राचा पाया घालण्याचे महत्त्वपूर्ण काम केले'' असे आपणास म्हणता येईल.

## ३.३ सारांश / मूल्यमापन

न्या. रानडे हे एक १९व्या शतकातील सामाजिक, राजकीय, अर्थतज्ज्ञ, श्रेष्ठ इतिहासकार लेखक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या विचारात भावनातिरेक नाही. भडकपणा नाही, त्यांच्या विचारांना एक चिरकालीन महत्त्व आहे. आधुनिक भारताच्या निर्मितीत त्यांचा मोलाचा वाटा आहे. भारतीय संस्कृतीमधील उज्ज्वल परंपरा आणि आधुनिक पाश्चिमात्य संस्कृती यांच्या मिलाफाचे महत्त्व अधिक सूक्ष्मपणे न्या. रानडे यांनी ओळखले होते. भारतीय आणि पाश्चिमात्य संस्कृतीमधील चांगल्या गोष्टींचा मिलाफ केला,

तर एक सुंदर अशी संस्कृती तयार होईल असे न्या. रानडे यांना वाटत होते. राजकारण, समाजकारण व अर्थकारण या तिन्ही क्षेत्रात त्यांनी आपली वाणी व लेखणी सारख्याच सफाईने फिरविली. अर्थकारणात त्यांनी प्रामुख्याने पाश्चात्त्य कल्पना भारतीय संदर्भात कशा लागू करता येतील याचे विवेचन केले. त्यांनी भारतीय अर्थशास्त्रास एक नवीन वळण प्राप्त करून दिले यात शंका नाही. न्या. रानडे यांनी अर्थकारणाप्रमाणेच समाजकारणाला एक नवीन दृष्टी व वळण दिले.

२२ जानेवारी १९०१ रोजी लो. टिळकांनी न्या. रानडे यांच्याविषयी जो मृत्यूलेख लिहिला. त्यामध्ये रानड्यांच्या कार्याचे समालोचन पुढील शब्दांत केले आहे. ''महाराष्ट्र देश म्हणजे त्या वेळी एक थंड गोळा होऊन पडलेला होता. या थंड गोळ्यास कोणत्या तऱ्हेने ऊब दिली तर तो पुन्हा जिवंत होऊन हातपाय हालवू लागेल. याचा रात्रंदिवस विचार करून अनेक दिशांनी अनेक उपायांनी अनेक रीतींनी पुन्हा त्यास सजीव करण्याचे दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरिता जिवापाड जर कोणी मेहनत केली असेल तर ती प्रथमतः रानडे यांनीच केली असे म्हटले पाहिजे व आमच्या मते, हेच त्यांच्या थोरवीचे किंवा असामान्य मोठेपणाचे मुख्य चिन्ह होय.''

न्या. रानडे हे सरकारी नोकर होते, साहजिकच त्यांच्यावर मर्यादा पडल्या होत्या. तरीपण राष्ट्रीय सभा, सार्वजनिक सभा व डेक्कन सभा अशा संस्थांना त्यांचे स्फूर्तिदायक मार्गदर्शन लाभले. न्या. रानडे यांनी समाजसुधारणेच्या कार्याबरोबरच हिंदुस्थानातील प्रागतिक राजकारणाचा पाया घातला, तसेच हिंदी अर्थशास्त्राचा पाया घातला.

## ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**१. बुद्धिप्रामाण्यवाद** : बुद्धिच्या निकषावर एखादी गोष्ट तपासून पाहणे.

**२. सनदशीर** : घटनात्मक

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

१. न्या. रानडे यांनी हिंदुस्थानच्या ........... राजकारणाचा पाया घातला.

(अ) प्रागतिक सनदशीर (ब) जहाल (क) मवाळ (ड) यापैकी नाही.

२. न्या. रानडे यांच्यावर ........... या उदारमतवादी विचारवंतांचा प्रभाव होता.

(अ) ॲडम स्मिथ (ब) जॉन रॉल्स (क) जॉन ऑस्टीन (ड) थोरो

३. न्या. रानडे यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा उगम ........... विचारसरणीत आढळतो.

(अ) जहाल (ब) मवाळ (क) पाश्चात्त्य उदारमतवादी (ड) भारतीय

४. न्या. रानडे हे ........... राजकीय विचारवंत होते.

(अ) सनातनी (ब) अध्यात्मवादी (क) पुरोगामी (ड) यापैकी नाही.

५. ........... मार्गाने हिंदुस्थानची प्रगती होईल असे न्या. रानडे यांना वाटत होते.

(अ) चळवळीच्या (ब) क्रांतीच्या (क) सनदशीर (ड) यापैकी नाही.

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

१. न्या. रानडे यांनी ........... सुधारणांना अग्रक्रम दिला होता.

(अ) राजकीय (ब) आध्यात्मिक (क) सामाजिक (ड) यापैकी नाही.

२. न्या. रानडे हे ........... नेते होते.

(अ) क्रांतिकारी (ब) नेमस्तवादी (क) जहालवादी (ड) अहिंसावादी

३. १८८७ साली न्या. रानडे यांच्या प्रेरणेने ........... या सामाजिक संस्थेची स्थापना झाली.

(अ) राष्ट्रीय सभा (ब) समता परिषद (क) राष्ट्रीय सामाजिक परिषद

(ड) सामाजिक न्याय परिषद

४. न्या. रानडे हे ........... समाजाचे आधारस्तंभ होते.

(अ) आर्य (ब) सत्यशोधक (क) ब्राह्मो (ड) प्रार्थना

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. न्या. रानडे यांच्या मते..........स्वातंत्र्य हा राजकीय स्वातंत्र्याचा पाया असतो.

(अ) न (ब) न (क) न (ड) न

२. १९८७ साली न्या. रानडे यांच्या प्रेरणेने ........... ही सासामाजिक संस्था स्थापन झाली.

(अ) न (ब) न (क) न (ड) न

३. न्या. रानडे हे ........... समाजाचे आधारस्तंभ होते.

(अ) न (ब) न (क) न (ड) न

४. हिंदी अर्थशास्त्राचा पाया ........... यांनी घातला.

(अ) न (ब) न (क) न (ड) न

५. न्या. रानडे हे ........... नेते होते.

(अ) न (ब) न (क) न (ड) न

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

१. न्या. रानडे यांचे राजकीय उदारमतवादी विचार स्पष्ट करा.

२. न्यायमूर्ती रानडे यांचे सामाजिक सुधारणेसंबंधीचे विचार स्पष्ट करा.

३. न्यायमूर्ती रानडे यांचे आर्थिक विचार स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


१. बोराळकर कृ. दि. (१९८७) ''भारतीय राजकीय विचारवंत'' पिंपळापुरे अॅन्ड कं. पब्लिशर्स

२. गर्दे दि. का. (१९७५), ''आधुनिक भारतीय राजकीय विचार'' परिमल प्रकाशन, औरंगाबाद.

३. डॉ. पाटील वा. भा. (२००९), ''प्राचीन व आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत'', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव.

४. पाटील बी. बी., प्रा. डॉ. सौ. ऊर्मिला चव्हाण, भारतीय राजकीय विचारवंत, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. वराडकर र. घ. ''भारतीय राजकीय विचारवंत', विद्या प्रकाशन, नागपूर.

६. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण (२००८), ''भारतीय राजकीय विचारवंत'' पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्यूटर्स, नागपूर.

# घटक – ४

# लोकमान्य टिळक


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ लोकमान्य टिळक : जीवन परिचय

४.२.२ लोकमान्य टिळकांचे सांस्कृतिक राष्ट्रवादाबाबतचे विचार

४.२.३ टिळकांची स्वराज्याची संकल्पना व चतु:सूत्री

ब्रिटिश सत्तेविषयी लोकमान्य टिळकांचे विचार

टिळकांची होमरूल चळवळ

टिळकांची चतु:सूत्री

४.२.४ प्रतियोगी सहकारिता धोरण

काँग्रेस लोकशाही पक्ष

प्रतियोगी सहकारिता

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्न

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

* लोकमान्य टिळकांची स्वराज्याची संकल्पना स्पष्ट करता येईल.
* चतुःसूत्रीचा अभ्यास करता येईल.
* राष्ट्रवादासंबंधीचे विचार समजून घेता येतील.
* होमरूल चळवळीची माहिती घेता येईल.
* प्रतियोगी सहकारितेचे धोरण समजून घेता येईल.
* काँग्रेस लोकशाही पक्षाची माहिती घेता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात १९०७ ते १९२० हा कालखंड 'टिळकयुग' म्हणून ओळखला जातो. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात ब्रिटिश राजवट प्रबळ झालेली होती. या कालखंडात राजकीय विचारांची मांडणी करणारे विचारवंत फारच मोजके असल्याचे दिसून येतात. त्यामध्ये प्रामुख्याने लोकमान्य टिळकांचा विचार करावा लागतो. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने 'टिळक युग' निर्माण केले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला एका लढाऊ संघटनेचे स्वरूप प्राप्त करून दिले. काँग्रेसमधील जहाल गटाचे नेते म्हणून टिळकांनी कार्य केले. स्वराज्याचे विचार व ते प्राप्त करण्याचा कार्यक्रम सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. भारतीय जनतेमधील स्वाभिमान पुनरुज्जीवित करून त्याचे रूपांतर राष्ट्रवादात करण्याचे कार्य त्यांनी केले. टिळकांनी स्वराज्यप्राप्तीसाठी चतुःसूत्रीचा कार्यक्रम भारतीय जनतेला दिला. टिळकांनी आपल्या राजकीय कारकिर्दीचा उत्तरार्धात प्रतियोगी सहकारितेचा मार्ग निवडला. लोकमान्य टिळकांनी आपल्या कर्तृत्वाने भारतीय स्वातंत्र्य लढयाला एक गतिमानता प्राप्त करून दिली.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ लोकमान्य टिळक : जीवन परिचय

भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील चिखली या गावी २३ जुलै १८५६ रोजी झाला. शिक्षणखात्यातील नोकरीमुळे गंगाधरपंत टिळक पुण्याला आले. वडिलांनी लहानपणीच बाळ यांची संस्कृत व गणित या विषयांची चांगलीच तयारी करून घेतली. टिळक दहा वर्षांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले. १८७२ साली टिळक दहा वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. गंगाधरपंतांच्या पश्चात त्यांचे भाऊ गोविंदराव यांनी टिळकांचा सांभाळ केला. १८७३ साली टिळक मॅट्रिक परीक्षा पास झाले. उच्च शिक्षणासाठी ते डेक्कन कॉलेजमध्ये दाखल झाले. १८७६ साली टिळक गणित विषय घेऊन पहिल्या वर्गातून बी.ए. उत्तीर्ण झाले. १८७९

साली टिळक एल.एल.बी.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. उच्च शिक्षण घेत असतानाच टिळक व आगरकर यांची मैत्री झाली. देशप्रेमाने प्रेरित झालेल्या या दोन मित्रांनी आपले आयुष्य देशसेवेसाठी समर्पित करण्याचे ठरविले.

लोकमान्य टिळकांनी प्रारंभी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेण्याचे ठरविले. त्यानुसार लोकमान्य टिळक आणि आगरकर यांनी विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या सहकार्याने पुण्यात १८८० साली 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना केली. या शाळेत दोघांनीही अध्यापनाचे काम सुरू केले. लोकशिक्षण व समाजहितासाठी टिळकांनी १८८१ साली मराठी भाषेतून 'केसरी' आणि इंग्रजी भाषेतून 'मराठा' ही दोन वृत्तपत्रे सुरू केली. अनेक विषयावर टिळक व आगरकरांनी निर्भिडपणे लेखन केले. १८८४ साली त्यांनी 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. या संस्थेमार्फत पुण्यात 'फर्ग्युसन कॉलेज' सुरू करण्यात आले. या कॉलेजमध्ये लोकमान्य टिळक गणित व संस्कृत विषयाचे अध्यापन करीत असत. १८८४ ते १८९० या काळात टिळकांनी डेक्कन एज्युकेशन सोसाटीच्या कार्याला वाहून घेतले. याच दरम्यान टिळक व आगरकर यांच्यात आधी सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणांना प्राधान्य द्यावे या प्रश्नावर वैचारिक मतभेद निर्माण झाले. टिळकांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सदस्यत्वाचा आणि प्राध्यापक पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर टिळकांनी राजकारण हेच आपले पूर्णवेळ कार्यक्षेत्र म्हणून निश्चित केले.

लोकमान्य टिळक १८८९ च्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाला उपस्थित होते. पहिली ४-५ वर्षे शैक्षणिक कार्यामुळे फारसे सहभागी झाले नाहीत. परंतु १८९० पासून ते काँग्रेसच्या कार्यात सक्रीय सहभाग घेऊ लागले. टिळकांनी केसरी व मराठा या वृत्तपत्रांच्या माध्यमातून लोकजागृतीचे कार्य जोमाने सुरू केले. १८९२ च्या कौन्सिल कायद्याने भारतीयांचा भ्रमनिरास झाला. काँग्रेसमधील तरुण कार्यकर्त्यांचा सनदशीर मार्गावरील विश्वास कमी झाला. टिळकांनी समाजात एकतेची जाणीव निर्माण करण्यासाठी १८९३ साली सार्वजनिक गणेशउत्सव सुरू केला. राजकीय जागृती आणि राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उत्सव सुरू करण्यात आला. सर्व जाती धर्माचे लोक या उत्सवात सहभागी होत असत. त्यांनतर टिळकांनी १८९५ साली शिवाजी महाराजांच्या समाधीचा जिर्णोद्धार करून १८९६ पासून रायगडावर शिवजयंती उत्सव सुरू केला. या उत्सवामुळे अनेकांना शिवचरित्राने प्रेरित केले व तरुणांचा आत्मविश्वास वाढला. १८९७ साली प्लेग निवारण अधिकारी रँडचा खून चाफेकर बंधूनी केला. ब्रिटिश सरकारने टिळकांनी आपल्या लेखनातून व व्याख्यानातून तरुणांना प्रोत्साहित केले असा आरोप ठेवून राजद्रोहाचा खटला भरला. टिळकांना १४ सप्टेंबर १८९७ रोजी १८ महिन्यांचा तुरुंगवास झाला. या शिक्षेमुळे टिळक राष्ट्रवीर झाले आणि भारतात नव्या राष्ट्रवादाचा उदय झाला.

ब्रिटिश सरकारने १९०५ साली बंगालची फाळणी केली. बंगालमध्ये सुरेंद्रनाथ बॅनर्जी आणि बिपिनचंद्र पाल यांनी वंगभंग विरोधी चळवळ सुरू केली. चळवळीमध्ये परकीय मालावर बहिष्कार व स्वदेशीचा स्वीकार असे धोरण ठेवले. स्वदेशी चळवळ एक राष्ट्रव्यापी राष्ट्रीय चळवळ बनली. लोकमान्य टिळकांनी वंगभंग व स्वदेशी चळवळीला पाठिंबा देवून मुंबई प्रांतात ही चळवळ सुरू केली. १९०५ साली टिळकांच्या

प्रेरणेने मुंबईत ‘स्वदेशी वस्तू प्रचारिणी सभा’ स्थापन करण्यात आली. टिळकांनी पैसा फंड उभारला व तो देशी उद्योगांच्या मदतीसाठी वापरण्यात आला. लोकमान्य टिळक, बिपिनचंद्र पाल आणि लाला लजपतराय या जहाल नेत्यांनी बहिष्कार व स्वदेशीच्या माध्यमातून स्वराज्यासाठी संघर्ष उभा करण्याचा प्रयत्न केला. परंतु राष्ट्रीय सभेचा त्याला पाठिंबा मिळाला नाही. ‘स्वराज्य’ हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे’ अशी टिळकांनी भूमिका घेतली व जहाल गटाला एक तात्त्विक व वैचारिक बैठक प्राप्त करून दिली. १९०७ च्या सुरत अधिवेशनात राष्ट्रीय सभेत जहाल व मवाळ गट अशी फूट पडली. जहाल गटाला लोकांचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला. ब्रिटिश सरकारने दडपशाहीचे धोरण अवलंबिले. टिळकांना केसरीतील ‘देशाचे दुर्दैव’ आणि ‘हे उपाय टिकावू नव्हेत’ या दोन अग्रलेखांबद्दल आक्षेप घेऊन राजद्रोहाचा खटला दाखल करण्यात आला. टिळकांना सहा वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा देण्यात आली. १९०८ ते १९१४ अशी सहा वर्षे त्यांना मंडालेला ठेवण्यात आले. या कारावासात टिळकांनी भगवद्‌गीतेतील कर्मयोगावर भाष्य करणारा ‘गीतारहस्य’ हा ग्रंथ लिहिला. भारतीय स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणारे तत्त्वज्ञान निर्माण करण्यासाठी या ग्रंथाची टिळकांनी निर्मिती केली.

शिक्षा संपवून टिळक १९१४ साली परत आले व पुन्हा राजकारणात सक्रीय झाले. १९१६ साली राष्ट्रीय सभेच्या लखनौ अधिवेशनात टिळकांनी पुढाकार घेऊन काँग्रेसमधील जहाल व मवाळ गट तसेच हिंदू व मुस्लिम यांच्यात समझोता घडवून आणला. टिळकांनी ॲनी बेझंट यांच्या सहकार्याने होमरूल लीग स्थापन करवून होमरूल चळवळ सुरू केली.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील ‘होमरूल चळवळ’ ही एक अभिनव चळवळ म्हणून ओळखली जाते. होमरूल म्हणजे स्वराज्य प्राप्त करणे किंवा आपल्या देशाचा राज्यकारभार आपण करण्याचा अधिकार प्राप्त करणे होय. टिळकांनी केसरी व मराठा मधून होमरूलची उद्दिष्टे स्पष्ट केली आहेत. लोकांच्यात जागृती निर्माण करून स्वातंत्र्य चळवळ चालविणे, स्वशासनासाठी देशभर दौरे काढून लोकमत तयार करणे. स्वराज्याचे ध्येय पूर्ण होईपर्यंत सनदशीर मार्गांनी चळवळ सुरू ठेवणे ही होमरूल लीगची उद्दिष्टे होती. लोकमान्य टिळक आणि डॉ. ॲनी बेझंट यांनी देशभर दौरे काढून लोकांना जागृत केले. भारतीयांसमोर त्यांनी चळवळीची भूमिका व उद्दिष्टे मांडली. १९१८ मध्ये टिळक होमरूलचे शिष्टमंडळ घेऊन ब्रिटनला गेले. तेथे त्यांनी ब्रिटनमधील लोकमत भारतीय स्वातंत्र्यासाठी अनुकूल करण्याचा प्रयत्न केला. होमरूल चळवळीमुळे स्वातंत्र्य चळवळीतील शिथिलता कमी होऊन ती गतिमान व आक्रमक बनली. स्वातंत्र्य चळवळीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली. १९१६ पासून राष्ट्रीय सभेवरील मवाळांचे वर्चस्व संपुष्टात आले व जहाल नेत्यांचा प्रभाव वाढला. राष्ट्रीय सभेच्या धोरणात बदल घडून आला. स्वराज्याची मागणी करण्यात आली. भारतमंत्र्यांना राजकीय सुधारणांची घोषणा करावी लागली. अनेक पाश्चिमात्य देशांना भारताच्या स्वातंत्र्याविषयी आस्था निर्माण झाली. अशारितीने होमरूल चळवळीने भारतात व भारताबाहेरची आपला प्रभाव निर्माण केला.

राष्ट्रीय सभेच्या अमृतसर अधिवेशनात मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांना सहकार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. या कायद्यानुसार भारतात निवडणुका घेतल्या जाणार होत्या. निवडणुकीत राजकीय पक्ष प्रचार करू शकत होते. टिळकांनी या निवडणुकीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला.

प्रचाराच्या निमित्ताने भारतीय जनतेत राजकीय जागृती निर्माण करण्यासाठी निवडणुका हे एक प्रभावी साधन आहे हे जाणून टिळकांनी २० एप्रिल १९२० रोजी 'कॉंग्रेस डेमोक्रेटिक पक्षा'ची स्थापना केली. मॉंटफर्ड सुधारणा राबवून संपूर्ण स्वराज्य प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणे हे कॉंग्रेस डेमोक्रेटिक पक्षाचे प्रमुख धोरण ठरवले होते. पक्षाच्या जाहिरनाम्यात आर्थिक, सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, दारूबंदी करणे, भाववाढ रोखणे, आरोग्य सेवा पुरविणे, मोफत व सक्तीचे शिक्षण इ. गोष्टींचा समावेश पक्षाच्या जाहीरनाम्यात केलेला होता. निवडणुकीद्वारे सत्ता मिळवून आणि ब्रिटिशांच्या बरोबर काही बाबतीत सहकार्य करून राष्ट्रीय चळवळ प्रबळ करण्याचे टिळकांचे धोरण होते. परंतु ते प्रत्यक्षात आले नाही. पुढे २ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांचे निधन झाल्याने या पक्षाचे उद्दिष्ट पूर्णत्वास गेले नाही.

भारतीय जनतेच्या मनात परकीय सत्तेविरुद्ध टिळकांनी तीव्र स्वरूपाचा असंतोष निर्माण केला. म्हणूनच त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणून ओळखले जाते. अभ्यासूवृत्ती, प्रचंड व्यासंग, निर्भयता, त्याग, साहस, धडाडी, नैतिकता, प्रखर राष्ट्राभिमान या गुणांनी टिळकांचे व्यक्तिमत्व संपन्न बनले होते. म्हणूनच त्यांना भारतीय जनता 'लोकमान्य' म्हणू लागली. भारीय जनतेत राजकीय जागृती निर्माण करून तिच्यात राष्ट्रभावनेचे बिजारोपण करण्याचे ऐतिहासिक महान कार्य टिळकांनी केले आहे.

**लोकमान्य टिळकांच्यावर पडलेला प्रभाव**

लोकमान्य टिळकांच्या विचारसरणीवर आणि त्यांच्या कार्यावर विविध घटकांचा प्रभाव पडलेला आहे. तो पुढीलप्रमाणे –

१. वैदिक वाङ्मयाचा प्रभाव

२. पारंपरिक हिंदू आचार, विचार, रूढी–परंपरांचा प्रभाव

३. दादाभाई नौरोजी तसेच मिल व स्पेन्सर या पाश्चिमात्य विचारवंतांचा प्रभाव

४. गणितशास्त्र, संस्कृत, महाभारत, भगवद्गीता यांचा प्रभाव

५. पाश्चिमात्य उदारमतवादी लोकशाही तत्त्वांचा प्रभाव

**लोकमान्य टिळकांचे साहित्य**

लोकमान्य टिळकांच्या विचारांचा व व्यासंगाचा आवाका त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांमधून प्रत्ययास येतो. गणित, संस्कृत, भारतीय संस्कृती व परंपरा, इतिहास, धार्मिक तत्त्वज्ञान हे टिळकांच्या आवडीचे विषय होते. शिक्षक, साहित्यिक, पत्रकार, गणितज्ञ, धडाडीचे नेते म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांचे पुढील साहित्य उपलब्ध आहे :

१. गीतारहस्य

२. दि आर्क्टिक होम इन वेदाज

३. दि वैदिक क्रोनॉलॉजी

४. दि ओरायन

५. केसरी व मराठा मधील त्यांचे लेख

६. लोकमान्य टिळकांची भाषणे

## ४.२.२ लोकमान्य टिळकांचे सांस्कृतिक राष्ट्रवादाबाबतचे विचार

लोकमान्य टिळकांना भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. त्यांची राष्ट्रवादाची संकल्पना आत्मिक स्वातंत्र्य या वैदिक तत्त्वज्ञानावर आधारित होती. तसेच त्यांचा राष्ट्रवादी विचारावर पाश्चात्त्य राष्ट्रवादी सिद्धांताचा प्रभाव पडला होता. १९०८ सालच्या खटल्यात त्यांनी स्टुअर्ट मिल यांची राष्ट्रवादाची व्याख्या निर्देशित केली होती. १९१९-२० साली वुड्रो विल्सन यांच्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा उद्‌घोष करून हे तत्त्व भारताला लागू करावे अशी टिळकांनी भूमिका मांडली होती.

राष्ट्रवाद ही एक मानसिक बाब असते. देशवासियांच्या मनात ऐक्याची भावना निर्माण होऊन आपसातल्या सर्व भेदभावावर ही भावना ज्यावेळी मात करते. त्यावेळी राष्ट्रवादाचा जन्म घेतो. भारतात ही ऐक्यभावना नसल्यामुळेच कंपनी सरकार भारतावर कब्जा करू शकले. टिळकांच्या मते युरोपीय राष्ट्राच्या उभारणीत समान धर्म, वंश, भाषा, परंपरा, संस्कृती, राजकीय हितसंबंध असे घटक कारणीभूत ठरले. भारतात मात्र राष्ट्रभावनेची उभारणी हिंदू धर्माचा आदर आणि प्राचीन सांस्कृतिक परंपरांचा अभिमान या आधारे केली जाऊ शकते. वर्णाश्रम धर्माचा पाया भारतीय राष्ट्राला भक्कम करू शकतो.

**विवेकवादी दृष्टिकोन**

टिळकांची राष्ट्रवादाची संकल्पना लोकांच्या सार्वभौमत्वाशी म्हणजेच लोकशाही शासनव्यवस्थेशी जोडली होती. त्यांचा दृष्टिकोन विवेकवादी होता, त्याला धर्मनिरपेक्षतेचा आधार होता. त्यांच्या मते राष्ट्र ही एक सामाजिक संघटना आहे. या संघटना लहान वर्तुळातून मोठ्या वर्तुळापर्यंत विकसित होतात. प्रत्येक वर्तुळाला स्वतःचे स्वायत्त अस्तित्व असते आणि प्रत्येक वर्तुळ इतरांवर प्रभाव टाकत असते. टिळकांच्या मते राष्ट्रवादाची अवस्था लहान समाजिक संघटना आणि विश्वबंधुत्व या दोन्हींच्या मध्यवर्ती असते. आपल्या कौटुंबिक हिताच्या पलीकडे जावून स्वतःच्या राष्ट्रासाठी काम करण्याची इच्छा निर्माण होणे हे मानवी मनाच्या कक्षा रुंदावत असल्याचे सूचक आहे.

**राष्ट्रवादाची प्रक्रिया**

राष्ट्रवादाची भावना कशी विकसित होते यासंबंधीची प्रक्रिया विशद करताना टिळक म्हणतात, ज्यावेळी लोकांमध्ये काही समान धागा, समान ओळख असते, तेव्हाच ते लोक एक राष्ट्र म्हणून उदयास येतात. राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारे सामाईकतेचे तत्त्व कोणत्याही एका घटकावर जसे वंश, धर्म, भाषा, प्रदेश ऐतिहासिक वारसा, संस्कृती यावर अवलंबून नसते. वरीलपैकी कोणता घटक राष्ट्रवादाच्या निर्मितीस पोषक ठरेल हे सांगता येत नाही. विविध समाजात विविध घटक प्रभावी ठरू शकतात असे टिळकांचे मत होते.

**विविध घटकांचा प्रभाव**

टिळकांच्या मते एकाच समाजात वेगवेगळ्या काळात वेगवेगळे घटक राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी प्रभाव पाडू शकतात. हे घटक काळ व परिस्थितीनुसार बदलू शकतात. ते कधीही स्थिर नसतात. म्हणजेच बदलत्या काळानुसार नवनवीन गट आधी अस्तित्वात असणाऱ्या राष्ट्रामध्ये सामील होऊन त्यांच्याशी जुळवून घेतात. राष्ट्रनिर्मिती ही एक जिवंत प्रक्रिया आहे आणि राष्ट्राच्या नवनवीन रूपात प्राप्त होऊ शकते. टिळकांनी राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेचा घेतलेला आढावा त्यांच्या प्रगल्भ विचारांची व व्यापक दृष्टिकोनाची साक्ष देतात.

**राष्ट्रवादाची भावना आवश्यक**

केवळ समान धर्म, वंश, पंथ, वर्ग, भाषा, संस्कृती, इतिहास आहे. म्हणून राष्ट्र उदयाला येते असे नाही. त्यासाठी राष्ट्रवादाची भावना आवश्यक असते. लोकांच्या मनात आपल्या राष्ट्राप्रती एक स्वाभिमानाची, आत्मसमर्पणाची भावना असावी लागते. केवळ विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा लोकसमुदाय म्हणजे राष्ट्र नव्हे याची टिळकांना जाणीव होती. त्यांच्या मते जोपर्यंत एखादा समुदाय विशिष्ट धार्मिक, सामाजिक, राजकीय बंधाने जोडलेला नसतो. आधी त्यामध्ये इतर समुदायांपेक्षा भिन्नतेची भावना नसते. तोपर्यंत राष्ट्र निर्माण होऊ शकत नाही. एक समुदाय या भावनेबरोबरच एक अधिकची एकरूपतेची भावना राष्ट्रवादासाठी आवश्यक असते. राष्ट्रवाद हा एक अमूर्त भावनिक अनुभव आहे. ती एक मानसिक अवस्था आहे. ज्याची वारंवार जडणघडण करावी लागते. राजकीय आपत्ती, गुलामगिरी किंवा संकटाच्या काळात राष्ट्रभावना लोकांमध्ये तीव्रतेने निर्माण होऊ शकते, याची टिळकांना जाणीव असल्याने ते म्हणतात 'मानवी इतिहासात एखादे राष्ट्र परकीय गुलामगिरीत राहिले नसते अगर गुलाम होण्याची भिती राहिली नसली तर कदाचित राष्ट्रवाद ही संकल्पनाच उदयाला आली नसती.

**राष्ट्राच्या उन्नतीसाठी उपयुक्त**

टिळकांच्या मते राष्ट्रवादाचा उपयोग लोकांच्या प्रगतीसाठी केला पाहिजे. राष्ट्रवाद मनुष्याला स्वार्थत्याग करून राष्ट्रासाठी कार्यप्रवण करण्याची प्रेरणा देतो. म्हणून टिळक म्हणतात राष्ट्राची प्रगती

राष्ट्रवादाच्या भावनेशी जोडलेली आहे. ज्यांना राष्ट्र पुनरुज्जीवित करावयाचे आहे त्यांनी राष्ट्रभावना वाढीस लागेल अशा घटकांवर भर देणे आवश्यक आहे. त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. टिळक म्हणतात ज्यांना आपल्या राष्ट्राचे कल्याण आणि प्रगती व्हावी असे मनापासून वाटते त्यांनी लोकांमध्ये एकतेची जाणीव निर्माण होईल अशी कार्ये हाती घेणे आवश्यक आहे.

**सार्वजनिक गणेशोत्सव**

भारतीय समाजात राष्ट्रवादाची भावना निर्माण होण्यासाठी टिळकांनी धर्मिक प्रतिमांचा वापर केला. हिंदू धर्मात विविध पंथ व देवदेवता असल्याने त्याचे स्वरूप व्यापक आहे. धर्म, श्रद्धा, समाजात खोलवर रुजलेल्या आहेत. त्यामुळे सामाजिक ऐक्य निर्माण करण्यासाठी धर्मश्रद्धांचा वापर केला पाहिजे अशी टिळकांची भूमिका होती. त्याच प्रयत्नाचा भाग म्हणून टिळकांनी १८९३ साली सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. कारण गणेश ही हिंदू धर्मियांना प्रिय असलेली देवता आहे. त्याबाबत टिळक म्हणतात, 'एका प्रांतातील सर्व हिंदू लोकांनी एका देवतेच्या उपासनेत गढून गेलेले असावे ही काही लहान-सहान गोष्ट नाही. ही गोष्ट साध्य झाली तर आपल्या भावी अभ्युदयाचा आपण पाया घातल्यासारखे होईल. ख्रिस्ती, मुस्लिम धर्मात सार्वजनिक प्रार्थनेची जी पद्धत आहे त्यापासून त्या धर्मातील लोकांना जो फायदा होतो तसाच फायदा गणेशोत्सव सार्वजनिक झाल्याने हिंदू लोकांना होईल. त्यामुळे समाजात एकतेची भावना निर्माण होऊन अंतिमतः राष्ट्रवादाची भावना जोपासली जाईल असे टिळकांचे मत होते.

**शिवजयंती उत्सव**

लोकमान्य टिळकांनी समाज जागृतीसाठी शिवजयंती उत्सवाला सुरुवात केली. शिवाजी महाराजांनी अन्यायी राज्यकर्त्यांविरुद्ध मावळ्यांना संघटित करून स्वराज्याची स्थापना केली. हे कार्य भारतीयांना प्रेरणा देणारे आहे. राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्यास व लोकांना संघटित करण्यास शिवाजी महाराजांसारखा महापुरुष लोकांमध्ये असलेला आदरभाव, पूज्यभाव उपयुक्त ठरेल या विचाराने टिळकांनी १८९५ साली रायगडावरील शिवाजी महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार केला आणि १८९६ पासून रायगडावर शिवजयंती उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली. छत्रपती शिवाजी महाराज हे सर्व जातींच्यासाठी आदराचे स्थान होते. त्यामुळे शिवजयंती उत्सव हा राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून साजरा करणे आवश्यक आहे असे टिळकांचे मत होते. अशा स्वरूपाच्या उत्सवांना, जयंतीच्या कार्यक्रमांना ब्रिटिश सरकारचा विरोध नव्हता. त्यानिमित्ताने लोक निर्भिडपणे बाहेर पडतील व त्यांच्यात हळूहळू ऐक्याची व पर्यायाने राष्ट्रवादाची भावना निर्माण होईल, अशी टिळकांची भूमिका होती आणि यामध्ये टिळक यशस्वी झालेले दिसतात. प्रथम प्रांतिक पातळीवर ऐक्य निर्माण करून नंतर राष्ट्रीय पातळीवर ऐक्याची भावना त्यांना निर्माण करावयाची होती.

**ब्रिटिश सरकारची भेदनिती**

ब्रिटिश राज्यकर्ते स्वातंत्र्य लढा तीव्र होऊ नये, चळवळीचे बळ वाढू नये यासाठी 'फोडा आणि झोडा' या धोरणाचा अवलंब करीत होते. ही चळवळ केवळ हिंदूंची आहे ती यशस्वी झाल्यास देशात हिंदूंचे राज्य येईल. हा राज्यकर्त्यांचा खोटा प्रचार मतलबी आहे. मुस्लिम बांधवांनी त्यापासून सावध रहावे असे आवाहन टिळकांनी केले. राष्ट्रीय सभा कोणत्याच विशिष्ट जातीधर्माच्या लोकांनी नसून ज्यांच्या हक्कांसाठी ती लढत आहे त्याचा लाभ हिंदू-मुस्लीम या दोहोंना सारख्याच प्रमाणावर होणार आहे. त्यामुळे समान राजकीय हितसंबंधावर लक्ष केंद्रीत करून एकमेकांचा धार्मिक व्यवहारात दखल देऊ नये. दोहोंना आपापले सण-उत्सव निवांतपणे करू द्यावेत असा सल्ला टिळकांनी दिला आहे. हिंदू-मुस्लीम यांच्यात ऐक्य घडवून आणण्यासाठी १९१६ साली राष्ट्रीय सभेच्या लखनौ अधिवेशनात हिंदू-मुस्लीम यांच्यात ऐक्य करार करण्यात आला. या कराराद्वारे राष्ट्रीय चळवळीला व भारतीय राष्ट्रवादाला व्यापक धर्मनिरपेक्ष स्वरूप प्राप्त झाले. या कालखंडात टिळकांची भूमिका अधिक प्रगल्भ, व्यापक, सर्वसमावेशक झालेली दिसून येते.

**टिळकांच्या राष्ट्रवादाचे मूल्यमापन**

लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रवादी विचारावर अशी टीका केली जाते की, टिळक राष्ट्रभावना केवळ महाराष्ट्रात निर्माण करू इच्छित होते त्यामुळे ते प्रांतवादी होते. टिळकांनी राष्ट्रभावना निर्माण करण्यासाठी प्रतिकांचा वापर केला. कारण राष्ट्रभावना निर्माण करण्यासाठी कुठेतरी सुरुवात करावी लागणार होती. तो प्राथमिक अवस्थेतील टप्पा होता. शिवाय भारताचे प्रचंड क्षेत्रफळ, भाषिक, सांस्कृतिक, भौगोलिक, ऐतिहासिक विविधतेमुळे राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रभावना निर्माण करणे कठीण होते. टिळकांना प्रथम प्रांतिक पातळीवर संघटितपणा निर्माण करून नंतर राष्ट्रीय पातळीवर संघटित करणे अभिप्रेत होते.

टिळकांनी धर्म आणि संस्कृतीच्या आधारे राष्ट्रवादाची एकांगी मांडणी केली अशी टीका केली जाते. त्या काळातील राजकीय, सामाजिक, धार्मिक परिस्थिती आणि ब्रिटिशांचे राजकीय डावपेच, कायदेकानून या सर्व गोष्टींच्या प्रभावातून टिळकांना मार्ग काढावयाचा होता. समाजावरील धर्मश्रद्धा व परंपरांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात असल्याने, त्याच श्रद्धांचा वापर टिळकांनी साधन म्हणून केलेला आहे. परंतु त्यांच्या परिणामांचा फारसा विचार टिळकांनी केलेला दिसून येत नाही. त्याऐवजी देशाची खालावलेली आर्थिक परिस्थिती, शोषण, लूट या आधारे चळवळ उभारावयास हवी होती अशीही मांडणी केली जाते.

### ४.२.३ लोकमान्य टिळकांची स्वराज्याची संकल्पना व चतुःसूत्री कार्यक्रम

**ब्रिटिश सत्तेविषयी लोकमान्य टिळकांचे विचार**

लोकमान्य टिळकांनी केसरीच्या माध्यमातून लिखाणाद्वारे ब्रिटिश सत्तेविषयीची आपली भूमिका स्पष्ट केली आहे. इंग्रजी सत्तेमुळे भारताला कायदा व सुव्यवस्था, आरोग्य, शिक्षण, गुन्हेगारीला आळा, शेती सुधारणा, लेखन स्वातंत्र्य याबाबत झालेल्या लाभांची प्रशंसा केली आहे. परंतु वरील फायदे झाले म्हणून

इंग्रजांचा अन्याय, जुलूम, शोषण, दडपशाही इ. दोष विसरून चालणार नाहीत. ब्रिटिश सत्ताधीश तुलनेने उदार असले तरी ते अंतिमतः साम्राज्यवादी आहेत. त्यांचा हेतू भारतातील आपले साम्राज्य टिकविणे हाच आहे. कोणतेही परकीय राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर लोककल्याणाच्या हेतूने राज्य करत नाही.

लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश सत्तेच्या जुलमी व शोषण वृत्तीविषयी परखड लेखन केले आहे. त्यांच्या मते राज्यकर्ते आणि लोक वेगवेगळ्या देशाचे किंवा वंशाचे असतात. तेव्हा आर्थिक विकास होऊ शकत नाही. ब्रिटिशांनी भारतीयांना प्रशासकापासून दूर ठेवले आहे. ब्रिटिश सरकारकडून प्रशासनावर पैशाची उधळपट्टी होत आहे. इंग्रजी राज्यात शांतता असली तरी देशाची स्थिती निकृष्ट झाली आहे. दारिद्र्याचा पगडा बसला आहे. शौर्य, साहस, नीती, स्वाभिमान हे गुण भारतीय समाजातून लोप पावले आहेत. राज्यकर्ते सुधारणा करत आहेत हा केवळ भ्रम आहे. कारण कोणतीही सुधारणा निघाली की लोणी युरोपीय अधिकाऱ्यांना आणि ताक भारतीयांना मिळते. अशाने हिंदुस्थानची भरभराट कधीच होणार नाही. ब्रिटिश राज्यकर्ते आणि त्यांचे अधिकारी जनतेला अन्यायाची वागणूक देत असतात.

टिळकांनी ब्रिटिशांच्या साम्राज्यशाही धोरणावर १९०२ मध्ये 'पाल्हाळीपणा की गुलामगिरी' हा लेख लिहून टिका केली आहे. ब्रिटिश साम्राज्यवादी धोरणाविषयी टिळक म्हणतात, 'आमच्या अंगात तुमच्यापेक्षा अधिक बळ आहे म्हणून तुम्ही आमचे वर्चस्व कबूल करून आमचे गुलाम बनून राहिले पाहिजे.' अशी ब्रिटिशांची साम्राज्यशाहीची कल्पना आहे. ब्रिटिशांनी स्वतःच्या देशात लोकशाही सरकार स्थापन करून लोकांना व्यक्तिस्वातंत्र्य व अधिकार दिले आहेत. हेच ब्रिटिश बाहेरील देशात साम्राज्यशाहीचे धोरण राबवून लोकांना पारतंत्राची व गुलामगिरीची वागणूक देत आहेत. घरात लोकशाही आणि बाहेर साम्राज्यशाही अशी कुटील निती करणारे इंग्रज लोक आहेत.

टिळकांच्या मते ब्रिटिश सत्तेमुळे भारताचे आध्यात्मिक आणि ऐहिक पतन झाले आहे. म्हणूनच गुलामगिरीत असणाऱ्या राष्ट्रांपुढे एकच पर्याय असतो तो म्हणजे स्वराज्यप्राप्ती आणि स्वराज्यप्राप्ती केवळ स्वयंपूर्णतेच्या माध्यमातून शक्य आहे. गुलाम राष्ट्राने साम्राज्यशाही राष्ट्राकडून ते कितीही प्रागतिक व उदार असले तरीही कोणत्याही मदतीची किंवा मार्गदर्शनाची अपेक्षा करू नये.

**लोकमान्य टिळकांची होमरूल चळवळ**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत लोकमान्य टिळक आणि डॉ. ॲनी बेझंट यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेली 'होमरूल चळवळ' ही एक अभिनव चळवळ म्हणून ओळखली जाते. होमरूल म्हणजे स्वराज्य प्राप्त करणे किंवा आपल्या देशाचा राज्यकारभार करण्याचा अधिकार आपण प्राप्त करून घेणे होय. ही चळवळ प्रथम आयर्लंडमध्ये श्री. रेडमंड यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाली. डॉ. ॲनी बेझंट या आयरिश महिला विदुषी १८९३ साली भारतात आल्या. त्यांनी भारतात थिऑसॉफीकल सोसायटीचे काम सुरू केले. त्यांनी १९१३ ला राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्यत्व स्वीकारले. भारतात होमरूल चळवळ सुरू करावी असा आग्रह त्यांनी काँग्रेसकडे धरला. परंतु काँग्रेसवर मवाळ गटाचे वर्चस्व असल्याने या मागणीकडे दुर्लक्ष

करण्यात आले. डॉ. बेझंट यांनी मद्रास प्रांतात 'न्यू इंडिया' आणि 'कॉमनव्हील' या वृत्तपत्रातून आपल्या विचारांचा प्रसार केला.

लोकमान्य टिळकांची १९१४ साली तुरुंगातून सुटका झाली. डॉ. बेझंट यांच्या विचाराला टिळकांनी पाठिंबा दिला आणि २८ एप्रिल १९१६ साली 'बेळगाव' येथे 'जोसेफ बॅप्टीस्टा' यांच्या अध्यक्षतेखाली 'होमरूल लीग'ची स्थापना केली. न. चि. केळकर सचिव झाले. लीगचे कार्यालय 'पुणे' येथे ठेवण्यात आले. पुढे सप्टेंबर १९१६ मध्ये डॉ. बेझंट यांनी स्वतंत्र होमरूल लीगची स्थापना केली. टिळकांच्या लीगचे कार्यक्षेत्र मुंबई व मध्यप्रांत होते तर देशाच्या इतर प्रांतात डॉ. बेझंट यांची लीग कार्य करेल असे ठरविण्यात आले. या दोन्ही लीगमध्ये परस्पर सहकार्य होते.

**होमरूल चळवळीचे उद्दिष्ट**

लोकमान्य टिळकांनी केसरी व मराठा या वृत्तपत्रांतून होमरूलची उद्दिष्टे स्पष्ट केली आहेत. लोकांच्यात राजकीय जागृती निर्माण करून स्वातंत्र्य चळवळ चालविणे. स्वशासनासाठी देशभर दौरे काढून लोकमत तयार करणे. स्वराज्याचे ध्येय पूर्ण होईपर्यंत सनदशीर मार्गांनी चळवळ सुरू ठेवणे ही लिगची उद्दिष्टे होती. टिळकांच्या मते, होमरूल चळवळ काँग्रेस विरोधी नसून काँग्रेसला पोषक कार्य करणारी आहे. काँग्रेसला एक नवे वळण देण्यासाठी ही चळवळ उपयुक्त ठरेल. स्वशासनाची मागणी हा आपला हक्क आहे अशी टिळकांची भूमिका होती.

**होमरूलचे आंदोलन**

लोकमान्य टिळक आणि डॉ. बेझंट यांनी देशभर दौरे काढून लोकांना जागृत केले. भारतीयांसमोर त्यांनी चळवळीची भूमिका व उद्दिष्टे मांडली. काँग्रेसच्या १९१६ च्या लखनौ अधिवेशनात जहाल-मवाळ वाद मिटला. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रयत्न झाले. स्वराज्याची मागणी एकमुखाने करण्यात आली. १९१७ साली टिळकांचा होमरूल लीगचे ३३ हजार सभासद झाले होते. लीगच्या चळवळीमुळे भारतीय जनतेत असंतोष वाढत होता. तो कमी करण्यासाठी भारतमंत्री एडविन माँटेग्यु यांनी २० ऑगस्ट २९१७ रोजी ब्रिटिश संसदेत घोषणा केली की, 'ब्रिटिश सरकार टप्प्याटप्प्याने हिंदुस्थानला स्वराज्य देईल.' या घोषणेला इतर कारणांबरोबरच होमरूल चळवळही कारणीभूत होती. ही चळवळ दडपून टाकण्यासाठी टिळकांवर खटला भरण्यात आला. लोकमान्य टिळक व डॉ. बेझंट यांच्यावर अनेक निर्बंध घातले.

लोकमान्य टिळक १९१८ मध्ये ब्रिटनला गेले. तेथे त्यांनी ब्रिटनमधील लोकमत भारतीय स्वातंत्र्यासाठी अनुकूल करण्याचा प्रयत्न केला. पार्लमेंटरी जॉईंट कमिटी पुढे होमरूल लीगतर्फे साक्ष दिली. टिळकांनी लाला लजपतराय, के. डी. शास्त्री व एस. एस. हर्डीकर यांना अमेरिकेत पाठविले. त्यांनी सॅन फ्रॅन्सिस्को येथे होमरूल लीगच्या शाखा स्थापन करून भारतीयांची बाजू मांडण्याचे काम केले. टिळकांच्या प्रयत्नामुळे होमरूल चळवळ भारताबाहेरही प्रसिद्ध झाली.

होमरूल चळवळीमुळे स्वातंत्र्य चळवळीतील शिथिलता कमी होऊन ती गतिमान व आक्रमक बनली. स्वातंत्र्य चळवळीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली. १९१६ पासून राष्ट्रीय सभेवरील मवाळांचे वर्चस्व संपुष्टात आले व जहाल नेत्यांचा प्रभाव वाढला. राष्ट्रीय सभेच्या धोरणात बदल घडून आला. स्वराज्याची मागणी करण्यात आली. भारतमंत्र्याला राजकीय सुधारणांची घोषणा करावी लागली. अनेक पाश्चिमात्य देशांना भारताच्या स्वातंत्र्याविषयी आस्था निर्माण झाली. अशारीतीने होमरूल चळवळीने भारतात व भारताबाहेरही आपला प्रभाव निर्माण केला.

भारतातील ब्रिटिशांच्या आधुनिक राज्याच्या प्रस्थापनेबरोबरच भारतातील इंग्रजी शिक्षणने भान जागृत झालेला बुद्धिजीवी अभिजन वर्ग प्रतिक्रिया देऊ लागला. त्याचे दोन विचारप्रवाह उदयास आले. पहिला विचारप्रवाह पाश्चात्त्य उदारमतवादाने प्रभावित झाला होता आणि त्यांची ब्रिटिशांविषयी भूमिका सौम्य होती. दुसरा विचारप्रवाह ब्रिटिशविरोधी होता. त्यांचा प्रयत्न भारतीय संस्कृतीशी सुसंगत असा लोकशाही राष्ट्रवाद निर्माण करण्याचा होता. युरोपीय वैचारिक वसाहतवादाला त्यांचा विरोध होता. भारतात ब्रिटिश सत्ता कायम राहण्यालाच त्यांचा विरोध होता. मग ती सत्ता न्याय्य असो अथवा अन्याय्य असो. भारतीयांनी जर आपल्यातील क्षमता ओळखल्या तर ते स्वतःला परकीय सत्तेपासून मुक्त करू शकतील. त्यासाठी भारताच्या समृद्ध संस्कृतीच्या आधारे स्वतःची एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून ओळख निर्माण करावी लागेल, अशी त्यांची धारणा होती. भारतीयांना परिचित अशा ऐतिहासिक परंपरांना पुनरुज्जीवित करण्यावर या प्रवाहाचा भर होता. ब्रिटिश सत्तेकडून प्रस्थापित झालेले राजकीय स्थैर्य, सुरक्षितता, न्याय आणि एकात्म प्रशासन या पाश्चिमात्य आधुनिक उदारमतवादी राज्यसंस्थेच्या चौकटीत स्वराज्याचे आदर्श शोधण्याचा प्रयत्न या प्रवाहाने केला. त्यापैकी लोकमान्य टिळक हे स्वराज्याची मागणी करणारे प्रमुख राष्ट्रीय नेते होते.

**स्वराज्याची आवश्यकता**

लोकमान्य टिळकांच्या मते स्वराज्याची आकांक्षा करणे ही नैसर्गिक मानवी प्रवृत्ती आहे. या विचारातून टिळकांनी केसरी मधून प्रखट टिकेद्वारे आपली भूमिका स्पष्ट केली आहे. इंग्रजी सत्तेमुळे भारताला कायदा व सुव्यवस्था, शिक्षण, आरोग्य, गुन्हेगारीला आळा, शेती सुधारणा, लेखन स्वातंत्र्य याबाबत झालेल्या लाभांची प्रशंसा केली आहे. परंतु वरील फायदे झाले म्हणून इंग्रजांचा अन्याय, जुलूम, शोषण, दडपशाही इ. दोष विसरून चालणार नाही. ब्रिटिश सत्ताधिश तुलनेने उदार असले तरी ते अंतिमतः साम्राज्यवादी आहेत. त्यांचा हेतू भारतातील आपले साम्राज्य टिकविणे हाच आहे. कोणतेही परकीय राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर लोककल्याणाच्या हेतूने राज्य करत नाही. त्यामुळे खरे स्वराज्य हे सुराज्य असतेच, परंतु सुराज्य हे मात्र स्वराज्य असेलच असे नाही अशी टिळकांची भूमिका होती.

लोकमान्य टिळकांचे स्वराज्य हे साध्य होते. ते प्राप्त करण्यासाठी त्यांनी वापरलेली साधने म्हणजेच चतुःसूत्री होय. राजकीय सुधारणा व स्वराज्यप्राप्तीसाठी भारतात वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब केला जात होता. दादाभाई नौरोजी, ना. गोखले, न्या. रानडे, फिरोजशहा मेहता इ. नेमस्त पुढाऱ्यांचा सनदशीर मार्गाने कार्य करावे असे मत होते. अरविंद घोष, स्वातंत्र्यवीर सावरकर इ. ना क्रांतीचा, आत्मबलिदानाचा मार्ग

योग्य वाटत होता. परंतु टिळकांचा मार्ग या दोन मार्गांपेक्षा भिन्न होता. सामान्य माणसाला राजकीय चळवळीत सहभागी करून घेता येईल असे कार्यक्रम तयार करून स्वातंत्र्य चळवळ अधिक व्यापक बनवली पाहिजे असे त्यांचे मत होते. म्हणून टिळकांनी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य या चतुःसूत्रीचा मार्ग टिळकांनी स्वीकारला. टिळक हे बंडखोर स्वभावाचे होते. परंतु कायद्याच्या चौकटीत राहून बंडखोरीचा कार्यक्रम दिला तरच सर्वसामान्य लोक त्यामध्ये सहभागी होतील असा त्यांचा व्यावहारिक दृष्टिकोन होता. वंगभंगाचे जनआंदोलन त्यांनी देशभर घडवून आणण्याचे कार्य चतुःसूत्रीच्या माध्यमातून केले. टिळकांच्या मते राजकीय, सामाजिक, धार्मिक व औद्योगिक असे चार प्रकारचे पारतंत्र्य असते. त्याच्याशी मुकाबला करण्यासाठी चतुःसूत्रीतील साधनांचा पुरस्कार टिळकांनी केला आहे.

**चतुःसूत्री कार्यक्रम**

**१. स्वदेशी** : टिळकांच्या चतुःसूत्रीतील स्वदेशी हे एक महत्त्वाचे साधन होते. दादाभाई नौरोजी, न्या. रानडे इ. नी भारताच्या अवनतीची अभ्यासपूर्ण मांडणी केली होती. टिळकांनी त्याच विचार-सूत्राच्या आधारे ब्रिटिश सत्तेमुळे भारतीयांची पिळवणूक कशी होते हे जनतेसमोर केसरीच्या माध्यमातून मांडले होते. शेतकऱ्यांच्या पिळवणुकीबाबत त्यांनी सरकारवर टीकेची झोड उठवली. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना भारतीयांच्या दारिद्र्याची, उपासमारीची जाणीव करून दिली. ब्रिटिश सत्ताधारी भारतीय मालावर अवाजवी कर बसून ब्रिटनहून आयात मालाला सवलती देत आहेत. त्यामुळे भारताला औद्योगिक पारतंत्र्य आले आहे. टिळकांच्या मते, जर आपल्याला आपल्या देशाचे कल्याण करावयाचे असेल तर भारतीयांनी स्वदेशी वस्तूंचा वापर केला पाहिजे.

स्वदेशीचे समर्थन करताना लोकमान्य टिळकांनी राजकोटच्या बॅरिस्टर पंडितांचा दाखला दिला आहे. 'स्वदेशी चळवळ ही एक दुष्काळ निवारक मात्रा आहे. कारण या चळवळीमुळे खेड्यातील उद्योगधंद्यांना उत्तेजन मिळून शेतीवर उदरनिर्वाह करणाऱ्यांची संख्या कमी होईल आणि वारंवार राज्यकारभार करण्यासाठी बहिष्काराचा मार्ग योग्य नाही. दुष्काळ पडण्याचा संभवही कमी होईल. टिळकांच्या मते स्वदेशी चळवळ नैतिक दृष्टीनेही प्रशस्त व साध्य वाटते. हा स्वावलंबनाचा व दुष्काळ निवारणाचा उत्तम मार्ग आहे. राजकीय, सामाजिक, औद्योगिक व सांपत्तिक, नैतिक या सर्व दिशांनी विचार करता स्वदेशी चळवळीची आवश्यकता व उपयोग पूर्णपणे सिद्ध होतो.

त्याकाळी स्वदेशी चळवळीवर घेतलेल्या आक्षेपांचे निरसनही टिळकांनी 'केसरी'तून 'स्वदेशीवरील आक्षेप' या लेखाद्वारे केले आहे. स्वदेशी माल घेतल्याने गिऱ्हाईकाचे व राष्ट्राचे नुकसान होते हा आक्षेप त्यांना निरर्थक वाटत होता. देशी मालाला उत्तेजन देण्यासाठी परदेशी मालावर सगळेच देश सीमाशुल्क लावतात. तोच हेतू स्वदेशीच्या वापरातून साध्य होतो. विलायती मालाचा शंभर टक्के पैसा परदेशात जातो तर स्वदेशी मालाचा संपूर्ण पैसा देशातच राहतो. त्यामुळे देशी मालाची किंमत जास्त असूनही देशाचा लाभ

होतो. कारण नव्या गुंतवणुकीसाठी त्यातून निधी उपलब्ध होतो. उद्योगधंदे वाढून उत्पादन वाढल्याने किंमतीही कमी होतात. 'सर्वांनी स्वदेशी माल वापरल्यास देशात पुरेसे उत्पादन होत नाही', या आक्षेपावर टिळक म्हणतात, पुरेसा माल नाही या सबबीवर स्वदेशी चळवळ करू नये असे आपण म्हणू लागलो तर सगळ्याच चळवळी स्थगित कराव्या लागतील. कारण कोणतेच राजकीय, सामाजिक, औद्योगिक सुधारणेचे लाभ सर्व लोकांना तात्काळ मिळविण्याची हमी देता येणार नाही.

टिळकांच्या मते स्वदेशी चळवळीची प्रमुख भिस्त पांढरपेशा मध्यम वर्गावर आहे. कारण गरिब लोक परदेशी मालाचा वापर करू शकत नाहीत. सुशिक्षितांना जर आपल्या देशाचे कल्याण करावयाचे असेल, आपल्या पूर्वजांचा सन्मान टिकवून ठेवायचा असेल, अन्याय कर धोरणाचा निषेध करायचा असेल, इथले राज्य इथल्या लोकांच्या हितासाठी चालले असे वाटत असेल, अन्यायाची चीड व न्यायाची चाड असेल तर कोणतीही सबब न सांगता त्यांनी देशी वस्तू वापरण्याचा निश्चय करून त्यानुसार वागायला प्रारंभ केला पाहिजे असे टिळकांनी आवाहन केले होते.

**२. बहिष्कार** : टिळकांच्या चळवळीचे बहिष्कार हे एक महत्त्वाचे साधन होते. बहिष्काराला त्यांनी 'बहिष्कार योग' असे संबोधून त्याची व्यापकता स्पष्ट केली आहे. परकीय मालावर बहिष्कार ही एक नांदी आहे. खरा बहिष्कार योग लोक जेव्हा अंमलात आणतील तेव्हा परकीय राज्यकर्त्यांना या देशात चार दिवसही वास्तव्य करणे अशक्य ठरेल. सरकारच्या बेपर्वा राजकारणाला आळा घालायचा असेल तर अर्ज, विनंती, निवेदने, युक्तिवाद, चर्चा हे उपाय चालणारे नाहीत. तिथे स्वार्थाचा संबंध असतो तिथे स्वार्थाला चटका दिल्याशिवाय सरकार आपली भूमिका बदलणार नाही. परकीय राज्यकर्त्यांना जिंकलेल्या प्रशासनाची सर्वांगीण अधोगती झाली तरी त्याची काहीच खेद-खंत वाटत नाही. इथल्या साधन-संपत्तीवर ते आपली मक्तेदारी टिकवून ठेवतात. अशा राज्यकर्त्यांना वठणीवर आणण्यासाठी टिळकांनी बहिष्काराचा मार्ग सुचवला आहे.

टिळकांच्या मते राज्यकर्त्यांविरुद्ध अस्त्र चालविणयाची भारतीयांची तयारी नाही व इच्छाही नाही. विलायतेला भारतातून जाणारे कोट्यवधी रुपये थांबविणे सहज शक्य आहे. जर आपले काही अडले-नडले तर इतर देशांकडून माल आयात करू पण विलायती मालावरील बहिष्कार कायम ठेवू. यातून काही नाही झाले तरी आपला राज्यकर्त्यांवरचा राग तरी व्यक्त होईल. प्रजा कितीही दुबळी असली तरी बहिष्काराच्या मार्गाचा अवलंब करून एकजुटीने खंबीरपणे उभी राहिली तर शिरजोर, अरेरावी करणाऱ्या राज्यकर्त्यांना ती नमवू शकते.

बहिष्कारामध्ये राज्यकर्ते दडपशाही करू शकत नाहीत. टिळकांना बंगालमध्ये बहिष्काराचा सामर्थ्याचा प्रत्यय आला होता. बहिष्कारासाठी फक्त जनतेच्या निग्रहाची गरज असते. त्याशिवाय या साधनाला कोणतीही साधनसामग्री लागत नसल्याने हे शस्त्र अल्पखर्चिक व सोयीचे आहे. व्यापक स्तरांवर त्याचा अवलंब करणे शक्य होते. टिळकांचे असे निरीक्षण होते की बहिष्काराच्या कृतीसाठी निरक्षर बहुजन समाज व विद्यार्थी पुढे येतात. परंतु शिक्षित बुद्धिवादी, मध्यम वर्गीय, सधन समाज घटक फक्त तोंडपाटीलकी करतात.

टिळकांनी बहिष्काराचे महत्त्व पटवून देण्यासाठी चीन, इटली व अमेरिकेचे उदाहरण दिले आहे. सर डब्ल्यू. वेडरबर्न यांनी राष्ट्रीय सभेत केलेल्या व्याख्यानात सांगितले होते की इटली देश ऑस्ट्रीयाच्या ताब्यात होता. तेव्हा इटालियन लोकांनी ऑस्ट्रियन अधिकाऱ्यांवर बहिष्कार घातला होता. अमेरिकन लोक चिनी लोकांना अन्यायी वागणूक देत होते. तेव्हा अमेरिकन माल चीनमध्ये विकू द्यावयाचा नाही असा निर्धार चिन्यांनी केल्याबरोबर अमेरिकेचे डोळे उघडले. अमेरिकेतील १३ वसाहती स्वतंत्र झाल्यानंतर विलायती मालावर त्यांनी बहिष्कार घातला होता. त्यामुळे भारतीयांनी आपली गाऱ्हाणी केवळ विनवण्या करून न मांडता त्याला बहिष्काराची जोड देवून आपला हेतू साध्य केला पाहिजे. हिंदुस्थानच्या इतर भागातील लोकांनी बंगालमधील बहिष्कार चळवळींना पाठिंबा दिला पाहिजे. राज्यकर्त्यांना देशातील लोकांचे दैन्य, दारिद्र्य, उद्योगांच्या स्थितीची जाणीव होऊन जबाबदारीने राज्यकारभार करण्यासाठी बहिष्काराचा मार्ग योग्य आहे.

**३. राष्ट्रीय शिक्षण** : चतुःसूत्री कार्यक्रमातील राष्ट्रीय शिक्षण हे एक महत्त्वाचे सूत्र आहे. टिळकांच्या काळात बहुतांश शिक्षणसंस्था सरकारी होत्या. काही शाळा मिशनऱ्यांतर्फे चालविल्या जात होत्या. त्यामधून पाश्चिमात्य, धर्मनिरपेक्ष व राष्ट्रभक्ती विरहित शिक्षण दिले जात होते. त्यामुळे पाश्चात्त्यांचे अनुकरण करणाऱ्या स्वाभिमानशून्य पदवीधरांच्या संख्येत भर पडते आहे असे टिळकांचे मत होते. विजयी राज्यकर्ते पराभूत प्रजाननांना कधीच राष्ट्रधर्म, राष्ट्रवाद शिकवत नाहीत. या शाळांचे शिक्षक विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आंदोलनापासून दूर राहण्याचा सल्ला देतात. 'हे आमचे गुरू नव्हेत' असा टिळकांनी त्यांचा धिक्कार केला आहे. विज्ञान आणि भौतिक प्रगतीला सर्वस्व ठरविणाऱ्या पाश्चिमात्य शिक्षण संस्कारामुळे इथला शिक्षित विद्यार्थि स्वधर्म, स्वभाषा, स्वसंस्कृतीकडे कुत्सित नजरेने पाहू लागली आहे. हे संकट गंभीर स्वरूपाचे आहे.

राष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने शिक्षणप्रसाराचे कार्य अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणाद्वारे नव्या पिढीच्या अंगी स्वाभिमान, कष्टाळूपणा, राष्ट्रप्रेम, मातृभूमीसाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी इ. गुणांचा परिपोष होतो, ते राष्ट्रीय शिक्षण होय. देशातील तरुण पिढी, देशाचे राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास समर्थ होईल असे शिक्षण देणे हा राष्ट्रीय शिक्षणाचा हेतू असतो. 'राजकीय सिद्धांताचे व सामाजिक प्रमेयांचे विद्यार्थ्यांना लहानपणापासून बाळकडू देणे हेच राष्ट्रीय शिक्षणाचे बीज आहे.' नगरिकांचे हक्क काय असतात, त्यापैकी आज आपणास किती मिळतात हे मुलांना समजले पाहिजे. तसेच जातिभेद, धर्मभेद, वंशभेद, रंगभेद यांच्यामुळे आपला देश कसा विभागला जात आहे, याचे ज्ञान मुलांना मिळाले पाहिजे. मुलांना देशासमोरील समस्यांची जाणीव शिक्षणाच्या माध्यमातून करून दिली पाहिजे. वरील उद्देश समोर ठेवूनच टिळकांनी चिपळूणकरांच्या साहाय्याने १८८० साली न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. नंतर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली. सर्वसामान्य वाचकांना राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठी केसरी व मराठा ही वृत्तपत्रे १८८१ साली सुरू केली. टिळकांनी राष्ट्रीय कॉंग्रेसला आवाहन केले की राष्ट्रीय शिक्षण

देणाऱ्या शाळा-महाविद्यालयांची देशभर स्थापना करण्यासाठी त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करावे, आणि संपूर्ण देशभर राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार करावा असे टिळकांना वाटत होते.

टिळकांनी देशातील शैक्षणिक परिस्थिती व त्यावरील उपाययोजनांवर लिखाण केले आहे. 'स्वतंत्र देशात राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न उद्‌भवत नाही. तेथील सरकार जाणिवपूर्वक जबाबदारीने जनतेला शिक्षण देते. इथे शासक व शासित एकरूप झालेले असतात. परंतु पारतंत्र्य देशात शिक्षण ही बाब गौण मानली जाते. शिक्षण म्हणजे केवळ लिहिणे-वाचणे नव्हे. आपल्या देशात उद्योगधंद्यांचे ज्ञान प्रजेला देणे हे राज्याचे कर्तव्य आहे. राज्यातील लोक स्वाभिमानी, निश्चयी, तेजस्वी कशाने होतील हे सरकारने पाहिले पाहिजे आणि जे सरकार या गोष्टींकडे दुर्लक्ष करते ते आपले कर्तव्य विसरते व जनतेला भिकेस लावते. आमच्या दुर्दैवाने आम्हास असे सरकार मिळाले आहे. असे देशातील शैक्षणिक स्थितीचे वर्णन टिळकांनी केले आहे.

टिळकांच्या मते शाळा-कॉलेजातील शिक्षक, प्राध्यापक हे कर्झनशाहीच्या हातातील खेळणे बनले आहेत. विद्यापीठे, सरकारी हमालखाने बनली आहेत. या विद्यापीठांना टिळकांनी 'परीक्षा घेण्याकरिता रजिस्टर्ड झालेली संस्था' असे म्हटले आहे. या शिक्षणातून विद्यार्थ्यांना सरकारी नोकर मिळत असे. हे सुशिक्षित इंग्रजी सत्तेचे गोडवे गात लाचारीने नोकरी करीत. अशा पिढीला स्वातंत्र्य चळवळ व स्वदेशीची किंमत काय कळणार ? असा प्रश्न टिळकांनी विचारला आहे. टिळकांच्या मते शिक्षण व्यवस्थेतील (१) शिळपटपणा व (२) उपयुक्त शिक्षणाचा अभाव हे दोन दोष काढून सरकारवर अवलंबून न राहता स्वतंत्र शाळा व परीक्षा पूर्व बंगालमध्ये विद्वान लोकांनी सुरू केल्या आहेत. त्याच धर्तीवर आपल्या प्रांतात शाळा-महाविद्यालये काढली पाहिजेत. जुना अभ्यासक्रम बदलून व्यवसाय शिक्षण दिले पाहिजे. नवे विज्ञान, प्रयोगांचे ज्ञान भारतीयांना मिळेल असा अभ्यासक्रम बनविला पाहिजे. सकस राष्ट्रीय वृत्तीचे व स्वावलंबनाचे शिक्षण देणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण संस्था निर्माण केल्या पाहिजेत. अशा पद्धतीची राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी व राष्ट्रनिर्माणासाठी पोषक ठरणारी राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना होती.

**४. स्वराज्य** : लोकमान्य टिळकांच्या चतु:सूत्रीतील स्वराज्य हे सर्वात महत्त्वाचे सूत्र आहे. कारण स्वराज्यप्राप्ती हेच टिळकांचे अंतिम ध्येय होते. त्यांनी स्वराज्यप्राप्तीसाठी स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या साधनांचा वापर करावा असे सुचविले आहे. टिळकांनी स्वराज्याची संकल्पना सविस्तरपणे स्पष्ट केली आहे. त्यांचा स्वराज्यविषयक दृष्टिकोन हा विवेकाधिष्ठित होता. तो भावनिक नव्हता. स्वराज्याच्या संकल्पनेला त्यांनी अध्यात्मिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. स्वराज्य ही एक वैदिक संकल्पना आहे. तो केवळ हक्क नसून एक धर्म आहे. राजकीयदृष्ट्या स्वराज्य म्हणजे होमरूल. टिळकांचा भर हा लोकांना जागृत करणे, प्रजेला त्यांचे हक्क समजावून सांगणे, त्या हक्कांचे राजकीय महत्त्व पटवून सांगणे यावर होता. टिळकांनी दोन गोष्टींवर विशेष भर दिला. पहिली शासक आणि शासित यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करून सांगणे आणि राजकीय आबंधनाचे सर्व पैलू स्पष्ट करून सांगणे. कोणतीही परकीय सत्ता न्याय्यशासन देऊ शकत नाही याची जाणीव असल्याने टिळकांनी स्वराज्यासाठी लढा उभा केला. त्यांच्या

मते स्वातंत्र्य ही मानवी जीवन अर्थपूर्ण करण्याची एक नैतिक पूर्वअट आहे. स्वातंत्र्याशिवाय व्यक्तीचे व्यक्तिगत आणि सामाजिक जीवन अर्थपूर्ण होऊ शकत नाही.

टिळकांच्या मते केवळ परकीय सत्तेपासून मुक्तता हे स्वराज्याचे उद्दिष्ट होऊ शकत नाही. त्यांच्या मते स्वयंशासन ही स्वराज्याची पूर्वअट होऊ शकते. परंतु स्वयंशासनातून स्वराज्य प्राप्त होईल याची खात्री नाही. स्वराज्यप्राप्तीने भारतातील सर्व प्रश्नांची आपोआप सोडवणूक होईल अशा भ्रमात टिळक नव्हते. स्वराज्य हे सर्वंकष व सत्ताभ्रष्ट होऊ शकते याची त्यांना जाणीव होती. त्यांच्या मते स्वराज्याचे फायदे खऱ्या अर्थाने तळागाळापर्यंत पोहोचतील तेव्हाच खरी स्वराज्यप्राप्ती होईल. स्वराज्याचा अर्थ स्पष्ट करताना टिळक म्हणतात, स्वराज्यामधील ‘स्वय’ हा शब्द महत्त्वाचा आहे. त्याचा अर्थ ‘प्राप्त’ असा आहे. म्हणूनच प्रजेचे राज्य म्हणजे स्वराज्य लोकांच्या इच्छेने राज्यव्यवहार चालविणे म्हणजे स्वराज्य. स्वराज्य हे प्रामुख्याने घटनात्मक लोकशाहीचे असले पाहिजे.

लोकमान्य टिळकांनी स्वराज्याची संकल्पना तीन प्रकारच्या स्वराज्याची मांडणी करून केली आहे.

१. जेव्हा स्वराज्य स्थानिक लोकांकडून चालविले जाते. परंतु ते अधिकाधिक सर्वंकष होत जाते, अशावेळी स्वराज्याचा केवळ नकारात्मक अर्थ राहतो. स्वराज्य म्हणजे केवळ परकीयांकडून राज्यकारभार होत नसलेने राज्य असा अर्थ अभिप्रेत होतो.

२. जेव्हा स्थानिक लोकांकडून तुलनेने अधिक व्यवस्थित राज्यकारभार चालविला जातो, तो राष्ट्राचा हिताचा असतो. परंतु तेथे निर्णय निर्धारण प्रक्रियेत लोकांना स्थान नसते.

३. ज्या राजकीय व्यवस्थेत लोकशाही, घटनात्मक शासनव्यवस्था असते आणि जे लोकांच्या इच्छांची पूर्तता करण्याची मुभा देते असे स्वराज्याचे तीन प्रकार टिळकांनी सांगितले आहेत.

लोकमान्य टिळकांना पारतंत्र्यातील लोकांच्या परिस्थितीचे भान होते. पारतंत्र्यामुळे व्यक्तीचे नैतिक अधःपतन व ऐहिक ऱ्हास होतो. व्यक्तिगत, सामाजिक जीवन अर्थपूर्ण करणाऱ्या मानवी गुणांचे अशा व्यवस्थेत पतन होते. म्हणून टिळक सातत्याने राजकीय स्वातंत्र्याचा आग्रह धरतात. त्यांच्या मते राजकीय स्वातंत्र्य म्हणजे स्वतःचे भविष्य स्वतः घडविण्याचा अधिकार असणे होय. मानवी जीवन नैतिक करण्याची ती एक पूर्वअट असते. राजकीय स्वातंत्र्यावरील त्यांच्या अढळ निष्ठेमुळेच त्यांनी कोणत्याही राष्ट्राचे स्वातंत्र्य हे त्या राष्ट्राचे चैतन्य असते अशी भूमिका मांडली. त्यांच्या मते राजकीय स्वातंत्र्य हा एक नैसर्गिक हक्क आहे. तो एक जन्मसिद्ध हक्क आहे आणि त्याची मागणी करण्यासाठी अन्य कोणत्याही समर्थनाची आवश्यकता नाही. टिळक स्वातंत्र्याकडे केवळ हक्क म्हणून पाहात नाहीत तर एक नैतिक जबाबदारी एक कर्तव्य म्हणून पाहतात. त्यांच्या मते स्वातंत्र्य लढा हा एक नैतिक लढा आहे. ज्यामध्ये लोकांनी सहभागी होणे आवश्यक असते.

टिळकांच्या मते केवळ घटनात्मक लोकशाही शासनव्यवस्थाच खऱ्या अर्थाने स्वराज्याची संकल्पना सार्थ ठरविते. त्याचप्रमाणे स्वराज्याचा आधार बळ नव्हे तर मान्यता असते. केवळ राज्य शिस्तबद्ध आहे,

कायदा व सुव्यवस्था चांगली आहे म्हणून लोकांनी राज्याचे समर्थन करू नये, तर प्रजा म्हणून त्यांनी हे जाणून घेण्याचा प्रयत्न करावा की शासकीय धोरण निश्चित करताना प्रजेला त्या प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेतले जात आहे किंवा नाही. टिळकांच्या मते लोक किती प्रमाणात राजकीयदृष्ट्या सहभागी होतात हा स्वराज्यामध्ये अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. टिळकांची स्वराज्याची संकल्पना व्यापक स्वरूपाची होती. त्यामध्ये सर्व समुदाय, धर्म, जाती वर्गांचा समावेश केला होता. स्वराज्यामध्ये समाजातील सर्व घटकांना प्रतिनिधित्व असेल. टिळकांनी स्त्रियाही जागरूक नागरिक असू शकतात अशी भूमिका मांडली. त्यांनी काँग्रेस लोकशाही पक्षाच्या जाहीरनाम्यात स्त्री-पुरुषांना समान मताधिकार असावे, त्याबाबत भेदभाव करू नये अशी भूमिका मांडली आहे.

### ४.२.४ प्रतियोगी सहकारिता धोरण

**लोकमान्य टिळकांचा काँग्रेस लोकशाही पक्ष**

राष्ट्रीय सभेच्या अमृतसर अधिवेशनात माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांना सहकार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. या कायद्यानुसार भारतात निवडणुका घेतल्या जाणार होत्या. निवडणुकीत राजकीय पक्ष प्रचार करू शकत होते. लोकमान्य टिळकांनी या निवडणुकीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने भारतीय जनतेत राजकीय जागृती निर्माण करण्यासाठी राजकीय पक्ष हे एक प्रभावी साधन आहे. हे जाणून टिळकांनी २० एप्रिल १९२० रोजी 'काँग्रेस डेमोक्रेटिक पक्षा'ची स्थापना केली. या पक्षाचा जाहीरनामा पुढीलप्रमाणे होता.

१. काँग्रेस लोकशाही पक्षाचा लोकशाहीवर विश्वास आहे.

२. राष्ट्रीय काँग्रेस पक्षावर दृढ विश्वास व अढळ निष्ठा आहे.

३. शिक्षण प्रसाराद्वारे लोकशाही तत्त्वांची ओळख जनतेला करून देणे.

४. मतदारांच्या संख्येत वाढ करणे.

५. खिलाफत चळवळीला पाठिंबा देवून मुस्लिमांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे.

६. धार्मिक व सामाजिक भेदभाव नष्ट करून समतेसाठी प्रयत्न करणे.

७. धार्मिक सहिष्णुता, बंधुता, मानवता या मूल्यांना महत्त्व देणे.

८. भारतात प्रातिनिधिक शासनव्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.

९. ब्रिटिश राष्ट्रकुलात भारताचा एक राष्ट्र म्हणून समावेश करणे.

१०. कामगारांना न्याय्य वेतन देवून कामाचे वाजवी तास निश्चित करणे.

११. लोहमार्गांचे राष्ट्रीयीकरण करणे.

१३. जागतिक शांततेसाठी राष्ट्रसंघाला सहकार्य करणे.

माँटफोर्ड सुधारणा राबवून संपूर्ण स्वराज्य प्राप्त करणेसाठी प्रयत्न करणे हे काँग्रेस लोकशाही पक्षाचे प्रमुख धोरण होते. पक्षाच्या जाहीरनाम्यात आर्थिक, सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, स्वदेशी-उद्योगांना संरक्षण देणे, लष्कराचे भारतियीकरण करणे व खर्चात काटकसर करणे, दारूबंदी करणे, भाववाढ रोखणे, आरोग्य सेवा पुरविणे, मोफत व सक्तीचे शिक्षण इ. गोष्टींचा समावेश जाहीरनाम्यात केलेला आढळतो.

काँग्रेस लोकशाही पक्षाच्या जाहीरनाम्यावर अशी टीका केली जाते की जाहीरनामा पक्षाचा नसून ते टिळकांचे धोरण आहे. परंतु टिळक हेच या पक्षाचे प्रमुख संस्थापक होते. त्यांच्याच कल्पनेतून या पक्षाची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रभाव जाहीरनाम्यावर पडणे साहजिक आहे. टिळक हे राजकारणात वास्तववादी भूमिका घेणारे होते. १९१९ च्या कायद्यानुसार होणाऱ्या निवडणुका लढवून सत्तेच्या आधारे आणि ब्रिटिशांच्या बरोबर काही बाबतीत सहकार्य करून राष्ट्रीय चळवळ प्रबळ करण्याचे टिळकांचे धोरण दिसून येते. परंतु १ ऑगस्ट १९२० रोजी टिळकांचे निधन झाल्याने या पक्षाचे उद्दिष्ट पूर्णत्वास गेले नाही.

**राज्यसंस्था विषयक विचार**

लोकमान्य टिळकांना समाजाची अंतिम नियंत्रणात्मक व्यवस्था म्हणून राज्यसंस्था आवश्यक वाटत होती. त्यांनी राज्याच्या उदयाचे दोन सिद्धांत मांडले आहेत. सामाजिक करार सिद्धांतात राजा हा परस्परांमधून झालेल्या करारातून निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्यसंस्था ही लोकांनी निर्माण केलेली संस्था आहे. जोपर्यंत लोकांची तिला मान्यता आहे तोपर्यंतच राजाला सत्तेवर राहण्याचा नैतिक अधिकार आहे. टिळक राज्याच्या उदयाची दैवी सिद्धांताविषयी म्हणतात, जर आपण राजा हा ईश्वर आहे असे मान्य केले तर त्याच तत्त्वाने प्रजाही ईश्वर आहे. म्हणून राज्यकर्त्यांकडून केला जाणारा अन्याय सहन करणे योगय नाही. राजा हा ईश्वर आहे असे मानले तरी त्याच्या अन्यायाचे समर्थन करता येणार नाही. टिळकांच्या मते धर्मशास्त्रांनी कधीही अन्यायी आणि अविववेकी राजाचे समर्थन केलेले नाही. जर राजाला आपण ब्रह्म मानत असू तर त्याच तर्काच्या आधारे लोक किंवा प्रजाही ब्रह्म आहे. राजा अन्यायी होतो तेव्हा त्याचे देवत्व संपते आणि तो दैत्य होतो. राजपदावर राहण्याचा नैतिक अधिकार तो गमावतो. राजा आपले दैवी तत्त्व हरवून बसतो तेव्हा दुसरी व्यक्ती तिची जागा घेऊ शकते. अन्यायी राज्यकर्ते सत्तेवर राहण्याचा आपला नैतिक अधिकार गमावतात. त्याबरोबरच लोकांची अधिमान्यताही गमावतात. यातून टिळक असे सुचवतात की, भारतीय लोकांनी ब्रिटिशांच्या राज्यकारभाराचे मूल्यमापन केले पाहिजे. भारतीय जनतेचा ब्रिटिश सरकारला असलेला पाठिंबा हा प्रजाहिताच्या निकषावर आधारित असला पाहिजे. टिळकांच्या मते, भारतातील परकीय ब्रिटिश सत्तेने लोककल्याणाचे किंवा हिताचे कोणतेही काम केलेले नाही. त्यामुळे ब्रिटिश सरकारला पाठिंबा देणे नैतिकदृष्ट्या चुकीचे आहे.

**राजकीय प्रतिकार विषयक अधिकार**

लोकमान्य टिळक आपल्या राजकीय जीवनात सातत्याने ब्रिटिश सरकारच्या अन्यायी धोरणाविरुद्ध संघर्ष करीत राहिले. त्यासाठी त्यांना तुरुंगवासाची शिक्षा भोगावी लागली. तरीही त्यांनी खचून न जाता अखंडपणे संघर्ष चालूच ठेवला. लोकमान्य टिळकांच्यावर प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता. विशेषतः वेद आणि भगवद्‌गीतेचा प्रभाव होता. याबरोबरच जे. एस. मिल, हर्बर्ट स्पेन्सर इ. पाश्चिमात्य विचारवंतांचा प्रभाव होता. त्यांनी मांडलेल्या विचारांच्या संदर्भात स्वातंत्र्य चळवळीस प्रेरणा देणारे तत्त्वज्ञान निर्माण करण्यासाठी मंडालेच्या तुरुंगवासात असताना 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. टिळकांनी पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातील प्राचीन, अर्वाचीन विचार भारतीय तत्त्वज्ञानाच्या भाषेत व चौकटीत मांडून त्यांची तुलनात्मक मांडणी केली. त्यांच्या वैचारिक मांडणीतून व प्रत्यक्ष कृतीतून शेकडो भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या माध्यमातून ब्रिटिश सत्तेशी प्रतिकार करण्यास सिद्ध झाले.

टिळकांच्या मते भारतीयांच्या स्वातंत्र्यलढ्याचा साधनांची संविधानिकता किंवा कायदेशीरपणा न तपासता ती न्यायसंगत, नैतिक आणि ऐतिहासिक प्रक्रियांशी सुसंवाद असणे महत्त्वाचे आहे. एखाद्या कायद्याशी जी साधने भंग करणारी असली तरी त्यांच्या नैतिकतेविषयी आपली खात्री असेल तर त्यामुळे मोडला जाणारा कायदा आपण अनैतिक मानावा. राज्यसत्तेच्या जुलूमाविरोध बेधडक उभे रहावे व त्यासाठी त्याग करण्यास सिद्ध असावे. टिळकांच्या मते प्रत्येकाने आपल्या सोयीचे साधन वापरावे. 'साधनानाम अनेकता' या सूत्रानुसार अनेकांनी आपल्या परीने साधन वापरावे अशी टिळकांची भूमिका होती. हिंसक चळवळी व सशस्त्र क्रांतीच्या मार्गांना टिळकांचा विरोध नव्हता. परंतु अशी क्रांती अनुकूल परिस्थितीखेरीज यशस्वी होऊ शकत नाही याची त्यांना पूर्ण कल्पना होती. तसेच टिळकांना दहशतवादी मार्गाच्या मर्यादांचीही जाणीव होती.

राज्यकर्ते कोणत्या परिस्थितीत लोकांचा पाठिंबा मिळवून आपली राजकीय सत्ता प्रस्थापित करू शकतात या प्रश्नाबत टिळक जागरूक होते. त्यांनी शासक व शासित राजा व प्रजा यांच्या परस्पर संबंधावर प्रकाश टाकला आहे. टिळकांच्या मते राज्यकर्ते आणि प्रजा यांची परस्परांविषयी काही कर्तव्ये असतात. हे स्पष्ट करताना टिळकांनी प्रजाद्रोहाची संकल्पना मांडली आहे. जर सरकारला लोकांचा पाठिंबा मिळविण्याचा किंवा राजद्रोह करणाऱ्याला शिक्षा करण्याचा अधिकार असेल तर प्रजेलाही प्रजाद्रोह करणाऱ्या सरकारला किंवा राज्यकर्त्यांना शिक्षा करण्याचा नैतिक अधिकार असला पाहिजे. प्रजाहिताविरुद्ध काम करणाऱ्या राज्यकर्त्यांना दूर करणे हा प्रजेचा केवळ हक्कच नसून ते नैतिक कर्तव्य आहे. भारताच्या संदर्भात जुलमी ब्रिटिश सत्तेला भारतातून घालवणे हे भारतीयांचे नैतिक कर्तव्य आहे.

लोकमान्य टिळक घटनावादाचे कट्टर समर्थक होते. त्यांच्या मते घटनावाद म्हणजे मर्यादित शासन राज्यघटनेचे प्रमुख कार्य आणि उद्देश शासनाच्या सत्तेवर नियंत्रण ठेवणे हे आहे. राज्यघटनेद्वारे स्थापन केलेल्या राजकीय व्यवस्थेमध्ये लोकांना दिलेल्या हक्कांद्वारे शासनाचे व प्रजेचे स्थान निश्चित होते.

वास्तविक शासनाची सर्व राजकीय अधिसत्ता लोकांकडून येते. त्यामुळे शासनाची खरी सत्ता लोकांकडे असते. अनिर्बंध राजकीय सत्ता असलेली राजकीय व्यवस्था घटनात्मक नसते. घटनात्मक राजकीय व्यवस्थेत शासनाची सत्ता मर्यादित असे. टिळकांच्या मते ब्रिटिश राजकीय व्यवस्था ही घटनात्मक आहे. ती लोकशाही पद्धतीने चालणारी, लोकांना जबाबदार असणारी व्यवस्था आहे. शासनाने घेतलेले निर्णय लोकांच्या विरोधात असतील तर लोक राज्यघटनेने बहाल केलेला अधिकार वापरून तो निर्णय बदलू शकतात. घटनात्मक व्यवस्था लोकांच्या हक्कांचे रक्षण करते. त्यांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेते. लोकांना संस्था व संघटन स्थापन करण्याचे, चळवळी-आंदोलन करण्याचे स्वातंत्र्य राज्यघटनेच्या आधीन राहून दिले जाते. टिळकांच्या मते, भारतात राज्यघटना अस्तित्वात नसताना लोकांना केवळ घटनात्मक मार्गाचा अवलंब करण्यास सांगणे हा वेडेपण आहे. त्यांच्या मते ब्रिटिश लोकांना प्राप्त झालेला घटनात्मक प्रतिकाराचा अधिकार हा एका मोठ्या लोकलढ्याचा आणि त्यागाचा परिपाक आहे. त्यामुळे भारतीयांनासुद्धा आपल्या हक्कांसाठी दीर्घकाळ लोकलढा उभारावा लागेल असे टिळकांचे मत होते.

**प्रतियोगी सहकारिता**

लोकमान्य टिळक नोव्हेंबर १९१९ मध्ये विलायतेहून भारतात परतले. डिसेंबरमध्ये अमृतसर येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन घेण्याचे ठरविण्यात आले होते. या अधिवेशनास स्वतंत्र रेल्वेची व्यवस्था करण्यात आली होती. टिळक याच गाडीतून जात होते. एका स्टेशनवर त्यांना ब्रिटनच्या राजाचा माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांचा जाहीरनामा वाचण्यास मिळाला. पुढच्या स्टेशनवर टिळकांनी ब्रिटनच्या बादशहाला तार पाठवली. या तारेमध्ये टिळकांनी 'प्रतियोगी सहकारिता' (रिस्पॉन्सिव्ह को-ऑपरेशन) या शब्दांचा उल्लेख केला होता. ब्रिटिश बादशहाच्या जाहीरनाम्यात सहकारित्वाचा उपदेश नोकरशाही व भारतीय प्रजेला करण्यात आला होता. टिळकांच्या मते भारतीय प्रजेला हा उपदेश करण्याची गरज नव्हती कारण प्रजेच्या कल्याणाच्या बाबतीत लोकांनी कधीही अडथळा आणलेला नाही. आजपर्यंत नोकरशाहीनेच अडथळा आणला आहे. जर नोकरशाहीने सहकारिता केली तर त्यांना प्रतियोगित्याच्या नात्याने म्हणजेच जबाबाला प्रतिजबाब म्हणून प्रजाही सहकारिता करेल. नोकरशाहीने प्रजेच्या कामात आडकाठी घातली तर मात्र विरोध करावा लागेल. माँटफोर्ड सुधारणांबाबत आपल्याला जे मिळाले आहे ते स्वीकारावे आणि बाकीच्या हक्कांबद्दल चळवळ जोराने चालू ठेवावी अशी टिळकांची भूमिका होती. टिळकांची ही भूमिका अधिक प्रगल्भ आणि वास्तववादी होती.

पहिल्या महायुद्धानंतर भारतात राजकीय जागृती वाढली होती. लोकमान्य टिळक व ॲनी बेझंट यांनी होमरूल चळवळीद्वारे भारतीयांना स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळावा यासाठी राष्ट्रीय आंदोलन उभारले होते. पहिल्या महायुद्धात भारतीयांचे सहकार्य मिळविण्यासाठी भारतमंत्री माँटेग्यू यांनी अशी घोषणा केली की, पुढील काळात भारतातील राज्यकारभाराच्या क्षेत्रात भारतीयांचे जास्तीत जास्त सहकार्य घेतले जाईल. तसेच भारतात जबाबदार शासनपद्धती निर्माण करण्यासाठी स्वयंशासित संस्थांचा विकास करण्यात येईल. त्यानुसार १९१९ साली ब्रिटिश संसदेने भारत प्रशासक कायदा मंजूर केला. त्याला माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा कायदा

असेही म्हटले जाते. या कायद्यान्वये दिलेल्या राजकीय सुधारणांचा स्वीकार करावा की करू नये या मुद्यावरून राष्ट्रीय सभेत दोन तट पडले. या सुधारणांना बिनशर्त सहकार्य करावे असे महात्मा गांधी, पंडित मदनमोहन मालविय, ॲनी बेझंट इ. नेमस्तांना वाटत होते. तसेच या सुधारणा फेटाळून लावाव्यात असे विचारवंत दास, बिपिनचंद्र पाल इ. जहाल नेत्यांना वाटत होते.

लोकमान्य टिळकांनी मात्र दोघांच्या मधला व्यवहारी मार्ग काढला. त्याचे नाव 'प्रतियोगी सहकारिता' (रिस्पॉन्सिव्ह को-ऑपरेशन) असे होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जे दिले आहे त्याचा स्वीकार करावा आणि जे मिळाले नाही ते मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवणे हे या मार्गाचे सूत्र होते. टिळकांच्या मते सहकार्याचा मार्ग एकतर्फी असू शकत नाही. सहकार्य हे नेहमी परस्परावलंबी असते. या कायद्यातील सुधारणा असमाधानकारक असल्या तरीही देशात कालांतराने स्वयंशासन आणण्यास उपयुक्त ठरतील असे टिळकांचे मत होते.

प्रतियोगी सहकारितेच्या धोरणातून टिळकांची राजकीय परिपक्व वता व दूरदृष्टी दिसून येते. एकाच वेळी सर्व आघाड्यांवर ब्रिटिश सत्तेशी संघर्ष न करता काहीवेळा सहकार्याचा मार्ग स्वीकारून आपला राष्ट्रीय कार्यक्रम पुढे नेला पाहिजे ही टिळकांची भूमिका व्यवहारी व सामंजसपणाची होती असे म्हणता येईल.

## ४.३ सारांश

या घटकात आपण लोकमान्य टिळकांचे राजकीय व सामाजिक विचार समजून घेतले. त्याचा संक्षिप्त सारांश पुढीलप्रमाणे आहे.

**सामाजिक विचार :**

* टिळकांच्या मते सामाजिक प्रश्न स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रबोधन आणि आधुनिक शिक्षणाद्वारे सोडवावे. समाजसुधारणेकरिता परकीय सत्तेची मदत घेणे त्यांना मान्य नव्हते.

* तत्कालीन समाजसुधारणांवर टिळकांनी प्रखर टीका केली. टिळकांना समाजसुधारणेपेक्षा राजकीय सुधारणांची निकड वाटत होती. समाजसुधारणांमुळे समाजात मतमतांतर, फूट पडू नये असे त्यांचे मत होते.

* टिळकांनी संमती वय विधेयकाला विरोध केला. सामाजिक परिषदेला विरोध केला. अस्पृश्यतेला त्यांचा विरोध होता. परंतु परंपरावादी समाजाचा रोष त्यांना नको होता. थोडक्यात टिळक समाजसुधारणेबाबत मवाळ धोरण स्वीकारणारे होते.

**राजकीय विचार :**

* टिळकांचे राजकीय विचार जहाल होते. ब्रिटिश सत्तेचा भारताला काही थोडे लाभ झाले तरी अन्याय, जुलूम, शोषण, दडपशाहीचा त्यांचा विरोध होता. ते हिंदुस्थानचे कधीही भले करणार नाहीत. लॉर्ड कर्झनसारख्या अधिकाऱ्याने मोठा अन्याय केला आहे. त्यामुळे स्वराज्य प्राप्ती ही एकच पर्याय आहे.

* लोकमान्य टिळकांनी स्वराज्यप्राप्तीसाठी भारतीय जनतेला स्वदेशी बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य हा चतु:सूत्रीचा कार्यक्रम दिला. टिळकांनी सनदशीर, नेमस्त मार्ग व क्रांतीकारी मार्ग यांच्यापेक्षा अहिंसक असा परिमकारक कार्यक्रम भारतीयांना दिला.

* टिळकांना भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव, शिवजयंतीच्या माध्यमातून समाजात ऐक्य निर्माण करून राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्याचा प्रयोग केला. टिळकांच्या या राष्ट्रवादाला सांस्कृतिक राष्ट्रवाद म्हणून ओळखले जाते.

* लोकमान्य टिळक आणि ॲनी बेझंट यांनी स्वराज्य प्राप्तीसाठी होमरूलची चळवळ सुरू केली. चळवळीद्वारे समाजात राजकीय जागृती निर्माण केली.

* टिळकांनी मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांच्या संदर्भात प्रतियोगी सहकारितेचा व्यवहारी मार्ग स्वीकारला. तसेच निवडणुकीच्या राजकारणात उतरण्यासाठी कॉंग्रेस लोकशाही पक्ष स्थापन केला.

## ४.४ पारिभाषिक शब्द

१. **चतु:सूत्री** : लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य चळवळीत अवलंबलेली स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षा व स्वराज्य हे चार मार्ग किंवा चार सूत्रे किंवा चार तत्त्वे.

२. **स्वयंशासन** : स्वायत्त शासन, स्वराज्य, स्वतःच्या देशात स्वतःचे शासन

३. **सेंद्रिय** : अवयवांसहित असणे, सजीवाप्रमाणे असणे

४. **शासक** : राज्यकर्ते, राज्य चालवणारा, राज्यकारभार करणारा वर्ग

५. **शासित** : राज्यातील लोक, प्रजा त्यांच्यावर राज्य चालवले जाते असे लोक.

६. **सहिष्णुता** : सोशिक असणे, सहनशील असणे.

७. **राष्ट्रकूल** : एकाच साम्राज्याचा भाग असलेली आणि आता स्वतंत्र झाल्यावर एकमेकांशी संबंध ठेवणारी राष्ट्रे किंवा समान हितसंबंध असलेल्या राष्ट्रांचा समूह.

८. **जहाल** : कट्टर, उग्र, जाज्वल्य, जहाल मतवादी, क्रांतीवादी विचार असणारी व्यक्ती

९. **मवाळ** : शांततामय मार्ग, मृदू, नेमस्त, सौम्य विचारांचा पुरस्कार

१०. **सनदशीर** : घटनात्मक मार्ग, कायदेशीर, नियमानुसार, नेमस्त

११. **राजद्रोह** : राजाविरुद्ध किंवा राज्यकर्त्यांविरुद्ध कट करणे, राजसत्तेविरुद्ध उठाव करणे, बंडखोरी करणे.

१२. **राष्ट्रवाद** : राष्ट्रप्रेम, राष्ट्राभिमान, राष्ट्राविषयी प्रेम वाटणे.

**४.५ स्वयं अध्ययन प्रश्न**

**पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव कोणत्या साली सुरू केला ?

२. शिवजयंती उत्सव कोणी सुरू केला ?

३. 'फोडा व राज्य करा' या नीतीचा अवलंब कोणी केला ?

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

**पुढील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१. ब्रिटिश सत्तेमुळे भारतीयांचे कोते गुण लोप पावले आहेत ?

२. कोणत्या व्हॉईसरॉयने भारतीय जनतेवर मोठा अन्याय केला आहे ?

३. गुलामगिरीत असणाऱ्या राष्ट्रापुढे कोणता एकच पर्याय असतो ?

**स्वयं अध्ययन प्रश्न ५**

**पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. लोकमान्य टिळकांनी होमरूल लीगची स्थापना कोठे केली ?

२. होमरूल म्हणजे काय ?

३. लोकमान्य टिळक ब्रिटनला कोणत्या साली गेले ?

**स्वयं अध्ययन प्रश्न**

**पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. चतुःसूत्री कार्यक्रमातील चार सूत्रे सांगा.

२. लोकमान्य टिळकांनी स्वराज्याचे किती प्रकार सांगितले आहेत ?

३. स्वावलंबनाचा व दुष्काळ निवारणाचा उत्तम मार्ग कोणता आहे ?

**स्वयं अध्ययन प्रश्न ६**

**गाळलेले शब्द भरून वाक्य पूर्ण करा.**

१. काँग्रेस लोकशाही पक्षाची स्थापना .......... यांनी केली.

२. काँग्रेस लोकशाही पक्षाची स्थापना .......... साली करण्यात आली.

**स्वयं अध्ययन प्रश्न ७**

**गाळलेले शब्द भरून वाक्य पूर्ण करा.**

१. लोकमान्य टिळक व .............. यांनी होमरूल चळवळीने राष्ट्रीय आंदोलन उभारले.

२. १९१९ च्या कायद्याला .......... सुधारणा कायदा म्हणून ओळखले जाते.

३. लोकमान्य टिळकांनी निवडलेल्या मार्गाचे नाव .......... असे होते.

**४.६ सरावासाठी स्वाध्याय**

**(अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. ब्रिटिश सत्तेविषयी लोकमान्य टिळकांचे विचार स्पष्ट करा.

२. लोकमान्य टिळकांच्या चतुःसूत्री कार्यक्रमाची चर्चा करा.

३. लोकमान्य टिळकांचे राष्ट्रवादासंबंधी विचार स्पष्ट करा.

४. लोकमान्य टिळकांची स्वराज्याची संकल्पना स्पष्ट करा.

५. लोकमान्य टिळकांच्या होमरूल चळवळीवर भाष्य करा.

६. लोकमान्य टिळकांच्या सांस्कृतिक राष्ट्रवादावर चर्चा करा.

**(ब) टिपा लिहा.**

१. स्वदेशी

२. बहिष्कार

३. राष्ट्रीय शिक्षण

४. स्वराज्य

५. समाजसुधारणेबाबत टिळक आगरकर वाद

६. सार्वजनिक गणेशोत्सव

७. शिवजयंती उत्सव

८. होमरूल चळवळ

९. काँग्रेस डेमॉक्रेटिक पक्ष

१०. प्रतियोगी सहकारिता

### ४.७ अधिक वाचनासाठी ग्रंथ


१. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण : आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे अँड पब्लिशर्स, नागपूर, जून २००३.

२. डॉ. चौसाळकर अशोक, (संपा). टिळक आणि आगरकर यांचे राजकीय विचार, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००८.

३. केळकर न. चिं., लोकमान्य टिळक यांचे चरित्र (खंड १, २, ३), रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, २०१२.

४. डॉ. चौधरी के. के. : आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (खंड पहिला) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २०१५.

५. डॉ. मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा (खंड पहिला), राजहंस प्रकाशन, पुणे, २००७.

६. डॉ. देव प्रभाकर : आधुनिक भारत, विद्याभारतीय प्रकाशन, लातूर, १९९८.

७. पाटील बी. बी. व चव्हाण उर्मिला : भारतीय राजकीय विचार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००८.

# घटक – १

# महात्मा गांधी

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ महात्मा गांधी यांचे संक्षिप्त चरित्र

१.२.२ सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह

१.२.३ स्वराज्याची संकल्पना

१.२.४ महात्मा गांधींची धर्म संकल्पना

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वाध्यायासाठी प्रश्न

१.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्टे

१. संक्षिप्त चरित्रातून महात्मा गांधींची वैचारिक जडण-घडण समजून घेता येईल.

२. महात्मा गांधींनी मांडलेल्या सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या संकल्पनांचा अभ्यास करता येईल.

३. महात्मा गांधीजी स्वराज्याची संकल्पना मांडतात यांतून रामराज्य व विश्वस्त या संकल्पनांचा अभ्यास करता येईल.

४. महात्मा गांधींच्या धर्मविषयक विचारांचा अभ्यास करता येईल आणि त्यांचे आजचे औचित्य स्पष्ट करता येईल.

## १.१ प्रास्ताविक

भारतीय राजकीय विचार भाग १ या अभ्यासविषयात आपण यापूर्वी कौटिल्य, महात्मा फुले, न्या. महादेव गोविंद रानडे आणि लोकमान्य टिळक या विचारवंतांनी मांडलेल्या विचारांचा अभ्यास केला आहे. प्राचीन काळातील राज्य विषयक विचार कौटिल्याने मांडले आणि त्यातून आदर्श राजकीय व्यवस्था आणि त्याची रचना कौटिल्यांनी मांडलेली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा फुले यांनी आपल्या सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून तत्कालीन समाजव्यवस्था आणि राजकीय व्यवस्था यावर टीका करून बळी राज्याची संकल्पना स्पष्ट केली. न्या. महादेव गोविंद रानडे यांनी मांडलेला राजकीय उदारमतवाद, समाजसुधारणा विषयक विचार व आर्थिक विचार या विषयांवरती विस्तृत विवेचन केलेले आहेत. १९०५ नंतर भारतात जहालमतवादी म्हणून लोकमान्य टिळकांना आणि त्यांच्या कार्याला महत्त्वाचे स्थान आहे. लोकमान्य टिळकांची या बाबतची भूमिका, स्वराज्याची संकल्पना, टिळकांच्या चतुःसूत्री कार्यक्रमाचे मूल्यमापन सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि प्रतिकाराचा अधिकार या विषयावर टिळकांनी मांडलेला विचार आपण अभ्यासले आहे. भारतीय राजकीय विचार भाग २ या विषयात महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा अभ्यास करणार आहोत. पहिल्या घटकामध्ये महात्मा गांधी यांच्या विचारांचा अभ्यास करणार आहोत.

## २.२ विषय विवेचन

आधुनिक भारतात टिळक युगानंतर म्हणजे लोकमान्य टिळकांच्या नंतर अहिंसाधिष्ठित गांधी युगास सुरुवात झाली. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधींची भूमिका महत्त्वाची होती. महात्मा गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीस नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. सत्य, अहिंसा व सत्याग्रह यासारख्या अभिनव विचारातून स्वातंत्र्य चळवळीला एक नवा आयाम दिला. स्वातंत्र्य चळवळ गतिमान करून सर्वसामान्य लोकांना या स्वातंत्र्यचवळीत सत्याग्रहाच्या माध्यमातून सामावून घेतले. तसेच वैचारिक आणि तात्त्विक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. महात्मा गांधी यांनी भारतीय राजकीय विचारात वैचारिक आणि तात्त्विक बैठकीचे योगदान दिले, त्याचे महत्त्व समजून घेणे हा आपल्या अभ्यासाचा उद्देश आहे.

### १.२.१ महात्मा गांधी यांचे संक्षिप्त चरित्र

महात्मा गांधींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील काठेवाड येथील पोरबंदर मध्ये एका सुसंस्कृत व प्रतिष्ठित कुटुंबात झाला. महात्मा गांधींचे संपूर्ण नाव मोहनदास कारमचंद गांधी असे होते. काठिवाडा संस्थानाच्या पदरी दिवाण म्हणून त्यांच्या पूर्वजांनी आणि त्यांचे आजोबा उत्तमचंद यांनी काम केले होते. त्यांच्या वडिलांचे नाव करमचंद आणि आईचे नाव पुतळाबाई हे दोघेही शीलसंपन्न व धर्मनिष्ठ होते. त्यांच्या घरातील वातावरण अत्यंत धार्मिक होते. धर्मश्रद्धेचा वारसा त्यांना प्रामुख्याने त्यांच्या मातेकडून मिळाला. त्यांच्यावर वैष्णव पंथांचे कौटुंबिक संस्कार झाले. महात्मा गांधींचा विवाह बालपणीच कस्तुरबा यांच्याशी झाला. कस्तुरबा आणि मोहनदास यांचे वय सारखेच होते. या दोघांचा विवाह वयाच्या

तेराव्या वर्षी झाला. ही विद्यार्थी दशा होती. मोहनदासचे प्राथमिक शिक्षण राजकोट येथे झाले. १८८५ मध्ये वडील करमचंद यांचे निधन झाले. वडीलांच्या निधनानंतर आई पुतळाबाई यांनी मोहनदास यांचे पुढील आयुष्यांचे निर्णय घेतले. सन १८८७ साली वयाच्या १८ व्या वर्षी ते मॅट्रिक पास झाले. मोहनदास यांनी पुढील बॅरिस्टरचे उच्च शिक्षण इंग्लंडमध्ये जावून घ्यावे यासंबंधात घरातील आई आणि वडीलधाऱ्या माणसांनी निर्णय घेतला. १८८८ साली इंग्लंडला रवाना होणार त्यावेळी त्यांच्या आईनी त्यांच्याकडून मद्य, मांस व परस्त्री वर्ज्य करण्याची शपथ घेतली. इंग्लंडमध्ये असताना गांधींनी शाकाहारी मंडळ स्थापन केले. वडिलांच्या पायापाशी बसून हिंदू, इस्लामी, ख्रिश्चन मित्रांच्या संवादांमध्ये अनेक धर्माच्या तत्त्वाचे जे विचार त्यांनी वारंवार ऐकले, ते इंग्लंडमध्ये गीता, बुद्धचरित्र व बायबल यांच्या वाचनाने अधिक दृढ झाले. मोहनदास १० जून १८९१ रोजी बॅरिस्टर झाले. याच दरम्यान त्यांच्या आई पुतळाबाई यांचे निधन झाले. ही गोष्ट त्यांना स्वदेशी परतल्यावर कळली.

इंग्लंडहून भारतात परत आल्यावर गांधींनी मुंबई येथे वकिली सुरू केली. पण वकिलीचा जम बसेना. यावेळी इंग्रजी पद्धतीचा पोषाख ते करीत होते. सन १८९३ मध्ये ते खान अब्दुल यांच्या एका मुस्लीम फर्मच्या वतीने खटला चालविण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत गेले. दरबानचा लक्षाधीश व्यापारी दादा अब्दुल्ला यांनी प्रिटोरीया येथील व्यापारी तय्यबजी यांच्या विरोधात ४०,००० पौंडांची फिर्याद केली होती. गांधीजींनी त्या दोघांचे मन वळवून कज्जाचा निकाल सामोपचाराने करवून घेतला. आफ्रिकेत ते सुमारे २० वर्षे राहिले. वकिलीचा अनुभव घेतला. दोन्ही पक्षांच्या अंतःकरणात शिरून व समजूत घालून, कज्जाचा निकाल करणे यात गांधीजी तरबेज झाले. दक्षिण आफ्रिकेत असताना तेथील बिनगोऱ्या जमातींवरील विशेषतः हिंदी लोकांवरील, त्याचप्रमाणे तेथील मजुरांवरील होणाऱ्या गोऱ्या सत्ताधाऱ्यांच्या जुलूमांविरुद्ध सत्याग्रहाचा किंवा निःशस्त्र प्रतिकाराचा दीर्घकालपर्यंत प्रयोग करण्याची संधी त्यांनी साधली. त्यांनी २२ मे, १८९४ रोजी दक्षिण आफ्रिकेत 'नाताळ इंडियन काँग्रेसची' स्थापना केली. दक्षिण आफ्रिकेत महात्मा गांधींना सत्याग्रहाचा मार्ग गवसला. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांना न्याय मिळवून देण्याचे त्यांचे सर्व प्रयत्न म्हणजेच सत्याचेच प्रयोग होते. वर्षभर राहण्याच्या इराद्याने दक्षिण आफ्रिकेत गेलेले गांधीजी वीस वर्षे तिथे राहिले. त्यांनी १९०५ साली दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रहाचा शोध लावला. १८९३ ते १९१४ पर्यंत त्यांचा गोऱ्या ब्रिटीश सरकारविरुद्ध अहिंसात्मक लढा सुरू होता. आत्म्याच्या शस्त्राने त्यांनी जुलूमाशी झुंज दिली आणि शेवटी ते यशस्वी झाले आणि हिंदी लोकांच्यावरील अन्याय दूर केला. दक्षिण आफ्रिकेतील या लढ्याचा महात्मा गांधींच्या जीवनकार्यावर प्रभाव पडला. त्याचप्रमाणे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी उभारलेल्या जनआंदोलनाला या लढ्याचा अनुभव उपयोगी पडला.

महात्मा गांधीजी ९ जानेवारी, १९१५ रोजी भारतात परत आले. भारताच्या राजकारणात गांधीजींनी प्रवेश केला. तो काळ प्रथम महायुद्धाच्या परिसमाप्तीचा काळ होता. त्यावेळी भारतीय स्वातंत्र्य चळवळीची अवस्था द्विधा झाली होती. त्या चळवळीला एक नवा आयाम देण्याचा प्रयत्न महात्मा गांधींनी केला. ब्रिटिशांच्या वर्चस्वाखाली संपूर्ण भारतीय जनता दडपली जात होती. ब्रिटिशांच्या अन्यायाविरुद्ध लढण्याची

गरज होती. नामदार गोखलेंच्या सांगण्यावरून गांधीजींनी संपूर्ण भारत फिरून देश समजून घेतला. भारताच्या एकंदरीत परिस्थितीचा अभ्यास केल्यानंतर ते या निष्कर्षापर्यंत आले की, स्वातंत्र्य आपणहून प्राप्त होणार नाही. त्यासाठी स्वातंत्र्य लढ्याची गरज आहे. तत्कालीन परिस्थितीत जहाल आणि मवाळ असे दोन गट होते. या दोन्ही गटांना गांधींचे विचार मान्य होते. ब्रिटिशांच्या दडपशाही, अन्यायी धोरणाविरुद्ध वेळोवेळी आंदोलने करून ब्रिटिशांना त्यांच्या चुकीची धोरणे निदर्शनास आणून देण्याचा आणि सर्वसामान्य भारतीयांच्या मनात राष्ट्रप्रेम, ब्रिटिशांविरुद्ध लढण्याचे बळ निर्माण करण्याचे काम गांधीनी केले. बिहारमधील चंपारण्यात मजुरांवर होणारे अन्याय, गुजरातमधील साराबंदीची चळवळ यामध्ये त्यांनी अहिंसक मार्गाने लढा दिला. याच काळात 'यंग इंडिया' आणि 'हरिजन' ही साप्ताहिके चालू केली. १९१७ मध्ये महात्मा गांधींनी बिहारमधील चंपारण्यातील शेतकऱ्यांवर व मजुरांवर होणारा जुलूम दूर केला. १९१९ साली गांधीजींनी खिलाफत चळवळीला पाठिंबा दिला आणि होमरूल चळवळ गतिमान करण्याचा प्रयत्न केला. भारतीय लढ्यातील १९२० ते १९४७ या सत्तावीस वर्षांचा कालखंडास 'गांधीयुग' म्हणून ओळखले जाते.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याला १९२० पर्यंत लोकमान्य टिळकांचे नेतृत्व लाभले. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचे निधन झाले. टिळकांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशाची आणि काँग्रेस संघटनेच्या नेतृत्वाची सूत्रे गांधींच्या हाती आली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याला एक नवी दिशा मिळाली आणि एक नवे पर्व सुरू झाले. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली संपूर्ण भारतीय समाज एकत्रित आला आणि सत्याग्रहाच्या मार्गाने इंग्रजांविरुद्धचा लढा सुरू झाला. गांधीजींच्या नेतृत्वाखाली असहकाराच्या चळवळी झाल्या. १९२१ मध्ये त्यांनी 'रौलेट ॲक्ट' व 'जालियनवाला बाग' या प्रकरणी सरकारविरुद्ध अहिंसात्मक मार्गांनी आंदोलने करून भारतीय जनतेत नवचैतन्य निर्माण केले. परंतु या आंदोलनास चौरीचौरा येथे हिंसक वळण लागल्याने गांधीजींनी ही चळवळ मागे घेतली. त्यानंतर १९२७ साली सायमन कमिशनविरुद्ध निदर्शने केली.

पुढे १९२९ साली लाहोर काँग्रेसने पूर्ण स्वराज्याचे ध्येय जाहीर कले. त्यामुळे गांधीजींकडे अहिंसात्मक चळवळीची सूत्रे आली. सन १९३० साली गांधीजींनी संपूर्ण देशभर सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. भारतीय स्वातंत्र्य लढ्याला सत्य, अहिंसा, असहकार, सत्याग्रह यांची जोड मिळाली. गांधीजींनी सविनय कायदेभंग, मिठाचा सत्याग्रह, बहिष्कार इत्यादी साधनांनी जनतेत जागृती निर्माण करण्याचे कार्य केले. याच दरम्यान 'गांधी-आयर्विन' करार झाला. त्यानुसार १९३१ साली गांधीजी दुसऱ्या गोलमेज परिषदेत भाग घेण्यासाठी इंग्लंडला गेले. १९३२ साली ब्रिटीश सरकारने 'जातीय निवाडा' जाहीर केला. त्याविरुद्ध गांधीजींनी २१ दिवस प्राणांतिक उपोषण केले. त्यावेळी गांधी-आंबेडकर यांच्यात 'पुणे-करार' झाला व त्यानंतर गांधीजींनी उपोषण मागे घेतले. १९३४ साली गांधीजींनी सविनय कायदेभंगाचे आंदोलन मागे घेतले.

महात्मा गांधींनी १९४२ मध्ये 'चले जाव' चळवळ सुरू केली. संपूर्ण भारतभर स्वातंत्र्य चळवळीविषयीचे वातावरण तयार झाले. १९४२ च्या लढ्यात गांधीजींनी जनतेला 'करेंगे या मरेंगे' असा संदेश दिला. या चळवळीअंतर्गत संपूर्ण भारतीय जनता इंग्रजांच्या विरोधात एकत्रित आली. एवढ्या प्रचंड

प्रमाणातील विरोध इंग्रज सरकारने प्रथमच पाहिला असेल. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली इंग्रजांना भारतीयांच्या संघटन आणि इच्छाशक्तीचे दर्शन झाले. स्वातंत्र्यलढा अंतिम टप्प्यात येऊ लागला. भारतीयांच्या मागणीकडे दुर्लक्ष करणे सरकारला अशक्य होऊ लागले. दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिशांना भारतीय स्वातंत्र्यसंबंधीचा विचार करावा लागला. गांधीजींच्या नेतृत्वाखाली १५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. १९२० ते १९४७ या कालखंडातील गांधीयुगात महात्मा गांधीजींनी संघटित शक्तीच्या जोरावर साम्राज्यवादी असणाऱ्या ब्रिटिशांना अहिंसात्मक प्रतिकाराच्या शक्तीच्या जोरावर नतमस्तक व्हायला लावले. शांततामय अहिंसक मार्गाने स्वातंत्र्यप्राप्ती होऊ शकते हे महात्मा गांधींनी दाखवून दिले. १९४७ ते १९४८ या दोन वर्षांत महात्मा गांधीजींनी हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी अहोरात्र प्रयत्न चालू ठेवले. अहिंसक पद्धतीने आयुष्यभर लढा देणाऱ्या गांधीजींचा मृत्यू मात्र हिंसेने झाला. ३० जानेवारी १९४८ रोजी एका हिंदुत्ववादी नथुराम गोडसे या माथेफिरूने त्यांच्यावर गोळ्या झाडून त्यांची हत्या केली आणि या महात्म्याची प्राणज्योत मालवली.

**महात्मा गांधींवर पडलेला प्रभाव**

एखादी व्यक्ती घडण्यामध्ये बराचसा वाटा हा त्यांच्यावर कोणत्या घटकांचा प्रभाव पडतो याचा असतो. महात्मा गांधीजींवर प्रभाव पाडणारे सर्व घटक उच्च नैतिक अधिष्ठान निर्माण करणारे होते. त्यामुळे ईश्वरावर श्रद्धा, ईश्वर म्हणजे सत्य, अहिंसा, प्रेम, सद्भावना, श्रम-प्रतिष्ठा व मानवधर्म इत्यादी गुणांची वाढ होऊन, जगाला दिशा देणारा एक महान महात्मा म्हणून गांधीजींना ओळखले जाऊ लागले. महात्मा गांधींची जडणघडण त्यांच्यावर पडलेल्या प्रभावातून झालेली आहे. महात्मा गांधींच्या जीवनावर भारतीय आणि पाश्चिमात्य विचारसरणी आणि विचारवंताचा प्रभाव पडला. गांधीजींवर ज्या घटकांचा प्रभाव पडला ते पुढीलप्रमाणे आहेत :

**१. धर्मग्रंथांचा प्रभाव** : भगवद्गीता, रामायण, महाभारत आणि बौद्ध धर्मातील ग्रंथ यांचा प्रभाव गांधीजींवर पडला होता. गांधीजींच्या विचारांवर सर्वाधिक प्रभाव हिंदू धर्मातील भगवद्गीता या ग्रंथाचा आहे. महात्मा गांधींच्या मतानुसार जेव्हा-जेव्हा ते मानसिक संघर्षात असत तेव्हा तेव्हा ते भगवद्गीतेकडे वळतात. याचा अर्थ असा की, भगवद्गीता त्यांच्यासाठी एक प्रेरक शक्ती होती. भगवद्गीतेतून त्यांना कर्मयोग आणि साध्य-साधन विवेक मिळाला. भगवद्गीतेतील अनासक्त योगावर गांधीजींनी धार्मिक मानवतावाद उभारलेला आहे. त्याप्रमाणे ईशोपनिषद मधील 'सर्व जगाचा निर्माता एक आहे' हे तत्त्व त्यांच्या मनावर बिंबले. जैन धर्मातील अहिंसेने त्यांना प्रेरणा दिली. अहिंसेची शिकवण त्यांना बायबल मधून मिळाली. 'देव त्यांना क्षमा कर, कारण जे ते काम करतात त्याची त्यांना जाणीव नाही.' हे येशुचे वाक्य गांधीजींच्या मनावर बिंबले होते. बौद्ध धर्मातील प्रेरक करुणा मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मातील एकेश्वरवाद अशा विविध धर्म आणि धर्मग्रंथांचा गांधीजींवर प्रभाव होता. त्यांच्या धार्मिक विचारांवर आणि आचारांवर ख्रिश्चन धर्मातील 'नॉन कन्फॉर्मिस्ट संप्रदाय' यांचाच विशेष प्रभाव पडला होता.

**२. कौटुंबिक वातावरणाचा प्रभाव :** महात्मा गांधींच्या मनावर बालपणी वैष्णव पंथाचे कौटुंबिक संस्कार झाले. बालवयात व उच्च शिक्षण घेत असताना त्यांच्या मनावर अनेक चांगले संस्कार झाले. धार्मिक ग्रंथांचा आणि विविध राजकीय विचारवंतांचा त्यांच्या मनावर प्रभाव पडला. उच्च शिक्षणासाठी परदेशी गेल्यावर तेथे थिऑसॉफीकल सोसायटीचा परिचय झाला आणि या सोसायटीच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. महात्मा गांधीजींचा एक कट्टर वैष्णव घरात जन्म झाला होता. त्यामुळे वैष्णव संप्रदायाचा त्यांच्यावर प्रभाव पडला. महात्मा गांधींची सत्तेची आणि धर्माची व्याख्या वैष्णव धर्माच्या जवळ जाणारी होती. महात्मा गांधींची आई वैष्णव संप्रदायाची होती. आईद्वारे भारतीय परंपरेचे ज्ञान गांधीजींनी आत्मसात केले. भारतीय परंपरेतील राजा हरिश्चंद्र, ध्रुव, राम, प्रल्हाद यांचे आदर्श गांधीजींच्या मनावर रुजले होते.

**३. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचा प्रभाव :** नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे महात्मा गांधीजींचे राजकीय गुरू होते. राजकारणाला अध्यात्माची जोड, साधनसुचिता आणि सनदशीर मार्गाचा अवलंब या बाबींचा प्रभाव महात्मा गांधीजींवर पडला होता.

**४. जॉन रस्किनचा प्रभाव :** जॉन रस्किनचा यांच्या विचारांशी गांधींचा जवळून परिचय झाला. रस्किन यांचे रस्किन 'Unto This Last' हे पुस्तक गांधींच्या वाचनात आले. त्यांच्या जीवनावर कार्यावर व विचारावर या ग्रंथाचा फार मोठा प्रभाव पडला होता आणि या पुस्तकातील विचारांची अंमलबजावणी त्यांनी आयुष्यभर केली. त्यांनी या पुस्तकाचे गुजराती भाषेत अनुवाद करून त्याचे नाव 'सर्वोदय' ठेवले. या पुस्तकात त्यांनी सर्वोदयाचे सिद्धांत मांडले. 'सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे. समाजात लहान–मोठे कोणीही नसून सगळ्या कामाची किंमत सारखीच असली पाहिजे. कारण पोटापाण्याचा हक्क सगळ्यांना सारखाच असतो. साधे कष्टकऱ्यांचे व शेतकऱ्यांचे जीवन हे खरे जीवन होय.' हे विचार होते.

**५. हेन्री डेव्हिड थोरो यांचा प्रभाव :** राजकीय क्षेत्रात गांधीजींच्या असहकार विषयक मतांवर थोरोच्या विचारांचा प्रभाव पडला होता. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या लढ्यावर थोरो यांच्या "Civil Disobedience" या निबंधाच्या आधारे शास्त्रीय आधार प्राप्त झाले होते. या पुस्तकातील राजकीय दृष्टीने एखादी गोष्ट बरोबर आहे की नाही हे बहुमताने नव्हे तर माणसाच्या विवेकानेच ठरविली जावी. अयोग्य गोष्ट समूळ नष्ट करताही आली नाही तरी त्या गोष्टीचे समर्थन तरी करू नये. एका माणसाने जरी अशी कृती केली तरी ती कृती खूप परिणाम करून जाते मग बहुसंख्य लोकांचा त्या गोष्टीला विरोध असला तरी काही फरक पडत नाही. अन्यायी समाजात न्यायी माणसाची जागा तुरुंगातच असते कारण त्याच राज्याच्या आज्ञेचे पालन करणे इष्ट असते ज्या राज्यात न्यायी माणसाला श्रेष्ठ स्थानी मानले जाऊन तिला स्वतंत्र शक्ती मानले जाते आणि राज्य आपल्या शक्तीचा स्रोत तीच व्यक्ती आहे असे मानत असते, हे सर्व थोरोचे विचार 'सिव्हील डिसओबिडिअन्स' या पुस्तकातून गांधीजी वाचून प्रभावित झाले.

**६. लिओ टॉलस्टॉय यांचा प्रभाव** : राजकीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भात थोरो, रस्किन यांच्यापेक्षा टॉलस्टॉय यांचा गांधींवर अधिक खोल प्रभाव पडलेला आढळतो. आपल्या आयुष्यातील बऱ्याच गोष्टींचे श्रेय गांधीजी टॉलस्टॉयना देतात. थोरो या विचारवंतांच्या 'The Kingdom of God is within You' या ग्रंथाचा प्रभाव गांधींच्या मनावर खोलवर बिंबला होता. टॉलस्टॉयच्या ग्रंथामधील 'ईश्वराचे साम्राज्य तुमच्यात आहे' या संदेशामुळे गांधीजी भारावून गेले. टॉलस्टॉयच्या मतानुसार, त्यांच्या लेखणीची जी नायिका आहे ती नितांत सुंदर असून तिचे जिच्यावर प्रेम आहे तिचे नाव 'सत्य' आहे. गांधीजींनी आपल्या तत्त्वज्ञानात टॉलस्टॉय यांचा 'दार्शनिक अराज्यवाद' उतरवला होता. युरोपियन व पाश्चिमात्य सभ्यतेवर प्रखर टीका करण्यात या दोन महात्म्यांमध्ये कमालीचे साधर्म्य आढळते. ३० मे, १९१० रोजी गांधींनी या विचारवंताच्या विचारांने भारावून दक्षिण आफ्रिकेत असताना टॉलस्टॉय फॉर्मची स्थापना केली. सविनय प्रतिकाराचा मार्ग व तत्त्वज्ञान यांच्या प्रयोगाचा ती प्रयोगशाळा व्हावी अशी गांधीजींची अपेक्षा होती त्यानुसार ती झाली. सत्य, अहिंसा, सविनय कायदेभंग इत्यादी गोष्टी गांधीजी टॉलस्टॉयपासून शिकले. टॉलस्टॉयच्या प्रेरणेमुळे त्यांचा आपल्या कार्यात उत्साह वाढला असला तरी त्यांची सत्याग्रह कल्पना टॉलस्टॉयच्या 'सविनय प्रतिकार' या संकल्पनेपेक्षा निराळी आहे.

**७. रोमन न्यायतत्त्वशास्त्र आणि ग्रीक विचारांचा प्रभाव** : १८८८ पासून गांधीजी बॅरिस्टरचे शिक्षण घेत असताना लंडनच्या कायद्याच्या अभ्यासक्रमात सामान्य कायदा व रोमन कायदा या दोन्ही प्रकारच्या कायद्याचा समावेश केलेला होता. या कायद्याच्या शिक्षणाचा गांधींच्या राजकीय विचारांवर झालेल्या परिणामामुळे त्यांना असे वाटू लागले होते की, या जगात आणखी असा एक कायदा आहे की जो नैतिक दृष्टीने संविधान व सामान्य कायदा यापेक्षा श्रेष्ठ आहे. राजकारणाकडे गांधीजी जितके नैतिकतेच्या दृष्टीकोनातून बघत, तितकेच ते न्यायशास्त्राच्या दृष्टीकोनातूनही बघत असत, हे रोमन न्याय तत्त्वशास्त्राच्या पडलेल्या प्रभावावरून दिसून येते.

ग्रीक विचारवंत प्लेटोच्या 'ॲपॉलॉजी' या पुस्तकातील मजकूर त्यांना फारच उत्साहवर्धक आणि प्रभावी वाटत असे गांधीजी म्हणत. 'ॲपॉलॉजी' या पुस्तकातून गांधीजी जो महत्त्वाचा धडा शिकले तो हा होता की, आत्म्याची सुस्थिती व समाजाची सुव्यवस्था यांच्यामध्ये निर्विवाद नैतिक संबंध आहेत. आत्म्याच्या आतील आवाजालाच महत्त्व दिले पाहिजे आणि दुसऱ्याला ठोसा देण्यापेक्षा स्वतः इजा सोसणारा पर्याय निवडणाऱ्या तत्त्वाला महत्त्वाचे मानले पाहिजे. या तत्त्वांना गांधींनी आपल्या स्वतःच्या जीवनात उतरवले होते. यावरून 'ॲपॉलॉजी' या ग्रंथाचा प्रभाव दिसून येतो. गांधींच्या मते, प्लेटोबरोबर सॉक्रेटीस हा मोठा सत्याग्रही होता, त्याने स्वतःच्याच लोकांच्यासमोर सत्याग्रह केला म्हणून तो श्रेष्ठ सत्याग्रही होता.

अशा प्रकारे महात्मा गांधींचे राजकीय जीवन कार्य घडले त्यात या ग्रंथाद्वारे व विचारांद्वारे त्यांच्या जीवनाची वैचारिक बैठक तयार झालेली आहे. तसेच त्यांच्यावर देशी परिस्थितीत दारिद्र्य व पारतंत्र्य यांचा

परिणामही झाला होता. महात्मा गांधींच्या जीवनाला महत्त्वाचे वळण दुसऱ्या परदेशवारीत मिळाले. या ठिकाणी टॉलस्टॉय, रस्किन आणि थोरो यांच्या विचारसरणीशी त्यांचा जवळून परिचय झाला. त्यांच्या जीवनावर, कार्यावर व तत्त्वज्ञानावर या तिघांच्या विचाराचा खोल ठसा उमटला व तो पुढे जन्मभर टिकला.

**महात्मा गांधींची ग्रंथरचना**

महात्मा गांधीजींनी आपले राजकीय नैतिक व आध्यात्मिक तत्त्वज्ञान, इंडियन ओपिनियन, हरिजन, यंग इंडिया आणि नवजीवन या वृत्तपत्रांतून आणि नियतकालिकांतून व्यक्त केले होते. त्यांचा दृष्टीकोण मानवतावादी होता. त्यांनी कर्म, चिंतन यांचा समन्वय साधला होता. हिंद-स्वराज्य, आत्मकथा, माझे समकालीन, गीताबोध, सर्वोदय, ब्रह्मचर्य, राष्ट्रवाणी, मंगलप्रभात, ग्रामसेवा, खादी, आत्मशुद्धी, गीताई, धर्मनीती, आरोग्याची गुरूकिल्ली, रामनावाचे महत्त्व, सत्य-विराची कथा, सत्याग्रह, अनासक्ती योग आणि रचनात्मक कार्यक्रम इत्यादी प्रमुख ग्रंथ गांधीजींनी लिहिले आहेत.

महात्मा गांधीजींनी आपले विचार निरनिराळ्या वेळी परिस्थितीप्रमाणे व्यक्त केले आहेत. त्यांनी आपले विचार संकलित करून कोणत्याच वादाला जन्म दिला नाही. गांधीवाद म्हणून कोणताही सिद्धांत मांडला नाही. सत्य आणि अहिंसा यांची ज्योत सतत तेवत राहावी एवढेच त्यांचे म्हणणे होते. आपल्या 'सत्याचे प्रयोग' या आत्मकथेत त्यांनी गांधीवाद म्हणून आपल्या विचाराचा उल्लेख केला नाही. आपल्या विचारांना त्यांनी कधीच पूर्ण मानले नाही. पट्टाभिसीतारामय्या यांच्या मते, गांधीविचार म्हणजे एखादा सिद्धांत नव्हे किंवा मतांचा व नियमांचा समूह नव्हे तर जीवनाचा तो एक दृष्टिकोन आहे. जीवनाची शैली आहे. मनुष्याच्या जीवनातील सर्व समस्यांचे निराकरण करणारी एक पद्धती आहे म्हणजेच गांधीविचार ही एक जीवनप्रणाली आहे.' ज्ञान, कर्म आणि भक्ती या गुणांनी युक्त असे महात्मा गांधी एक कर्मयोगी होते. अमेरिकेत जॉन हेन्स होल्मस् यांनी गांधीजी म्हणजे येशू ख्रिस्तानंतरचे 'श्रेष्ठ मानव' असे गौरवोद्गार काढले होते. यावरून गांधींच्या श्रेष्ठत्वाची प्रचिती येते. महात्मा गांधींच्या सत्याग्रह, अहिंसा, अपरिग्रह, साधनसुचिता, विश्वस्त कल्पना आणि अराज्यवाद या विचारांना गांधीजींचे तत्त्वज्ञान म्हणून संबोधले जाते.

**१.२.२ महात्मा गांधीजींचे सत्य, अहिंसा आणि सत्याग्रहाचे विचार**

महात्मा गांधीजी वेदांत तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते होते. गीतेचा खोलवर असा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. त्यांनी वेदांत आणि गीतेचा स्वतःच्या अनुभवाच्या आधारे अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. सततच्या बदलत्या युगात शाश्वत सत्य शोधण्यासाठी त्यांनी अद्वैतवादाचा उपयोग केला. सत्य, देव आणि ब्रह्म यांना एकाच साच्यात बसवले व या तिन्ही गोष्टी एकच आहेत असे मानले. महात्मा गांधींच्या मते, 'सत्य' या शब्दाचा मूळ अर्थ 'सत्' म्हणजेच अस्तित्व असा आहे. अस्तित्व हे सत्याशिवाय टिकू शकत नाही, म्हणून ईश्वर हे सत्य आहे आणि सत्य म्हणजेच ईश्वर आहे. भारतीय तत्त्वज्ञानात सत्य, ज्ञान आणि आदर म्हणजेच देव मानला जातो.

**गांधीप्रणित सत्याचे प्रकार**

महात्मा गांधी हे सत्याचे व अहिंसेचे पुरस्कर्ते होते. मानवी जीवनाचा आधार सत्य आहे. सत्याशिवाय जगात कोणती वस्तू अस्तित्वात येत नाही. महात्मा गांधींनी सत्यासाठी जीवनभर संघर्ष केला. सत्य व अहिंसा हे महात्मा गांधीजींच्या जीवनाचे मुख्य सूत्र असल्याने त्यांनी 'माझे सत्याचे प्रयोग' हे आत्मचरित्र लिहिले. महात्मा गांधींच्या मते, सत्य पूर्ण असत नाही. कारण सत्यासाठी सतत प्रयोग केले पाहिजे. सत्याचा शोध घेणे हे गांधीजींच्या जीवनाचे मुख्य उद्दिष्ट होते. गांधीजींच्या मते, सत्य आणि ईश्वर या दोन्ही गोष्टी वेगळ्या नाहीत. ईश्वर हेच सत्य आहे आणि सत्य हेच ईश्वर आहे. ईश्वर आणि सत्यात विभागणी किंवा निवड करताना मी सत्याची निवड करेन. महात्मा गांधी सत्याचे दोन प्रकार सांगितले ते पुढीलप्रमाणे :

**(अ) सापेक्ष सत्य** : महात्मा गांधीजींच्या मतानुसार विशिष्ट परिस्थितीत एखादी गोष्ट सत्य आहे असे वाटणे त्याला सापेक्ष सत्य असे म्हणतात. परंतु प्रत्यक्षात मात्र असे सत्य असत नाही. अर्थात प्रत्येक व्यक्तीची एखाद्या परिस्थितीत सत्याची कल्पना बदलू शकते. अशा प्रकारचे सत्य हे पूर्ण नसते. परंतु तो निरपेक्ष सत्याकडे जाण्याचा मार्ग असतो. तो सत्यशोधण्याचा एक अयशस्वी प्रयत्न असतो. उदा. व्यक्तीच्या सुख व दुःखाची कल्पना सापेक्ष स्वरूपाची असते.

**(ब) निरपेक्ष सत्य** : महात्मा गांधीजींच्या मते, सापेक्ष सत्याच्या साहाय्याने जगणारा मनुष्य निरपेक्ष सत्याकडे जातो. निरपेक्ष सत्य म्हणजे सत्, चित् आणि आनंद यांचा सुंदर मिलाफ व समन्वय होय. निरपेक्ष सत्य म्हणजेच ईश्वर होय. ईश्वर म्हणजे सत्य आणि सत्य म्हणजे ईश्वर'. हे सत्य सर्वात श्रेष्ठ असते असे गांधीजी म्हणतात. सापेक्ष सत्याचा मार्ग स्वीकारणारी व्यक्तीच निरपेक्ष सत्यापर्यंत पोहोचते. महात्मा गांधीजींच्या मते, सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह व ब्रह्मचर्य या पाच जीवन तत्त्वांचा मार्ग स्वीकारणाऱ्या व्यक्तीस 'आत्मज्ञान' प्राप्त होणे म्हणजे निरपेक्ष सत्य गवसणे होय. उदा. येशू ख्रिस्त, सॉक्रेटिस यांना आत्मबलिदानाने निरपेक्ष सत्य सापडले होते.

**महात्मा गांधीजींचे अहिंसाविषयक विचार**

महात्मा गांधीजींची अहिंसा ही संकल्पना नैतिक मूल्यांवर आधारित आहे. अहिंसेला ते सर्वश्रेष्ठ बळ मानत होते. अहिंसेला माणसातील ईश्वरी बळ मानत होते. माणूस अहिंसावादी बनण्यासाठी विनम्र असला पाहिजे. अहंभाव, अहंमन्यता असेल तर अहिंसा शक्य नसते. अहिंसेचा सिद्धांत बिनचूक आहे अशी महात्मा गांधींची समजूत होती. अहिंसेचा अंगिकार करण्यासाठी निष्कलंक चारित्र्य आणि सत्य निर्भयता गुण आवश्यक आहेत असे गांधी म्हणत होते.

महात्मा गांधींना अहिंसा म्हणजे हिंसेचा अभाव असा अर्थ अभिप्रेत नव्हता. मनाची हिंसा, द्वेषाची भावना, बौद्धिक किंवा नैतिक गैरवर्तन म्हणजे हिंसाच असे गांधी मानत होते. गांधींच्या मते सत्य व अहिंसा मनुष्य जीवनात आनंद, प्रेम, सात्विकता आणतात. अहिंसा नैतिक कल्पना आहे. अहिंसा हे मानवी मुक्तीचे

साधन आहेत असे गांधीजी मानत होते. सत्य व अहिंसा ह्या एकमेकांच्या परस्परपूरक असून त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. गांधीजींनी सत्याबरोबर अहिंसा या तत्त्वाला महत्त्व दिले. सत्य आणि अहिंसा मानवी आत्म्याच्या दोन शक्ती आहेत. सत्य साध्य आणि अहिंसा साधन आहे असे गांधीजी मानत होते, म्हणजे अहिंसेच्या मार्गाने सत्यापर्यंत जाता येते असे गांधीजी मानत.

अहिंसेच्या व्याख्या करताना गांधी म्हणतात की, ठार मारणे व इजा करणे ही हिंसा आहे. तसेच एखाद्या व्यक्तीबद्दल मनातसुद्धा दुष्टबुद्धी, पापभावना बाळगणे हिंसाच आहे. 'हरिजन' या साप्ताहिकामध्ये त्यांनी केलेली अहिंसेची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे. 'पृथ्वीवरील मनुष्य, वस्तू व प्राणीमात्रांना शब्दाने, विचाराने वा कृत्याने होणारी दुखापत टाळणे म्हणजे अहिंसा होय.'

**अहिंसेचे प्रकार**

महात्मा गांधी अहिंसेचे तीन प्रकार सांगतात ते पुढीलप्रमाणे –

**(अ) शूर पुरुषांची अहिंसा** : महात्मा गांधीजींच्या मते, मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात शूराची अहिंसा आढळते. नैतिकता व आत्मविश्वास यांच्या साहाय्याने व्यक्ती जेव्हा अहिंसेचा मार्ग आजमावते तेव्हा तिला शूर पुरुषांची अहिंसा असे म्हणतात. या अहिंसेत वीर पुरुष समाजातील कोणतीही गोष्ट सहज करू शकतो. ही अहिंसा वीर पुरुषांचे भूषण असते. गांधीजींनी या अहिंसेचा स्वीकार केला होता.

**(ब) दुर्बलांची अहिंसा** : दुर्बल आणि अगतिक लोक दुर्बलांची अहिंसा स्वीकारतात. विशिष्ट परिस्थितीत व्यक्ती ही अहिंसा स्वीकारतात. परंतु ती कायम राहील का नाही ते सांगता येत नाही. दुर्बलांची अहिंसा वीर पुरुषांच्या अहिंसेपेक्षा कमी प्रतीची असते. मनुष्य आपल्या दुर्बलतेमुळे ही अहिंसा मान्य करतो. नैतिकता, सत्य व साहस या गोष्टींचा अभाव असल्यामुळे ही अहिंसा प्रभावशाली नसते.

**(क) भित्र्या लोकांची अहिंसा** : महात्मा गांधी म्हणतात, भित्र्या लोकांच्या जवळ अहिंसा नसते. भीती व अहिंसा या दोन गोष्टी एका ठिकाणी राहू शकत नाहीत. गांधीजींनी या अहिंसेला विरोध केला.

महात्मा गांधींनी वरीलप्रमाणे अहिंसेचे प्रकार सांगून त्यातील शूर पुरुषाची अहिंसा सर्वश्रेष्ठ मानली. अहिंसेच्या विचारांचे गांधीजींनी खालीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे.

१. महात्मा गांधी अहिंसेला आत्मिक शक्ती असे म्हणतात. पाशवी शक्तीचा प्रतिकार करणे हे काम अहिंसेवर सोपवितात.

२. अहिंसा शौर्याची चरणसीमा आहे. ज्या व्यक्तीला अहिंसेचा अवलंब करायचा असतो. त्या व्यक्तीच्या ठिकाणी सत्तेची हाव, अहंकार, घमेंड नसावी. नम्रतेने अहिंसेचा मार्ग वापरता येतो.

३. अहिंसेचा मार्ग स्वीकारताना पूर्वतयारी करावी लागते ती खालीलप्रमाणे :

(अ) देशातील आर्थिक व सामाजिक वातावरण व्यवस्थित करणे.

(ब) रचनात्मक मार्गांचा वापर करून सामाजिक संबंध सुधारणे.

(क) धैर्य, सहनशीलता, सोशिकता या गुणांची जोपासणा करणे.

४. शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येक देशांना अहिंसेचा वापर करता येईल.

५. महात्मा गांधीनी देशापुढे एक अत्यंत उच्च व उदात्त आदर्श ठेवून जगापुढे अहिंसेचा आदर्श मार्ग ठेवला आहे.

६. सैद्धांतिक पातळीवर अहिंसा हेच सर्वश्रेष्ठ अस्त्र असले तरी प्रत्येकालाच ते पेलेल याची शाश्वती देता येत नाही यांची कल्पना गांधीजींना होती. निष्कलंक चारित्र्य, सत्य, निर्भयता, गुण, साधेपणा, सेवाभाव हे गुण आत्मसात केल्याशिवाय अहिंसेचा समर्थपणे वापर करता येत नाही, असे ते म्हणतात.

**महात्मा गांधीजींचे सत्याग्रहाचे विचार**

महात्मा गांधींचा जो जागतिक विचारवंतात समावेश झाला तो त्यांनी मांडलेल्या सत्याग्रह विषयक विचारांमुळे होय. सत्याग्रहाचा सिद्धांत आणि व्यवहार यामध्ये महात्मा गांधींनी महत्त्वाचे योगदान दिले. सत्याग्रहाची कल्पना गांधींना दक्षिण आफ्रिकेत सुचली. दक्षिण आफ्रिकेत भारतीय लोकांवर जे अन्याय्य कायदे लादले जात होते ते बदलण्यासाठी गांधींनी सत्याग्रहाचा शोध लावला. मुळात सत्याग्रह ही कल्पना गांधींनी सुरुवातीला वापरलेली नव्हती तर 'निःशस्त्र प्रतिकार' ही संकल्पना वापरली होती. महात्मा गांधीजींच्या आधी निःशस्त्र प्रतिकार ही संकल्पना लोकमान्य टिळक आणि अरविंद घोष यांनी मांडली होती. त्यानंतर आयरिश कार्यकर्त्यांनी वापरली. त्यानंतर ही संकल्पना गांधींनी वापरली. परंतु निःशस्त्र प्रतिकार शब्द गांधींना योग्य वाटला नाही, कारण निःशस्त्र प्रतिकार या शब्दातूनच त्याचा उद्देश व्यक्त होत नाही. गांधींनी सत्याग्रहापूर्वी दक्षिण आफ्रिकेत चळवळ करताना 'सदाग्रह' हा शब्द वापरला. सदाग्रह म्हणजे चांगुलपणासाठी आग्रह धरणे. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या लढ्याला काय नांव द्यायचे या विचारातून त्यांना सत्याग्रह शब्द सापडला. 'इंडियन ओपीनियनच्या' वाचकांसाठी लढा या शब्दाला स्वतंत्र शब्द सुचविण्यासाठी स्पर्धा ठेवली होती. त्या स्पर्धेतून 'सत् आग्रह' याचा अर्थ सतत आग्रह धरणे यांची संधी करून 'सदाग्रह' हा शब्द तयार झाला. त्यातूनच 'सत्याग्रह' हा शब्द तयार झाला. याचा अर्थ सत्याचा सतत आग्रह धरणे हे महात्मा गांधींना अपेक्षित होते. गांधीनी सत्याग्रहाचा वापर विविध चळवळीत केला. सत्याग्रहाच्या रूपात गांधींनी सामूहिक तंत्र जगाला दिले.

सविनय प्रतिकार किंवा निःशस्त्र प्रतिकारापेक्षा सत्याग्रह ही संज्ञा गांधींना अधिक उपयुक्त वाटत होती. प्रतिकार द्वेषात्मक असण्याची शक्यता असते. परिस्थितीतून प्रतिकार हिंसक होऊ शकतो. परंतु सत्याग्रहात अहिंसा असते. गांधींच्या मते, 'सत्याग्रह म्हणजे सत्यपरायण होय. म्हणजेच सत्याला चिकटून राहणे, सत्याग्रहामध्ये सत्याचे बळ असते, आत्मबळ असते. गांधीजी सत्याग्रहाला प्रेमाचे सामर्थ्य म्हणतात. कारण सत्याग्रही चूक करणाऱ्याला सुधारू शकतात. सत्याग्रही अहिंसक व निर्भय असतो.'

## सत्याग्रह आणि निःशस्त्र प्रतिकार

महात्मा गांधींच्या मते, सत्याग्रह आणि निःशस्त्र प्रतिकार या दोन संकल्पनांमध्ये फरक आहे. त्यांनी निःशस्त्र प्रतिकार हा शब्दप्रयोग दक्षिण आफ्रिकेमध्ये वापरला होता. परंतु त्यांच्या हे नंतर लक्षात आले की निःशस्त्र प्रतिकारामधून सत्याग्रहाचा पूर्ण अर्थ व्यक्त होत नाही. निःशस्त्र प्रतिकार हा शब्द मर्यादित व संकुचित शब्द आहे. त्यानंतर निःशस्त्र प्रतिकाराऐवजी सत्याग्रह हा शब्द त्यांनी वापरला. महात्मा गांधींनी निःशस्त्र प्रतिकार व सत्याग्रह यामधील फरक पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

१. निःशस्त्र प्रतिकार ही संकल्पना संकुचित आहे. तिचा वापर मर्यादित क्षेत्रामध्ये केला जातो. याउलट सत्याग्रह ही व्यापक संकल्पना आहे. सत्याग्रहाचा वापर राजकीय व मानवी जीवनातील कोणत्याही क्षेत्रातील समस्या सोडविता येतात.

२. निःशस्त्र प्रतिकार निराधार, असुरति व दुर्बल लोकांचे प्रतिकार शस्  आहे. तर सत्याग्रह सबल व सामर्थ्यवान लोकांचे शस्त्र आहे. धैर्यवान लोक सत्याग्रहाचा वापर करतात.

३. निःशस्त्र प्रतिकारामध्ये शारीरिक शक्ती व हिंसा यांचा वापर करतात. याउलट सत्याग्रहामध्ये हिंसेला व शारीरिक शक्तीला स्थान नसते.

४. निःशस्त्र प्रतिकारामध्ये दबाव तंत्राचा वापर केला जातो तर सत्याग्रहात दबाव तंत्राचा वापर केला जात नाही.

५. निःशस्त्र प्रतिकाराचा भर अडथळे आणण्यात असतो तर सत्याग्रहामध्ये विरोधकांमध्ये परिवर्तन करण्यासाठी मन वळविण्याचा प्रयत्न केला जातो.

६. निःशस्त्र प्रतिकारामध्ये कायद्याविषयी आदर बाळगला जात नाही. तर सत्याग्रहामध्ये कायद्याबाबत आदर बाळगला जातो.

७. निःशस्त्र प्रतिकारामध्ये काही वेळी सशस्त्र लढण्याची तयारी केली जाते. परंतु सत्याग्रहामध्ये सशस्त्र लढ्याचा वापर केला जात नाही.

### सत्याग्रहीची पात्रता

सत्याग्रह कोण करतो, त्या सत्याग्रहीची पात्रता महात्मा गांधी पुढीलप्रमाणे सांगतात.

१. सत्याग्रहीची ईश्वरावर अढळ श्रद्धा असायला हवी.

२. सत्याग्रहीला संपत्ती व प्रसिद्धी यांची इच्छा व अभिलाषा असू नये.

३. सत्याग्रहीचे आरोग्य उत्तम असावे. ब्रह्मचर्य धर्माचे पालन करावे.

४. सत्याग्रहीला कशाचीही भिती नसावी.

५. सत्याग्रही ध्येयनिष्ठ असावा.

६. सत्याग्रही स्वार्थासाठी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबणारा नसावा.

७. विरोधकाबद्दल प्रेम आणि आदराची भावना सत्याग्रहीकडे असली पाहिजे.

८. द्वेष, क्रोध व घृणा या भावनांच्या आहारी जाऊन तो आपल्या मार्गापासून दूर जाणारा नसावा.

**सत्याग्रहाचे मार्ग**

महात्मा गांधी सत्याग्रह करताना कोणकोणत्या मार्गाने सत्याग्रह करावा हे सांगतात ते पुढीलप्रमाणे -

**१. असहकार** : सन १९२०-२१ मध्ये महात्मा गांधीनी असहकार चळवळ सुरू केली. ब्रिटिश सरकार भारतीय लोकांवर अत्याचार करू लागले, त्यांची पिळवणूक करू लागले. महात्मा गांधी म्हणत, लोक सहकार्य करतात म्हणून ब्रिटिश सरकार शोषण व अत्याचार करत आहे. म्हणून त्यांनी असहकार चळवळ सुरू केली. सप्टेंबर १९३० मधील कलकत्ता काँग्रेसच्या अधिवेशनात असहकार चळवळीचा ठराव पास करून घेतला. पुढे डिसेंबरमधील नागपूरच्या नेहमीच्या अधिवेशनात असहकार चळवळीचा ठराव पास करून घेतला. या ठरावात खालील गोष्टींचा समावेश होता.

१. किताब, सन्मान, पदव्यांचा त्याग करणे.

२. सरकारी उत्सव, कार्यक्रम यावर बहिष्कार टाकणे.

३. सरकारी शाळांतून मुले काढून घेणे.

४. न्यायालयावर बहिष्कार टाकणे.

५. भारतीय सैनिकांनी कामावर बहिष्कार टाकणे.

६. कायदेमंडळावर बहिष्कार टाकणे.

७. विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकणे.

**२. सविनय कायदेभंग**

गांधीजींनी सन १९३०-३१ मध्ये सविनय कायदेभंग चळवळ सुरू केली. राज्यकर्त्यांनी राज्यकारभार करण्यासाठी अन्यायी कायदे केले असतील तर लोकांनी हे अन्यायी कायदे पाळू नये. त्यांच्या विरुद्ध सविनय कायदेभंगाची चळवळ अहिंसक मार्गानेच करावी, असे गांधीजी म्हणत असत. त्यासाठी सत्याग्रहीनी शिक्षा भोगण्याची तयारी ठेवली पाहिजे. सॉक्रेटिस व थोरो या विचारवंतांच्या विचारातून गांधीजींना सविनय कायदेभंगाची कल्पना सुचली. १९३० मध्ये गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह करून सविनय कायदेभंग चळवळीला सुरुवात केली. दांडीयात्रेला मिठाचा सत्याग्रह म्हणूनही ओळखले जाते. स्वातंत्र्य चळवळीचे पहिले पाऊल म्हणून दांडीयात्रेकडे पाहिले जाते. जे कायदे अन्यायी आहेत. त्यांचा कायदेभंग करायचा आणि जे अन्यायी नाहीत ते पाळायचे अशी भूमिका घेतली. सविनय या शब्दाचा अर्थ जे कायदे अन्यायी आहेत ते जनतेने पाळू नयेत. सविनय कायदेभंग करताना विनयशीलता असावी. समाजाची हानी

होऊ द्यायची नाही. सविनय कायदेभंग करताना सरकारकडून अत्याचार केले तर ते सहन करायची तयारी असावी पाहिजे. ७ एप्रिल, १९३४ रोजी महात्मा गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेतली.

**३. हरताळ** : लोकांच्या व सरकारच्या निदर्शनास एखादी गोष्ट आणण्यासाठी हरताळाचा वापर करावा. हरताळ ऐच्छिक असावा असे गांधीजी म्हणत असत. हरताळामध्ये व्यापार व व्यवसाय बंद ठेवले जातात. हरताळ दबावाने किंवा सक्तीने करू नयेत. हृदयपरिवर्तन करण्यासाठी हरताळाचा वापर करावा.

**४. हिजरत (देशत्याग)** : जेव्हा एखाद्या भागात जनतेवर कायम अत्याचार होत असतील आणि अहिंसक मार्गाने प्रतिकार करता येत नसेल तर त्यावेळी तो प्रदेश/भाग सोडून दुसऱ्या प्रदेशात जावे. सन १९२८ ते १९३९ या कालावधीत महात्मा गांधीजींनी लिंबडी, बार्डोली, विठ्ठलगड आणि जुनागड येथील लोकांना असा सल्ला दिला होता. त्याचप्रमाणे जांबुसर व वोरसाड या गावात हिजरत सत्याग्रह केला होता.

**५. उपोषण** : सत्याग्रहाचे उपोषण हे एक प्रभावी साधन आहे. उपोषण साधनाचा वापर योग्यवेळी करावा. उपोषण साधनाचा वापर करणाऱ्या व्यक्तीच्या अंगी आत्बल व संयम असावा. उपोषण साधन प्रभावी असल्यामुळे त्यांच्या दुरुपयोग होऊ नये यांची काळजी घ्यावी. उपोषण साधनाचा वापर करणे अवघड असते. सरकारला अयोग्य कामापासून परावृत्त करण्यासाठी उपोषणाचा वापर करावा, असे गांधी म्हणत. महात्मा गांधीजींनी १९३३ मध्ये हरिजनांची सेवा करण्यासाठी २१ दिवस आत्मशुद्धी उपोषण केले होते. १९४७ साली हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी उपोषणाचा वापर केला होता.

**६. बहिष्कार** : महात्मा गांधीजींच्या मते सत्याग्रहाचे प्रमुख साधन म्हणजे बहिष्कार होय. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात बहिष्काराचा वापर करता येतो. भारतातील लोकांनी परदेशी मालावर पूर्णपणे बहिष्कार टाकण्याचा प्रयत्न केला होता. सरकारी कचेऱ्या, शाळा व न्यायालये यावर बहिष्कार टाकता येतो असे ते म्हणत.

**७. धरणे** : गांधीजींच्या मते, धरणे हा सत्याग्रहाचा मार्ग होय. त्यांचा वापर काळजीपूर्वक व जबाबदारीचे स्वीकार करावा. समाजातील एखाद्या अन्यायी, अत्याचारी व्यक्तीला लोकांच्या निंदेद्वारे लज्जित करणे म्हणजे धरणे होय. हिंसात्मक मार्गाचा अवलंब न करता धरणे सत्याग्रहाचा प्रयोग आहे.

**८. निरोधन** : निरोधन म्हणजे प्रतिबंध करणे होय. अन्याय, अत्याचार होतो, त्याच्याविरुद्ध निरोधनाचा मार्ग वापरावा व त्याला त्या कृत्यांची जाणीव करून द्यावी. विदेशी वस्तूवर बहिष्कार व दारूबंदी यासाठी महात्मा गांधीनी निरोधनाचा वापर केला होता.

वरीलप्रमाणे महात्मा गांधीजींनी सत्याग्रहाचे वेगवेगळे मार्ग सांगून त्या मार्गाचा वापर केला होता.

### १.२.३ महात्मा गांधींचे स्वराज्य किंवा रामराज्याची संकल्पना

महात्मा गांधी हे एक वेगळा दृष्टिकोन स्वीकारून इतिहासाचा अभ्यास करणारे विचारवंत होते. स्वराज्य व राज्यसंस्था या दोन्ही बाबतीत महात्मा गांधींनी मूलगामी विचार मांडलेला होता. १९०९ मध्ये

महात्मा गांधींनी 'हिंदस्वराज्य' नावाचा ग्रंथ लिहिला. यामध्ये त्यांनी आपले मूलगामी विचार मांडले. त्यामुळे गांधींच्या वाङ्मयात हा विचार बहुचर्चित ठरला आहे. १९०९ मध्ये गुजराती भाषेत हिंदस्वराज्य नावाचा ग्रंथ लिहिला. भारतीयांना कशाप्रकारे स्वराज्य हवे आहे याची त्यांनी या ग्रंथात मीमांसा केली. या ग्रंथात महात्मा गांधीनी स्वराज्याचा/रामराज्याचा पर्यायी मार्ग मांडला. या ग्रंथात त्यांनी स्वराज्य संकल्पनेची चार भागात त्यांनी मांडणी केली आहे.

१. भारतीय राजकीय चळवळीतील स्वराज्याबद्दलचे विचार

२. गांधींची आधुनिक संस्कृतीची चिकित्सा

३. पर्यायी संस्कृती आणि समाज यांची मांडणी

४. स्वराज्य म्हणजे काय ? याचे सविस्तर विश्लेषण त्यांनी खालीलप्रमाणे केले आहे.

### १. भारतीय राजकीय चळवळीतील स्वराज्याबद्दलचे विचार

हिंदस्वराज्याच्या पहिल्या भागात महात्मा गांधींनी भारतात निर्माण झालेल्या राजकीय चळवळीची चर्चा केली. त्यांच्या मते, भारतीय चळवळी स्वराज्याची मागणी करत आहेत. त्यातील पहिली चळवळ मवाळांची होती. गांधींच्या मते, दादाभाई नौरोजी व इतर मवाळांनी स्वराज्याचे स्वप्न दाखवले. ही त्यांची मोठी कामगिरी आहे. त्याच्यानंतर जहालमतवाद्यांची स्वराज्याचा पुरस्कार केला. त्याचबरोबर हिंसक क्रांतीचा मार्ग जपणारे सशस्त्र क्रांतिकारक येतात. महात्मा गांधींच्या मते, या सर्वांनी स्वराज्याची कल्पना मुळापासून लक्षात घेतली नसून त्यांची स्वराज्याची कल्पना प्रतिकात्मक आहे. भारतातील कापड उद्योग, शेती इत्यादींचे नुकसान केले. हे राजवट इंग्रजांनी स्थापन केली म्हणण्यापेक्षा आम्ही त्यास मदत केली. आम्ही त्यांना मदत केल्यामुळे इंग्रजांपेक्षा आम्ही जास्त अपराधी आहोत. त्यामुळे आमचेच नुकसान झाले. गांधींच्या मते, जहाल व सशस्त्र क्रांतिकारकांना देशात राजकीय बदल घडवून आणावयाचा आहे. हा बदल मूलगामी बदल आहे. त्यांना स्वतः सत्तेवर बसायचे आहे. इंग्रजांच्या संस्था काळ्यांच्या हाती आल्यानंतर ते कल्याणकारी कार्य करतील काय ? फरक फक्त एवढाच की गोऱ्यांच्याऐवजी काळे राज्यकर्ते येतील. शोषणांसाठी निर्माण केलेल्या संस्था काळ्या अधिकाऱ्यांच्या पुढाकाराखाली शोषण करतील. कारण त्यांचे स्वरूप शोषणात्मक आहे. गांधींच्या मते, या संस्था इंग्रजांप्रमाणे नको आहेत. कारण त्यामुळे मूलगामी बदल होणार नाहीत. सशस्त्र क्रांतिकारक व जहालांना फक्त इंग्रज नको आहेत. महात्मा गांधी येथे मॅझिनीना अभिप्रेत स्वातंत्र्य लोकशाही न स्थापण्याचे उदाहरण देतात. इटलीत लोकशाहीच्या जागी इटलीचे संस्थानिक व अधिकाऱ्यांचे राज्य आले व मॅझिनी निराशेने मरण पावला. संस्थानाची राजवट स्वराज्याची होऊ शकत नाही. महात्मा गांधींच्या मते, भारत स्वतंत्र होऊन संस्थानिकांच्या हातात गेला तर मी इंग्रजांप्रमाणे देशी संस्थानिकांविरुद्ध लढेन. महात्मा गांधींच्या स्वराज्याचा अर्थ हा खोल आहे. आपल्या लोकांचे राज्य म्हणजे स्वराज्य नव्हे हे त्यांना अपेक्षित होते.

**२. महात्मा गांधींची आधुनिक संस्कृतीची चिकित्सा :** भारतावरचे इंग्रजांचे राज्य हे केवळ इंग्लंड नावाच्या देशातील लोकांचे राज्य नाही तर ते आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीने स्थापलेले राज्य आहे. आधुनिक पाश्चिमात्य संस्कृती ही सर्व संहारक व सर्वभक्षक संस्कृती असून या संस्कृतीने सर्व शोषणात सुरुवात केली आहे. आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीच्या संस्थांवर गांधीजींनी चिकित्सा केली ते पुढील–प्रमाणे :

**(अ) इंग्लंडची लोकशाही आधुनिक संस्कृतीची देणगी :** इंग्लंडची लोकशाही जगातील लोकशाहीची माता मानली जाते. परंतु ती माता नसून वेश्या आहे. गांधींच्या मते, आधुनिक लोकशाहीत विकास होत नाही. पाश्चिमात्य लोकशाहीत बहुमत मिळवणाऱ्यांना सत्ता मिळते. बहुमत मिळविण्याचे मार्ग सुप्त–असुप्त आहेत. त्यासाठी संसद सदस्य भांडवलादारांचे हितरक्षण करतात. ते गटबाजी करतात. निवडून आल्यावर पुन्हा निवडून येण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यामुळे लोकहिताची चर्चा होत नाही. संसदेत सर्व चर्चा शुद्ध पाल्हाळ असते. सत्तेच्या राजकारणाशिवाय त्यांना काही सूचत नाही. ज्या देशात लोकशाही स्थापन होईल त्या देशात हे दोष निर्माण होतात. केवळ इंग्लंडमध्येच असे होईल असे नाही. म्हणून गांधींनी संसदीय राजवटीवर टीका करून ही आधुनिक संस्कृतीची देणगी आहे. जी लोकांच्या प्रतिनिधींना लोकांपासून दूर करते असे म्हटले.

**(ब) आधुनिक संस्कृतीतील औद्योगिक विकास व त्यातील हाव :** महात्मा गांधींनी आधुनिक संस्कृतीतील औद्योगिक विकास व त्यातील हावरटपणावर टीका केली. यात जे मिळते त्यावर समाधानी न राहता जास्तीत जास्त सत्ता, मालमत्ता मिळवण्याकडे कल असतो. भौतिक साधनाद्वारे सुख मिळविण्याचा प्रयत्न असतो. त्यामुळे गांधींच्या मते, आधुनिक सभ्यता ही माणसाला समाधान न देता स्पर्धात्मक बनविते आणि पूर्णपणे उपभोगी बनविते.

**(क) आधुनिक संस्कृती म्हणून डॉक्टर, वकील व रेल्वे :** रेल्वे ही इंग्रजांनी स्वतःच्या स्वार्थासाठी सुरू केली. गांधींनी वकील, डॉक्टर यावर टीका केली. वकील ही संस्था भारतात नव्हती. ही संस्था केवळ लोकांत भांडणे करण्यासाठी सुरू केली. वकील जाणुनबुजून खोटं बोलायला लावतात. आपण गुन्हा केलेल्यांची तरफदारी अंतःकरणाविरुद्ध केवळ पैशासाठी करत आहोत यांची थोडीही खंत बाळगत नाहीत. त्यामुळे हे अत्यंत निंदनीय आहे. डॉक्टर हे सुद्धा लोकांना निरोगी करण्यापासून त्यांना अतिरेकी औषधे देऊन त्यांची तब्येत बिघडवतात. आधुनिक संस्कृती हिंसेवर आधारीत आहेत. गरज नसताना शस्त्रक्रिया करून महागडी औषधे रुग्णांना देतात. माणसाच्या शरीरातील बिघाड बहुतेक वेळा निसर्गतः दूर होतात. परंतु डॉक्टर औषध देऊन त्यांच्या प्रकृतीला धोका आणतात. हे सर्व पैशांसाठी होते. प्राचीन भारतात हे व्यवसाय होते. परंतु प्रतिष्ठा नव्हती. हे लोक श्रम न करता शोषण करत आहेत. त्यामुळे डॉक्टरांनी सुद्धा आधुनिक संस्कृतीचे सर्वभक्षक दूत म्हणून कार्य केलेले आहे. ही टीका अतिरेकी आहे. परंतु आधुनिक संस्कृतीतील दोष दाखवण्यासाठी ही टीका महात्मा गांधींनी केली.

**३. महात्मा गांधींनी पर्यायी संस्कृती आणि समाज यांची केलेली मांडणी** : आधुनिक संस्कृतीपेक्षा भारतीय संस्कृती ही पर्यायी संस्कृती आहे. आधुनिक भौतिक संस्कृतीस पर्याय देण्याची ताकद भारतीय संस्कृतीत आहे. ही संस्कृती सामंजस्य या तत्त्वावर आधारलेली असून ती पराभूत होत नाही. भारताच्या फेरउभारणीसाठी आधुनिक संस्कृतीचा त्याग करून मूळ संस्कृतीकडे परत जावे लागेल असे गांधींचे मत आहे.

**४. स्वराज्य**

महात्मा गांधीजी स्वराज्य आणि रामराज्य याविषयी पुढील विचार मांडतात.

**१. लोकशाही स्थापन करणे** : गांधींच्या राज्यसंस्थेच्या कल्पनेत राज्यसंस्थेची संस्थात्मक ताकद कमी करून राज्यसंस्थेच्या सर्व व्यवहारावर, निर्णयात जनतेचा खोल सहभाग असावा. जनतेच्या खोल सहभागाशिवाय ही निर्णयप्रक्रिया खऱ्या अर्थाने लोकशाही होणार नाही. गांधीजींच्या मते, सर्व राजकीय संस्थांची लोकशाही दृष्टिकोनातून पुनर्रचना व्हावी, नवे स्वराज्य हे स्वतःचे असावे.

**२. सत्ता विभाजनांच्या सिद्धांताला विरोध** : गांधींच्या मते, आधुनिक पाश्चिमात्य राज्यशास्त्राने ज्याप्रमाणे संसदीय राज्यव्यवस्था दिली व स्वराज्य हे लोकांना वेगळे वाटले. त्यामुळे ही अलगता पक्की करण्यासाठी त्यांनी सत्ता विभाजनाचा सिद्धांत मांडला. सत्ता विभाजनाच्या सिद्धांताला मार्क्सप्रमाणे गांधीजींचा विरोध होता. गांधीजींच्या मते, हे कृत्रीत असून भांडवलशाहीसाठी तयार केलेली ही व्यवस्था असावी. अशा परिस्थितीत कार्यकारी व कायदेमंडळ स्वतंत्र नाहीत. कार्यकारी मंडळ ठरविण्याचे अधिकार कायदेमंडळाला आहेत. तेथे भ्रष्टाचार, वाटाघाटी चालतात. न्यायमंडळ हे खऱ्या अर्थाने वेगळे असत नाही. कारण ते या व्यवस्थेने निर्माण केलेले कायदे तपासून त्याला न्याय्य ठरवणे व त्याद्वारे न्याय देणे. त्यामुळे खर्च गुंतागुंत वाढते व सत्य लुप्त पावते. त्यामुळे त्या प्रक्रिया सोप्या कराव्यात. लोकांची भांडणे या कायद्यामुळे निर्माण झाली आहेत. ती न्यायपंचायतीद्वारा नव्या पद्धतीने सोडविली पाहिजे. गांधीजींच्या मते, हा अधिकार विकेंद्रित करावा.

**३. ग्रामस्वराज्याची कल्पना** : गांधींनी ग्रामस्वराज्याची कल्पना मांडली. प्रत्येक गावात स्वराज्य असेल, तिथे आर्थिक स्वावलंबन असेल. गावातील लोकांनी कुटिरोद्योग, लघुद्योग यातून उत्पादन करावे. गावे स्वयंपूर्ण असावीत हा ग्रामस्वराज्याचा अर्थ आहे.

**४. एकमताने निर्णय** : पंचायत व्यवस्थेत लोकांना राजकीय व्यवहारात भाग घेण्याचा अधिकार असावा. निर्णय घेऊन अंमलबजावणीसाठी अधिकार असावा. एकमताने निर्णय घ्यावा. बहुमतामुळे दोन गट निर्माण होऊ नयेत. त्यामुळे अल्पमतावर दबाव येतो. म्हणून निर्णय एकमताने व सहमतीने घ्यावेत. सहमती निर्मितीसाठी अतिरेकी निर्णय नसावेत. बहुमत म्हणजे लोकशाही नव्हे. खरी लोकशाही एकमताने निर्णय घेण्यात आहे. हा निर्णय घेताना सर्वांना बरोबर घ्यावे लागते तरच तो निर्णय मान्य होतो. अन्यथा मान्य होणार नाही. दरवर्षी प्रमुखपदी वेगळी व्यक्ती असावी.

**५. सत्तेचे विकेंद्रीकरण** : गांधींच्या मते, सत्तेचे जास्तीत जास्त विकेंद्रीकरण व्हावे. बळाचा उद्देश सत्तेचे केंद्रीकरण असते. सत्तेचे केंद्रीकरण समाजात घातक ठरते. म्हणून ते विकेंद्रित करावे. खरी राज्यसंस्था ही असंख्य, स्वायत्त, स्वावलंबी, स्वतंत्र गणराज्याचा संघ असावा. गांधींच्या मते, पिरॅमिडप्रमाणे ग्रामराज्य असल्यास वरील राज्य खालच्या ग्रामराज्याला दाबून टाकेल. परंतु समुद्राच्या लाटेसारखी गणराज्य एकमेकाबरोबर सहवास करतील. हे एकमेकांना साहाय्य करतील. महात्मा गांधीवरून येणाऱ्या दबावाविरुद्ध होते. पदसोपान पद्धतीला गांधींचा विरोध होता.

अंतिमतः गांधींच्या मते, राज्यसंस्था व राज्यकर्ते हे कितीही चांगले असले तरी ते दंडशक्तीचे, शोषणाचे प्रतिनिधी आहेत. आदर्श राजाही स्थूलकर्मा आहे. कारण तो बळाच्या द्वारे माणसात सुधारणा घडवून आणतो. प्रत्येक मनुष्य सुष्ट व दुष्ट प्रवृत्तीचा नसतो. बळाद्वारे जेव्हा राजा या व्यक्तींचा संहार करतो तेव्हा तो दुष्टाबरोबर सृष्टत्वाचा नाश करतो म्हणून तो आदर्श होत नाही.

**विश्वस्त संकल्पना**

महात्मा गांधी विश्वस्ताची संकल्पना मांडताना खालील मुद्यांच्या आधारे मांडतात.

**१. श्रमाचा सिद्धांत**

महात्मा गांधींच्या मते, मानवी श्रम ही महत्त्वाची गोष्ट आहे. माणसाच्या विकासात श्रम महत्त्वाची भूमिका बजावते. श्रमाचे दोन प्रकार असतात. शारीरिक श्रम व बौद्धिक श्रम. बौद्धिक श्रम हे जास्त महत्त्वाचे व शारीरिक श्रम हे कमी महत्त्वाचे मानले जाते. शारीरिक श्रमाला जास्त महत्त्व दिले जात नाही. महात्मा गांधींच्या मते, हे दोन्ही श्रम महत्त्वाचे आहे व समान आहेत. त्यांच्यात भेद करणे चुकीचे असून त्यामुळे समाजात विषमता निर्माण होते व शारीरिक श्रमाला व ते करणाऱ्यांना तुच्छ समजले जाते. श्रम हे मनुष्य स्वतःच्या व कुटुंबाच्या पालनपोषणासाठी करतो. हे श्रम संपूर्ण समाजाच्या उन्नतीसाठी करावे. समाजात प्रत्येकाने श्रम करावे जो श्रम न करता उपभोग करेल तो मनुष्य चुकीचा संदेश जगाला देईल. त्यामुळे श्रमावर आधारलेली व्यवस्था गांधींना मान्य होती.

**२. स्वावलंबनाचा सिद्धांत**

स्वावलंबी विकासाचे गांधी पुरस्कर्ते होते. गांधींच्या मते, मनुष्य हा एकटा स्वावलंबी नाही. कारण मनुष्य समाजात राहून जीवन साधना करतो. परस्पर सहकाऱ्यांवर आधारलेला समाज गांधींना अभिप्रेत होता. माणसाला स्वतःचे स्वातंत्र्य, परिसर, परिसरातील लोकांचे स्वातंत्र्य जपायचे असल्यास गांधीजींच्या मतानुसार, स्वावलंबी विकासव्यवस्था आपण निर्माण केली पाहिजे. लहान-सहान गोष्टींसाठी आपण परावलंबी होऊ नये. जुन्या भारतीय व्यवस्थेत माणूस स्वावलंबी होता. कामासाठी लागणारी औजारे-साधने याच परिसरात निर्माण होत होते. परंतु सध्या मनुष्य परावलंबी बनत आहे. स्वावलंबी जीवन महत्त्वाचे आहे.

**३. यंत्रांविषयी गांधींची मते** : महात्मा गांधींच्या मते यंत्रामुळे मानव गुलाम बनतो. चरखा हे

स्वावलंबनाचे प्रतीक आहे असे त्यांचे मत होते. १९२०-३० च्या दशकात इंग्रजांच्या भांडवलशाहीला त्यांनी 'चरख्याने' उत्तर दिले. गांधी भांडवलशाही, विज्ञान, तंत्रज्ञान यांच्या विरोधी होते. गांधी हे यंत्रविरोधी नव्हते. त्यांच्या मते, मानवी शरीर हे एक यंत्रच आहे व ते चांगले राहण्यासाठी आपण कार्यशील राहतो लक्ष देतो, चरखा हेही यंत्र आहे. त्यामुळे यंत्राला विरोध नाही. मुख्य विरोध यंत्राच्या साह्याने माणसाला गुलाम बनविण्याच्या प्रयत्नास आहे. यंत्राच्या साहाय्याने प्रचंड उत्पादन करून शारीरिक कष्ट करणाऱ्या लोकांना त्यांच्या उदरनिर्वाहाच्या साधनापासून बेदखल करतात. अति उत्पादनामुळे लाखो लोक बेकार झाले. ज्या यंत्रामुळे बेरोजगारी निर्माण होते त्या यंत्रास गांधी विरोध करतात. मोठी यंत्रे उत्पादन जास्त करून ते उत्पादन लोकांवर लादतात. त्यासाठी त्याच्या जाहिराती लोकांत केल्या जातात व गरज नसताना वस्तू खरेदीस प्रोत्साहन देतात व उपभोगवादी वस्तू बाजारात निर्माण केल्या जातात. भांडवलदारांना नफा वाढावा म्हणून प्रचार संस्कृती यंत्रामुळे निर्माण झाली. यातून उपलब्ध साधन सामुग्रीचा गैरउपयोग होतो. लोक जास्त पैसा खर्च करतात. गांधींचा या यंत्राचा उपयोग करत असणाऱ्या यंत्रणेला विरोध होता.

गांधी यंत्राविरोधी नव्हते परंतु यंत्राचा वापर करताना त्यावर मालकी नियंत्रण कोणाचे हा प्रश्न होता. छोट्या यंत्रात यंत्र माणसाच्या हातातील साधन आहे. परंतु मोठ्या यंत्रात मनुष्य हा यंत्राच्या हातातील साधन आहे. उत्पादन व्यवस्थेत मनुष्याची उत्पादनापासून फारकत होते. यंत्राचा हा उपयोग होतो. त्यास गांधींचा विरोध होता.

गांधी हे विज्ञान तंत्रज्ञान विरोधी नव्हते. आपल्या पूर्ण आयुष्यात त्यांनी प्रयोग केले. प्रयोगशिलता हा त्यांचा गुण होता. तो गुण त्यांनी विज्ञानातून घेतला. विज्ञानाचा मुख्य आशय गांधींना मान्य होता. प्रगती-शीलतेला गांधींचा पाठिंबा होता. विज्ञान व तंत्रज्ञान मानवी जीवनात महत्त्वाची भूमिका बजावतात. ही भूमिका कोणत्या प्रकारात असावी याबाबत त्यांनी विवेचन केले. ही व्यवस्था यंत्रकेंद्रित नसून मनुष्यकेंद्रित असावी. ज्यामुळे मनुष्याचे कष्ट वाचतील. विज्ञानाचा साधन म्हणून जो समाजात वापर होतो, त्यास त्यांचा विरोध होता. म्हणून गांधीजींचा आर्थिक विचार पर्यायी विचार होता. या पर्यायी आर्थिक विचारात चार तत्त्वे आहेत ती पुढीलप्रमाणे -

**१. महात्मा गांधींचा आर्थिक विचार** : हा मनुष्यकेंद्रित आर्थिक विचार होता. मनुष्याच्या विकासात नवी पर्यायी व्यवस्था किती भर घालते हे पाहणे. त्यामुळे जी उत्पादन साधने असतील त्यावर मनुष्याचे पूर्ण नियंत्रण असावे. मनुष्य यंत्राचा गुलाम होऊ नये.

**२. स्वावलंबी विकास** : आर्थिक विकास करताना हा स्वावलंबी विकास व्हावा व मनुष्य स्वावलंबी रहावा हे पाहणे, अशा प्रकारची साधने निर्माण करणे. उदा. कुटीरोद्योग, हस्तोद्योग इत्यादी निर्माण करावीत ज्यामुळे मानवी उपजीविका होईल व एकात्म जीवन मनुष्य जगू शकेल. समाजापासून तुटलेला मनुष्य त्यांना आदर्श वाटत नाही. माणसाला श्रम मिळावे, मूलभूत जगण्याची साधने प्राप्त व्हावीत.

**३. शाश्वत विकास** : निसर्गाला ओरबाडून निसर्गातील साधनसामुग्री व नैसर्गिक साधने ही कधीतरी नष्ट होतील. स्वार्थीपणे ही साधने मनुष्याने घेऊ नयेत. नव्या उत्पादन व्यवस्थेमुळे मानव पर्यावरणाचा नाश करीत आहे. झाडे, जंगले, जमीन इत्यादी संपत्ती नष्ट होत आहे. गांधींच्या मते, पर्यावरणाचा नाश न करता सुखदायी जीवन जगता आले पाहिजे. विकास हा चिरंजीवी असावा. हे निसर्गाचे स्रोत वापरून त्यात वृद्धी करावी. नैसर्गिक साधनाचे शोषण व दोहन न करता त्याच्या सान्निध्यात शाश्वत विकास साधने हे त्यांचे महत्त्वाचे लक्ष्य होते.

**४. क्षमतेचा विकास** : आजच्या भांडवलशाहीचा भर अधिक उत्पादनाचा आहे व हे उत्पादन लोकांच्या गळ्यात घालणे व यामुळे आनंद मिळेल म्हणून सांगितले जाते. माणसाची इच्छा आनंद मिळवणे ही असते. त्यासाठी इंद्रियाचे समाधान करावे लागते. परंतु मनुष्याचे समाधान कधीही होत नाही. गांधींच्या मते, आनंदाची व्याख्या उपभोगावर आधारित असू नये. इंद्रिय शमन म्हणजे आनंद नव्हे तर प्रत्येकाला मूलभूत गरजा भागवता याव्यात, गरजा पूर्ण व्हाव्यात. समता म्हणजे सगळ्यांच्या क्षमतांचा विकास करणे. गांधीची समता ही क्षमतेमध्ये होती. क्षमतेत गांधींचा भर क्षमता विकासावर होता. प्रत्येकाला विकास करण्यास संधी मिळावी. हे करताना उपभोगवाद माणसाचा प्राधान्यक्रमास बिघडवतो. काही लोकांना जास्त संपत्ती देवून विषमता वाढते, म्हणून निसर्गातून आवश्यक तेवढेच घ्यावे. परंतु हे करताना जास्त असणारी संपत्ती गरिबांना वाटावी.

**५. विश्वस्ताची भूमिका समाजातील विषमता नष्ट करणे** : समाजातील विषमता नष्ट व्हावी. ही विषमता संपत्तीच्या अन्याय्य वाटपापासून निर्माण झालेली आहे. काम न करता गोळा झालेली संपत्ती असून ती कष्टाची नाही. महात्मा गांधीजींच्या मते, समाजात हिंसेच्या मार्गाने बदल करण्योवजी उद्या होणाऱ्या संकटाची नोंद घेऊन समाजातील भांडवलदार वर्गांनी आपल्या जवळील संपत्तीचा विनियोग समाजाचे विश्वस्त म्हणून करावे. ज्याप्रमाणे नोंदणीकृत संस्थेच्या व्यवस्थापनाखाली विश्वस्त असतात, ते त्या संस्थेचे संपत्तीचे व्यवस्थापन करतात, पैशाचा वापर स्वार्थासाठ न करता, कार्य तडीस नेण्यासाठी करतात. गांधीच्या मते, ही गोष्ट आर्थिक व सामाजिक व्यवहारात स्थापन करावी. श्रीमंतांनी अशी व्यवस्था करावी की, या संपत्तीचा विनियोग समाजाच्या कल्याणासाठी होणार आहे. गांधींच्या मते, भांडवलदारांनी विश्वस्त म्हणून काम केले नाही तर पुढे वर्गवादाला तोंड द्यावे लागेल. त्यानुसार जमिनदारांनी जमिनी कुळांना द्याव्या असे गांधींचे मत होते. गांधींची विश्वस्त कल्पना तत्कालीन भांडवलदारांना व जमिनदारांना विशेष रुचले नाही.

### १.२.४ महात्मा गांधींची धर्म संकल्पना

महात्मा गांधींची धर्माबाबतची संकल्पना ही पूर्णपणे वेगळी होती. त्यांनी आपले धर्म विषयक विचार सर्व धर्माच्या तत्त्वांचा समावेश करून मांडले आहे. महात्मा गांधींच्या धर्मविषयक विचारांवर त्यांचे राजकीय गुरू नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या विचाराचा प्रभाव हेता. गोखले एके ठिकाणी असे म्हणाले होते

की, 'जर हिंदुत्ववादी विचारांमुळे मुस्लिम लोकांवर अन्याय होत असेल तर मी हिंदू नाही.' याचा प्रभाव गांधीजींवर पडला होता. महात्मा गांधीजींची धर्म संकल्पना पुढील मुद्याच्या आधारावर आपण समजून घेऊ.

**१. विश्वधर्म आणि मानवताधर्म** : गांधींनी धर्म हा शब्द संप्रदाय या अर्थाने वापरलेला नाही. गांधींनी विश्वधर्म किंवा मानवधर्म अशी संकल्पना मांडली. त्यांना सर्व धर्मांबाबत आदर होता. गांधीजींच्या मते, सर्व माणसे ही परमेश्वराचीच लेकरे आहेत. म्हणूनच मनुष्यसेवा हीच ईश्वरसेवा आहे आणि तोच खरा धर्म आहे. महात्मा गांधी हे श्रद्धावान होते. त्यांच्यावर अगदी लहानपणापासून धार्मिक संस्कार झाले होते हे आपण त्याच्यावर पडलेल्या प्रभावावरून पाहिले होते. परंतु महात्मा गांधीची धर्माबाबतची कल्पना जरी हिंदू धर्माशी निगडित असली तरी त्यांची धर्माची कल्पना हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध या धर्माच्या पलीकडची आहे. सर्व धर्मांचा अभ्यास केल्यानंतर सर्व धर्मांमध्ये काही समान तत्त्वे असतात हा विचार गांधीनी मांडला. प्रत्येक धर्म हा प्रेम आणि अहिंसा यांचा पुरस्कार करतो. त्यामुळे एका अर्थाने सर्व धर्म सारखेच असतात असे त्यांनी म्हटले आहे.

**२. सत्याचा आदर करणारी धार्मिकता** : महात्मा गांधी प्रणीत धर्मचिंतन व धार्मिकतेचा आज खऱ्या अर्थाने आग्रह धरावा लागेल. गांधींची धार्मिकता सर्व धर्माची नव्हे तर सर्व धर्मातील सत्याचा आदर करणारी होती. त्यांच्या प्रार्थना, अस्मितेचे पोषण करीत नव्हत्या तर त्या माणसाला त्यांच्या मर्यादांची व क्षमतांची जाणीव करून देणाऱ्या होत्या. आश्रमात प्रार्थना होत असत पण गांधींनी आश्रमात मंदिर बांधू दिले नाही. सत्य व अहिंसेच्या प्रकाशात धर्मतत्त्वांची त्यांनी चिकित्सा केली. सद्‌सद्‌विवेकबुद्धी आणि धर्मग्रंथात विरोध उत्पन्न झाल्यास सद्‌सद्‌विवेकबुद्धीचा आवाज प्रमाण मानण्यास गांधी सांगतात. विज्ञान, विवेक आणि मानवतावादी मूल्ये नाकारणाऱ्या धर्मरूढींना त्यांनी सतत नाकारले. आजच्या धार्मिकतेला महात्मा गांधींच्या धर्मविवेकातून येणाऱ्या भावात्मक धर्मनिरपेक्षतेची जोड त्यास द्यावी लागेल. धर्मसत्तेच्या विरोधात केलेला हा गांधींचा हस्तक्षेप नव्या धर्मनिरपेक्षतेची वाट सांगणारा आहे.

**३. हिंदू-मुस्लिम ऐक्य** : महात्मा गांधींनी धर्माबाबत आपले विचार मांडताना हिंदू-मुस्लिम ऐक्यावर भर दिला आहे. गांधींनी स्वातंत्र्यप्राप्ती इतकेच महत्त्व हिंदू-मुस्लिम ऐक्याला दिले. एकवेळ स्वातंत्र्य उशिरा मिळाले तरी चालेल परंतु हिंदू-मुस्लीम ऐक्य आधी झाले पाहिजे. दोन्ही धर्माच्या लोकांनी आपल्या धर्मातील गोष्टी चांगल्या प्रकारे समजून घेऊन त्यांचे आचरण केले पाहिजे. हिंदू व मुसलमान यांनी परस्परविश्वास ठेवला तर सर्व सुरळीत पार पडेल अशी गांधींची खात्री होती. हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी दोन्ही धर्मातील विचारी, बुद्धिमान माणसांनी एकत्र येऊन संघर्षाऐवजी सहिष्णुता निर्माण केली पाहिजे अशी गांधीजींची अपेक्षा होती. गांधीजी स्वतः धार्मिक प्रवृत्तीचे असल्यामुळे हिंदू-मुस्लीम तणावाचा विचार धर्मनिरपेक्षतेच्या दृष्टीकोणातून करण्याऐवजी त्यांनी तो धर्माच्या चौकटीत राहूनच केला. सर्व धर्मात समान मूल्ये असतात. त्यांच्या आधारावर सर्व धर्मांत ऐक्य साधले जावे. तणाव दूर केला जावा असे गांधींनी म्हटले होते.

**४. धार्मिक एकात्मता** : हिंदू राष्ट्रवाद ही महात्मा गांधींना न रुचणारी गोष्ट होती. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात निरनिराळ्या धर्माचे लोक राहत म्हणून ते एक राष्ट्र होऊ शकत नाही असा युक्तिवाद केला जात होता. तो युक्तिवाद महात्मा गांधींनी खोडून काढला. गांधीजींच्या मते, भारत हा देश सर्व धर्माच्या लोकांसाठी आहे. कारण येथे सर्व धर्माचे लोक एकत्र राहतात. अनेक धर्म असून देखील ते एकमेकांच्या धर्मामध्ये हस्तक्षेप न करता एकात्मतेने राहतात. गांधींच्या मते, भारत जर हिंदूंचे राष्ट्र आहे असे जर कोणी म्हणत असतील तर ते चुकीचे आहे. भारतात अनेक वर्षांपासून हिंदूंच्या बरोबर मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, पारशी व शीख अशा अनेक धर्मीय लोकांनी भारत हा देश आपला मानला आहे. सर्व धर्मातील लोक एकमेकांना बांधव मानत आहेत. स्वतःच्या आणि देशाच्या हितासाठी आणि विकासासाठी ते सतत एकत्रित राहतील. गांधींच्या मते, भारत स्वतंत्र झाल्यावर ते हिंदू राज्य असणार नाही. कोणत्याही एका धर्माचे राज्य न राहता ते सर्व धर्मियांचे राज्य असेल. धर्म किंवा संप्रदाय ही खाजगी बाब आहे. धर्माला सार्वजनिक जीवनात अजिबात स्थान असणार नाही. अशा रीतीने राजकारण हे संप्रदायापासून अलिप्त असावे अशी कल्पना गांधीनी मांडली होती.

**५. सर्व धर्मांची मूलतत्त्वे समान** : महात्मा गांधींच्या मते, सर्व धर्मांची मूलतत्त्वे समान आहेत. अहिंसा हे सर्व धर्मांत सापडणारे हे सूत्र आहे. त्यामुळे सर्व धर्माच्या लोकांनी एकत्र येऊन त्यांच्या त्यांच्या धर्मानुसार समान साध्याकडे जाणारे योग्य मार्ग निवडावेत व स्वातंत्र्य साध्य करावे. परंतु कोणत्याही परिस्थितीत परस्परांमधील मतभेद, भांडणे मिटवावीत, किमान इंग्रजांची मध्यस्थी स्वीकारू नये असे गांधीजी म्हणतात.

**६. धर्म आणि राजकारण** : धर्म आणि राजकारण यांची फारकत महात्मा गांधीजींना मान्य नव्हती. धर्म हा राजकारणाचा आधार असला पाहिजे असा गांधींचा आग्रह होता. महात्मा गांधींना मूल्याधिष्ठित नैतिक राजकारण असावे असे वाटत असेल तरी धर्म आणि राजकारण हे एकमेकांपासून वेगळे करता येणार नाही असे त्यांचे मत होते. राजकारण व धर्म हे वेगवेगळे असावे असे मानणाऱ्या लोकांना धर्माचे ज्ञान नाही असे गांधीजी म्हणत असत. कारण वाईट प्रवृत्तींवर विजय मिळविणे हे धर्मात शिकविले जाते व त्यांची राजकारणात उपेक्षा असते. राजकारणावर वाईट गोष्टींवर विजय मिळवूनच राज्यकारभार शक्य होतो. राजकारणाला धर्माचे अधिष्ठान हवे असे जेव्हा गांधीजी म्हणतात तेव्हा त्यांच्या मनात हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, शिख असे धर्म नसतात. त्यांच्या मते, धर्म म्हणजे मानवता धर्म होय. सर्व धर्माबद्दल आदर असून कोणत्याही एका धर्माप्रमाणे राजकारण चालवावे असे ते मानीत नाहीत. महात्मा गांधींचे विचार हे त्यांच्या नैतिक, धार्मिक, आर्थिक व सामाजिक विचारांमध्ये इतके मिसळून गेले आहेत की, त्यांचे स्वतंत्र अस्तित्वच राहिलेले नाही. गांधींच्या मते, राजकारण हे धर्माला साहाय्यभूत असते तर धर्माशिवाय राजकारण असूच शकत नाही. राजकारणात सत्याची व न्यायाची प्रतिष्ठापना करणे हा खरा आध्यात्मीकरणाचा हेतू असतो. राजकारणाला धर्माचे अधिष्ठान हवे, परंतु त्याचा अर्थ राज्यकारभाराची सूत्रे धर्मगुरूंच्या हातात असावीत असा नव्हे. एकाच धर्माला राजाश्रय देणे किंवा राज्याचा असा विशिष्ट धर्म असणे हे देखील

त्यांना मान्य नाही. राजकीय विचार हे सत्य, प्रेम, अहिंसा या विचारांवर आधारीत ठेवणे म्हणजे राजकारणाचे आध्यात्मीकरण होय असे गांधी मानतात.

थोडक्यात, गांधींनी राष्ट्रीय ऐक्य साधण्यासाठी सर्वधर्म समभाव असणे किंवा धार्मिक सलोखा असणे अत्यंत आवश्यक मानले आहे. धार्मिक सलोखा किंवा सर्वधर्म समभाव या संकल्पना धर्मनिरपेक्षतेशी निगडितच आहेत त्यांच्यात परस्परविरोध नाही.

## १.३ सारांश

महात्मा गांधींनी आपले विचार मांडताना सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह याविषयी मांडणी केली. सत्यविषयक विचारात सापेक्ष सत्य आणि निरपेक्ष सत्य असे मांडले आहेत. अहिंसात्मक विचार मांडताना शूर पुरुषांची अहिंसा, दुर्बलांची अहिंसा आणि भित्र्या लोकांची अहिंसा असे तीन प्रकार सांगितले आहेत. सत्याग्रह म्हणजे काय सांगितले त्यानंतर सत्याग्रहाची पात्रता सांगितली आहे. त्यानंतर सत्याग्रहाच्या मार्गामध्ये असहकार, सविनय कायदेभंग, हरताळ, देशत्याग, उपोषण, बहिष्कार, धरणे व निरोधन या मार्गांचा अवलंब करण्यास सांगितले. महात्मा गांधींनी राज्यविषयक विचार मांडले आहेत. त्यामध्ये स्वराज्याबद्दलचे विचार आणि विश्वस्ताची संकल्पना, धर्मविषयक विचार या विषयीचे विचार मांडले.

विकेंद्रीकरणात्मक अर्थव्यवस्था, स्वयंपूर्ण खेड्यांची योजना, निर्वाह-श्रम सिद्धांत, राष्ट्रीय शिक्षण, स्त्री-पुरुष यांचा समान दर्जा, अस्पृश्यता निवारण, स्वदेशी चळवळ, ग्रामोद्योगाला चालना अशा विविध विषयांसंबंधीचे गांधीजींचे विचार आजही मार्गदर्शक, प्रेरक आणि उपयुक्त वाटतात. भारतीय राज्यघटनेने 'व्यक्ती' हा घटक महत्त्वाचा मानला. परंतु गांधीजींनी 'खेडे' हा घटक महत्त्वाचा मानून ग्रामराज्य प्रस्थापित करावयाचे होते.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

१. **सत्य** : सत्य म्हणजे सर्वोच्च प्रेम, सर्वोच्च दया, सर्वोच्च आत्मबलिदान होय.

२. **अहिंसा** : पृथ्वीवरील मनुष्य, वस्तू व प्राणीमात्रांना शब्दाने, विचाराने वा कृत्याने होणारी दुखापत टाळणे म्हणजे अहिंसा होय.

३. **सत्याग्रह** : सत्याग्रह हा अहिंसात्मक पद्धतीने लढा करण्याचा एक मार्ग आहे.

४. **स्वराज्य** : जनतेचे शोषण थांबावे आणि तिचे सर्वांगीण कल्याण व्हावे यासाठी सर्वसामान्य गरीब जनतेने चालविलेले म्हणजे स्वराज्य होय.

## १.५ सरावासाठी स्वाध्याय

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. महात्मा गांधीनी सत्याचे कोणते प्रकार सांगितले ?

२. महात्मा गांधींनी अहिंसेचे कोणते प्रकार सांगितले ?

३. महात्मा गांधींवर कोणत्या विचारांचा प्रभाव पडला होता ?

४. गांधीजींनी कोणाला राजकीय गुरू मानले होते ?

५. गांधीजींवर कोणकोणत्या विचारवंतांचा प्रभाव होता ?

६. टॉलस्टॉय यांच्या कोणत्या पुस्तकांचा गांधीजींवर प्रभाव पडला ?

७. गांधीजींच्या मते, माणसाचे अंतिम ध्येय कोणते ?

**टीपा लिहा.**

१. सत्य

२. अहिंसा

३. सत्याग्रह

४. स्वराज्य

५. धर्म विषयक विचार

६. विश्वस्त

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. महात्मा गांधींचे सत्य, अहिंसा आणि सत्याग्रहाचे विचार स्पष्ट करां.

२. महात्मा गांधींची स्वराज्याची संकल्पना स्पष्ट करा.

३. महात्मा गांधींची विश्वस्त संकल्पना स्पष्ट करा.

४. महात्मा गांधींची धर्म संकल्पना स्पष्ट करा.

## १.६ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१. Gandhi M. K., 'Non Violence in peace and war', Navjivan Trust, Ahmedabad 1969.

२. Gandhi M. K., 'Selected Works of Mahatma Gandhi' Navjivan Trust, Ahmedabad, 1968.

३. गांधी मो. का., 'हिंद स्वराज्य', नवजीवन प्रकाशन, अहमदाबद, २०११.

४. गांधी मो. का., 'सत्य के प्रयोग अथवा आत्मकथा', नवजीवन प्रकाशन, अहमदबाद, १९५७.

५. गांधी मो. का., 'सत्याग्रहाची जन्मकथा, गांधी विचार दर्शन', खंड ५, 'महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे १९६०.

६. चौसाळकर अशोक (सं.) 'महाराष्ट्रातील गांधीवादाचा विकास आणि अन्वयार्थ', गांधी अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००३.

७. भोळे भा. ल. 'भारतीय राजकीय विचारवंत', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, १९९९.

८. डोळे ना. य., 'प्रमुख भारतीय राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, १९९९.

९. पांढरीपांडे सु. श्री., 'स्वराज्य : दिशा आणि दर्शन', प्रतिमा प्रकाशन, पुणे २००७.

१०. पांढरीपांडे सु. श्री., 'महात्मा गांधींचे हिंदस्वराज्य आणि नवे मन्वंतर', प्रतिमा प्रकाशन, पुणे २०१०.

११. सुमंत यशवंत, 'महात्मा गांधींची विचारसृष्टी : काही अलक्षित पैलू', साधना प्रकाशन, पुणे २०१६.

१२. द्वादशीवार सुरेश, 'गांधीजी आणि त्यांचे टीकाकार', साधना प्रकाशन, पुणे २०१८.

## घटक – २

# जवाहरलाल नेहरू

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ जीवन परिचय

  २.२.२ लोकशाही समाजवाद

  २.२.३ सर्वसमावेशक राष्ट्रवाद आणि धर्मनिरपेक्षतावाद

  २.२.४ पंचशील आणि अलिप्ततेचे धोरण

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्न

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

### २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला –

१. पं. जवाहरलाल नेहरूंचा जीवनपरिचय व ग्रंथसंपदा समजावून घेता येईल.

२. पं. जवाहरलाल नेहरूंचे लोकशाही समाजवाद विषयक विचार समजावून घेता येतील.

३. पं. नेहरूंचे संमिश्र राष्ट्रवाद आणि धर्मनिरपेक्षतावाद याबाबतचे विचार समजावून घेता येतील.

४. पं. नेहरूंची पंचशील तत्त्वे व अलिप्ततेचे धोरण समजावून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक

आधुनिक भारताचा पाया घालणारे भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू हे एक द्रष्टे नेते होते. लोकशाही पद्धतीवर त्यांची नितांत श्रद्धा होती. स्वतंत्र भारताच्या पुरोगामी धोरणांचा पुरस्कर्ता म्हणून पं. नेहरूंना ओळखले जाते. नेहरूंचे सर्वात मोठे योगदान कोणते असेल तर, तर भारताला त्यांनी लोकशाहीचा भक्कम आधारस्तंभ दिला. पं. नेहरूंचे विचार आणि धोरणे काळाच्या पटलावर अजरामर आहेत. प्रचंड अस्थिर परिस्थितीतून भारताला एक स्थिर राजवट देण्यामागे नेहरूंचा सिंहाचा वाटा आहे. पं. नेहरूंनी गोहत्येपासून घटस्फोटापर्यंत, सार्वजनिक आरोग्य ते राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत अशा विविध विषयांवर लेखन केले. त्यांचे विचार व धोरणे आजही काळाच्या कसोटीवर टिकून आहेत. सर्वसामान्य जनतेचे जीवनमान उंचावून आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्टीने भारताला प्रगत करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ जीवन परिचय

पं. जवाहरलाल नेहरू यांचा जन्म १४ नोव्हेंबर, १८८९ रोजी अलाहादबाद येथे एका सधन खानदानी ब्राह्मण कुटुंबात झाला. लहानपणी वडील मोतीलाल नेहरू व आई स्वरूपाराणी यांचा मोठा प्रभाव पं. नेहरूंवर पडला. मोतीलाल नेहरू काँग्रेसचे नेते व प्रसिद्ध वकील होते. पं. नेहरूंचे प्राथमिक शिक्षण घरीच झाले. त्यांचे शिक्षक एफ. टी. ब्रुक्स यांनी तत्त्वज्ञानात त्यांची आवड निर्माण केली. वयाच्या १५व्या वर्षी १९०५ मध्ये शिक्षणासाठी त्यांना इंग्लंडला पाठविण्यात आले. तेथे हॅरो पब्लिक स्कूल मध्ये प्रवेश घेण्यात आला. तेथे त्यांना आंतरराष्ट्रीय राजकारण व घडामोडी याविषयी आवड निर्माण झाली. त्यांनी २९०७ मध्ये ट्रिनिटी कॉलेज, केंब्रीज येथे प्रवेश घेतला. येथे शिक्षण घेताना त्यांच्यात साहित्य, अर्थकारण, राजकारण, इतिहासामध्ये रूची निर्माण झाली. १९१० मध्ये पदवी घेऊन केंब्रीज मधून बाहेर पडले व कायद्याच्या शिक्षणासाठी लंडनला आले. कायद्याचे शिक्षण घेताना ते फेबियन समाजवादाकडे आकर्षित झाले. १९१२ मध्ये बॅरिस्टर होऊन ते भारतात आले व अलाहाबाद उच्च न्यायालयात वकिली सुरू केली. परंतु या व्यवसायात त्यांचे मन रमले नाही. १९१६ मध्ये लखनौ येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात पहिल्यांदा पं. नेहरू व व म. गांधी यांची भेट झाली. या अधिवेशनापासून पं. नेहरूंच्या राजकीय जीवनाला सुरुवात झाली. येथून पुढे पं. नेहरूंनी राष्ट्रीय चळवळीत आपला सक्रीय सहभाग नोंदवला. १९२१ मध्ये असहकार चळवळीत पहिल्यांदा अटक झाली. भारताच्या स्वातंत्र्य-लढ्यात नेहरूंना एकूण ३२६२ दिवसांचा (सुमारे ९ वर्षे) इतका कारावास भोगावा लागला. १९२९, १९३६, १९३७, १९४६ या साली भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पं. नेहरूंच्या १७ वर्षांच्या पंतप्रधानपदाच्या कालखंडात त्यांनी संसदिय लोकशाहीला स्थैर्य प्राप्त करून दिले. त्यांचा लोकशाहीवर अढळ विश्वास असल्यामुळे त्यांनी विरोधी पक्षाच्या सदस्यांनाही नेहमीच आदरयुक्त वागणूक दिली. भारताच्या जडणघडणीचे महत्त्वपूर्ण कार्य

नेहरूंनी केले. तसे जागतिक शांतता निर्माण करण्याच्या दृष्टीने त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत भारतातील सर्वसामान्य जनतेचे जीवनमान उंचावणे व आर्थिक प्रगती करणे यासाठी समाजवादाचा पुरस्कार केला. I am not a man of letters असे म्हणणारे पं. नेहरू एक प्रतिभावंत लेखकही होते. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. सोव्हिएट रशिया–१९२९, आत्मचरित्र (An Autobiography) - १९३०, नैनीच्या तुरुंगात असताना लिहिले. जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन (Glimpses of World History) - १९३९) भारताचा शोध (Discovery of India)–१९४४ अहमदनगरच्या किल्ल्यात कारावासात असताना हा ग्रंथ लिहिला. Letters from a Father to his Daughter – १९३० इ. ग्रंथ लिहिले. याबरोबरच पं. नेहरू पंतप्रधान झाल्यावर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना दर पंधरा दिवसांनी स्वतः पत्र लिहून देशापुढील प्रश्नांची जाण करून देत असत. त्यात देशांतर्गत, आंतरराष्ट्रीय प्रश्नांची चर्चा केली जात असे. राज्यांना सर्व निर्णय प्रक्रियेत समाविष्ट करून घेणे हा त्यामागे उद्देश होता. त्यांचे शिक्षण, बुद्धिमत्ता यापैकी कशाचीही कमतरता या पत्रातून दिसत नाही. अशा या आधुनिक भारताच्या शिल्पकाराचे निधन २७ मे, १९६४ रोजी झाले.

### २.२.२ लोकशाही समाजवाद

पं. जवाहरलाल नेहरू हे भारतीय लोकशाही समाजवादाचे पुरस्कर्ते होते. त्यांनी लोकशाहीत समाजवाद मिसळलेला दितो. समाजाचे सर्वांगीण परिवर्तन घडवून त्याचा विकास करणे हाच उद्देश त्यांची भाषणे, चर्चा, पत्रव्यवहार, ग्रंथ, प्रसिद्ध झालेले साहित्य यातून दिसून येतो. आधुनिकतेची वाटचाल करताना आपली राज्यपद्धती लोकशाहीचीच राहील आणि सत्तेचे सार्वभौमत्व लोकांकडेच राहील असे नेहरूंनी सांगितले. १९०५ ते १९१२ या कालखंडात नेहरू इंग्लंडमध्ये होते. इंग्लंडमधील उदारमतवादी तत्त्वज्ञानाचा मोठा प्रभाव या कालखंडात नेहरूंवर पडला होता. व्यक्तिस्वातंत्र्य हा उदारमतवादाचा व लोकशाहीचा आत्मा आहे. पं. नेहरूंनीही व्यक्तिस्वातंत्र्याचे किती महत्त्व आहे हे वेळोवेळी स्पष्ट केले आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात लोकशाहीचा पुरस्कार करणारे व साम्राज्यशाहीला, हुकूमशाहीला विरोध करणारे राष्ट्र अशी जी भारतीय प्रतिमा तयार झाली ती केवळ पं. नेहरूंमुळे. लोकशाहीच्या तत्त्वज्ञानावर त्यांची प्रचंड निष्ठा होती. भारताबरोबर इतर राष्ट्रातही लोकशाही रुजावी यासाठी नेहरूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवरही प्रयत्न केलेले दिसतात.

भांडवलशाहीवर आधारीत लोकशाही ही खऱ्या अर्थाने लोकशाही नसते असे त्यांचे मत होते. त्यातूनच इतिहासाकडे पाहण्याच्या मार्क्सवादी दृष्टीकोनाकडे त्यांचा बौद्धिक कल झुकला होता. याचं प्रतिबिंब त्या काळातील त्यांच्या लेखांमधून व त्यांनी केलेल्या चर्चेमधून दिसून येते. नेहरूंचा लोकशाही समाजवाद समजून घेण्यापूर्वी त्यांचे लोकशाहीविषयक विचार समजून घेणे आवश्यक आहे.

### पं. नेहरूंचे लोकशाही विषयक विचार

पं. नेहरूंनी संसदिय लोकशाहीचा पुरस्कार केलेला आहे. खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाहीचे जनक

हे नेहरूच आहेत. लोकशाही प्रक्रियेतून भारताचा विकास व्हावा असे त्यांना वाटत होते. आधुनिक भारतात संसदिय लोकशाहीचे बी रुजविण्याचे काम पं. नेहरूंनी केले. आज त्याचा वटवृक्ष झालेला दिसतो. नेहरूंनी स्वातंत्र्योत्तर भारतातील समस्या सोडविण्यासाठी तीन दृष्टीकोन सांगितले. त्यापैकी पहिला युरोपमधील भांडवलशाही (Capitalist) दृष्टीकोन, दुसरा साम्यवादी (Communist) दृष्टीकोन जो चीन, व्हीएतनाम यांनी स्वीकारलेला आणि तिसरा, गांधीजींचा (Gandhian) दृष्टीकोन. परंतु पं. नेहरूंनी यापैकी दृष्टीकोन न स्वीकारता यातील मध्यम मार्ग स्वीकारला. ज्यामध्ये त्यांनी कल्याणकारी राज्याची, धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची पद्धती स्विकारली.

पं. नेहरूंच्या संसदिय लोकशाहीचे मुख्य चार स्तंभ (Pillars) दिसतात ते पुढीलप्रमाणे :

**१. व्यक्तिगत स्वातंत्र्य** (Individual Freedom) : पं. नेहरूंनी त्यांच्या लोकशाही विचारात व्यक्तिस्वातंत्र्याला महत्त्व दिलेले दिसते. व्यक्तीला व्यक्तिगत विकासासाठी, स्वतःच्या क्षमता वाढविण्यासाठी, त्याचबरोबर 'कौशल्य व सहिष्णूता' (Ability & Tolerance) वाढविण्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्य आवश्यक आहे असे त्यांना वाटते. व्यक्तीवर अधिकची बंधने घालणे व्यक्तिविकासाला मारक ठरते. त्यामुळे राज्याने प्रत्येक व्यक्तीला त्याचा विकास घडवून आणण्याची समान संधी उपलब्ध करून दिली पाहिजे असे त्यांना वाटते.

**२. प्रातिनिधीक शासन** (Representative Government) पं. नेहरूंनी त्यांच्या लोकशाही विचारात प्रातिनिधीक शासनाचा पुरस्कार केलेला आहे. या प्रातिनिधीक शासनाचा सार्वभौमत्व हा पाया असेल. लोकांनी कोणत्याही दबावाला, आमिषाला बळी न पडता निवडलेले प्रतिनिधी असतील असे लोकांनी निवडलेले प्रतिनिधी लोकांना उत्तरदायी असतील. म्हणजेच लोकांना जबाबदार राहून कार्य करतील.

**३. आर्थिक व समाजिक समता** (Economic and Social equality) : पं. नेहरूंना त्यांच्या संसदिय लोकशाहीत आर्थिक व सामाजिक समता अभिप्रेत आहे. स्वातंत्र्य व समतेमध्ये योग्य समतोल निर्माण होण्यासाठी आर्थिक व सामाजिक समता आवश्यक आहे असे त्यांना वाटते. त्याचबरोबर समाजवादी समाज निर्माण करण्यासाठीही आवश्यक आहे. आर्थिक व सामाजिक समता निर्माण करण्याच्या उद्देशानेच त्यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून नियोजनाला महत्त्व दिलेले दिसते.

**४. सामाजिक स्वयंशिस्त** (Social Self discipline) : पं. नेहरूंच्या लोकशाहीचा चौथा व महत्त्वाचा स्तंभ म्हणजे सामाजिक स्वयंशिस्त होय. यामध्ये नेहरूंना हे अभिप्रेत आहे की बहुसंख्यांक हे अल्पसंख्यांकांवर अन्याय करणार नाहीत. अल्पसंख्यांकांचेही या लोकशाहीत अधिकार मान्य करून त्यांनाही विकासाची समान संधी दिली जाईल. बहुसंख्यांक बहुमताच्या जोरावर अल्पसंख्यांकांचे अधिकार नाकारून त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची दडपशाही करणार नाहीत.

हे चार स्तंभ किंवा वैशिष्ट्ये नेहरूंच्या संसदिय लोकशाहीची सांगता येतील. त्यांनी त्यांच्या लोकशाही विचारात याबरोबरच आर्थिक न्यायालाही महत्त्व दिले आहे. त्यांच्या मते, आर्थिक न्यायाशिवाय लोकशाही असू शकत नाही आणि लोकशाही शिवाय आर्थिक न्यायाची खात्री देता येत नाही. राजकीय लोकशाही म्हणजे केवळ लोकांनी मतदान करणे होय. मतदान करण्यापेक्षा व्यक्तीच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्यामुळे केवळ राजकीय लोकशाही पुरेशी नाही तर आर्थिक लोकशाहीही तितकीच महत्त्वाची आहे असे नेहरूंना वाटते.

पं. नेहरूंनी संसदिय शासनप्रक्रियेत विरोधी पक्षाचे महत्त्व पूर्णतः मान्य केले आहे. लोकशाही बळकट होण्यासाठी विरोधी पक्ष तितकाच महत्त्वाचा आहे जितका सत्ताधारी पक्ष आहे असे त्यांना वाटते. तत्कालीन संसदेतील विरोधकांसोबतच्या चर्चा, वादविवादातून त्यांनी विरोधी पक्षाचे महत्त्व मान्य केलेले दिसते. पं. नेहरूंची बहुमतातील सरकारे होती. परंतु त्यांनी विरोधी पक्षाला दडपून टाकण्याचा एकदाही प्रयत्न केलेला दिसत नाही. पं. नेहरूंनी १९५७ मध्ये मद्रास येथे केलेल्या भाषणात ते म्हणतात की –

" I believe completely in any government, whatever it might be, having stout critics, having an opposition to face. Without criticism people and governments become complacent. The whole parliamentary system of government is based on such criticism. It would be a bad thing for us if the press was not Free to criticise, if people were not allowed to speak and criticise Government fully and in the open, it would not be a proper democracy. I welcome criticism in Partliament........."

यावरून पं. नेहरूंनी शासनावरील विरोधी पक्षाच्या टीकेला (Criticism) महत्त्व दिलेले दिसते. हिरेन मुखर्जी, एस. पी. मुखर्जी, अशोक मेहता, डॉ. एन. बी. खरे, आचार्य कृपलानी, राममनोहर लोहिया, मिनू मसानी इ. विरोधी पक्षातील नेत्यांसोबत झालेल्या चर्चा, वादविवादातून विरोधी पक्षाला दिलेले महत्त्व लक्षात येते.

अशा प्रकारचे लोकशाही विषयक विचार नेहरूंनी मांडले.

**पं. नेहरूंचा लोकशाही समाजवाद**

पं. नेहरू हे लोकशाही समाजवादाचे पुरस्कर्ते होते. भारतात स्वातंत्र्यानंतर लोकशाही समाजवाद रुजविण्याचे व त्याचा विकास करण्याचे काम त्यांनी केले. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच म्हणजे जवळ जवळ १९३६ पासूनची त्यांची भाषणे, चर्चा पाहिल्यास येथील जनमत लोकशाही समाजवादाच्या बाजूने वळविणयाचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसतो. सध्याच्या आर्थिक विषमतेवर एकमात्र उपाय समाजवाद आहे हे त्यांनी लोकांना पटवून दिले.

लोकशाही समाजवाद म्हणजे काय ? तर राज्यशास्त्र शब्दकोषात लोकशाही समाजवादाची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे. ''प्रातिनिधीक लोकशाही संस्थांच्या द्वारे समाजवादी समाजरचना प्रत्यक्षात आणता येते असा विश्वास बाळगणारी विचारप्रणाली म्हणजे लोकशाही समाजवाद होय. लोकशाही समाजवाद हे समता व व्यक्तिस्वातंत्र्य या दोन तत्त्वांवर आधारलेली समाजव्यवस्था घटनात्मक मार्गाने स्थापन करण्याचे ध्येय समोर ठेवणारे तत्त्वज्ञान आहे. लोकशाही समाजवादाचे पुरस्कर्ते हिंसक क्रांतीच्या मार्गाचा निषेध करतात. ते धार्मिक व सांस्कृतिक स्वातंत्र्याला पाठिंबा देऊन, खुल्या निवडणुकांद्वारे सत्ता काबीज करू इच्छितात. त्याचबरोबर समता व स्वातंत्र्यावर आधारीत समाज निर्माण करण्याचा प्रयत्न लोकशाही समाजवादाचे पुरस्कर्ते करतात. भारतात लोकशाही समाजवादाचे प्रामुख्याने दोन विचारप्रवाह दिसतात. ते पुढीलप्रमाणे -

१. पहिला विचारप्रवाह आहे जो केंद्रीकरणावर विश्वास असणारा व मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारा आहे. हा विचारप्रवाह मोठ्या प्रमाणात औद्योगिकरणाचा पुरस्कार करून असे मानतो की सर्वच उद्योग हळूहळू सार्वजनिक क्षेत्रात येऊन समाजवादी समाजरचना प्रस्थापित होईल. आर्थिक व राजकीय सत्तेच्या केंद्रीकरणावर त्यांचा विश्वास आहे. या विचारप्रवाहाचा पुरस्कार पं. नेहरूंनी केला.

२. दुसरा विचारप्रवाह आहे जो आर्थिक व राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण करून समाजवादी समाज निर्माण करू इच्छिणारा राम मनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण यांचा विचारप्रवाह मोठ्या औद्योगिकरणाने प्रश्न सुटतील असे हा विचारप्रवाह मानीत नाही.

अशा प्रकारचे दोन लोकशाही समाजवादाचे विचारप्रवाह दिसतात. खाजगी व सार्वजनिक क्षेत्र एकत्र असलेली मिश्र अर्थव्यवस्था पं. नेहरूंनी स्वीकारली. आर्थिक प्रगतीचा व लोकशाही समाजवादाचा आकृतिबंध म्हणून मिश्र अर्थव्यवस्था पं. नेहरूंनी स्वीकारली. 'जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन' या पुस्तकात पं. नेहरूंनी मार्क्सवाद व इतिहासाच्या भौतिकवादी मीमांसेची मूलभूत तत्त्वे स्पष्ट केली आहेत. १९३३ मध्येच 'विदर इंडिया?' या नावाने लिहिलेल्या लेखातून भारताबद्दलचा दृष्टीकोन व मतं त्यांनी स्पष्ट केली. जग एका बदलाच्या व क्रांतीच्या प्रक्रियेतून जात आहे व हे सर्व भांडवलशाहीतील समस्यांमुळे घडत आहे. जागतिक संपत्तीचं गैरवाटप आणि मूठभर लोकांच्या हातामध्ये ही संपत्ती एकवटल्यामुळे हे घडत आहे असे त्यांनी स्पष्ट केले. जोपर्यंत सामान्यांच्या हातात पैसा असणार नाही तोपर्यंत सद्यस्थितीत बदल होणार नाही. उत्पादन साधने सामाजिक नियंत्रणाखाली असावीत, औद्योगिक उत्पादन वाढावे, राष्टीय संपत्तीचे वाटप समन्यायी पद्धतीने व्हावे असे सांगून पं. नेहरूंनी समाजवादाचा पुरस्कार केला. समाजवादाशिवाय भारतातील गरिबी, बेरोजगारी आणि जनतेची खालावत जाणारी परिस्थिती बदलता येणार नाही. भारताचे व जगाचे प्रश्न, समस्या सोडविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे समाजवाद होय असे नेहरूंनी संगितले. समाजवाद म्हणजे अशी एक पद्धती की ज्यामध्ये भूमी आणि भूमीची फळे यांचा समाजाच्या हितासाठी अशातऱ्हेने उपयोग व्हावा की, मिळणारा लाभ खाजगी मालमत्तेच्या अपघाताने न ठरता लोकांनी केलेल्या सेवेच्या प्रमाणात ठरावा. देशातील जनतेची पिळवणूक थांबविणे हेच भारतापुढील तातडीचं लक्ष्य

असू शकतं. समाजवाद हे केवळ आर्थिक तत्त्वज्ञान नाही तर जीवनाचं तत्त्वज्ञान आहे असे त्यांनी सांगितले. २१ जानेवारी १९५५ रोजी आवडी येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात समाजवादी समाजरचनेचा ठराव मंजूर करून घेऊन आधुनिक भारताची ध्येयधोरणे कोणती असावीत हे ठरविले.

पं. नेहरूंनी समाजवादाचा पुरस्कार करताना मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. फक्त मोठ्या उद्योगांतूनच लोकांच्या समस्या सोडविल्या जाऊ शकतील असे नाही हे आपण समजले पाहिजे. आपल्याला ग्रामीण उद्योग विकसित केले पाहिजेत. मोठे किंवा लघुउद्योग वाढविताना लोकांना विसरून चालणार नाही. आपण फक्त अधिक पैसा किंवा उत्पादन करणार नाही तर आपण एक मनुष्य घडविण्याचा सुद्धा प्रयत्न करणार आहोत असे मत मांडले. गरिबीच्या दुष्टचक्रातून बाहेर पडायचे असेल तर योजनाबद्ध विकासाशिवाय पर्याय नाही असे सांगून जमिनदारी पद्धती, अस्पृश्यता, जातीयता, जमातवादाला विरोध केला. नियोजन पद्धतीतून त्यांना श्रीमंत आणखी श्रीमंत व गरीब आणखी गरीब हे थांबवायचे होते. समता, सामाजिक न्याय याद्वारे सामाजिक तत्त्वज्ञान विकसित करण्याचा प्रयत्न केला. पंचवार्षिक योजनेद्वारे कृषी उत्पन्न वाढविणे, औद्योगिकरणातून राष्ट्रीय उत्पन्न वाढविणे, लोकांचे जीवनमान उंचावणे, आर्थिक विकास करणे हे ध्येय ठरविले. पं. नेहरूंनी कार्ल मार्क्सची समाजवादाची कल्पना न स्वीकारता शास्त्रीय समाजवादाची संकल्पना स्वीकारली. शास्त्रीय समाजवादावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच त्यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. १९५५ नंतर नेहरूंचा समाजवाद, लोकशाही समाजवादात परावर्तीत झाला. नेहरूंच्या मते, औद्योगिकरण म्हणजे धन व बँकांवर सरकारी नियंत्रण होय. सामान्य जनतेचा फायदा करायचा असेल तर औद्योगिकरण हे वैज्ञानिक पद्धतीने केले पाहिजे. फायदयाची अपेक्षा त्यामध्ये नसली पाहिजे. जो माल तयार होतो तो खरेदी करण्यासाठी लोकांकडे पैसा आहे की नही हे पाहण्याचे काम हुकूमत गाजवणाऱ्यांचे आहे असे त्यांना वाटते. यावर उपाय एकच तो म्हणजे समाजवाद होय. कोणाला आवडो न आवडो यापासून सुटका नाही, तो येणार आहे असे ते म्हणतात. उत्पादन आणि वितरणाच्या साधनांचे राष्ट्रीयीकरण करून त्याद्वारे आमूलाग्र बदल घडवून आणणे हा त्यांच्या मते समाजवादाचा गाभा होय. लोकशाही समाजवादाखाली खाजगी मालकी संपूर्णपणे मोडून पडत नाही. फक्त महत्त्वाचे उद्योगधंदे सार्वजनिक मालकीचे होतात आणि ग्रामोद्योग सहकारी नियंत्रणाखाली येतात. विषमता नष्ट करून सामाजिक न्याय सुलभ करणे हा समाजवादाचा हेतू आहे.

पं. नेहरू म्हणतात की, काही लोकांचे म्हणणे आहे की मी उद्योगांना विसरून शेतीच्या गोष्टी करत असतो. परंतु शेतीचा पाया भक्कम केल्याशिवाय औद्योगिक विकास करू शकत नाही. काँग्रेसच्या बाहेरही भारतीय भांडवलदार वर्गाने नेहरूंच्या समाजवादी तत्त्वावर हल्ला चढवला. उद्योगपतींनी एक निवेदन काढून नेहरूंच्या समाजवाद समर्थनाचा निषेध केला. समाजवादाचा विचार विनाशक व विरोधी स्वरूपाचा असल्याचे म्हटले. या टीकेला प्रत्युत्तर देताना नेहरू म्हणतात की मी नेहमीच सर्वात दबलेल्या व सर्वाधिक गांजलेल्या व्यक्तीच्या बाजूने असेन. हे एवढं कारण मला कम्यूनिझमकडे झुकण्यासाठी पुरेसं आहे. माझ्यात व देशातील इतर समाजवाद्यांमध्ये एक फरक आहे तो हा की माझी पार्श्वभूमी वैज्ञानिक विचारसरणीची आहे

आणि विज्ञानाचा समाजकारणावर किती प्रभाव पडू शकतो याची मला जाण आहे. नेहरू पुढे म्हणतात की, ज्यामध्ये सरकार हे सर्वशक्तिमान बनते व देशातील सर्वच व्यवहारात हस्तक्षेप करते असा टोकाचा समाजवाद मला अभिप्रेत नाही. राजकीयदृष्ट्या सरकार हे बलवान आहेच. पण आर्थिक बाबतीतही असे केले तर सर्वच अधिकार त्यांच्यात केंद्रीत होतील, म्हणून आर्थिक व्यवहाराचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. आता जरी खाजगी क्षेत्राला मुभा देण्यात आली असली तरी क्रमशः व अखेरीस खाजगी क्षेत्र नाहीसे व्हावे अशी अपेक्षा आहे. अशा प्रकारचा लोकशाही समाजवाद पं. नेहरूंनी मांडला.

वरील विवेचनावरून पं. नेहरूंच्या लोकशाही समाजवादाची काही वैशिष्ट्ये सांगता येतील. ती पुढीलप्रमाणे -

**१. समता व व्यक्तिस्वातंत्र्य** : पं. नेहरूंनी आपल्या लोकशाही समाजवादात समता व व्यक्ति-स्वातंत्र्य या दोन तत्त्वांना महत्त्व दिलेले दिसते. जरी समाजवाद आणायचा असला तरी व्यक्तिस्वातंत्र्याला कोणतीही बाधा पोहोचणार नाही असे ते म्हणतात. व्यक्तिगत विकासासाठी व्यक्तिस्वातंत्र्य आवश्यक आहे. व्यक्ति-स्वातंत्र्याइतकीच समताही आवश्यक आहे, असे ते म्हणतात.

**२. घटनात्मक मार्गाचा अवलंब** : लोकशाही समाजवाद निर्माण करताना तो घटनात्मक मार्गाने केला जाईल असे नेहरू म्हणतात. पं. नेहरूंना साम्यवादाचा हिंसक क्रांतीकारी मार्ग मान्य नाही. खुल्या निवडणुकांद्वारे सत्ता मिळवून समाजवादी समाजव्यवस्था निर्माण करण्यावर त्यांचा विश्वास होता. आहे रे वर्गाकडून जबरदस्तीने संपत्ती काढून घेऊन ती नाही रे वर्गाला देणे नेहरूंना मान्य नव्हते, तर ते सनदशीर मार्गाने करण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

**३. मिश्र अर्थव्यवस्था** : पं. नेहरूंच्या लोकशाही समाजवादाचे हे एक प्रमुख वैशिष्ट्य होते. एखाद्या उद्योगधंद्यावर केवळ खाजगी मालकी प्रस्थापित होऊ नये. मोठ्या उद्योगधंद्यांबरोबरच ग्रामीण भागात लहान उद्योग सुरू करण्यावर त्यांनी भर दिला.

**४. संपत्तीचे न्याय्य वितरण** : पं. नेहरूंनी आपले लोकशाही समाजवादाचे विचार मांडताना संपत्तीचे न्याय्य वितरण केले जाईल असे सांगितले. आर्थिक विषमता नष्ट करून आर्थिक समता स्थापन करण्यावर त्यांनी भर दिला.

**५. उत्पादनाच्या साधनांचे राष्ट्रीयीकरण** : पं. नेहरूंनी आपल्या लोकशाही समाजवादात या तत्त्वावर मोठा भर दिलेला दिसतो. उत्पादनाची साधने केवळ भांडवलदार वर्गाकडे असणार नाहीत तर उत्पादनाची साधने गरिबातील गरीब व्यक्तीकडे कशी येतील या उद्देशाने नेहरूंनी उत्पादनाच्या साधनांचे राष्ट्रीयीकरण केले.

**६. नियोजनावर भर** : भारतातील दारिद्र्य बेकारी, उपासमार जर कमी करायची असेल तर नियोजनबद्ध विकासाशिवाय पर्याय नाही असे नेहरूंना वाटत होते. त्यातूनच त्यांनी नियोजन आयोग,

पंचवार्षिक योजनांचा पुरस्कार केलेला दिसतो. पंचवार्षिक योजनाद्वारे कृषी उत्पन्न वाढविण्यावर त्यांनी भर दिलेला दिसतो.

अशा प्रकारे पं. नेहरूंनी लोकशाही समाजवाद विषयक विचार मांडले.

## १.२.३ सर्वसमावेशक राष्ट्रवाद आणि धर्मनिरपेक्षतावाद

### सर्वसमावेशक राष्ट्रवाद

पं. नेहरू हे प्रखर राष्ट्रवादी नेते होते. इंग्लंडमधील शैक्षणिक कालखंडात त्यांनी वाचलेले मॅझिनी, गॅरिबाल्डी यांचे जीवनचरित्र व कार्य त्यांच्या राष्ट्रवादी विचारांना पोषक ठरले. त्याचबरोबर मोतीलाल नेहरू हे वकील असल्यामुळे 'आनंदभवन' हे हिंदू-मुस्लिम व इंग्रजी या तिन्ही संस्कृतीचे समन्वय केंद्र होते. ते पुढे स्वराज्यभवन म्हणून राष्ट्राला समर्पित केले. पं. नेहरूंवर इंग्लंडमधील उदारमतवादाचा खूप मोठा प्रभाव होता. त्यातूनच पुढे त्यांनी उदारमतवादी राष्ट्रवाद मांडला. पं. नेहरूंना हिंदू राष्ट्रवाद किंवा मुस्लिम राष्ट्रवाद या संकल्पनाच मुळात मान्य नव्हत्या. म्हणून त्यांनी हिंदू, मुस्लिम, शीख यांना समाविष्ट करणारा सर्वसमावेशक राष्ट्रवाद मांडला. त्यांच्या या सर्वसमावेशक राष्ट्रवादावर उदारमतवादाचा प्रभाव होता. त्यांच्या सर्वसमावेशक राष्ट्रवादाची उद्दिष्टे उदारमतवादी परंपरेनुसार उदात्त होती. जात, धर्म, प्रांत, भाषा या सगळ्यांना छेदून जाणारी प्रखर भावनिक एकात्मता हे नेहरूंच्या राष्ट्रवादाचे सर्वश्रेष्ठ साध्य होते. पं. नेहरूंनी आपल्या 'भारताचा शोध' या ग्रंथातही राष्ट्रवादाबाबत विचार मांडले आहेत. या ग्रंथात ते म्हणतात की, पुष्कळांच्या बाबतीत या राष्ट्रवादाला मर्यादा राहत नाही. घरबंध राहत नाही, परंतु माझे तसे नव्हते. माझ्या आजच्या हिंदुस्थानच्या अवस्थेत राष्ट्रवाद अपरिहार्य आहे. राष्ट्रवाद ही नैसर्गिक नि आरोग्यदायी वाढ आहे. परतंत्र राष्ट्राला स्वतःच्या स्वातंत्र्याची तहान प्रथम हवी. राष्ट्रवाद हा संकुचित धार्मिक निष्ठेवर उभारण्यास त्यांचा विरोध होता. बॅ. जीनांनी धर्मावर आधारित मांडलेल्या द्विराष्ट्रवादाला विरोध करून नेहरूंनी स्वतःचा धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद मांडला, जो कोणत्याही जातीवर, धर्मावर, भाषेवर आधारित असणार नाही. नेहरूंचा राष्ट्रवाद हा संकुचित वा अलगतेच्या पायावर उभा नव्हता, तर तो सर्वांना सामावून घेणारा होता. उग्र राष्ट्रवाद युद्धास कारणीभूत ठरतो असे नेहरूंचे मत होते. त्यामुळे त्यांना उग्र राष्ट्रवादही पसंत नव्हता. १ जून, १९६४ रोजी भोपाळ येथे पब्लिक मिटींगमध्ये दिलेल्या भाषणात ते म्हणतात की, जर तुम्हाला परदेशात जाण्याचा योग आला तर तुम्हाला तुमचा पासपोर्ट घेऊन जावा लागतो. तेथे तुमच्या जातीला, धर्माला कोणताही अर्थ नाही, तेथे तुमचा आदर केला जातो कारण तुम्ही फक्त भारताचे नागरिक असता म्हणून. परदेशात तुम्हाला कोणत्या धर्माचे म्हणून ओळखले जात नाही किंवा तुम्ही भोपाळचे, दिल्लीचे, मुंबईचे म्हणून ओळखला जात नाही तर तुम्ही भारताचे नागरिक म्हणून ओळखले जाता.

पं. नेहरूंच्या मते, राष्ट्रवाद ही शक्तिशाली भावना असून ती लोकांना संघटित करायला प्रेरणा देते. राष्ट्रवाद ही एक मनोवस्था आहे. राष्ट्रप्रेमाची, राष्ट्रीय अस्मितेची, ऐक्याची ती भावना आहे आणि तो

म्हणजे भारतीय राष्ट्रवाद होय. पुढे त्यांचा हा राष्ट्रवाद आंतरराष्ट्रीयवादात विरून गेलेला दिसतो. जागतिक शांतता निर्माण करण्यासाठी मानवतावादी दृष्टिकोनातून त्यांनी आंतरराष्ट्रीय वाद मांडला.

*** धर्मनिरपेक्षतावाद**

पं. जवाहरलाल नेहरू हे धर्मनिरपेक्ष विचारवंत होते. त्यामुळे भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र व्हावे यासाठी त्यांनी प्रयत्नही केले. राज्यघटनेतही त्याचा समावेश केला. भारतासारख्या बहुधार्मिक देशातील ऐक्य व सामाजिक स्थैर्यासाठी धर्मनिरपेक्षता हाच एकमेव आधार आहे असे त्यांना वाटते. पं. नेहरू हे नास्तिक नव्हते, परंतु त्यांच्या धर्मविषयक विचारावर मात्र पाश्चिमात्य प्रभाव दिसून येतो. भारतासारख्या बहुधार्मिक देशात न्याय व समतेचा पाया हा धर्मनिरपेक्ष समाजच आहे असे त्यांना वाटते. नेहरूंच्या मते, जातीग्रस्त समाज योग्यरित्या धर्मनिरपेक्ष होऊ शकत नाही. राजकीय व आर्थिक हक्क हे कोणत्याही व्यक्तीस/गटास धर्माच्या आधारावर दिले जाऊ नयेत. विज्ञान, औद्योगिकरण, आर्थिक विकास व लोकशाही यांच्यामुळे धर्मनिरपेक्ष समाज निर्माण होईल. धार्मिकता, स्वकेंद्रित व अहंकारी असते. राज्याच्या नैतिक व आध्यात्मिक वाढीच्या मार्गातील ती अडथळा असते. नेहरूंच्या विश्लेषणानुसार भारताचे नागरीकरण कमकुवत होण्यास जातीव्यवस्था जबाबदार आहे. धर्मनिरपेक्षतेत राज्याची भूमिका महत्त्वाची आहे. धार्मिक बाबतीत राज्य केवळ तटस्थता पाळली जाते किंवा नाही हे पाहील. पं. नेहरूंच्या धर्मनिरपेक्षतेचे चार पैलू सांगता येतील ते पुढीलप्रमाणे–

**१. धार्मिक स्वातंत्र्य** : यामध्ये सर्व धर्मियांना समान दर्जा देणे, कोणत्याही एका धर्माला विशेषाधिकार न देणे, धर्माच्या नावाखाली कोणताही समाज अधिकारापासून वंचित राहता कामा नये.

**२. धार्मिक बाबतीत राज्याची तटस्थता** : पं. नेहरूंना धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजे राज्य कोणत्याही एका धर्माने बद्ध (Tied) नसणे हे अभिप्रेत आहे. नेहरूंना हिंदू राज किंवा मुस्लिम राज म्हणणे पसंत नव्हते. राज्याने सर्व धर्मांबरोबर सहअस्तित्वाचे धोरण पाळले पाहिजे असे त्यांना वाटत होते.

**३. सामाजिक जीवनातील धर्मनिरपेक्षता** : हिंदू आणि इस्लाम यांनी भारतीय सामाजिक जीवनात खोलवर प्रवेश केला आहे हे नेहरूंनी ओळखले होते. त्यामुळेच दोनही धर्मांना सामावून घेणारे भारतीय राष्ट्र आहे अशी त्यांची धारणा होती. आधुनिक लोकशाही समाजासाठी धर्मनिरपेक्षता अपरिहार्य आहे असे नेहरूंना वाटते.

**४. मनाचा दृष्टीकोन** : पं. नेहरूंच्या मते, धर्मनिरपेक्षता हा मानसिक दृष्टीकोन आहे. वेगवेगळ्या समुदायाची अल्पसंख्यांकासंबंधी निरपेक्षता बहुसंख्यांकांच्या मानसिक दृष्टिकोनावर अवलंबून आहे.

पं. नेहरूंची धर्मनिरपेक्षतेची कल्पना धर्म आणि शासन यांची फारकत करणारी असली तरी ती अमेरिकन घटनेप्रमाणे Wall of Seperation ची नाही. समाजजीवनात धर्मनिरपेक्षता अंगवळणी पडायची असेल तर सर्वप्रथम जमातवादी राजकारणाचा राजकीय पातळीवर मुकाबला व्हायला हवा. अशी नेहरूंची भूमिका होती.

### २.२.४ पंचशील आणि अलिप्ततेचे धोरण

भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पं. जवाहरलाल नेहरू हे आहेत. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे संपूर्ण श्रेय हे नेहरूंनाच द्यावे लागेल. नेहरूंच्या पंतप्रधानपदाच्या काळात त्यांनी परराष्ट्र धोरण विभाग आपल्याकडेच ठेवलेला होता. आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी या परराष्ट्र धोरणाद्वारे केला. दुसऱ्या महायुद्धानंतर जगात नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना दिलासा देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पं. नेहरूंचे परराष्ट्र धोरण हे शीतयुद्धाच्या काळात विकसित झाले, त्यामुळे शीतयुद्धाच्या राजकारणाचा प्रभाव नेहरूंच्या परराष्ट्र धोरणावर जाणवतो. भारताचे परराष्ट्र धोरण हे इतर देशांच्या धोरणाप्रमाणेच होते. ज्यामध्ये राष्ट्राचे हित, राष्ट्राचे संरक्षण, लोकांची आर्थिक गरज, सांस्कृतिक घटक इ. ला प्राधान्य दिलेले होते.

*** पंचशील**

जागतिक शांततेच्या प्रसारासाठी १९५४ मध्ये पं. नेहरूंनी चीन बरोबर एक करार केला तो म्हणजे पंचशील होय. हा करार पं. नेहरू व चीनचे पंतप्रधान चौ-एन-लाय यांच्यामध्ये झाला. १९५४ मध्ये भारत-चीन दरम्यान तिबेट संदर्भात एक करार झाला. तो म्हणजे पंचशील होय. पंचशील तत्त्वे ही या तिबेट संदर्भातील कराराची प्रस्तावना आहे. १९२५ मध्येच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने भारताचे जागतिक घडामोडीबाबतचे धोरण ४ मुख्य मुद्यांद्वारे ठरविले होते. यामध्ये (१) साम्राज्यवादाचा व वसाहतवादी कायद्यांचा विरोध करणे, (२) स्वातंत्र्यासाठी, समतेसाठी संघर्ष करणाऱ्या लोकांना पाठिंबा देणे (३) शांततेचा पुरस्कार व युद्धाला विरोध करणे (४) परराष्ट्र धोका टाळणे यांचा समावेश केला. १९५४ मध्ये जो पंचशील तत्त्वांचा करार झाला. त्यावर या धोरणाचा प्रभाव असलेला दिसतो. पंचशील कराराद्वारे पुढील पाच तत्त्वे स्वीकारण्यात आली.

१. प्रत्येक राष्ट्राने सार्वभौमत्वाचा व एकतेचा परस्पर आदर राखणे.

२. प्रत्येक राष्ट्राला स्वातंत्र्य व स्वायत्तता देणे.

३. प्रत्येक राष्ट्राने परस्पर राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारतात हस्तक्षेप करू नये.

४. इतर राष्ट्रांवर आक्रमण न करता परस्परांचा मान राखणे.

५. शांततामय सहजीवन.

या करारावर साम्यवादी चीन, युगोस्लाव्हीया व रशिया यांनी सह्या केल्या. १९५५ मध्ये पं. नेहरू व बुल्गानीन यांच्यामध्ये मास्कोमध्ये सह्या करून रशियाने हा करार स्वीकारला. परंतु या पंचशील तत्त्वातील तिसऱ्या तत्त्वात थोडी भर घालून स्वीकारला. त्यामध्ये 'For any reason, either of economic, political or ideological character' अशी भर घातली.

पं. नेहरूंनी राष्ट्राच्या जडणघडणीचे महत्त्वपूर्ण कार्य केले. जागतिक शांतता निर्माण करण्याच्या दृष्टीने त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारणातील या योगदानाबद्दल जग त्यांना 'शांतीदूत नेहरू' म्हणून ओळखते. नेहरूंनी पंचशील तत्त्वे मांडून मानवतावादाचा संदेश दिला. सर्वंकष सत्ता हाती घ्यायची नाही, व्यक्तिस्वातंत्र्य संपुष्टात आणावयाचे नाही. लोकशाही पद्धतीचा आदर करावयाचा हा नेहरूंचा पायाभूत विचार होता. परंतु १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. तेव्हा नेहरूंच्या या पंचशील कराराला अपयश आले. चीनकडून या कराराचे पालन केले गेले नाही. त्यानंतर नेहरूंच्या परराष्ट्र धोरणावर मोठ्या प्रमाणात टीका होऊ लागली. परंतु नेहरूंचा जगातील दोन महासत्तांच्या गटात सामील न होता शांततावादी धोरणावरच विश्वास होता. म्हणून शांततावादी दृष्टीने नेहरूंनी केलेले प्रयत्नच अत्यंत महत्त्वाचे आहेत.

* **अलिप्ततावाद** (Non Alignment)

दुसऱ्या महायुद्धानंतर जगात दोन महासत्ता उदयाला आल्या. एक अमेरिकेच्या नेतृत्वाखाली स्वतःला लोकशाहीवादी मानणारी व भांडवलशाहीचा पुरस्कार करणारी तर दुसरी सोव्हिएट रशियाच्या (U.S.S.R.) नेतृत्वाखाली साम्यवादाचा पुरस्कार करणारी. या दोन्ही महासत्तांच्या शीतयुद्धाच्या संघर्षात न पडता नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी या महासत्तांच्या अधिपत्याखाली येऊ नये म्हणून पं. नेहरूंनी अलिप्ततावादी गटाची स्थापना केली. भांडवलशाही व साम्यवाद यासारख्या विचारप्रणालींच्या वादात पडणे हितावह नाही असे नेहरूंचे मत होते. अलिप्तता म्हणजे तटस्थता नव्हे आणि स्वतःला इतरांपासून वेगळे ठेवणेही नव्हे, तर आपल्या हिताच्या दृष्टीने योग्य असेल तो निर्णय घेणे होय. अलिप्तता हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा केंद्रबिंदू होता. या अलिप्ततावादी गटात १२५ पेक्षा जास्त राष्ट्रांचा समावेश होता. संयुक्त राष्ट्रसंघटनेनंतरची (U.N.) सर्वांत मोठी संघटना म्हणून अलिप्ततावादी गटाला ओळखले जाते.

१८ ते २४ एप्रिल १९५५ मध्ये इंडोनेशिया मधील बांडूंग येथे नव्याने स्वतंत्र झालेल्या आशियायी व आफ्रिकन देशांची सभा बोलाविली गेली. या सभेत अलिप्ततावादी तत्त्वे ठरविण्यात आली. परंतु या सभेला यश आले नाही. पुढे १९६१ मध्ये पं. नेहरूंच्या पुढाकाराने युगोस्लाव्हिया मधील बेलग्रेड येथे अलिप्ततावादी चळवळीची स्थापना झाली. या चळवळीला इजिप्तचे नासेर, युगोस्लाव्हियाचे मार्शल टिटो यांनी पाठिंबा दिला.१९६१ मधील या परिषदेला जवळ जवळ २५ राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अलिप्ततावादी चळवळीचा संदर्भ शीतयुद्धाच्या राजकारणापासून स्वतंत्र राहणे हा होता. परंतु नेहरूंनी ह्या चळवळीला शीतयुद्धाच्या राजकारणापलीकडे नेण्याचा प्रयत्न केला. १९७९ मध्ये या अलिप्ततावादी संघटनेचा हेतू फिडेल कॅस्ट्रो यांनी हवाना जाहीरनाम्यातून स्पष्ट केला. त्यामध्ये ते म्हणतात की, अलिप्त राष्ट्रांचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, भौगोलिक एकता व सुरक्षा टिकवून ठेवणे हा मुख्य हेतू आहे. त्याचबरोबर साम्राज्यवादी, वसाहतवाद, नव वसाहतवाद, बड्या राष्ट्रांचे प्रभूत्व (hegemony) याबरोबर संघर्ष करणे, तिसऱ्या जगातील विकसनशील राष्ट्रांनी या चळवळीला पाठिंबा देऊन त्यामध्ये सहभाग घेतला.

अलिप्ततवादाची दोन मूलभूत तत्त्वे होती. शांततेचे धोरण आणि जागतिक राजकारणात स्वतंत्रपणे धोरण आखण्याची गरज.

भारताने अलिप्ततावादाचा स्वीकार केल्यामुळे शीतयुद्धाच्या काळात भारत ही दोन सत्तागटांची युद्धभूमी झाली नाही. उलट अमेरिका व रशिया यांनी भारताच्या विकासास मदत केली. साम्राज्यवाद विरोधी धोरण, उदारमतवादी आंतरराष्ट्रीय धोरण, अलिप्तता, शांततेचे धोरण आणि स्वतंत्र विचारसरणीवर आधारित परराष्ट्रीय धोरण ही अलिप्ततावादाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

## २.३ सारांश

आधुनिक भारताच्या जडणघडणीत नेहरूंचे योगदान खूप मोठे आहे. त्यांनी आपल्या १७ वर्षांच्या पंतप्रधानपदाच्या कालखंडात देशाच्या विकासाला नवी दिशा दिली. भारतात लोकशाहीची तत्त्वे रुजवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. भारताचा आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास करण्यासाठी एक प्रतिमान निर्माण झाले. त्यालाच नेहरू प्रतिमान म्हणून ओळखले जाते. आज नेहरूंच्या विचारांपासून भारताने बरीच फारकत घेतली आहे. परंतु एकविसाव्या शतकातही नेहरूवादाचा प्रभाव दिसून येतो.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

**१. शीतयुद्ध** : दुसऱ्या महायुद्धानंतर (१९४५ नंतर) जगात अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्या नेतृत्वाखाली दोन गट निर्माण झाले. या गटात सत्तेसाठी जो संघर्ष सुरू होता त्यालाच शीतयुद्ध म्हणतात. या दोन गटांनी समोरासमोर येऊन युद्ध केले नाही मात्र त्यांच्यात सत्तेसाठी तीव्र स्पर्धा होती. शीतयुद्धाचा कालखंड हा १९९० पर्यंत मानला जातो.

**२. लोकशाही समाजवाद** : प्रातिनिधीक लोकशाही संस्थांद्वारे समाजवादी समाजरचना अस्तित्वात आणता येते असा विश्वास बाळगणारी विचारप्रणाली म्हणजे लोकशाही समाजवाद. समता व स्वातंत्र्य या दोन तत्त्वांवर आधारलेली समाजव्यवस्था घटनात्मक मार्गाने स्थापन करण्याचे ध्येय लोकशाही साम्यवादाच्या पुरस्कर्त्यांचे असते.

**३. अलिप्ततावाद** : दुसऱ्या महायुद्धानंतर भांडवलशाही व साम्यवादी गटाच्या सत्तास्पर्धेत सामील न होता राष्ट्रहिताचा विचार करून शांतता व सहजीवनाच्या मार्गावर चालणारा तिसरा विचारप्रवाह म्हणजे अलिप्ततावाद. अलिप्तता म्हणजे तटस्थता नव्हे तर न्याय भूमिकेचे निर्वाहन करणे अलिप्ततेत अपेक्षित आहे.

**४. सर्वसमावेशक राष्ट्रवाद** : राष्ट्रवाद ही स्वातंत्र्याची प्रेरणा होती, हे जरी सत्य असले तरी वैचारिक अधिष्टानातील, मार्गातील आणि ध्येयातील भिन्नतेमुळे भारतात हिंदू राष्ट्रवाद, मुस्लीम राष्ट्रवाद, द्विराष्ट्रवाद, सांस्कृतिक राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद असे अनेक प्रकार पडतात. परंतु या सर्व प्रकारांना

सामावून घेणारा, सर्वव्यापक व तात्त्विक अर्थाने सर्वश्रेष्ठ असा राष्ट्रवाद म्हणजे सर्वसमावेशक राष्ट्रवाद होय. सर्व धर्मांना, पंथीयांना सामावून घेणारा हा राष्ट्रवाद आहे.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्न

**रिकाम्या जागा भरा.**

१. .......... साली भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात पं. नेहरू व म. गांधी यांची पहिल्यांदा भेट झाली.

२. 'An Autobiograpy' (आत्मचरित्र) हे पं. नेहरूंनी ............ येथील तुरुंगात असताना लिहिले.

४. ............ हा ग्रंथ अहमदनगरच्या किल्ल्यात कारावासात असताना लिहिला.

४. ............ हा लोकशाहीचा आत्मा आहे असे पं. नेहरूंना वाटते.

५. पं. जवाहरलाल नेहरूंनी .......... राष्ट्रवाद मांडला.

६. पं. नेहरूंच्या राष्ट्रवादावर इंग्लंडमधील .......... चा खूप मोठा प्रभाव होता.

७. पं. नेहरूंनी आपल्या .......... ग्रंथात राष्ट्रवादाबाबत विचार मांडले.

८. पं. नेहरूंच्या मते, राजकीय व आर्थिक हक्क हे कोणत्याही गटास .......... च्या आधारावर दिले जावू नयेत.

९. पं. नेहरूंची धर्मनिरपेक्षतेची कल्पना धर्म आणि .......... यांची फारकत करणारी आहे.

१०. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून ........ यांना ओळखले जाते.

११. १९५४ मध्ये भारत व ........... या दोन देशात पंचशील तत्त्वांचा करार झाला.

१२. आंतरराष्ट्रीय राजकारणातील योगदानाबद्दल पं. नेहरूंना जग ........... नेहरू म्हणून ओळखते.

१३. १९६१ मध्ये ........... येथे अलिप्ततावादी गटाची स्थापना झाली.

१४. १९५५ मध्ये .......... येथे आशियायी व आफ्रीकन देशांची सभा झाली.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. पं. जवाहरलाल नेहरू यांचे लोकशाही समाजवादविषयक विचार स्पष्ट करा.

२. पं. नेहरूंचा संमिश्र राष्ट्रवाद व धर्मनिरपेक्षतावाद स्पष्ट करा.

३. पं. नेहरूंचे परराष्ट्र धोरण विषयक विचार स्पष्ट करा.

**टीपा लिहा.**

१. पं. नेहरूंचा संमिश्र राष्ट्रवाद

२. पं. नेहरूंचा धर्मनिरपेक्षतावाद

३. पंचशील

४. अलिप्ततेचे धोरण

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

१. भोळे भास्कर लक्ष्मण, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जून २००३.

२. बाचल वि. मा., भारतीय राजकीय विचारवंत, के. सागर पब्लिकेशन्स, २००६.

३. गोडबोले माधव, जवाहरलाल नेहरूंचे नेतृत्व एक सिंहावलोकन, राजहंस प्रकाशन, मे २०१४.

४. मुखर्जी रुद्रांग्श, अनुवाद डोंगरे अवधूत, नेहरू व बोस : समांतर जीवनप्रवास, रोहन प्रकाशन, पुणे.

५. नेहरू पं. जवाहरलाल, अनुवादक साने गुरूजी, करंदीकर ना. वि., भारताचा शोध, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २०१०.

६. पाटील बी. बी. 'भारतीय राजकीय विचारवंत, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९७.

७. थरूर शशी, अनुवाद सोनवणे मनोहर, शोध नेहरूंचा आणि भारतीयांचाही, समकालीन प्रकाशन, पुणे २०१५.

८. समाज प्रबोधन पत्रिका, अंक २०८, ऑक्टोबर-डिसेंबर, २०१४.

९. शरण गिरिराज सं. - मै नेहरू बोल रहा हूँ, प्रभात प्रकाशन, नवी दिल्ली, २०१२.

१०. Jha M. N., Modern Indian Political Thought, Ram Mohan Roy to Present Day, Meenakshi Prakashan, Delhi, 1975.

## घटक – ३

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ जीवन परिचय

 ३.२.२ जातीव्यवस्थेवरील टीका

 ३.२.३ सामाजिक व संसदीय लोकशाही

 ३.२.४ राज्य समाजवाद

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्न

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

### ३.० उद्दिष्टे

राज्यशास्त्रामध्ये पाश्चात्त्य आणि भारतीय राजकीय विचारवंताचा अभ्यास महत्त्वाचा आहे. भारतीय राजकीय विचारवंतामध्ये कौटिल्य, महात्मा फुले, महादेव गोविंद रानडे, बाळ गंगाधर टिळक, महात्मा गांधी, पंडित नेहरू, बाबासाहेब आंबेडकर, राममनोहर लोहिया, एम. एन. रॉय इत्यादी अनेक विचारवंतांचा समावेश होतो. प्रस्तुत प्रकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची चर्चा करणार आहोत. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वाचे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, कृषी इत्यादी क्षेत्रासंबंधीचे विचार मांडले आहेत. त्यांच्या विचारातील जातीव्यवस्थेसंबंधी तसेच लोकशाही, समाजवाद, राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, समता, इत्यादी विचार महत्त्वाचे आहेत. त्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## ३.१ प्रास्ताविक

आधुनिक भारतात राजकारण आणि समाजसुधारणा करणारे अनेक राजकीय नेते, विचारवंत होऊन गेले आहेत. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महत्त्वाचे विचारवंत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाला गतिमान करण्यासाठी आणि समाजातील जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी अनेक आंदोलने केली आहेत. तसेच भारतातील संसदीय व सामाजिक लोकशाही संदर्भात चर्चा केली आहे. त्यांनी आपले विचार अनेक पुस्तके व भाषणाच्या माध्यमातून लोकांसमोर ठेवले आहेत. त्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण भारतामधील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक गोष्टींची डॉ. आंबेडकरांनी चिकित्सकरित्या मांडणी केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने हजारो वर्षांपासून चालत आलेली जातिव्यवस्था मोडीत काढण्यासाठी आंबेडकरांनी अनेक भाषणातून आपले परखड विचार मांडले आहेत. २६ नोव्हेंबर १९४९ रोजीच्या संविधान सभेतील भाषणामध्ये त्यांनी भारतात लोकशाही स्विकारण्यासंदर्भात विचार मांडले. भारतीय अर्थव्यवस्थेसंबंधी विचार करताना राज्य समाजवादाची कल्पना मांडली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले राज्य समाजवाद, संसदीय लोकशाही आणि समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठीचे विचार इत्यादी गोष्टींची चर्चा करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ जीवन परिचय

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म महू या गावी दि. १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. त्यांचे मूळगाव रत्नागिरी जिल्ह्यातील आंबडवे हे होते. परंतु त्यांचे वडील रामजी संकपाळ हे ब्रिटिशांच्या सैन्यात नोकरीला होते. महू हे त्यावेळी लष्करी छावणी क्षेत्र होते. त्यामुळे महू येथे रामजी संकपाळ हे कार्यरत होते. सैन्यातून निवृत्त झाल्यावर रामजी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथे स्थलांतरीत झाले. नंतर रामजी संकपाळ यांना सातारा येथे नोकरी मिळाली. तेव्हा सातारा येथील शाळेत भीमराव रामजी आंबेडकर यांनी प्रवेश घेतला. शाळेमधील शिक्षक कृष्णा केशव आंबेडकर यांनी भीमा रामजी आंबडवेकर ऐवजी भीमा रामजी आंबेडकर असे नाव दिले. आंबेडकरांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सातारा येथेच झाले. सातारा येथील शाळेत असताना आंबेडकरांना अस्पृश्यतेच्या कारणावरून भेदभावाची वागणूक मिळाली होती.

रामजीची नोकरी संपल्यानंतर १९०४ साली ते मुंबई येथे स्थलांतरित झाले. परळ येथील एका चाळीतील भाड्याने घेतलेल्या खोलीत ते राहू लागले. आंबेडकर प्रथम परळमधील मराठी उच्च माध्यमिक विद्यालयात शिकत होते. नंतर त्यांनी एल्फिन्स्टन उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश घेतला. एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये शिकताना आंबेडकरांना वर्गातील स्पृश्य जातीच्या मुलांपासून दूर रहावे लागे. १९०५ साली आंबेडकरांचा वयाच्या १४व्या वर्षी दापोलीचे भिकू वलंगकर यांची मुलगी रमाबाई यांच्याशी विवाह झाला. पुढे १९०७ साली आंबेडकर मॅट्रिक पास झाले. एका महार जातीतल्या मुलाचे यश पाहून सत्यशोधक समाज सुधारणा चळवळीचे नेते सीताराम केशव बोले यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात भीमराव

रामजी आंबेडकर यांचा सत्कार सोहळा समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी गुरुवर्य कृष्ण अर्जुन केळुस्कर यांनी स्वतः लिहिलेले 'बुद्धचरित्र' हे पुस्तक भीमराव आंबेडकरांना भेट दिले आणि नारायण चंदावरकर यांच्या मध्यस्थीने बडोद्याचे नरेशांची त्यांच्या मुंबईतील निवासस्थानी भेट घेतली व शिष्यवृत्ती संबंधी चर्चा केली. त्यानुसार बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी दिलेल्या मासिक २५ रुपयांच्या शिष्यवृत्तीच्या मदतीमुळे डॉ. आंबेडकरांचे महाविद्यालयीन शिक्षण एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये झाले आणि प्रत्येक वर्षाच्या परीक्षेत ते पासच होत राहिले. कॉलेजमध्ये भीमरावांनी इंग्रजी व पर्शियन या दोन्ही विषयामध्ये उत्तम मार्क्स मिळवून १९१३ साली बी. ए. पदवीचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या आर्थिक सहकार्यातून मुक्त होण्यासाठी भीमरावांनी बडोदा राज्यात सरकारी नोकरी स्वीकारली. बडोदा संस्थानामध्ये आंबेडकरांना मिळालेल्या नोकरीने ते उच्चवर्गीयांच्या बरोबरीने कार्यरत होते. परंतु उच्चवर्णीय हिंदूंच्या मनात विटाळाची कल्पना खोलवर रुजलेली होती. आंबेडकरांना त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या लोकांकडून अपमान सहन करावा लागला. त्यामुळे पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात यावी म्हणून महाराजांना विनंती केली. महाराजाच्या सांगण्यावरून आंबेडकरांना परदेशात शिकण्यासाठी दरमहा साडे अकरा पौंडाची शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. जून १९१३ मध्ये आंबेडकरांनी न्यूयॉर्क येथील कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुन्हा बडोदा संस्थानात नोकरी करण्याचा करार झाला होता.

कोलंबिया विद्यापीठात असताना आंबेडकरांनी 'ओरीजीन ऑफ कास्टस्' या अत्यंत परिणामकारक आणि महत्त्वपूर्ण शोध निबंधाचे सादरीकरण केले. एम. ए. पदवीसाठी 'एन्शीएंट इंडियन कॉमर्स' या विषयावर प्रबंध सादर केला. १९१६ मध्ये पीएच.डी. पदवीसाठी 'द नॅशनल डिवीडेन्ट ऑफ इंडिया' हा प्रबंध सादर केला. त्याचवर्षी एस.एस्सी. व डी.एस्सी. या पदवी प्राप्त करण्याच्या ध्येयाने प्रेरीत होऊन भीमराव न्यूयॉर्कहून लंडनला आले. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अॅण्ड पॉलिटिकल सायन्स मध्ये प्रवेश मिळविला. लंडनमधील ग्रेज हन मध्ये बॅरिस्टर या कायद्याच्या अत्युच्च पदवीसाठी प्रवेश घेतला. परंतु शिष्यवृत्तीचा कालावधी पूर्ण झाल्यामुळे त्यांना भारतात यावे लागले. भारतात परत आल्यानंतर बडोदा येथे महाराजा सयाजीराव यांच्याकडे लष्करी सचीव म्हणून ते कामावर रुजू झाले. परंतु कार्यालयातील कर्मचारी भीमरावांचा जास्तीत जास्त अपमान होईल अशा पद्धतीचे वर्तन करतच राहिले. अशा प्रकारे मिळणारी विषमतेची वागणूक व इतर समस्यांमुळे डॉ. भिमराव आंबेडकरांनी बडोदा संस्थानची नोकरी सोडून मुंबईला परत येण्याचा निर्णय घेतला. इ. स. १९१७ च्या नोव्हेंबर महिन्यात ते मुंबईला आले. नोव्हेंबर १९१७ ते ऑक्टोबर १९१८ या वर्षभरात बेकारीचे, निराशेचे जीवन जगत राहिले असले तरी ते रिकामे बसून राहिले नव्हते. या काळात विद्यार्थ्यांची शिकवणी घेतली, स्टॉक्स अँड शेअर्स अॅडव्हर्टायर्स नावाची सल्ला देणारी कंपनी चालवली, तसेच दावर्स कॉलेज ऑफ कॉमर्स नावाचे कॉलेज प्रो. डी. आर. दावर चालवीत होते, तेथेही प्रोफेसर म्हणून कार्य केले. डॉ. भीमराव आंबेडकरांनी स्वतःचा व कुटुंबाचा खर्च भागविण्यासाठी

उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध केला होता. एकूणच त्यांची आर्थिक परिस्थिती सुस्थितीत होती. परंतु त्यांना थोडे पैसे जमा करून पुढील शिक्षण घेणे भाग होते.

११ नोव्हेंबर, १९१८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स या कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. तेथे त्यांना दरमहा ४५० रुपये इतका पगार मिळणार होता. मार्च १९२० मध्ये एम.एस्सी. व बार अॅट लॉ चे शिक्षण पुन्हा सुरू करण्यासाठी प्रोफेसरच्या नोकरीचा राजीनामा दिला. तत्पूर्वी १९२० च्या जानेवारी मध्ये आंबेडकरांनी भारतातील बहिष्कृत वर्गाच्या हिताला प्रोत्साहन देण्यासाठी मूकनायक नावाचे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकासाठी कोल्हापूरच्या महाराजांकडून अर्थसाहाय्य मिळत होते. डॉ. भीमराव आंबेडकर जेव्हा पुढील शिक्षणासाठी लंडनला जाण्याच्या तयारीला लागले तेव्हा त्यांना शाहू महाराजांनी दीड हजार रुपये सहकार्य म्हणून दिले. लंडन विद्यापीठाने जी चार वर्षांची मुदत दिली होती, ती संपण्याच्या अगोदरच डॉ. भीमराव आंबेडकर लंडनला गेले. लंडनला गेल्यानंतर वर्षभराच्या आत डॉ. भीमरावांनी तत्परतेने Provincial Decentralization of Imperial Finance in British India हा प्रबंध लिहून जून १९२१ मध्ये एम.एस्सी. च्या पदवीसाठी लंडन विद्यापीठाला सादर केला आणि एम.एस्सी. पदवी मिळाली. पुढे डी.एस्सी. पदवीसाठी The Problem of the Rupee हा प्रबंध लंडन विद्यापीठाला प्रो. एडविन कॅनन यांच्या अनुमतीने इ.स. १९२२ च्या ऑक्टोबर महिन्यात सादर केला. डी.एस्सी.च्या प्रबंधाच्या कामाची पूर्तता झाल्यानंतर बार अॅट लॉ च्या परीक्षेची तयारी करून शेवटची परीक्षा दिली. ते त्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. त्यामुळे डॉ. भीमराव बॅरिस्टरची पदवी मिळवून वकिली व्यवसाय करण्यास पात्र झाले होते.

एम.एस्सी., डी.एस्सी. आणि बार अॅट लॉ या तीनही परीक्षांतून पार पडल्यानंतर आंबेडकरांच्या मनात विचार आला की जर्मनीच्या बॉन विद्यापीठाची डॉक्टरेट मिळवावी. बॉन विद्यापीठात जर्मन भाषेत लेखन करावे लागेल म्हणून डॉ. आंबेडकरांनी जर्मन भाषेचा आणि फ्रेंच भाषेचा अभ्यास सुरू केला. पुढे जर्मनीत ३-४ महिने राहून प्रबंध लेखनाची तयारी करीत असतानाच त्यांना लंडनला परत यावे लागले. लंडनला परत आल्यानंतर मार्च १९२३ मध्ये परीक्षकांनी डी.एस्सी.च्या प्रबंधात काही बदल करण्यास सांगितले. पुढे आंबेडकरांनी ३ एप्रिल १९२३ ला मुंबईत येऊन प्रबंध लंडन विद्यापीठाला ऑगस्ट महिन्यात पाठवून दिले. इ.स. १९२३ च्या नोव्हेंबर महिन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना डी.एस्सी.ची अत्युच्च पदवी दिल्याचे लंडन विद्यापीठाने जाहीर केले. ती तार वाचून डॉ. भीमरावांना अमर्याद आनंद झाला.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी सामाजिक चळवळ आणि सामाजिक परिस्थितीचा विचार करून बहिष्कृत वर्गाच्या परिस्थितीवर लक्ष वेधण्यासाठी ९ मार्च १९२४ रोजी दामोदर हॉलमध्ये एक सार्वजनिक सभा बोलाविली आणि त्याचा परिणाम म्हणून २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारीणी सभेची स्थापना करण्यात आली. डॉ. आंबेडकरांना एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून आमंत्रित करण्यात आले. तसेच डॉ. आंबेडकरांना कोल्हापूर राज्यात मंत्रिपद देऊ केले गेले. पण त्यांनी दोहोंसाठी

नकार दिला. कारण त्यांना सामाजिक कार्यासाठी आणि सार्वजनिक जीवन जगण्यासाठी मुक्त राहणे आवश्यक होते. १९२५ च्या एप्रिल महिन्याच्या १० आणि ११ या तारखांना बहिष्कृत हितकारिणी सभेच्या सहकार्याने बेळगाव जिल्ह्यातील निपाणी या गावी 'मुंबई इलाखा प्रांतिक बहिष्कृत परिषद' या संस्थेचे तिसरे अधिवेशन आयोजित करण्यात आले. त्यात अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांनी आपल्या भाषणात 'सामाजिक सुधारणासाठी तयार व्हा' असा संदेश देणारे भाषण केले. अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्यक्रमाकरिता आपली आर्थिक स्थिती सुधारण्याच्या उद्देशाने डॉ. भीमराव आंबेडकरांनी १० जून १९२५ पासून ते ३१ मार्च १९२८ पर्यंत बॉटलीबॉय अकौटन्सी ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी केली.

बहिष्कृत वर्गाचे नेते म्हणून आणि सार्वजनिक वित्तप्रणालीचे तज्ञ म्हणून त्यांनी १९२६ साली 'रॉयल कमिशन ऑन करन्सी अँड फायनान्स' यांच्यासमोर साक्ष दिली. एप्रिल १९२७ मध्ये त्यांनी 'बहिष्कृत भारत' नावाचे वर्तमानपत्र सुरू केले होते. मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये रावबहादूर बोले यांनी सार्वजनिक पाणवठे सर्व अस्पृश्यांसाठी खुले करण्याचा ठराव ४ ऑगस्ट १९२३ रोजी पास करून घेतला. १९२६ साली पुन्हा मुंबई सरकारने रा. ब. बोले यांच्याच ठरावात काही दुरूस्त्या करून स्वतंत्र ठराव पास केला. या ठरावानुसार महाडचे चवदार तळे कायद्याने तरी अस्पृश्यांना खुले झाले होते. मात्र महाडच्या सनातनी मंडळींनी हा समता प्रस्थापन करण्याचा कायदा धाब्यावर बसविला होता. २० मार्च १९२७ रोजी अस्पृश्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी नेतृत्वाखाली चवदार तळ्याचा पाणी सत्याग्रह यशस्वी केला. पुढे २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड सत्याग्रहावेळी या विषमता निर्माण करणाऱ्या ग्रंथाचे म्हणजेच मनुस्मृतीचे दहन केले. नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशासाठी दि. २ मार्च १९३० रोजी सत्याग्रह सुरू झाला. त्याचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. हा सत्याग्रह हिंदू असूनही मंदिर प्रवेश नाकारणाऱ्या विषमतेविरुद्ध होता. म्हणजेच सामाजिक समतेसाठी होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ असावेत मागणी केली होती, ती मागणी १९३२ साली रॅमसे मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा घोषित केला, त्यात समाविष्ट केली. यामुळे हिंदू समाजाची एकता भंग होईल या मुद्यावर गांधीजींनी आमरण उपोषण केले, यातून गांधी व आंबेडकर यांच्यामध्ये २४ सप्टेंबर १९३२ रोजी पुणे करार म्हणून समझोता करण्यात आला. त्या कराराद्वारे स्वतंत्र मतदार संघा ऐवजी संयुक्त मतदार संघ व राखीव जागा अस्पृश्यांसाठी मान्य करण्यात आल्या. परंतु त्याचे दुष्परिणाम जास्त होत असल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी १९३६ साली स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली.

१३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला येथील बहिष्कृत वर्गाच्या प्रांतीय परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अशी घोषणा केली की, 'मी हिंदू समाजात जन्माला आलो पण मी हिंदू म्हणून मरणार नाही.' कारण हिंदू समाजरचनेत सुधारणा करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश येत नव्हते. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी ही घोषणा केली. १९३७ च्या मुंबई प्रांतिक विधीमंडळाच्या निवडणुकीत डॉ. आंबेडकरांच्यासह स्वतंत्र मजूर पक्षाचे १३ उमेदवार निवडून आले. दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर

ब्रिटिश सरकारने डॉ. आंबेडकर यांची १९४१ मध्ये भारताच्या संरक्षण सल्लागार समितीवर नियुक्ती केली. २० जुलै १९४२ च्या गव्हर्नर जनरलच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळामध्ये डॉ. आंबेडकरांना मजूर व बांधकाम खात्याचे मंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली. १९४२ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाचे विसर्जन करून डॉ. आंबेडकरांनी २० जुलै १९४२ रोजी 'ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशन' या राजकीय पक्षाची स्थापना केली. १९४६ साली डॉ. आंबेडकर बंगाल विधीमंडळातून संविधान सभेवर निवडून गेले. परंतु १९४७ मध्ये बंगालची फाळणी झाल्याने त्यांचे संविधान सभेचे प्रतिनिधीत्व रद्द झाले. त्यामुळे मुंबई विधीमंडळाच्या काँग्रेस सभासदातर्फे डॉ. आंबेडकर यांना घटना समितीचे सभासद म्हणून निवडून देण्यात आले आणि १४ जुलै १९४७ रोजी घटना समितीच्या नोंदवहीत सदस्यत्वाची सही केली. पुढे ३० ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीचे अध्यक्ष झाले. याच काळात ते सारखे आजारी पडत असल्यामुळे १५ एप्रिल १९४८ रोजी डॉ. आंबेडकरांनी डॉ. शारदा उर्फ सविता कबीर यांच्याबरोबर दिल्ली येथील हार्डिंग्ज ॲव्हिन्यू या निवास-स्थानी विवाह केला. १९४९ मध्ये काठमांडू येथे झालेल्या बौद्धाच्या परिषदेत ते सहभागी झाले. त्या परिषदेमध्ये डॉ. आंबेडकरांनी मार्क्स आणि बुद्ध यांच्यातील गुणदोषाची तुलना करून बौद्ध धर्माची श्रेष्ठत्व दर्शविणारे विचार मांडले. जुलै १९५० मध्ये त्यांनी जागतिक बौद्ध परिषदेत सहभाग घेतला. जुलै १९५१ मध्ये त्यांनी भारतीय बौद्ध जनसंघाची स्थापना केली. पुढे ते अनेक जागतिक बौद्ध परिषदेत सहभागी झाले होते. स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री झाले. परंतु स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून तयार केलेले हिंदू कोड बिल संसदेत मंजूर झाले नाही, त्यामुळे ११ ऑक्टोबर १९५१ रोजी डॉ. आंबेडकरांनी आपल्या कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. मार्च १९५२ मध्ये ते राज्यसभेवर निवडून आले. जून १९५२ मध्ये आंबेडकरांच्या जुन्या कोलंबिया विद्यापीठाने त्यांना एलएल.बी. (ऑनर्स) (Causa) ही पदवी देऊन सन्मानित केले. या सन्मानपत्रामध्ये विद्यापीठाने म्हटले की, भारताच्या घटनेचा मसुदा तयार करण्याच्या कामगिरीचा सन्मान म्हणून त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली आहे. भारतामध्ये १२ जानेवारी १९५३ रोजी डॉ. आंबेडकर यांना उस्मानिया विद्यापीठाने डी.लिट. ही सन्मानाची पदवी केली. मे १९५५ मध्ये त्यांनी भारतीय बौद्ध महासभेची स्थापना केली. १९३५ च्या येवला परिषदेत केलेल्या घोषणेनुसार हिंदू धर्माला सोडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्यांच्यासोबत सविता आंबेडकरांनीही बौद्ध धर्माची दिक्षा घेतली होती. डॉ. आंबेडकरांनी भाषावार प्रांतरचनेसंबंधी विचार मांडून सरकारच्या भाषावार प्रांतरचनेच्या कायद्यात महत्त्वाची भूमिका मांडली होती. शेवटी ६ डिसेंबर १९५६ रोजी दलित, अस्पृश्य, बहिष्कृत समाजाचा नेता, विद्वान व्यक्तिमत्व आणि भारताच्या घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले. परंतु त्यांचे विचार आजही समाजातील प्रश्न मिटविण्यासाठी आणि शासन व्यवस्था चालविण्यासाठी उपयुक्त आहेत. त्यांच्या सर्व विचारांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

### ३.२.२ जातीव्यवस्थेवरील टीका

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जातीव्यवस्थेवरील विचार** : भारत हा एक विविधतेतील एकतेचा देश आहे. त्यामध्ये विविध जातीचे, धर्माचे, पंथाचे लोक राहतात. भारतीय समाजात वर्षानुवर्षे वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था अस्तित्वात आहे. यामध्ये अस्पृश्य समाजावर अन्याय होत होता. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील जातीव्यवस्थेसंबंधी सखोल असा अभ्यास करून महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत आणि जातिव्यवस्था नष्ट करण्याचे प्रयत्न केले आहेत. वैदिक काळात ब्राह्मण, क्षत्रीय व वैश्य हे तीनच वर्ण होते. नंतर शूद्र हा वर्ण तयार करण्यात आला. शूद्र हेही क्षत्रीयच होते. पण शूद्राला सवर्ण मानण्यात आले नाही. म्हणून त्याला उपनयनाचा अधिकार दिला गेला नाही. 'शूद्र कोण होते?' या पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याची सविस्तर चर्चा केलेली आहे. शूद्रांच्या नंतर अतिशूद्रांचा वर्ण तयार करण्यात आला. अतिशूद्रांना सर्व अधिकार नाकारण्यात आले. शिक्षणबंदी, व्यवसाय बंदी, रोटी बंदी आणि बेटी बंदी अशा बंदी घालण्यात आल्या. वर्णव्यवस्थेतून अनेक जाती पोटजाती निर्माण झाल्या. समाजात जातीभेद निर्माण झाल्यामुळे जातीजातीमधील द्वेष निर्माण झाला. यावर टीका करताना डॉ. आंबेडकर असे लिहितात की, ''समाजरचनेची एक पद्धती या दृष्टीने चातुर्वर्ण्य अव्यवहार्य व अपायकारक पद्धती असून कीव करण्यालायक अपयशी ठरली आहे. चातुर्वर्ण्याच्या समर्थकांनी अजून लक्षात न घेतलेल्या कितीतरी अडचणी व्यवहार्यतेच्या दृष्टीकोणातून उद्‌भवतात. जातीमध्ये अंतर्भूत असलेले तत्त्व वर्णामध्ये अंतर्भूत असलेल्या तत्त्वाहून पूर्णतः वेगळे आहे. त्याच्यात मुलभूत फरक एवढाच आहे की चातुर्वर्ण्य गुणावर आधारलेला आहे आणि जन्मानेच जात ठरविली जाते तर वर्णपद्धती स्थापन करण्यासाठी तुम्हाला प्रथम जातीभेद मोडावे लागतील.'' त्यामुळे चातुर्वर्ण्य व्यवहार्य नाही असे ठाम मत डॉ. आंबेडकरांनी मांडले आहे. चातुर्वर्ण्य हे वरवर पाहता श्रमविभाजन आहे असे वाटते. प्रत्यक्षात मात्र ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य मिळून शूद्राचे शोषण करतात. या तिघांच्या आश्रयावाचून शूद्राला जीवन जगता येऊ नये म्हणून संपत्ती जमविण्याचा हक्क नाकारण्यात आला. त्याने आपल्या हिताच्या रक्षणासाठी सतर्क राहू नये म्हणून त्याला शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला. कदाचित या तिघांच्याही विरुद्ध बंड करून उठले म्हणून त्याला शस्त्रे बाळगण्यास बंदी करण्यात आली अशी टीका डॉ. आंबेडकरांनी केली आहे.

डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे एकेक मजलाच होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या मनोऱ्यात शिडी नाही आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही चांगला किंवा श्रेष्ठ असो त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही आणि वरच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची प्रथा नाही.' अशा रीतीने भारतीय समाजव्यवस्थेमुळे विषमता निर्माण झाल्याची दिसून येते. त्यामुळे समाजातील जाती निर्मूलनाच्या प्रश्नाला डॉ. आंबेडकरांनी महत्त्वाचे मानले होते. कारण हिंदू धर्मातील या अमानवी जाती व्यवस्थेमुळे एका मोठ्या वर्गाला बहिष्कृताचे जीवन जगावे लागले होते.

अस्पृश्यांना पशूपेक्षा हीन जीवन जगावे लागत होते. सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक अशा सर्वच स्तरावर अस्पृश्याचे अधःपतन झाले होते. हे सर्व हिंदू धर्मशास्त्राच्या रूढी प्रथा परंपरेमुळे घडते आहे, म्हणून हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्याच्या संकल्पनेवरच हल्ला करावा लागेल, याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात की, ''हिंदू समाज ही एक भाकड कथा आहे. हिंदू समाज या नावाची वस्तूच कोठे अस्तित्वात नाही. तो केवळ जातीचा संग्रह आहे. प्रत्येक जातीला आपल्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव आहे. तिथे जीवन किंवा विनाश हा तिच्यापुरताच मर्यादित आहे. सर्व जाती मिळून एकसंध सुद्धा तयार होऊ शकत नाही.'' त्यामुळे जाती कायम ठेवून अस्पृश्यता नष्ट करणे हे केवळ अपुरे, अयोग्य व अशक्य आहे असे डॉ. आंबेडकरांना वाटले. त्यामुळे त्यांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन इत्यादी आंदोलनाद्वारे जातीभेद नष्ट करण्यासाठीचे प्रयत्न केले.

डॉ. आंबेडकर हे आंदोलनाबरोबरच वैचारिक मांडणी करूनही जातीभेद निर्मूलनाचा मार्ग सुचवितात. डॉ. आंबेडकरांच्या मते, आदर्श समाज म्हणजे जो समता क्षमता स्वातंत्र्य आणि बंधुतेवर आधारलेला समाज होय. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी काही उपाययोजना सुचविल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे :

**१. पोटजाती नष्ट करणे** : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीनिर्मूलन करताना पोटजाती नष्ट किंवा एकत्रीकरण करणे शक्य आहे का? या प्रश्नाला उत्तर देताना असे म्हटले की, त्यामुळे जाती नष्ट होण्याऐवजी अधिक बळकट होण्याची भिती असते म्हणून हा उपाय परिणामकारक नाही, व्यवहार्य नाही असे वाटते.

**२. आंतरजातीय सहभोजन** : आंतरजातीय सहभोजनामुळे जात निर्मूलन होईल असे वाटते. परंतु आंबेडकरांच्या मते हाही उपाय तोकडाच वाटतो. कारण आंतरजातीय सहभोजने करणाऱ्या अनेक जाती आहेत. परंतु स्वजातीची जाणीव व वृत्ती कमी करण्यात सहभोजन यशस्वी ठरले नाहीत असा सर्वांचा अनुभव आहे.

**३. आंतरजातीय विवाह** : डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, आंतरजातीय विवाह हाच त्यावरील खराखुरा तोडगा आहे. कारण रक्त संबंधानेच आपुलकीची भावना निर्माण होते व या नातेसंबंधाच्या भावनेवाचून विभक्तपणाची भावना जातीने निर्माण केलेली परकेपणाची भावना कधीच नष्ट होणार नाही. सामाजिक जीवनात एकसूत्रीपणा असणारी एक शक्ती या दृष्टीने हिंदूना आंतरजातीय विवाहाची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे आंतरजातीय विवाहामुळे जातीभेद नष्ट करणे शक्य आहे अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे. अशाप्रकारे जातीप्रथेचा तुरुंग उद्ध्वस्त करण्याचे आवाहन डॉ. आंबेडकरांनी घेतले होते. जाती-जातीमधील केवळ भेदभाव नष्ट करणे म्हणजे जातिव्यवस्था नाही करणे नव्हे. जातीचे अस्तित्व जोवर कायम आहे, तोवर जातिजातीमधील भेदभाव राहणारच आणि म्हणून जात

आणि जातिप्रथाच नष्ट केली पाहिजे. आंतरजातीय विवाह हाच यावरचा जालीम उपाय आहे असे आंबेडकरांचे म्हणणे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमध्ये जातीप्रथेच्या विद्ध्वंसाचा प्रश्न हा केंद्रस्थानी होता. कारण त्यांना जातिविहिन आणि वर्गविहीन समाज हवा होता. ही जुनी समाजव्यवस्था बदलण्यासाठी नवीन शिक्षण-व्यवस्था निर्माण करायला पाहिजे असे त्यांना वाटत होते. कारण पारंपरिक शिक्षणातून जातिव्यवस्थेमध्ये बदल होऊ शकत नाहीत. त्यासाठी वैज्ञानिक दृष्टीकोण आवश्यक आहे. वैज्ञानिक दृष्टीकोणामुळे जातीच्या मागे ज्या धार्मिक कल्पना उभ्या आहेत त्या हळूहळू गळून पडतील अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे. डॉ. आंबेडकरांचा जातीविषयक विचार हा भारतातील अस्पृश्यता, बहिष्कृतता निर्मूलनाचा विचार होता. कारण त्यांना भारतीय समाजव्यवस्था समतेच्या तत्त्वावर पुनर्रचना करावयाचा होता. डॉ. आंबेडकरांना पक्षीय राजकारणातसुद्धा जातिव्यवस्था, जातीभेद बहिष्कृतता याची प्रचिती आल्यामुळे त्यांनी काँग्रेस, कम्युनिस्ट पक्ष आणि खुद्द म. गांधी यांच्यावरही टीका केली आहे. कारण काँग्रेसच्या राजकीय चळवळीत दलीत, अस्पृश्य व वंचितांच्या प्रश्नाबद्दल गांभीर्य नाही हे डॉ. आंबेडकरांनी दाखवून दिले आहे.

डॉ. आंबेडकरांनी जाती निर्मूलनाचा प्रयत्न राज्यघटनेद्वारे केला. कलम १५ आणि १६ अन्वये समता प्रस्थापित करण्यासाठी विशेष तरतुदी केल्या आणि कलम १७ अन्वये अस्पृश्यता पाळणे कायद्याने गुन्हा ठरवला. तरीही हिंदू धर्मातील जातीव्यवस्था नष्ट होत नाही. याची खात्री झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. समतेवर आधारलेला बौद्ध धर्माचा पुरस्कार करून लाखो लोकांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली.

### ३.२.३ सामाजिक लोकशाही व संसदीय लोकशाही

लोकशाही हा भारतीय राजकारणात अनेक वेळा चर्चेचा विषय बनला आहे. लोकशाहीची जननी म्हणून ब्रिटीश राज्यव्यवस्था मानली जाते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांच्या मते, 'लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांसाठी, लोकांनी चालविलेले राज्य होय.' महात्मा गांधी यांनी तर लोकशाही हा एक जीवनमार्ग आहे असे स्पष्ट केले आहे. पंडीत नेहरूंनीही लोकशाही संदर्भात विचार स्पष्ट केले आहेत. त्यांच्या मते, लोकशाही म्हणजे केवळ मतदानाच्या हक्कासंबंधीची राजकीय समता नव्हे तर राजकीय समतेबरोबर आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित करणे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही लोकशाहीबाबत विचार स्पष्ट केले आहेत. आंबेडकरांचा लोकशाही विचार हा केवळ आदर्शवत स्वप्नरंजनातून तयार झालेला नव्हता. भोवतालच्या सामाजिक आणि राजकीय वातावरणातून वास्तव परिस्थितीच्या अभ्यासातून तो तयार झालेला होता. डॉ. आंबेडकरांचा लोकशाहीचा विचार केवळ भारतामध्ये लोकशाही प्रस्थापित करण्यापुरता मर्यादित विचार नव्हता तर जगामध्ये ज्या ज्या ठिकाणी लोकशाही व्यवस्था असेल त्या सर्व देशांशी सहकार्य करून भारताने लोकशाही मूल्यांचे संरक्षण केले

पाहिजे, अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. कारण भारतातील सामाजिक जीवनाची फेररचना फक्त लोकशाही राजवटच करू शकेल असा त्यांना विश्वास होता. लोकशाही हा केवळ शासनाचा प्रकार नसून ती समाज जीवनाची एक पद्धती आहे. सामाजिक जीवनाच्या आवश्यकतेतून, अपरिहार्यतेतून जीवन व्यतीत करण्याच्या ज्या काही विचारप्रणाली किंवा आचार-धर्म प्रस्तुत झाले आहेत त्यापैकी लोकशाही हा एक आहे. पुणे जिल्हा कायदा ग्रंथालयातर्फे डॉ. आंबेडकरांच्या भाषणाचा कार्यक्रम २२ डिसेंबर १९५२ रोजी झाला. त्या कार्यक्रमामध्ये डॉ. आंबेडकरांनी लोकशाही संदर्भात विचार मांडले होते, त्यामध्ये ते लोकशाहीची व्याख्या करतात. त्यांच्या मते, 'रक्ताचा एक थेंबही न सांडता लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणणारा शासनाचा एक प्रकार आणि पद्धती म्हणजे लोकशाही होय.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीची चर्चा करताना लोकशाहीच्या वेगवेगळ्या आयामाद्वारे प्रकार स्पष्ट करताना दिसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही संदर्भात विचार मांडताना सामाजिक लोकशाही आणि संसदीय लोकशाही या दृष्टीने विचार मांडले आहेत.

### (अ) सामाजिक लोकशाही

भारतीय समाजव्यवस्था अनेक जाती, रूढी, परंपरा, भेद, धर्म, वंश यांनी निर्माण झालेली आहे. अशा या भिन्न सामाजिक गटाच्या सांस्कृतिक दृष्टीकोणात प्रबळ तफावती असतात आणि भिन्न लोकसमूहाच्या ठायी सहजीवनाची भावनाच अपुरी व अनुपस्थित असते, त्या ठिकाणी लोकशाही निर्माण होणे अवघड असते. हा विचार आंबेडकरांच्या लोकशाहीवरील चिंतनाचा केंद्रबिंदू होता. भारतीय लोकशाहीच्या यशस्वीतेमध्ये दारिद्र्य, निरक्षरता, जातीय व्यवस्था या गोष्टीमुळे अडथळे निर्माण झाले होते. हे अडथळे दूर झाल्याशिवाय भारतामध्ये लोकशाही अस्तित्वात येऊ शकत नाही, म्हणून डॉ. आंबेडकरांनी सामाजिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते आधी सामाजिक रचनेमध्ये मौलिक फेरफार केल्याशिवाय लोकशाहीची इमारत उभी राहू शकत नाही. या मौलिक फेरफारानाच डॉ. आंबेडकरांनी सामाजिक लोकशाही निर्मिती असे नाव दिले आहे. सामाजिक लोकशाहीचा भाग म्हणून डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायाची कल्पना मांडली. सामाजिक लोकशाही प्रस्थापित झाल्याशिवाय लोकशाही पूर्णपणे यशस्वी होऊ शकत नाही.

सामाजिक लोकशाही निर्माण करण्यासाठी केवळ एका व्यक्तीला एक मत हे तत्त्व स्वीकारून चालत नाही तर एक व्यक्ती आणि एक मूल्य हे तत्त्व स्वीकारले पाहिजे. सामाजिक लोकशाही मध्ये दोन गोष्टी अंतर्भूत आहेत. पहिली म्हणजे एकमेकांबद्दलचा सन्मान आणि समतेची भावना होय. तर दुसरी ताठर अशा सामाजिक बंधनापासून मुक्त अशी सामाजिक रचना होय. लोकशाही निर्माण करताना स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तत्त्वे महत्त्वाची आहेत. यातील कोणतेही तत्त्व एकमेकांपासून वेगळे करण्याचा प्रयत्न केला तर लोकशाहीचा मूळ हेतू नष्ट होऊन जाईल. स्वातंत्र्य समतेपासून वेगळे करता येणार नाही व समतेची स्वातंत्र्यापासून फारकत होऊ शकणार नाही. स्वातंत्र्याशिवाय नुसतीच समता असेल तर ती वैयक्तिक

कर्तृत्वशाली व्यक्तिमत्व नाहीशी करू शकेल आणि बंधुभाव नसेल तर स्वातंत्र्य व समता यांचा नैसर्गिक विकास होणार नाही. म्हणून तीनही तत्त्वे महत्त्वाची आहेत. सामाजिकदृष्ट्या आपला समाज क्रयशील विषमतेच्या तत्त्वावर उभारलेला आहे. समाजमध्ये उच्चनीचता-गरीब-श्रीमंत अशी विषमता आहे. त्यामुळे आंबेडकर विषमता, गरीबी, दारिद्र्य दूर करून सामाजिक लोकशाही प्रस्थापित करण्याची भूमिका स्पष्ट करतात. समाजामध्ये सामाजिक बहिष्कार टाकणे, सामाजिक बहिष्कारास चिथावणी देणे किंवा सामाजिक बहिष्काराची धमकी देणे हे गुन्हा म्हणून मान्य करावे, असे त्यांचे मत होते. मतदानाच्या हक्काद्वारे राजकीय क्षमता मिळाली खरी परंतु सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करणे गरजेचे आहे त्याशिवाय लोकशाही यशस्वी होत नाही म्हणून सामाजिक लोकशाही प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

**(ब) संसदीय लोकशाही**

डॉ. आंबेडकर जसे सामाजिक लोकशाहीला महत्त्व देतात तसे ते संसदीय लोकशाहीला तेवढेच महत्त्व देतात. त्याच्या मते, संसदीय पद्धती हीच व्यक्तीच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशीलता व जबाबदारीची जाणीव निर्माण करू शकते, सहकार्य, शिस्त व आत्मसमर्पणाची भावना निर्माण करते. या लोकशाहीमध्ये उच्च प्रतीचे राष्ट्रीय चारित्र्य घडवून शील, सचोटी, उद्यम व धारिष्ट्य याचा विकास होऊ शकतो. मानवी जीवनाच्या प्रवाही स्वरुपाशी संसदीय लोकशाही सुसंगत ठरते. कारण रक्तपात न होऊ देता सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात मुलभूत स्वरूपाचे बदल घडवून आणण्याचा मूलमंत्र फक्त संसदीय लोकशाहीकडेच आहे. त्याचबरोबर विविध मुद्यांबाबत निर्णय घेणे, चर्चा करणे, सर्वांची संमती मिळविण्याची तरतूद हे संसदीय लोकशाही पद्धतीतच आहे. अहिंसात्मक, घटनात्मक, शांततापूर्ण विचारविनिमयासाठी संसदीय पद्धतीतच वाव मिळतो. तसेच संसदीय लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष, विरोधी वृत्तपत्रे, मुक्त व न्याय्य निवडणुका आणि त्याद्वारे शांततापूर्वक मार्गाने होणारे सत्तांतर इ. गोष्टी महत्त्वाच्या आहेत अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे. सत्ताधारी पक्षाइतकाच प्रबळ विरोधी पक्ष संसदेत असणे अत्यावश्यक असते. संसदीय लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचा उचित प्रमाणात सन्मानही केला जातो. कारण सत्ताधारी पक्षाला हुकूमशाही वर्तनापासून दूर ठेवण्याचे काम विरोधी पक्ष करू शकतो. भारतातील जातीव्यवस्थेमुळे राजकीय बहुमतांची घडण होण्याऐवजी एकाच जातीच्या बहुमताची सत्ता प्रस्थापित होण्याचा चिरंतन धोका आहे. त्यामुळे संसदेमधील व विधानसभेतील बहुमत हे बहुसंख्यांक जातीकडे जाते. मतदान हे जातीच्या आधारावर होते. अल्पसंख्यांक जातीवर जुलूम, अत्याचार, सक्ती यासारखे प्रकार घडतात. अशा गोष्टी या लोकशाहीला मारक आहेत. डॉ. आंबेडकरांना भारतात संसदीय लोकशाहीला अनेक अडथळे येणार आहेत याची जाणीव होती. म्हणून त्यांनी प्रारंभीच्या अपयशाने खचून न जाता भारतीयांनी धीर धरून संसदीय लोकशाहीची पद्धत शिकायला, समजावून घ्यायला पाहिजे आणि ती यशस्वी करण्यासाठी परिश्रमाची पराकाष्टा केली पाहिजे असे म्हटले. डॉ. आंबेडकरांच्या मते भारताला संसदीय लोकशाहीपेक्षा दुसरा चांगला पर्याय नाही.

संसदीय लोकशाहीमधील संघराज्य व्यवस्था कशी असावी याबाबत डॉ. आंबेडकरांची खालील तरतुदी असाव्यात असे सुचविले.

१. कायदेमंडळाची मुदत संपण्यापूर्वी केंद्र किंवा राज्याची बिगर संसदीय स्वरूपाच्या कार्यकारिणीत कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात येऊ नये.

२. कार्यकारिणीचे सदस्य हे जर कायदेमंडळाचे सदस्य नसतील तर त्यांना कायदेमंडळात बसण्याचा, बोलण्याचा, मतदान करण्याचा व प्रश्नांना उत्तरे देण्याचा अधिकार नसावा.

३. एकमेव हस्तांतरीय मताने संपूर्ण सभागृहाने पंतप्रधानाची निवड करावी.

४. कायदेमंडळातील वेगवेगळ्या अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधीची निवड कायदेमंडळातील प्रत्येक अल्पसंख्यांक जमातीच्या सदस्यांनी एकमेव हस्तांतरीय मतांनी करावी.

५. कार्यकारिणीतील बहुसंख्य समाजातील प्रतिनिधीची निवड संपूर्ण सभागृहाने एकमेव हस्तांतरणीय मताने करावी.

६. पर्यवेक्षणात महालेखापाल यांचा समकक्ष दर्जा असावा व त्यांची गैरवर्तनावरून हकालपट्टी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांप्रमाणे व्हावी.

७. सार्वजनिक ठिकाणी अल्पसंख्यांकाना मिळणाऱ्या वागुणकीबाबत त्यांच्यावर होणाऱ्या अन्याया-बाबत वार्षिक अहवाल तयार करणे हे या पर्यवेक्षणाचे कर्तव्य आहे.

८. हा अहवाल कायदेमंडळात सादर केला पाहिजे आणि या अहवालावर चर्चा करण्यासाठी वेळ उपलब्ध करून देणे हे केंद्र व राज्य शासनावर बंधनकारक आहे.

९. केंद्रिय व प्रांतिक कायदेमंडळात मागासवर्गीय जातीला किमान त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणानासुर प्रतिनिधीत्व असले पाहिजे.

१०. केंद्र सरकार व राज्य सरकार व नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नोकऱ्यांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात मागासवर्गीयांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत.

संसदीय लोकशाहीचे समर्थन करताना डॉ. आंबेडकरांनी खालील त्रूटीवर नेमके बोट ठेवले आहे. संसदीय लोकशाहीमध्ये लोकांना स्वातंत्र्य, संपत्ती, सुख यांचा लवकर लाभ मिळत नाही म्हणून त्यावर टीका केली जाते. परंतु हेतूपूर्वक विचार करून सर्वांना समान मताधिकार देण्यात आला असून त्यातून मिळणाऱ्या राजकीय समतेचा प्रवाह वाहत जातो आणि आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. त्याबरोबर वैधानिक नैतिकतेचा मुद्दा लोकशाहीच्या विकासासाठी आवश्यक आहे, लोकशाहीतील कायदा हा सर्वांसाठी समान हितकारक व मानवी असायलाच पाहिजे, तो जुलमी असता कामा नये, परिस्थितीसापेक्षता व परिवर्तनीयता या कायद्याच्या अंगी असायलाच पाहिजे अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली.

### लोकशाही यशस्वीतेच्या अटी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही ही प्रस्थापितांच्या हातातील बाहुले बनू नये म्हणून लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीकोणातून त्यांनी सामाजिक आर्थिक न्यायाचा समावेश संविधानामध्ये करण्याचा आग्रह धरला होता. २६ नोव्हेंबर १९४९ रोजीच्या भाषणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'घटना कितीही चांगली व निर्दोष असली तरी ती राबवणारे चांगले नसले तर ती घटना वाईट ठरेल. त्याच-प्रमाणे घटना कितीही वाईट असली तरी ती राबवणारे चांगले असतील तर तीच चांगली ठरेल. म्हणून डॉ. आंबेडकरांनी लोकशाही यशस्वीतेच्या आवश्यक अटी स्पष्टपणे प्रतिपादन केल्या आहेत. त्या आवश्यक अटी पुढीलप्रमाणे -

१. समाजामध्ये टोकाची विषमता असता कामा नये. शोषित किंवा शोषक वर्ग नसावेत.

२. विरोधी पक्षाचे अस्तित्व मान्य करणे व एका मुदतीनंतर लोकमतानुसार सत्तांतर घडवून आणून सत्तेवर येण्याची त्यांनी संधी असणे.

३. कायदा व प्रशासनाबाबत समानता असावी.

४. घटनात्मक नैतिकतेचे पालन केले पाहिजे.

५. देशातील जनतेमध्ये सार्वजनिक सद्सद्विवेक बुद्धी असावी अथवा जाणीव असावी.

६. बहुसंख्यांक समाजाकडून अल्पसंख्यांक समाजावर अन्याय, अत्याचार होऊ नये.

लोकशाही व्यवस्था यशस्वी होण्यासाठी वरील सर्व अटी आवश्यक आहेत. या अटींची पूर्तता झाल्यावरच लोकशाहीचे यश अथवा भवितव्य अवलंबून आहे. जर या अटींची पूर्तता झाली नाही तर लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. म्हणून डॉ. आंबेडकरांनी लोकशाहीच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी नैतिक अधिष्ठान असले पाहिजे अशी भूमिका मांडली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबडेकर हे लोकशाहीचे पुरस्कर्ते होते आणि आयुष्यभर त्यांनी भारतात लोकशाही खोलवर रुजविण्यासाठी प्रयत्न केले. भारतात लोकशाहीच्या मार्गानेच सामाजिक आणि आर्थिक समता स्थापन करता येईल असे त्याचे मत होते. एकूणच डॉ. आंबेडकरांचे लोकशाही विषयक विचार हे प्रगमन-शील व सर्वसमावेशक लोकशाही सिद्धांत असून तो घटनात्मक नैतिकतेवर आधारलेले आहे. व्यक्तीच्या अधिकारांचा व क्षमतांचा विकास करणे हे त्याचे महत्त्वाचे अधिष्ठान आहे व त्याच्या आधारेच डॉ. आंबेडकरांनी आपल्या दुविधेचे निराकरण केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लोकशाहीविषयक विचार हा समाजात समता प्रस्थापित करणे या तत्त्वावर आधारलेला होता. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी आदर्श लोकशाही व्यवस्थेची काही सूत्रे सांगितली आहेत.

१. आदर्श लोकशाहीत समाज हा नेहमी गतिशील असला पाहिजे आणि समाजात होणारे बदल प्रत्येकाने परस्परास कळवले पाहिजेत.

२. समाजात वेगवेगळ्या संस्था, समाजहितवादी मंडळे स्थापन झाली पाहिजेत. त्यांचे परस्परांशी संबंध असले पाहिजेत. त्यांनी आपल्या कामाची माहिती एकमेकांना दिली पाहिजे.

३. समाजातील वेगवेगळ्या संस्था व संघटना या स्वतंत्र असल्या पाहिजेत व त्याच्यामध्ये वेगवेगळे विचारप्रवाह असले पाहिजेत, त्याबाबत त्यांच्यामध्ये चर्चा आणि संवाद असला पाहिजे.

थोडक्यात, समाजात एक प्रकारचा वैचारिक जिवंतपणा, परस्परविचारांची देवाण-घेवाण आणि परस्पर-संवाद असला पाहिजे.

### ३.२.४ राज्य समाजवाद

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राज्य समाजवादाविषयीचे विचार** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ घटना तयार केली किंवा राजकीय क्षेत्रात योगदान दिले असे नाही तर त्यांनी आर्थिक क्षेत्रातही महत्त्वाचे योगदान दिले आहे. डॉ. आंबेडकरांच्या समाजवादाचा उगम दारिद्र्याविषयीच्या असलेल्या द्वेषामध्ये आढळतो. देशातील दारिद्र्य दूर करण्यासाठी त्यांनी राज्यसमाजवादी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला आहे. त्यामध्ये शेती, प्रमुख उद्योगधंदे व विमा हे विभाग सरकारी क्षेत्रात असावेत व हे परिवर्तन लोकशाहीचा मार्गाने व्हावे असा त्यांचा आग्रह होता. त्यांचा राज्यसमाजवाद हा व्यक्तीला भांडवलशाहीच्या तसेच भूक, बेकारी, भय, टंचाई इत्यादी सामाजिक अरिष्टाच्या कचाट्यातून सोडविण्याचा सिद्धांत आहे. डॉ. आंबेडकरांचा भांडवलशाही तसेच मार्क्सवादाला विरोध होता. त्यांनी भारतातील सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन लोकशाहीबरोबर समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार केला आहे.

डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा विकास फ्रेंच राज्यक्रांती व युरोपातील प्रबोधनातून झाला आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, राज्याला अधिमान्यता ही स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांच्या आधारावर मिळते. याचा अर्थ राज्य अस्तित्वात येताना स्वातंत्र्य, समता व बंधूता या तिन्ही मूल्यांच्या संरचनात्मकरित्या समावेश केला जाईल. डॉ. आंबेडकरांच्या मते, उदार लोकशाही राज्य ही या तीनही मूल्यांना योग्यप्रकारे हाताळू शकणारी राजकीय प्रणाली आहे. लोकशाही यशस्वीतेसाठी धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परिस्थितीही महत्त्वाची असते. त्यामुळे आंबेडकर असे म्हणतात की समाज हा मुलभूत संरचनेवर आधारलेली राज्य ही दुसरी संरचना आहे. त्यामुळे कोणतेही राज्य समाजापासून स्वतंत्र असे चालविले जाऊ शकत नाही. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचारात संसदीय लोकशाहीचा समन्वय राज्य समाजवादाशी घालण्यात आला आहे. या दोन्ही संकल्पना वरवर पाहता विसंगत वाटत असल्या तरी त्याचा योग्य मेळ घातला गेला तर ते परस्परपूरक वाटतात. म्हणून डॉ. आंबेडकरांनी आपल्या 'स्टेटस् ॲण्ड मायनॉरीटीज' या पुस्तकात समाजवादाचा पुरस्कार केला आहे. कारण भारतीय समाजातील जाती व्यवस्था नष्ट करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि व्यक्तीची प्रतिष्ठा या तत्त्वावर आधारलेल्या समाजाची निर्मिती करणे हे डॉ. आंबेडकरांचे जीवनध्येय होते. समाजवादी व्यवस्था स्वीकारून सर्व प्रकारचे शोषण

आणि गुलामगिरी राज्यघटनेच्या कायद्याद्वारे नष्ट करून सामूहिक हिताची मानवी व्यवस्था रुजविणे हेच त्यांचे अंतिम ध्येय होते. यासाठी त्यांनी राज्य समाजवादाचा पुरस्कार केला.

१९१७ साली रशियन क्रांती होऊन साम्यवाद प्रस्थापित झाला. त्यामुळे भारतातील अनेक विचारवंताचे आणि राजकीय नेत्याचे लक्ष समाजवादी विचारांकडे आकर्षित झाले. परंतु डॉ. आंबेडकरांनी भांडवलशाही व मार्क्सवाद या दोन्हीला विरोध केला आणि भारतातील सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन लोकशाहीबरोबर समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार केला. कारण त्यांनी स्वतः दारिद्र्य अनुभवले होते. त्यामुळे दारिद्र्य हटविण्यासाठी आधुनिक, औद्योगिक व यंत्रप्रधान सभ्यतेला राज्यसमाजवादाची विशेषच आवश्यकता आहे असे आंबेडकरांचे मत होते. कारण या सभ्यतेचे काही दोष आहेत, त्यांचे सामाजिक आणि आर्थिक घटकांवर वाईट परिणाम होतात. हे परिणाम यंत्राचा आणि आधुनिकतेचा लाभ होण्यास अडथळा निर्माण करतात म्हणून यंत्राला किंवा आधुनिकतेला विरोध न करता समाजरचना बदलून टाकण्याचा प्रयत्न करणे योग्य आहे असा डॉ. आंबेडकरांनी विचार केला आणि भारतीय समाजात आर्थिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी राज्यसमाजवादाचा पुरस्कार केला.

डॉ. आंबेडकरांनी १९३६ साली स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला आणि त्याच्या जाहीरनाम्यात शेती विकासासाठी बँक स्थापन करावी, व्यवसाय शिक्षणाचा कार्यक्रम सरकारने हाती घ्यावा, देशातील प्रमुख उद्योगधंद्याची मालकी व व्यवस्था सरकारने आपल्या हाती घ्यावी, कामगारांना वेतन ठरवून द्यावे, कामगार वर्गाच्या हितासाठी कामाचे तास, वेतन, पगारवाढ, बडतर्फी यावर सरकारचे नियमन असावे इ. गोष्टींचा समावेश करण्यात आला होता. त्याचबरोबर १९४७ साली त्यांनी घटनापरिषदेला एक राज्य समाजवादाबाबतच आराखडा सादर केला होता. त्यात महत्त्वाचे उद्योगधंदे शासनाकडे असावेत, विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करून सर्व प्रौढ नागरिकांचा सक्तीने विमा उतरवावा. शेती व्यवसायावर राज्याची मालकी असावी. कोणी जमीनदार किंवा भूमीहीन नसावा. शेतजमीन सामुदायिक तत्त्वानुसार शेतकऱ्यांसाठी दिली जावी, इत्यादी अनेक गोष्टींचा समावेश करण्यात आला होता. यावरून आंबेडकर राज्य समाजवादाचे किती आग्रही होते हे दिसून येते.

**डॉ. आंबेडकरांच्या राज्य समाजवादाची वैशिष्ट्ये**

१. राज्यातील महत्त्वाचे व मौलिक उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करण्यात यावे. त्याचबरोबर आर्थिक नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी करून राज्याच्या उत्पन्नात वाढ करण्यात यावी आणि त्याचे न्यायपद्धतीने वाटप करावे.

२. भारत हा शेतीप्रधान देश आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी सामूहिक शेतीचा पुरस्कार डॉ. आंबेडकरांनी केला आहे.

३. डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीने समता हे सर्वश्रेष्ठ लोकशाही मूल्य असून त्याला वगळून समाजवादाचा विचार होऊ शकत नाही. त्यामुळे सामाजिक भेदभाव दूर करणे अत्यावश्यक आहे. भारताच्या संदर्भात तर समाजवादामध्ये आर्थिक समतेपेक्षा सामाजिक समता अधिक महत्त्वाची आहे.

४. डॉ. आंबेडकरांच्या मते, वस्तूच्या उत्पादनावर, वितरणावर आणि मूल्यावर राज्याचे नियंत्रण असावे आणि उत्पादनाचे वितरण न्याय्य रीतीने झाले पाहिजे.

५. राज्यसमाजवादामध्ये जन्माऐवजी गुणात्मक आधारावर व्यवसाय निवडण्याची संधी मिळते.

६. डॉ. आंबेडकरांनी राज्यसमाजवादाच्या माध्यमातून पुरस्कार करताना आर्थिक क्षेत्रात परिवर्तन होऊ शकते, यासाठी शासनाची भूमिका महत्त्वाची आहे हे स्पष्ट केले.

७. ग्रामीण सुधारणा करणे आणि त्याद्वारे कोट्यवधी ग्रामीण लोकांना राष्ट्रीय प्रवाहात आणणे, शहरी व ग्रामीण विकासात समतोल साधणे आवश्यक आहे.

८. राज्यसत्तेने शांतपणे व कायदेशीर मार्गांने सामाजिक, राजकीय व आर्थिक विषमतेचे निर्मूलन करावे. वंचित वर्गाना अधिक चांगल्या संधी द्याव्यात.

९. मागासवर्गीय जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची आर्थिक जबाबदारी केंद्र व राज्य सरकारने स्वीकारावी व त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करावी.

१०. मागासवर्गीय जातीचे स्वतंत्र खेड्यात पुनर्वसन करण्याच्या उदात्त हेतूने पडीक जमीन ताब्यात घेण्यासाठी नवीन घटनेतील तरतुदीनुसार पुनर्वसन आयोगाची स्थापना करण्यात यावी.

वरीलप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी राज्य समाजवादाची वैशिष्ट्ये स्पष्ट केले आहेत. यातून भारतीय सामाजिक व आर्थिक स्थितीचा विचार करून भारतासाठी राज्य समाजवाद व्यवहार्यपूर्ण आहे याची जाणीव करून दिली आहे. भारतातील आर्थिक, सामाजिक क्षेत्रामध्ये बदल करून स्वातंत्र्य, समता ही लोकशाही मूल्ये जोपासण्यासाठी राज्यसमाजवाद हाच पर्याय योग्य आहे अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली.

## ३.३ सारांश

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राजकारणात एक महत्त्वाचे विचारवंत आहेत. त्यांनी अनेक पदावर काम केले आहे. त्यांचे महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांनी भारतीय राज्यघटना तयार केली आहे. त्याचबरोबर भारतीय संसदीय लोकशाही व सामाजिक लोकशाही संबंधी मौलिक विचार मांडले आहेत. तसेच त्यांनी जातीव्यवस्थेसंबंधी चिकित्सकरित्या अभ्यास करून अनेक महत्त्वाचे विचार स्पष्ट केले आहेत. एकूणच त्यांच्या विचारांनी आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान दिले आहे. म्हणून त्यांचा

विचार अभ्यासणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, जातीव्यवस्था ही भारतामध्ये खोलवर रुजलेली आहे, ती व्यवस्था नष्ट केल्याशिवाय भारतीयांमध्ये ऐक्य निर्माण होणार नाही, समाजातील गरीब-श्रीमंत, उच्च-नीचतेचा भेद नष्ट केल्याशिवाय लोकशाही अस्तित्वात येणार नाही आणि राज्याने अनेक उद्योगधंदे हे राष्ट्रीयीकरण करून त्याचा विकास केल्याशिवाय राज्यसमाजवाद प्रस्थापित होणार नाही. त्यामुळे प्रामुख्याने स्वातंत्र्य-समता-बंधुता या तत्त्वाच्या आधारे लोकशाही बळकट करणे व जातीव्यवस्था नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करणे आवश्यक आहे अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

१. **समता** : प्रत्येकाला विकासाच्या संधी व समानता देणे

२. **सामाजिक लोकशाही** : सामाजिक दृष्टीकोणातून सर्वांना समान संधी असते

३. **संसदीय लोकशाही** : सर्व घटकांना राजकीय क्षेत्रात संधी देऊन त्याचा सर्वांगीण विकास करणे.

४. **समताधिष्ठित** : समतेवर आधारलेला

५. **जातव्यवस्था** : वेगवेगळ्या जातीचा समूह

६. **आंतरजातीय विवाह** : एक जातीतील व्यक्तीने दुसऱ्या जातीतील व्यक्तीबरोबर विवाह करणे.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्न

**प्रश्न १ : खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारीणी सभेची स्थापना ........... साली करण्यात आली.

२. १९३६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी ........... पक्षाची स्थापना केली.

३. डॉ. आंबेडकरांचा जन्म ........... या गांवी झाला.

४. डॉ. आंबेडकरांनी ........... विद्यापीठातून बी.ए.ची पदवी पूर्ण केली.

५. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दिक्षा ........... येथे घेतली.

५. डॉ. आंबेडकरांनी जातीव्यवस्थेसंबंधी लिहिलेला पहिला निबंध ........... .

६. अस्पृश्यता पाळणे कायद्याने गुन्हा आहे ही भारतीय राज्यघटनेच्या ........... कलमामध्ये तरतूद करण्यात आली आहे.

७. डॉ. आंबेडकरांनी जातीय व्यवस्था नष्ट करण्यासाठी ........... विवाह पद्धत बदलविण्याची सूचना केली.

८. हिंदू धर्मातील जातिव्यवस्था नष्ट होत नाही म्हणून आंबेडकरांनी ........... धर्माचा पुरस्कार केला.

९. डॉ. आंबेडकरांनी जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी ........... मंदिरात प्रवेश केला होता.

१०. जनतेच्या सामाजिक व आर्थिक जीवनात मुलभूत बदल घडवून आणणे म्हणजे .......... होय.

११. लोकशाहीचे रूपांतर ........... मध्ये होता कामा नये असे डॉ. आंबेडकर बजावतात.

१२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्ताधारी पक्षाबरोबर ........... पक्षाला महत्त्व दिले आहे.

१३. डॉ. आंबेडकरांनी लोकशाही संदर्भात ........... रोजी संसदेमध्ये भाषण दिले होते.

५. डॉ. आंबेडकरांनी ........... लोकशाहीचा पुरस्कार केला.

१४. ........... आधारित संसदीय लोकशाही डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे.

१५. रशियन क्रांती ........... साली झाली आहे.

१६. डॉ. आंबेडकरांनी ........... या पुस्तकामध्ये राज्यसमाजवादाचा पुरस्कार केला आहे.

१७. डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना ........... साली केली.

१८. राज्यसमाजवादामध्ये ........... ची भूमिका महत्त्वाची असावी असे आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

१. संसदीय लोकशाहीवर टिपा लिहा.

२. लोकशाहीविषयक विचार स्पष्ट करा.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीसंदर्भात केलेल्या विचाराची चर्चा करा.

४. सामाजिक लोकशाहीवर टीपा लिहा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१. कुबेर वा. ना. (१९७२) डॉ. आंबेडकर - विचारमंथन, केसरी प्रकाशन, पुणे.

२. समाज प्रबोधन पत्रिका ऑक्टोबर-डिसेंर २०१६, विशेषांक.

३. रघुवंशी राजेश (संपादक) (१९९८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, राजेश प्रकाशन, पुणे.

४. गायकवाड राजवंश, ज्ञानराज काशीनाथ (२०१३), महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर.

५. राव राघवेंद्र के. (२०१७) बाबासाहेब आंबेडकर, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

६. आंबेडकर भीमराव रामजी (२०१०-११) जातीचे निर्मूलन, प्रदीप रोडगे, नागपूर.

७. आंबेडकर भीमराव रामजी, घटनापरिषदेतील २९ नोव्हेंबर, १९४९ रोजीचे भाषण, प्रयास प्रकाशन, कोल्हापूर.

८. कीर धनंजय, (२००९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

## घटक – ४

# मानवेंद्रनाथ रॉय


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ मार्क्सवादाबाबतचे विचार

४.२.२ मूलगामी लोकशाही बाबतचे विचार

४.२.३ नवमानवतावाद

४.२.४ रॉय यांच्या विचारांचे मूल्यमापन

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्न

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


### ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला –

* एम. एन. रॉय यांच्या जीवनप्रवासाबाबत माहिती मिळेल.
* रॉय यांचे मार्क्सवादाबाबतचे विचार समजतील.
* रॉय यांचे नवमानवतावादाबाबतचे विचार स्पष्ट करता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

मानवेंद्रनाथ यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ भट्टाचार्य. त्यांचा जन्म १८९३ साली प. बंगालमधील चोवीस परगणा या जिल्ह्यात झाला. कलकत्ता येथील नॅशनल कॉलेजमध्ये शिकत असताना त्यांच्यावर महर्षी दयानंद सरस्वती, बंकिमचंद्र चटर्जी, अरविंद घोष, बिपीनचंद्र पाल यांच्या विचारांचा प्रभाव पडला व त्यांच्यामध्ये प्रखर राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली. राष्ट्रवादी विचाराच्या नरेंद्रनाथाचा संबंध याच काळात भूमिगत क्रांतीकारक प्रकाशचंद्र डे यांच्याशी आला आणि ते भूमिगत क्रांतिकारी चळवळीमध्ये ओढले गेले. अनेकदा पकडले गेले. परंतु पुराव्या अभावी सुटलेही. याच काळात काही क्रांतिकारक भारतीय स्वातंत्र्याच्या या सशस्त्र लढ्यामध्ये जर्मनीची मदत मिळेल ही अपेक्षा ठेवून होते. ही मदत मिळविण्याकामी प्रतिनिधी म्हणून नरेंद्रनाथ (रॉय) यांना पाठवावे असे ठरले आणि १९१५ साली सी. मार्टिन हे नाव धारण करून त्यांनी मायदेश सोडला. जर्मनी, जपान, चीन, अमेरिका, रशिया अशा अनेक देशांमधून भारतीय स्वातंत्र्यलढ्याला काही मदत मिळते का याचा ते सतत १५ वर्षे प्रयत्न करीत होते. (१९१६ साली अमेरिकेत गेले असताना धनगोपाल मुखर्जी या त्यांच्या जुन्या सहकाऱ्याने नरेंद्रनाथाला-मानवेंद्रनाथ हे नाव दिले. जे त्यांनी शेवटपर्यंत धारण केले.) शेवटी १९३० मध्ये डॉ. महमूद हे नाव धारण करून ते मायदेशी परतले. या १५ वर्षांत त्यांच्या विचारांमध्ये आमूलाग्र बदल झाले होते. अनेक ख्यातनाम विभूतींच्या विचारांचा, व्यक्तिमत्वाचा त्यांच्यावर प्रभाव पडला होता. त्यांच्या विचारांनी-व्यक्तिमत्वाने अनेक जागतिक दर्जाचे नेते प्रभावीतही झाले होते. परंतु यातून आपला भारतीय स्वातंत्र्याचा मूळ उद्देश सफल होत नाही अशी विफलता त्यांच्या मनात होती. मायदेशी राहूनच भारतीय स्वातंत्र्यासाठी काहीतरी करता येईल या विचारावर ते स्थिरावले होते. १९३१ मध्ये इंग्रजांनी त्यांना जुन्या खटल्यामध्ये अटक केली आणि १२ वर्षांची शिक्षा सुनावली. पुढे ती ६ वर्षांनी कमी करण्यात आली व ते १९३६ मध्ये मुक्त झाले. स्वातंत्र्याबाबतची त्यांची आस्था कमी झालेली नव्हती. यानंतरही ते राजकारणामध्ये सक्रीय राहिले. गांधीवाद, रॉय यांना प्रारंभीपासूनच अमान्य होता. परंतु यापुढील वैचारिक प्रवासामधून संसदीय लोकशाही आणि साम्यवादाच्या रूपातून कामगारांची हुकूमशाही या बाबीही त्यांनी अमान्य केल्या. यावर पर्याय म्हणून त्यांनी मूलगामी लोकशाहीचा विचार मांडला.

१९४६ पासून रॉय यांच्या जीवनातील अंतिम पर्वाची सुरुवात झाली होती. क्रांतिकारक ते साम्यवादी असा प्रवास संपला होता. परंतु मानवाच्या स्वातंत्र्याची ओढ संपलेली नव्हती. आजपर्यंतच्या जीवनप्रवासाचे व वैचारिक उत्क्रांतीचे फलीत नव्या विचारांच्या रूपाने मिळविण्याचा हा शेवटचा काळ होता. यातूनच नवमानवतावाद उदयाला आला. हा काळ त्या नवमानवतावादाच्या वैचारिक अधिष्ठानाचा काळ होता. १९४८ ते १९५४ हा अंतिम सहा वर्षांचा प्रवास त्यांचे नाव नवमानवतावादी म्हणून अजरामर करणारा ठरला. २५ मे १९५४ रोजी देहरादून येथे त्यांनी प्राण सोडले.

**रॉय यांचे प्रमुख ग्रंथ व लिखाण** : लहान मोठे असे रॉय यांनी १०० पेक्षा अधिक ग्रंथ लिहिले आणि अनेक नियतकालिके चालवली. यापैकी काही उल्लेखनीय ग्रंथ म्हणजे –

The Problem of India (1922)

India in Transition (1922)

The Future of Indian Politics (1926)

My Experience in China (1933, 1945)

Constitutution of India (1944)

Beyond Communism (1846)

New Humanism : A manifesto (1947) & (1953)

Radical Humanism (1952)

## ४.२ विषय विवेचन

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण मानवेंद्रनाथ रॉय यांच्या प्रमुख तीन विचारांवर प्रकाश टाकणार आहोत. यात त्यांचे मार्क्सवादाबाबतचे विचार, नवमानवतावादाबाबतचे विचार आणि मूलगामी लोकशाही बाबतचे विचार यांचा समावेश होतो. विचारांच्या स्पष्टीकरणासाठी आवश्यक असेल तेथे त्यांच्या इतर विचारांचाही संदर्भ दिला आहे.

### ४.२.१ मार्क्सवादाबाबतचे विचार

आपल्या परदेशगमनाच्या काळात रॉय अमेरिकेला गेले होते. तेथे त्यांची भेट लाला लजपतराय यांच्याशी झाली. दोघांनी एकत्र काम केले. दोन्ही व्यक्ती या समाजवादी विचार न मानणाऱ्या असतानाही तेथील परिस्थितीने रॉय आणि राय यांना समाजवादी व्यासपीठाच्या जवळ आणले. लाला लजपत राय यांनी समाजवादी विचारधारेच्या ग्रंथाची खरेदी केली. दोघांनी त्याचे वाचन केले आणि या माध्यमातून दोघांवर समाजवादी विचारांचा प्रभाव निर्माण झाला. महाविद्यालयीन जीवनापासूनच रॉय हे क्रांतिकारी चळवळीशी जोडले गेले असल्यामुळे आणि शोषितांवर होणाऱ्या अन्यायाचे परिमार्जन अपेक्षिले असल्याने रॉय यांना पुढील काळात मार्क्सवादाशी जुळवून घेणे कठीण गेले नसावे.

पहिल्या महायुद्धातील जर्मनीचा पराभव व रशियामधील साम्यवादी क्रांती या दोन घटनांचा परिणाम परकीय मदतीने भारताला स्वातंत्र्य मिळवून देऊ पाहणाऱ्या असंख्य क्रांतिकारक व जहाल नेत्यांवर झालेला होता. येणाऱ्या काळात रशिया भारताच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये सहाय्य करेल या आशेने अनेक क्रांतिकारक समाजवादी चळवळीकडे ओढले गेले. मानवेंद्रनाथ रॉय यापैकी एक होते.

#### (अ) रॉय आणि मार्क्सवाद

रॉय यांच्या जीवनातील मार्क्सवादाचे स्थान समजावून घेण्यासाठी आपणास त्यांच्या जीवनाचा प्रवास दोन पातळींवर अभ्यासावा लागेल.

१. मार्क्सवादी चळवळीचा सक्रिय कार्यकर्ता (सामान्य कार्यकर्ता – आंतरराष्ट्रीय नेता – चळवळीचा टिकाकार असा एक प्रावस)

२. राजकीय विचारवंत (मार्क्सवादी विचारांमधील निवडक सिद्धांतांचा पुरस्कर्ता व सुधारक म्हणून प्रवास.)

**मार्क्सवादी चळवळीचा सक्रिय कार्यकर्ता** : आपल्या अमेरिकेतील वास्तव्यात रॉय यांच्यावर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव पडल्याचे आपण पाहिले आहे. विशेषतः १९१८-१९१९ सालानंतर मार्क्सवादा रॉय यांनी जगतामध्ये आपले मोठे स्थान निर्माण केले होते. मेक्सिको मध्ये साम्यवादी पक्षाची स्थापना करण्याचे मोठे श्रेय त्यांना जाते. याच काळात मेक्सिकोमधील कॉमिन्टर्नचे प्रतिनिधी मायकेल बोरोडिन यांच्या सहवासात रॉय आले आणि त्यांनी आपल्या विचारांनी लेनिनच नाही तर सबंध आंतरराष्ट्रीय साम्यवादी जगताला प्रभावीत केले. १९२० सालच्या कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या दुसऱ्या अधिवेशनासाठी स्वतः लेनिनने रॉय यांना आमंत्रण दिले होते. या अधिवेशनातील रॉय यांच्या विचारांनी प्रभावीत होऊन लेनिनने रॉय यांच्यावर ब्रिटीश साम्राज्यातील वसाहतींमध्ये साम्यवादी क्रांतीसाठी पोषक वातावरण निर्माण करण्याचे मोठे काम सोपवले.

पुढे रॉय यांच्यावर कॉमिन्टर्नच्या वतीने चीनमध्ये साम्यवादी क्रांती घडवून आणण्याचे कार्य सोपवण्यात आले. परंतु याच कार्यावर असलेल्या इतर साम्यवादी प्रतिनिधींशी त्यांचे वैचारिक मतभेद झाले. ते रशियाला परतले. यानंतरच्या काळात त्यांचे साम्यवादी चळवळीच्या कार्यपद्धतीबाबत वैचारिक मतभेद शिगेला पोहोचले. १९२८ च्या सहाव्या कामिन्टर्न परिषदेला ते उपस्थित राहिले नाहीत. भारतातील साम्यवादी चळवळीबाबतही त्यांचे कॉमिन्टर्नसोबत मतभेद झाले. याचा परिणाम म्हणून स्टॅलिन याच्याशी त्यांचे मतभेद झाले. १९२९ च्या कॉमिन्टर्न अधिवेशनात त्यांना कार्यकारी मंडळावरून बाजूला करण्यात आले. १९३० साली ते डॉ. महमूद या नावाने रशियातून भारतात परतले. भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्यामध्ये साम्यवादी जगताकडून रॉय यांचा भ्रमनिरास झालेला होता. भारतीय राष्ट्रीय सभेमधून साम्यवादी गटाने बाहेर पडावे या कॉमिन्टर्नच्या विचारांना तिलांजली देवून ते पुढे राष्ट्रीय सभेच्या निवडणुकांमध्ये सक्रीय दिसले. म. गांधींसोबत बेबनाव झाल्यानंतर साम्यवादी गटाची स्थापना न करता १९४० साली त्यांनी रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षाची स्थापना केली. यावरून आपणास हे दिसते की रॉय यांनी भारतात आल्यानंतर अधिकच साम्यवादी चळवळीच्या राजकारणापासून दूर गेलेले होते.

**राजकीय विचारवंत** : रॉय यांच्या वैचारिक प्रवासाच्या बाबतीत मात्र असे दिसत नाही. साम्यवादी चळवळीच्या राजकारणापासून दूर राहिल्यानंतरही काही काळ त्यांच्यावर मार्क्सवादाचा प्रभाव कायम राहिला. मार्क्सने द्वंद्वात्मक भौतिकवाद, वर्गसंघर्ष, इतिहासाची भौतिक मीमांसा, अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत, कामगारांची क्रांती व वर्गविहीन-राज्यविहीन समाजरचना असे विचार मांडले. रॉय यांना मार्क्सवादामधील सर्वच तत्त्वज्ञान मान्य होते असे नाही.

रॉय यांच्यावर मार्क्सच्या भौतिकवाद, मानवतावाद आणि शोषणमुक्त समाजनिर्मिती या तीन विचारांचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो.

**भौतिकवाद** : ज्या घटकाचे अस्तित्व शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध करता येत नाही त्याचे अस्तित्व अमान्य करणे म्हणजे भौतिकवाद. रॉय हे कट्टर भौतिकवादी होते. दैव, नियती, आत्मा इत्यादी बाबी शास्त्रीय आधारावर सिद्ध करणे शक्य नसल्याने रॉय यांना ते अमान्य आहे.

**मानवतावाद** : मार्क्स हा एक श्रेष्ठ मानवतावादी होता. मानवाला समाज, राज्य व इतर संस्थांच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी मार्क्सने साम्यवादाचा पुरस्कार केलेला होता. रॉय यांना मार्क्सच्या तत्त्वज्ञानातील हे मुलभूत उद्दिष्ट मान्य होते.

**शोषणमुक्त समाज निर्माण करणे** : आपल्या इतिहासाच्या भौतिक मीमांसेमध्ये आणि अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांतामध्ये मार्क्सने आहेरे वर्गाकडून नाहिरे वर्गाचे सुरू असलेले अविरत शोषण मांडले आहे. इतिहासाची भौतिक मीमांसा आणि अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत या दोन्ही विचारांबाबतही रॉय फारसे सहमत नसले तरी या सिद्धांताचा उद्देश शोषणमुक्त समाज निर्माण करणे हा असल्यामुळे ते या उदात्त हेतूशी तत्त्वतः सहमत आहेत. भारतासारख्या देशात शोषणाचे मूळ अतिरिक्त मूल्य नाही तर जातीव्यवस्था व धर्मकारण राहिले आहे तेव्हा या दृष्टीने रॉय यांनी पुढे विचार मांडले आहेत.

वर उल्लेख केल्याप्रमाणे रॉय यांना मार्क्सवादातील सर्वच तत्त्वज्ञान मान्य होते असे म्हणणे चुकीचे ठरेल. काही बाबींचे रॉय यांनी समर्थन तर काहींचा उघड विरोध केलेला दिसतो. मार्क्सच्या वर्गसंघर्ष, इतिहासाची भौतिक मीमांसा, अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत, कामगारांची क्रांती व वर्गविहीन-राज्यविहीन समाजरचना अशा अनेक विचारांशी रॉय असहमत होते. ही असहमती मार्क्सवादावरील टीका या सदरामध्ये विस्ताराने पाहणार आहोत.

### (ब) मार्क्सवादावरील टीका

मार्क्सवादाचे खंदे समर्थक रॉय आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात मात्र मार्क्सवादावर टीका करताना दिसतात. पैकी प्रमुख टीका पुढीलप्रमाणे -

१. मार्क्सच्या अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत रॉय यांना मान्य नाही. अतिरिक्त मूल्याच्या निर्मितीशिवाय अधिक उत्पादन कसे शक्य आहे आणि अधिक उत्पादनाशिवाय समाजाचा आर्थिक विकास अशक्य आहे. भांडवलदार हे अधिकच उत्पन्नच पुढे व्यवसायात लावतो. ज्यामुळे त्याचा व्यवसाय व पर्यायाने कामगारांची मागणी, उत्पादनात वाढ व आर्थिक विकास असे चक्र फिरताना दिसते. एकंदरीतच अतिरिक्य मूल्याच्या निर्मितीला मार्क्स ज्याप्रमाणे अनैतिक मानतो त्याप्रमाणे रॉय हे अनैतिक मानत नाहीत. उलटपक्षी हे अतिरिक्त मूल्य (नफा) हेच पुढे व्यवसायवाढीसाठी आवश्यक आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

२. रॉय यांना मार्क्सने केलेली इतिहासाची भौतिक मीमांसा अमान्य होती. रॉय यांच्या मते भौतिक साधनांबरोबरच नैसर्गिक घटकांचीही इतिहासाच्या अध्ययनात तितकीच आवश्यकता असते. अनेक नैसर्गिक घटनांनी इतिहासाला वेगळी कलाटणी मिळाली आहे. परंतु मार्क्स केवळ भौतिक गोष्टींना महत्त्व देतो अशा प्रसंगी इतिहासाचा परिपूर्ण आकलन होणार नाही. तसेच मार्क्स ऐतिहासिक भौतिकवादामध्ये केवळ आर्थिक तत्त्वांना परिवर्तनाचे प्रेरक मानतो. मात्र रॉय यांच्या मते मार्क्सचे हे विचारही एकांगी आहेत. ऐतिहासिक परिवर्तनामध्ये जशी आर्थिक घटकांची भूमिका महत्त्वाची आहे, तशीच सांस्कृतिक, बौद्धिक, जैविक अशा अनेक घटकांची भूमिकाही महत्त्वाची आहे. मात्र मार्क्स याकडेही दुर्लक्ष करतो, म्हणून मार्क्सचे ऐतिहासिक भौतिकवादाबाबतचे विचार अपूर्ण आहेत.

३. रॉय यांना मार्क्सने समाजाचे आहेरे आणि नाहिरे अशा दोन भागात केलेली विभागणी अमान्य आहे. रॉय यांच्या मते असे करून मार्क्स समाजातील अतिशय मोठ्या व निर्णायक मध्यमवर्गाकडे दुर्लक्ष करतो. विशेषतः १९ व्या आणि २० व्या शतकात मध्यम वर्गाची भूमिका जागतिक शांतता आणि विकासामध्ये महत्त्वाची राहिली आहे. एवढेच नाही तर अनेक देशांनी लोकशाहीचे मूल्य स्वीकारले. त्यामुळे राष्ट्राच्या निर्णयप्रक्रियेमध्येही मध्यम वर्गाची भूमिका महत्त्वाची ठरू लागली.

वर्गसंघर्षाचे वर्णन मार्क्स ज्या प्रमाणे करतो त्या प्रमाणे हे वर्गसंघर्ष साम्यवादी क्रांती झालेल्या देशांमध्ये दिसून येत नाही. उलट रशिया व चीन या औद्योगिकदृष्ट्या अप्रगत देशांमध्ये साम्यवादी क्रांती झाली. येथे अनुक्रमे लेनिन आणि माओ-त्से-तुंग यांना कामगारांऐवजी शेतकरी व इतर वर्गांची मदत घ्यावी लागली आहे.

तसेच वर्गा-वर्गामधील संबंधाच्या बाबतीतही रॉय आणि मार्क्स यांच्या मतांमध्ये भिन्नता दिसते. रॉय यांच्या मते मार्क्स फक्त संघर्षावर भर देतो. मात्र असे वर्णन एकांगी ठरेल. वर्गा-वर्गामध्ये सहकार्य व समन्वयाच्या भावनेमधून मानव विकास साध्य करू शकला आहे, असे रॉय म्हणतात.

४. कामगारांची क्रांती आणि राज्यविहीन समाजरचना याबाबतचे मार्क्सचे विचार रॉय यांनी अमान्य केले आहेत. रशियान साम्यवादी क्रांतीनंतर जसजसा काळ जात होता तसतसा मार्क्सच्या राज्यविहीन समाजरचनेबाबतच्या विचारांचा मर्यादा स्पष्ट होत होत्या. त्यामुळे हे विचार रॉय यांना मान्य नव्हते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे रशिया आणि रशियाच्या प्रेरणेने ज्या देशात साम्यवादी क्रांती झाली त्या देशांमध्ये कामगारांची सत्ता आली. मात्र मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे यानंतरची वर्गविहीन आणि राज्यविहीन समाजरचना अस्तित्वात येऊ शकली नाही. तसेच या देशांमध्ये देखील भांडवलशाहीचा अंत झाला नाही. फक्त भांडवलदार नियंत्रित भांडवलशाही ऐवजी साम्यवादी पक्ष नियंत्रित भांडवलशाही निर्माण झाली. तेव्हा मार्क्सच्या भांडवलशाहीचा अंत आणि राज्याचा अंत या दोन्ही भविष्यवाणी असत्य ठरल्या. वास्तविक पाहता राष्ट्रराज्याच्या या वैश्विक युगामध्ये राज्यविरहित भूभाग राहूच शकत नाही हे सत्य आहे.

अशा प्रकारे मार्क्सवादातील प्रमुख विचारांवरच पुढे जावून रॉय यांनी टीका केलेली दिसते.

### ४.२.२ मूलगामी (सुसंघटित) लोकशाही

मार्क्सप्रमाणे मनुष्य हाच रॉय यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. परंतु मार्क्सच्या विचारांचा आधार घेऊन निर्माण झालेल्या व्यवस्थांमध्ये व्यक्तीला समाज आणि राज्याच्या बंधनातून मुक्त (स्वतंत्र) करण्याऐवजी अधिक पारतंत्र्यात ढकलले गेले, जे रॉय यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिले. तेव्हा एक आदर्श शासन व्यवस्था कोणती असेल या प्रश्नाचे उत्तर शोधत ते मूलगामी लोकशाहीपर्यंत येऊन पोहोचले. आपल्या 'न्यू ह्युमॅनिझम : ए मॅनिफेस्टो' (१९४७) या ग्रंथामध्ये नवमानवतावादाची जी २२ तत्त्वे सांगितली आहेत त्यापैकी १४ ते २२ दरम्यान मूलगामी लोकशाही किंवा संघटीत लोकशाही बाबत रॉय यांनी मांडणी केली आहे. नवमानवतावाद अस्तित्वात येण्यासाठीची सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती कशा प्रकारची असावी याबाबत हे विवेचन दिसते. रॉय यांचे मूलगामी लोकशाही किंवा सुसंघटित लोकशाही बाबतचे विचार पाहण्याआधी त्यांनी उदारमतवादी लोकशाही आणि साम्यवादी शासनव्यवस्थेवर केलेली टीका पाहणे आवश्यक ठरते.

#### (अ) उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेतील दोष

(i) **आधारभूत मूल्यांपासून फारकत** : लोकशाहीशासनाची मूल्ये तत्त्वतः खूप चांगली आहेत. लोकसहभागावर आधारीत ही शासनव्यवस्था आहे. जिचा उद्देश व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समस्या आणि बंधुतेच्या आधारे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आवश्यक (न्याय) परिस्थिती निर्माण करणे हा असतो. परंतु रॉय यांच्या मते समकालीन उदारमतवादी लोकशाहीत या उद्देशाची पूर्तता होताना दिसत नाही. वर्तमान लोकशाही ही स्वातंत्र्य, समता आणि बंधूता या मूल्यांपासून दूर जाताना दिसते आणि जरी ह्या मूल्यांची प्रचिती आलीच तर ती ठरावीक वर्गासाठी असते. सामान्य जनतेला लाभदायक अशी परिस्थिती निर्माण करण्यात ही व्यवस्था अपयशी ठरली आहे.

(ii) **प्रातिनिधीक लोकशाहीमुळे दोषनिर्मिती** : राज्याच्या भूप्रदेश आणि लोकसंख्येच्या विस्तारामुळे प्रत्यक्ष लोकशाहीची जागा प्रातिनिधीक लोकशाहीने घेतलेली आहे. हे लोकप्रतिनिधी सर्वसामान्यांचे हितसंबंध जोपासताना दिसत नाहीत. उलटपक्षी ते धनदांडग्यांचे हितसंबंध अधिक हिरीरीने जोपासतात. सर्वसामान्य जनतेचा सहभाग दैनंदिन राज्यकारभारात अशक्य असल्यामुळे केवळ निवडणुकीपुरताच नेत्यांचा व्यवहार बदललेला दिसतो.

(iii) **आर्थिक विषमतेची निर्मिती** : उदारमतवादी लोकशाहीत अश्या प्रकारे नेत्यांबरोबरच एक भांडवलदारांचाही एक गट निर्माण झालेला दिसतो. सत्ता कोणाचीही असो या वर्गाचे हितसंबंध जोपासले जातातच. यामुळे भांडवलदार अधिक श्रीमंत आणि कामगार अधिक गरीब बनत जातो. अशा प्रकारची आर्थिक विषमतेवर आधारीत व्यवस्था ही स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेला मारक ठरते.

(iv) **पक्षपद्धतीची निर्मिती :** प्रातिनिधीक लोकशाहीमुळे साहजिकच राजकीय पक्षांची निर्मिती होते. रॉय यांच्या मते पक्षपद्धती ही अतिशय घातक आहे. राजकीय पक्ष हे सत्ता हस्तगत करण्यासाठी साम, दाम, दंड, भेद या सर्व वाममार्गांचा वापर करतात. तेव्हा असे पक्ष जनतेसोबत न्याय कसे करू शकतील. तसेच पक्षपद्धतीमुळे सत्तेचे केंद्रीकरण होत असते आणि बहुसंख्यांकांचे अल्पसंख्यांकावर अधिराज्य निर्माण होऊ शकते. या अर्थाने पक्षपद्धती ही व्यक्तिस्वातंत्र्यासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करण्यामध्ये बाधा आहे.

अशा प्रकारे रॉय यांच्या मते तत्त्वतः उदारमतवादी लोकशाही ही कितीही चांगली वाटत असली तरी प्रत्यक्षात मात्र तिच्यामध्ये अनेक दोष आहेत.

**(ब) साम्यवादी शासनव्यवस्थेतील दोष :** रॉय हे मार्क्सवादाने प्रभावित झालेले विचारवंत होते. या विचारांवर आधारीत व्यवस्था प्रथम रशियामध्ये निर्माण झाली. जिचा रॉय यांनी जवळून अनुभव घेतला. नंतर ती चीनसह अनेक देशात रशियाच्या मदतीने निर्माण करण्यात आली. भारतातही स्वातंत्र्यानंतर साम्यवादी शासन निर्माण व्हावे अशी रशियाच्या नेत्यांची धारणा होती. परंतु रॉय यांचे काही बाबतीत साम्यवादी नेत्यांसोबत मतभेद होते. यातूनच त्यांनी सैद्धांतिक साम्यवाद आणि निर्माण झालेल्या साम्यवादी व्यवस्था यांच्यामधील फरक आपल्या विचारांमधून व लेखणीमधून जगासमोर आणण्याचा प्रयत्न केला असे करताना त्यांनी साम्यवादी व्यवस्थेमधील अनेक दोष दाखवून दिले.

(i) ज्या समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी साम्यवादाची मांडणी झालेली आहे त्या प्रकारची समताधिष्ठित समाजाची निर्मिती साम्यवादी राष्ट्रांमध्ये झाली नाही. उलट भांडवलदार आणि कामगारांबरोबर तेथे साम्यवादी सत्ताधाऱ्यांचा एक तिसरा वर्ग निर्माण झालेला दिसतो.

(ii) ज्या व्यक्तिस्वातंत्र्यासाठी मार्क्स साम्यवादाची मांडणी करतो त्या व्यक्तिस्वातंत्र्याची साम्यवादी व्यवस्थेत गळचेपी झाली. साम्यवादी पक्षाची एकपक्षीय हुकूमशाही निर्माण झाली. साम्यवादी पक्षाच्या ध्येयधोरणाविरुद्ध व्यक्तीला बोलण्याचेही स्वातंत्र्य राहिले नाही.

(iii) मार्क्स कामगारांच्या हुकूमशाहीनंतर राज्यव्यवस्था टप्प्याटप्प्याने नष्ट होईल हे भाकीत करतो. मात्र प्रत्यक्षात उलटेच होताना दिसत आहे. राज्यव्यवस्था नष्ट होण्याऐवजी अधिक बळकट होत आहे आणि राज्यव्यवस्थेचे व्यक्तीवरील नियंत्रण शिथील होण्याऐवजी अधिक कठोर होत आहे.

अशा प्रकारे रॉय यांनी समकालीन साम्यवादी व्यवस्थेमधील दोष दाखवून दिले आहेत.

**(क) मूलगामी लोकशाही**

एकीकडे उदारमतवादी लोकशाही आणि दुसरीकडे साम्यवादी व्यवस्था या दोन्हीही व्यक्तीला जे हवे ते देण्यामध्ये असमर्थ ठरल्या आहेत. अशा प्रसंगी एका वेगळ्या शासनव्यवस्थेची जगाला आवश्यकता आहे हे ओळखून रॉय यांनी मूलगामी लोकशाहीची मांडणी केलेली आहे. ती पुढीलप्रमाणे :

**मूलगामी लोकशाहीची वैशिष्ट्ये**

**१. व्यक्तिस्वातंत्र्य** : मार्क्सवाद असो की लोकशाही असो व्यक्तीला तिच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करून देणे हेच दोन्ही विचारप्रणालीचे अंतिम साध्य आहे. परंतु दोन्ही विचारप्रणाली यामध्ये अपयशी ठरल्या. व्यक्तीच्या विकासासाठी स्वातंत्र्याची आवश्यकता आहे. त्यामुळेच व्यक्तिस्वातंत्र्य हे लोकशाही आणि साम्यवाद दोन्ही व्यवस्थांचे मुलभूत मूल्य राहिले आहे. परंतु दोन्ही व्यवस्थांमध्ये प्रातिनिधीक शासनपद्धतीच्या उदयामुळे आणि विकासामुळे व्यक्ती आपल्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते स्वातंत्र्य उपभोगू शकत नाही. त्यातल्या त्यात लोकशाहीत व्यक्तिस्वातंत्र्याला अनन्यसाधारण महत्त्व असले तरी लोकशाहीतील केवळ शासन निवडताना लोकमताचा विचार केला जातो. मात्र पुढील पाच वर्षांसाठी लोकमताचा कौल घेतला जात नाही. सामान्य लोकांना शासकीय निर्णयप्रक्रीयेत समाविष्ट करून घेतले जात नाही. तेव्हा रॉय यांनी खऱ्या अर्थाने व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारीत मूलगामी लोकशाहीची मांडणी केलेली आहे. ज्यामध्ये व्यक्तीला आवश्यक तेथे शासनाच्या निर्णयप्रक्रियेमध्ये आपला सहभाग नोंदवता येईल. यासाठी व्यक्तीमधील सुप्त शक्तींची आणि बौद्धिकतेची जाणीव निर्माण होण्यासाठीची आवश्यक ती परिस्थिती निर्माण करावी लागेल. व्यक्तीवरील राज्य, समाज, धर्म आणि इतर संस्थांची बंधने कमी केली, तरच खऱ्या अर्थाने व्यक्तीस्वातंत्र्याची परिस्थिती निर्माण होईल आणि व्यक्तिमत्वाचा खऱ्या अर्थाने विकास होईल. अशा व्यक्ती प्रत्यक्ष सहभागाद्वारे चांगल्या प्रकारे शासनाचे संचालन करू शकतात, यावर रॉय यांचा विश्वास आहे.

**२. लोकसमितींना प्राधान्य** (People's Committees) : व्यक्तिस्वातंत्र्य अबाधीत ठेवायचे असेल तर निरंतर लोकसहभागाची व्यवस्था करणे आवश्यक ठरते. यातूनच लोकसमितींची कल्पना पुढे आली. १९४४ साली रॉय यांनी भारतीय संविधानाचा जो आराखडा मांडला. त्यामध्ये राजकीय पक्षांऐवजी लोकसमित्यांची निर्मिती केली जाईल. लोकसमित्या गाव/शहर पातळीवरील लोकांकडून निर्माण केल्या जातील. यासाठी लोकसंख्या निर्धारित केली जाईल आणि या लोकसमित्यांच्या माध्यमातून सर्व स्तरावरील शासनांची निर्मिती होईल. प्रत्यक्ष राज्यकारभारात या लोकसमित्यांना अत्यंत महत्त्वाचे अधिकार असतील. लोकसमित्यांनी निवडलेल्या लोकप्रतिनिधींना असमाधानकारक कार्यामुळे परत बोलावणे (Right to Recall), एखाद्या नवीन कायद्याच्या निर्मितीचा प्रस्ताव मांडणे (Initiate Legislation) कार्यकारी मंडळाच्या निर्णयाबाबत/कार्याबाबत जनतेकडून कौल (सर्वमत, Referendum) मागणे ही काही महत्त्वाची कार्ये लोकसमित्या पार पाडतील. केंद्र शासनाने घेतलेल्या एखाद्या निर्णयाच्या संदर्भातही सर्वमताची मागणी करण्याचा हक्क लोकसमित्यांना मिळावा असे रॉय यांचे मत हाते.

यातूनच खऱ्या अर्थाने गाव/शहर पातळीवरील लोकसमित्यांना जबाबदार अशी त्रिस्तरीय शासनव्यवस्था निर्माण होईल. या लोकसमित्या स्थनिक लोकांच्या दैनंदिन संपर्कात असल्यामुळे सामान्य लोकांना शासनकार्यात सहभाग नोंदवणे सोपे जाईल, असे रॉय यांचे मत होते.

**३. पक्षपद्धतीला विरोध** : पाश्चात्य लोकशाही आणि साम्यवादी पक्षाची एकपक्षीय हुकूमशाही पाहिल्यानंतर रॉय यांनी पक्षपद्धतीला कडाडून विरोध केलेला आहे. दोन्ही शासनप्रकारामध्ये पक्षपद्धती ही व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी करणारी असते. सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या मताला कोणतेही महत्त्व उरत नाही. पक्षपद्धतीमध्ये कमालीची केंद्रीकरणाची प्रवृत्ती असते. पक्ष कोणताही असो पक्षातील उच्च पदस्थ पदाधिकाऱ्यांच्या आज्ञांचे पालन उर्वरीतांनी करणे बंधनकारक असते, अन्यथा तो पक्षशिस्तीचा भंग समजला जातो. उच्चपदस्थ पदाधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयांच्या विरोधात मतप्रदर्शन केले तर पक्षविरोधी कार्यवाही म्हणून कार्यकर्त्यांना पक्षातून काढून टाकले जाते.

एखादा पक्ष जेव्हा सत्तेवर येतो आणि राष्ट्रहित आणि पक्षहित यापैकी एकाची निवड अनिवार्य ठरते, अशा प्रसंगीही अनेक वेळा पक्षहिताला प्राधान्य दिल्याचे दिसते. वास्तविक हे पक्षहित म्हणजे पक्षश्रेष्ठींचे हित असते. बहुतांश वेळा पक्षाची मूलभूत विचारप्रणाली आणि पक्षनेत्याचे हित यामध्येही विचारप्रणालीचा त्याग करून पक्षनेत्याचे हित जोपासले जाते. पक्षपद्धती किती केंद्रीभूत असते याचा प्रत्यय येतो. म्हणून रॉय पक्षपद्धतीला विरोध करून याऐवजी स्थानिक पातळीवर अधिक जबाबदार, अधिक विकेंद्रित आणि अधिक संघटीत अशा लोकसमित्यांची शिफारस करतात.

**४. नवीन अर्थव्यवस्था** : जगातील अर्थव्यवस्थांची विभागणी भांडवली किंवा समाजवादी अर्थव्यवस्थांमध्ये झालेली होती. परंतु दोन्ही अर्थव्यवस्थांचे आपापले फायदे-तोटे आहेत तेव्हा दोन्ही अर्थव्यवस्थांमधील दोष दूर करून एक नवीन अर्थव्यवस्था रॉय सुचवितात. याला ते **सहकारी अर्थव्यवस्था** असे नाव देतात. उत्पादनाच्या साधनांची मालकी भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये भांडवलदाराकडे असते तर साम्यवादी किंवा समाजवादी अर्थव्यवस्थांमध्ये ती राज्याकडे असते. कामगार हा या दोन्ही व्यवस्थेत या मालकीपासून वंचितच राहतो. याउलट सहकारी अर्थव्यवस्थेत मालक आणि कामगार असे वर्ग नसतील, तर सर्वांच्या सहकारातून असंख्य सहकारी संस्था तयार केल्या जातील. त्यामुळे अर्थातच उत्पादनांच्या साधनावर समाजाची मालकी प्रस्थापित होईल. यामुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक विकेंद्रीकरण होईल आणि आर्थिक समानता प्रस्थपित करणे सोपे जाईल.

रॉय आर्थिक नियोजनाचाही पुरस्कार करतात. मात्र त्यांना येथे साम्यवादी राष्ट्रांप्रमाणेच आर्थिक नियोजन अपेक्षित नाही तर उत्पादनात वाढ व्हावी आणि संपत्तीचे समान वाटप व्हावे यासाठी त्यांना आर्थिक नियोजन हवे आहे. नियोजना अभावी भांडवलशाही फोफावेल. नियोजनाद्वारे आपण मिळालेल्या नफ्याचा विनियोग शिक्षण, आरोगय, ग्राम-नगर विकास अशा समाजकल्याणाच्या कामी करणे शक्य होईल.

**५. शिक्षणाद्वारे राजकीय प्रयोजन** : व्यक्तीकेंद्रीत आणि सहभागी तत्त्वावर आधारीत संघटीत लोकशाहीत व्यक्तींचा समाजकार्यात आणि राजकारणात सहभाग अत्यावश्क ठरतो. परंतु प्रातिनिधीक लोकशाहीत सर्वसामान्य व्यक्ती यापासून स्वतःला दूर ठेवताना दिसतात. हे कार्य आपले नसून आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे आहे असे त्यांचे मत असते. आपल्या सहभागी लोकशाहीत रॉय यांना हे

अपेक्षित नाही. राज्य हे व्यक्तीचे विकसित स्वरूप आहे आणि प्रत्येक व्यक्ती उत्तम प्रकारे शिक्षीत झाली, आपापल्या हक्क आणि कर्तव्याची जाणीव तिला झाली व ती समाजकार्यात आणि राजकारणात आपापली भूमिका पार पाडू लागली तरच सहभागी लोकशाही यशस्वी होऊ शकते. यासाठी व्यक्तीच्या मनातून प्रथम हा गैरसमज काढून टाकला पाहिजे की राज्य केवळ लोकप्रतिनिधींनी करावे. हे कार्य शिक्षणातूनच साध्य होणार आहे. म्हणून उत्तम व नियोजीत शिक्षणाद्वारे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास करून तिला सहभागी लोकशाहीत सहभागी होण्यासाठी पात्र बनवले पाहिजे, हा सहभाग वेगवेगळ्या पातळीवरचा असू शकतो, मात्र पात्र व्यक्तींची निर्मिती आणि पात्र व्यक्तींना राजकीय सहभागासाठी प्रथम पसंती हे सहभागी लोकशाहीची वैशिष्ट्य असेल.

अशा प्रकारे रॉय यांनी प्रचलित शासनव्यवस्थांमधील दोषांकडे लक्ष वेधून भारतासाठी एक नवीन प्रकारची सहभागी लोकशाहीची कल्पना मांडली आहे.

### ४.३.३ नवमानवतावाद

रॉय यांचे नाव आज नवमानवतावादाला पर्यायी बनले आहे, ते त्यांच्या उत्तरार्धात त्यांनी केलेल्या नवमानवतावादाच्या मांडणीमुळे. मार्क्सवादाच्या प्रभावात ते त्या सिद्धांतातील मानवतावादी मूल्यांमुळेच आले होते. मार्क्सवादापासून दूर होत असताना सुरुवातीला रॉय यांनी मूलगामी मानवतावादाची मांडणी केलेली दिसते. कालांतराने या विचारांना त्यांनी अधिक शास्त्रीय स्वरूप प्रदान करून नवमानवतावादाची मांडणी केली.

१९३६ ते १९४६ या दहा वर्षांमध्ये त्यांच्यामध्ये जे वैचारिक परिवर्तन झाले त्याचे प्रतिबिंब आपणास त्यांच्या Beyond Communism (1946) या ग्रंथात पहावयास मिळते. या ग्रंथात त्यांनी मार्क्सवादातील मूलभूत सिद्धांत तसेच त्यांच्यावर आधारीत प्रस्थापित शासनांमधील दोष प्रखरपणे मांडले आणि मार्क्सवाद तथा साम्यवादी शासने ही मानवतावाद या मार्क्सच्याच मूलभूत तत्त्वापासून कशा प्रकारे फारकत घेत आहेत हे ही मांडले. अनेक अभ्यासकांच्या मते हा कालावधी त्यांच्या मूलगामी मानवतावादाचा होता. पुढे म्हणजे १९४७ मध्ये त्यांनी १९५३ मध्ये दुसरी आवृत्ती काढली. दरम्यानच्या काळात त्यांनी १९५२ मध्ये Radical Humanism (मूलगामी मानवतावाद) हा ग्रंथही लिहिला. मूलगामी मानवतावाद आणि नवमानवता हे विचार प्रथमदर्शनी भिन्न भिन्न वाटत असले तरी यांचे वैचारिक अधिष्ठान एकच आहे. म्हणून अभ्यासक हे दोन्ही सिद्धांत एकमेकाला पर्यायवाचक आहेत असे मानतात.

New Humanism या ग्रंथामध्ये रॉय यांनी पहिल्या भागात साम्यवादी आणि भांडवली व्यवस्थांमधील दोषांची मांडणी केली आहे. दुसऱ्या भागात मूलगामी मानवतावादाची आणि संघटीत लोकशाहीची मांडणी केलेली आहे. ग्रंथाच्या शेवटी परिशिष्टांमध्ये त्यांनी मूलगामी मानवतावादाची २२ तत्त्वे आणि त्यावर आधारीत नवमानवतावाद कशा प्रकारे अंमलात आणावा याची मांडणी केलेली दिसते. नवमानवतावादाची काही प्रमुख तत्त्वे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**नवमानवतावादाची मूलतत्त्वे**

**१. व्यक्ती हा केंद्रबिंदू :** रॉय यांच्या विचारांचा प्रामुख्याने १९३६ नंतरच्या कालावधीत व्यक्ती हाच केंद्रबिंदू राहिला आहे. नवमानवतावादाची निर्मितीच मुळात व्यक्तीला स्वातंत्र्य, समता, बंधूता आणि न्याय मिळवून देण्यासाठी आहे. हे कार्य समाज आणि राज्याचे असल्यामुळे त्यांचे कार्य केवळ साधनापर्यंतच मर्यादित आहे. साधनांचा उपयोग साध्यापर्यंत जाण्यासाठी होत नसेल तर व्यक्तीला साधनांमध्ये बदल करण्याचा नैसर्गिक हक्क आहे. मानवाने आपले जीवन सुखकर करण्यासाठी अनेक संस्थांची निर्मिती केली. परंतु कालांतराने याच संस्था व्यक्तीच्या विकासाच्या विरोध काम करू लागल्या. विषमतेवर आधारीत सामाजिक-आर्थिक व राजकीय मूल्य, जाचक नियमांची निर्मिती करणारी शासन-व्यवस्था, पोथीनिष्ठ आणि चिकित्सेला विरोध करणारे धर्म यामुळे व्यक्तीविकासामध्ये बाधा निर्माण होऊ लागली. मानवतावादात या बाधांचे निर्मूलन अपेक्षित आहे.

**२. भौतिकवाद आणि वैज्ञानिक दृष्टिकोन :** मानवतावाद हा मानवी सभ्यतेसाठी नवा नाही. अतिप्राचीन काळापासून मानवी विकासाची कारणे शोधली तर त्यामध्ये एक कारण मानवतावादाची प्रेरणा हे होतेच. परंतु या मानवतावादाचे स्वरूप दैवी-आध्यात्मिक-गूढ अशा स्वरूपाचे होते. या मानवतावादाला भौतिकवादाचे आणि वैज्ञानिकतेचे अधिष्ठान देण्याचे काम रॉय यांनी केले.

मानवी विकासाचे, मानवी सहजीवनाचे श्रेय मानवाच्या बुद्धिप्रामाण्यवादाला जाते. मानवाकडे बुद्धी आणि विवेक या दोन बाबी आहेत, यांच्या आधारावरच मानवाने वैज्ञानिक प्रगती केली आहे. १६ व्या शतकानंतर युरोपने जी प्रगती केली व जगावर अधिराज्य केलेले ते त्यांच्या भौतिकवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोणामुळेच. भारतालाही या पारतंत्र्यातून बाहेर पडावयाचे असेल आणि स्वतंत्र व्हावयाचे असेल तर त्याचा प्रवास ज्ञान-सत्य-स्वातंत्र्य असाच असेल. आणि ज्ञान प्राप्तीसाठी किंवा सत्यापर्यंत जाण्यासाठी मानवाला दैवी-गूढवादी-अध्यात्मिक या ऐवजी भौतिकवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या मार्गानेच जावे लागेल.

विश्वातील घटनांच्या पाठीमागे निश्चित कार्यकारणभाव असतो. तो वैज्ञानिक दृष्टिकोणाद्वारे शोधला की आपणास सत्य कळते. ज्ञानप्राप्ती होते. १९ व्या शतकात ब्रिटिशांचे भारतावरील राज्य हे ईश्वर वरदान आहे, हे राज्य असेच चालावे' अशी धारणा होती. ब्रिटिशांच्या माध्यमातून होत असलेल्या समाजसुधारणांना समर्थन करणे ही यामागची भूमिका होती. परंतु अशा प्रकारच्या अंधश्रद्धेमधून केवळ कायमचे पारतंत्र्यच मिळू शकते आणि पिंजरा कितीही मूल्यवान असो तो पिंजराच असतो. तेव्हा भारताला स्वातंत्र्य प्राप्त करावयाचे असेल तर ब्रिटिशांपुढे भारत पराभूत होण्यामागचा कार्यकारणभाव शोधून आपली कमकुवत स्थाने बलस्थानांमध्ये परावर्तित करणे हाच स्वातंत्र्यापर्यंत जाण्याचा म्हणजे मूलगामी मानवतावादापर्यंत जाण्याचा मार्ग होय.

### ३. मानवाच्या मुलभूत प्रेरणा – स्वातंत्र्य आणि सत्य

रॉय यांच्या मते स्वातंत्र्य आणि सत्य या मानवाच्या मूलभूत प्रेरणा आहेत. पैकी स्वातंत्र्याला भावनात्मक तर सत्याला ज्ञानात्मक आधार असतो.

'मानवी स्वातंत्र्य म्हणजे मनुष्याची बौद्धिक क्षमता विकसित करण्याच्या मार्गात असलेले अडथळे दूर करणे अशी रॉय स्वातंत्र्याची परिभाषा करतात. तेव्हा स्वातंत्र्याचा संबंध बुद्धिच्या विकासाशी जोडतात. दुसऱ्या ठिकाणी ते म्हणतात की, 'अधिक चांगले व समृद्ध जीवन जगण्यासाठी माणसाची अखंडपणे चाललेली जी धडपड आहे तिच्या मागे स्वातंत्र्याची प्रेरणा आहे.'

ज्ञानप्राप्तीमधून बौद्धिक क्षमतांचा विकास होतो व हाच मार्ग मानवाला सत्यापर्यंत घेऊन जातो. या अर्थाने सत्य ही काही आध्यात्मिक संकल्पना नव्हे तर मनावाला ज्ञानप्राप्तीमधून आलेली अनुभूती आहे. सत्याला वैज्ञानिक आधार आहे. जे विज्ञानाच्या कसोटीवर सिद्ध करता येते तेच सत्य. सत्याचा शोध ही मानवी विकासाची पूर्वअट असते. जोपर्यंत मानवाला विज्ञानाच्या आधारावर नैसर्गिक घटनांचा कार्यकारणभाव शोधता आला नाही तोपर्यंत तो खऱ्या अर्थाने विकास करू शकला नाही. मात्र १६ व्या शतकात युरोपात प्रथम वैचारिक क्रांती झाली व नंतर औद्योगिक क्रांती झाली. ज्यामुळे मनुष्य अंधश्रद्धेच्या अंधकारमय पारतंत्र्यामधून बाहेर आला. हे सर्व होऊ शकले ते मानवाच्या स्वातंत्र्य व सत्याप्रती असलेल्या त्याच्या अंतःप्रेरणेमुळेच.

### ४. बुद्धिप्रामाण्यता

निसर्गाने मानवाला बुद्धी हे वरदान दिले आहेत. इतर प्राण्यांच्या तुलनेत मानवाने जो विकास केला आहे तो याच दोन वरदानांच्या जोरावर केला आहे. परंतु या विकासालाही अंधश्रद्धा, गूढवाद, दैववाद, धार्मिकता यामुळे वेळोवेळी खीळ बसत आली आहे. मानवाने स्वतःच्या सोयीसाठी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर निर्माण केलेल्या व्यवस्थाच मानवी विकासात बाधक होत होत्या. तरीही मानव परंपरावादाच्या आहारी जावून स्वतःच्या स्वातंत्र्याला नष्ट करत आला. धार्मिकतेबाबतही तसेच आहे. धर्माची निर्मिती मानवाने केली, मात्र कालांतराने धर्माने मानवी जीवनावर नियंत्रण मिळवले. शासनव्यवस्थांच्या बाबतही तसेच आहे. भांडवलशाही असो की समाजवादी असो. दोन्ही विचारप्रणालींवर आधारीत शासनव्यवस्था मानवी बुद्धीची निर्मिती आहे, परंतु आता दोन्ही विचारप्रणाली मानवालाच बुद्धीच्या जोरावर चिकित्सा करण्यास मनाई करतात.

रॉय यांच्या मते मानवाला आपल्या बुद्धीप्रामाण्यतेच्या आधारवर सतत आपल्यासाठी योग्य त्या परिस्थिती निर्माण करत राहणे आवश्यक आहे. तरच तो आपले स्वातंत्र्य अबाधीत ठेवू शकेल.

### ५. विवेकनिष्ठ नैतिकता

ज्याप्रमाणे निसर्गाने मानवाला बुद्धी दिली आहे. त्याचप्रमाणे विवेक व नैतिकताही दिली आहे. मानवता-वादाचा आधार नैतिकताच आहे. मात्र मूलगामी मानवतावादात नैतिकतेला विवेक व बुद्धीप्रामाण्यतेची जोड आहे. म्हणजेच ही नैतिकता धर्माधिष्ठीत नाही तर ती वैज्ञानिक आहे. कोणत्या तरी गूढवादाच्या किंवा अंधश्रद्धेच्या भीतीने चांगले वागण्यापेक्षा मानवाने चांगले किंवा वाईट वागण्यामागचा कार्यकारण भाव जाणून घेतला पाहिजे आणि विवेक आणि नैतिकतेच्या कसोटीवर आपल्या वागण्याला तपासून घेऊन त्या मुलभूत प्रेरणेमधून इतरांशी व्यवहार करावा. एखाद्या मुक्या प्राण्याला मारल्याने पाप लागेल ही अंधश्रद्धा झाली. परंतु ज्याप्रमाणे आपणास लागल्यानंतर वेदना होता त्याप्रमाणेच त्या प्राण्यालाही वेदना होतील या भावनेने अशी कृती न करणे ही विवेकनिष्ठ नैतिकता आहे असे केल्यास आपोआपच मूलगामी मानवतावादाची पायाभरणी होईल.

### ४.३.४ रॉय यांच्या विचारांचे मूल्यमापन

मूलगामी मानवतावाद, संघटीत लोकशाही आणि नवमानवतावाद हे तीनही विचार रॉय यांच्या आयुष्याच्या अंतिम टप्प्यातील विचार आहेत. प्रत्येक विचाराची मांडणी रॉय यांनी स्वतंत्रपणे केलेली असली तरी हे तीनही विचार परस्परसंबधीत आहेत.

आपल्या आयुष्याच्या अंतिम पर्वात रॉय यांनी नवमानवतावादाची मांडणी केली. राष्ट्रवादापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास हा मार्क्सवादामार्गे नवमानवतावादावर येऊन थांबतो. वैचारिक पातळीवर हा प्रवास अतिशय रोमांचक असा आहे. स्वातंत्र्याच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या प्रखर राष्ट्रवादामुळे रॉय यांना मार्क्सवादाशी जुळवून घेण्यात अडचण आली नाही. मार्क्सवादातील मानवतावाद हे मूल्य आत्मसात केल्यामुळे त्यांचा पुढे नवमानवतावादापर्यंतच प्रवासही अडचणीचा ठरला नाही. परंतु एका अर्थाने हा प्रवास मूल्यांच्या अंतर्विरोधाचा म्हणावा लागेल. प्रखर राष्ट्रवादात राष्ट्र व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ ठरते. मार्क्सवादात किंवा साम्यवादात समाज व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ ठरतो तर मानवतावादात राष्ट्र आणि समाजापेक्षा मानव श्रेष्ठ ठरतो. या अर्थाने त्यांचा प्रवास राष्ट्रापासून सुरू होतो आणि समाजामार्गे व्यक्तिस्वातंत्र्यावर येऊन थांबतो.

कोणत्याही विचारवंताच्या विचारांचे मूल्यमापन करण्यासाठी आपणास त्या विचारवंताचे वैचारिक अधिष्ठान आणि त्याचा समाजावरील परिणाम या दोन अंगाने परिक्षण करावे लागते. रॉय यांच्या विचारांचा पाया हा भौतिकवाद, वैज्ञानिकता, बुद्धिप्रामाण्यता, धर्मनिरपेक्ष नैतिकता आणि व्यक्तिस्वातंत्र्य या प्रमुख तत्त्वांवर आधारलेला आहे. गेल्या ७०-८० वर्षात मानवाने जी प्रगती आहे ती देखील भौतिकवाद, बुद्धीप्रामाण्यता आणि विज्ञानाच्या जोरावर केली आहे. आज जगातील धार्मिक संघर्षाला प्रभावी औषध म्हणजे रॉय यांची धर्मनिरपेक्ष नैतिकता होय. याद्वारेच आपण दहशतवादासारख्या समस्येचेही निराकरण करू शकतो. समाजवाद असो की उदारमतवाद असो दोन्ही व्यवस्था व्यक्तिस्वातंत्र्याच्या कसोटीवर असफल ठरणार आहेत हे रॉय यांचे भाकीत आज खरे होताना दिसतो. यावर उत्तर म्हणजे त्यांचे मूलगामी लोकशाही आणि नवमानवतावाद. तेव्हा वैचारिक अधिष्ठानाच्या कसोटीवर रॉय हे उपयुक्त ठरतात.

मात्र रॉय यांच्या विचारांची प्रत्यक्ष परिणामकारकता व्यवस्थेच्या रूपाने दिसत नाही. मूलगामी लोकशाही आणि नवमानवतावादाचे विचार त्यांनी आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात भारतात मांडलेले विचार आहेत. मात्र या विचारांची घ्यावी तितकी दखल भारतात घेतली गेली नाही असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. मुळात पक्षीय रचनेवर आधारीत भारतीय राजकीय व्यवस्थेला पक्षविरहित लोकशाहीचा विचार रुचला नाही. तसेच बहुधार्मिक असणारा भारतीय समाज सहिष्णू असला तरी तो कमालीचा धार्मिक आहे. त्यामुळे त्याला धर्मनिरपेक्ष नैतिकतेचा विचार पचला नाही. अशाच अनेक कारणांनी रॉय यांचे विचार प्रत्यक्षात येऊ शकले नाहीत ही शोकांतिका आहे.

## ४.३ सारांश

२० या शतकातील अतिशय प्रतिभावान विचारवंत म्हणून मानवेंद्रनाथ रॉय यांची गणना होते. स्वतःच्या काळाच्याही पुढे अनेक शतके पाहण्याची दृष्टी अतिशय कमी विचारवंतांमध्ये असते. रॉय यांचे नाव अशाच श्रेणीत येते. त्यांचे जीवन त्यागमय होते. रोमांचकारी होते तसेच विफलतांनी भरलेले होते. तरीही मातृभूमीसाठी त्यांची श्रद्धा-प्रेम व भक्ती निस्सीम होती. म्हणूनच आयुष्यभर भ्रमंती करून शेवटी ते भारतातच स्थीर झाले आणि आपले सर्वश्रेष्ठ विचार त्यांनी भारतासाठीच मांडले. परंतु दुर्दैवाने हे विस्मरणात जात आहेत. वर्तमानात गरज आहे ती त्यांच्या विचारांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करून त्यांना पुनरुज्जीवीत करण्याची.

## ४.४ पारिभाषिक शब्द

**मार्क्सवाद** : १९ व्या शतकात युरोपमध्ये कार्ल मार्क्स या विचारवंताने समताधिष्ठित समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने - वर्गसंघर्ष - इतिहासाची भौतिक मीमांसा, अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत कामगारांची क्रांती व वर्गविहिन-राज्यविहीन समाजरचना इ. विचारांची मांडणी केली. या विचारांना एकत्रितपणे मार्क्सवाद संबोधले जाते.

**मूलगामी लोकशाही** : उदारमतवादी लोकशाही आणि समाजवादी राजकीय व्यवस्थांमधील दोष दूर करण्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्य, लोकसमित्यांद्वारे शासन, पक्षपद्धतीला विरोध, नवीन अर्थव्यवस्था आणि शिक्षणाद्वारे प्रबोधन या वर आधारीत राजकीय व्यवस्था म्हणजे मूलगामी लोकशाही होय.

**नवमानवतावाद** : आपल्या आधीच्या मानवतावादातीत काही बाबतीत सुधारणा करून बुद्धीप्रामाण्यता, वैज्ञानिक दृष्टीकोन, व्यक्तिस्वातंत्र्य, विवेकनिष्ठ नैतिकता या आधारावर मानवतावादाची नव्याने रॉय यांनी केलेली मांडणी म्हणजे नवमानवतावाद होय.

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्न

**(अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. मानवेंद्रनाथ यांचे मूळ नाव .......... होते.

(अ) देवेंद्रनाथ (ब) नरेंद्रनाथ (क) सुरेंद्रनाथ

२. रॉय यांच्यावर मार्क्सवादाचा प्रभाव .......... या सालापासून दिसून येतो.

(अ) १९१८ (ब) १९३६ (क) १९४६

३. रशियाच्या .......... या नेत्यावर रॉय यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता.

(अ) माओ (ब) स्टॅलिन (क) लेनिन

४. भौतिकवाद, शोषणमुक्त समाज आणि मानवतावाद या मार्क्सच्या विचारांशी रॉय हे ........ होते.

(अ) असहमत (ब) सहमत (क) सांगता येत नाही

५. मार्क्सच्या वर्गसंघर्ष, अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत, राज्यविहीन समाज या विचारांशी रॉय ...... होते.

(अ) असहमत (ब) सहमत (क) सांगता येत नाही

६. रॉय यांनी मूलगामी लोकशाही बाबतची मांडणी ............. या ग्रंथात केली आहे.

(अ) बीयाँड कम्युनिझम (ब) न्यू ह्युमॅनिझम : ए मेनिफेस्टो

(क) दि प्रॉब्लेम ऑफ फ्रिडम

७. रॉय यांच्या मते .......... ही व्यवस्था नवमानवतावादासाठी पूरक आहे.

(अ) साम्यवादी शासन (ब) उदारमतवादी लोकशाही

(क) मूलगामी लोकशाही

८. मूलगामी लोकशाहीमध्ये ............. असेल.

(अ) भांडवलशाही (ब) साम्यवाद (क) सहकारी अर्थव्यवस्था

९. रॉय यांनी नवमानवतावादाची मांडणी ............. या ग्रंथात केली आहे.

(अ) बियाँड कम्युनिझम (ब) न्यू ह्युमॅनिझम : ए मॅनिफेस्टो

(क) दि प्रॉब्लेम ऑफ फ्रिडम

१०. रॉय यांनी नवमानवतावादाची ............तत्त्वे सांगितली.

(अ) १४ (ब) २२ (क) १०

११. रॉय यांचा ............याला विरोध होता.

(अ) बुद्धिप्रामाण्यता (ब) विवेकनिष्ठ (क) नैतिकता (ड) दैववाद

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. रॉय यांचे नवमानवतावादाबाबतचे विचार स्पष्ट करा.

२. रॉय यांनी मूलगामी लोकशाहीबाबत केलेल्या मांडणीची चर्चा करा.

**टीपा लिहा.**

१. रॉय यांचा वैचारिक प्रवास

२. रॉय यांचे मार्क्सवादाबाबतचे विचार

३. रॉय यांचे उदारमतवादी लोकशाही बाबतचे विचार

## ४.७ संदर्भ : अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

१. भोळे भा. ल. : आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर.

२. रॉय एम. एन. : न्यू ह्युमॅनिझम – ए मॅनिफेस्टो : रेनेसा पब्लिशर्स, कोलकाता.

३. स्प्रेट फिलीप व रॉय एम. एन. : बियाँड कम्युनिझम, अजंठा पब्लिकेशन, दिल्ली.